





# मानवी कल्याणाचे शिल्पकार




- लेखक -

**प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर**

M.com., M.A., L.L.M., M.P.M.,
D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., PhD.



# मानवी कल्याणाचे शिल्पकार

लेखक : प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर
M.com., M.A., L.L.M., M.P.M.,
D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., PhD.

**मानवी कल्याणाचे शिल्पकार**

- © **लेखक :** प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर

- प्रकाशक :

**ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन**

४०३ ए, चौथा मजला, शिवाई २, पर्वती पायथा,
राष्ट्र सेवा दलाजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११०३०.
संपर्क : **९८२२०३०२१७, ७७५८०३०२१७**
**Email :** gautamkotwal2016@gmail com,
greenworld932@gmail.com

- **ISBN No.: 978-93-88856-24-9**

- कव्हर व आतील मांडणी :
**आशिष जाधव,** वारजे, पुणे

- मुद्रितशोधन :
**नजीर शेख**

- मुद्रणस्थळ :
**व्हीजन ग्राफीक्स**

- प्रथम आवृत्ती :
**जानेवारी २०२५**

- मूल्य : **रु. ३००/-**



**श्रीपाल सबनीस**
मा. अध्यक्ष,
मराठी साहित्य संमेलन व ज्येष्ठ साहित्यिक

# प्र स्ता व ना

'मानवी कल्याणाचे शिल्पकार' हा डॉ. सुधाकरराव जाधवर यांचा वैचारिक ग्रंथ भारतीय संस्कृतीच्या मानदंडाचा वेध घेणारी अभिजात कलाकृती आहे. वर्तमानकाळ आदर्शांच्या बाबत वांझ असला तरी प्राचीन अर्वाचीन काळातील विविध जात धर्मातील संत महापुरुषांनी समाजाला समर्पित होऊन मानवतावादाची पेरणी केली, त्या सर्वांच्या बेरजेची शिदोरी नव्या पिढीसाठी डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी अभ्यासपूर्वक अधोरेखीत केली आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत सावता माळी महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज ते संत गाडगेबाबापर्यंतच्या लोककल्याणकारी संतत्वाचा ठेवा या वैचारिक ग्रंथात लेखक डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी उपलब्ध करून दिला आहे. संत आणि संतत्व या लेखनाचे केंद्र आहे. संसारात राहूनही नित्य जागृत असावे, हा संत नामदेवांचा उपदेश या लेखनाने सन्मानित केला आहे. महाराष्ट्राचा भूगोल ओलांडून संत नामदेव महाराज उत्तर भारतातील

घुमानपर्यंत पोहोचले. त्यांनी समाजाची आध्यात्मिक जागृती केली आणि शीख-हिंदू हा संवाद साधून महाराष्ट्राची नाळ पंजाब राज्याशी जुळवून राष्ट्रीय पूल बांधला. ज्ञानेश्वरांनी अभिजात मराठीचा अभिमान वाढवला आणि वारकरी संप्रदायाला मूल्य पुरवठा केला. ज्ञानदेव आणि नामदेवांनी तीर्थयात्रा करून संतत्वाची तळमळ अभिव्यक्त केली.

संत चरित्राचा संशोधनात्मक शोध घेऊन डॉ. जाधवर यांनी संतांचे चरित्र व चारित्र्य नव्या पिढीसमोर आवर्जून ठेवले. संत एकनाथ महाराज म्हणजे सदगुणांचा अक्षय अमृतकुंभ असे सुंदर व प्रत्ययकारी वर्णन डॉ. जाधवर करतात. त्यांच्या क्षमाशीलतेचा गौरव करतात. एकनाथांनी केलेल्या ज्ञानेश्वरीच्या संशोधनाचा सन्मान करतात. भारुडाची जादू स्पष्ट करतात. सामाजिक समतेसाठी तळमळणाऱ्या संत एकनाथांची प्रतिभा लेखकाने सुंदर शैलीत वर्णिली आहे. जातपातविरहीत लोकसेवा हेच संत एकनाथ महाराजांचे मुख्य वैशिष्ट्य असल्याचे लेखक डॉ. जाधवर सांगू पाहतात.

कर्मात विठ्ठलाचे दर्शन घेणारे संत सावता माळी महाराज आपल्या अभंगातून अंधश्रद्धा व कर्मठपणावर प्रहार करताना दिसतात. अभंग संख्या कमी असली तरी सावता माळी यांचे संतत्व त्यांच्या शुद्ध अंत:करणातून पाझरत असल्याचा लेखकाचा निष्कर्ष महत्त्वाचा आहे.

संत तुकाराम महाराजांच्या चरित्राचा त्रोटक आढावा या लेखनात आला आहे. सम्यक दृष्टी देणारा, मानवी मूल्यांची पेरणी करणारा, रंजल्या-गांजल्यांविषयी कळवळा असणारा संत तुकाराम महाराज डॉ. जाधवरांच्या शब्दशैलीतून सादर झालाय. वारकरी संतांसह गाडगेबाबांच्या कार्याचा धावता आढावा या ग्रंथात लेखकाने घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कर्तृत्वाचा गाडगेबाबांशी संबंध जुळवून त्यांचे आपासातील अनुबंध या लेखनात लेखक डॉ. जाधवर यांनी अधोरेखित केले आहे. मुख्यमंत्री खेर यांनी गाडगेबाबांना साष्टांग दंडवत घालून आदर व्यक्त केल्याचा प्रसंग नाट्यपूर्ण आहे. त्यावरून गाडगेबाबांचे महत्त्व लक्षात येते. बंद पडलेले शाळेचे अनुदान मुख्यमंत्र्यांनी पुन्हा चालू करून गाडगेबाबांचे सत्कार्य सन्मानित केले. त्यांच्या कीर्तनाचे अंतरंग लोककल्याणकारी असल्याचे सत्य

महत्त्वाचे ठरते.

डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी ऐतिहासिक महापुरुषांच्या चरित्रालासुद्धा उजाळा दिला आहे. नव्या पिढीच्या उत्थानासाठी ऐतिहासिक आदर्श महत्त्वाचे ठरतात. त्यांची प्रेरणा नव्या पिढीतील प्रत्येकासाठी उपयुक्त असल्याचा लेखकाचा विश्वास आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी, चक्रवर्ती सम्राट यशवंतराव होळकर अशा कर्तृत्ववान व्यक्तींचा यथार्थ गौरव या पुस्तकात केलेला आहे. विशेष म्हणजे जात न पाहता या महान कर्तृत्वांचे दर्शन डॉ. जाधवर घडवतात. कारण महान योद्ध्यांना व महापुरुषांना जात नसते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सविस्तरपणे मांडून लेखकाने नव्या पिढीला जागृत केले आहे. अहिल्याबाई होळकरांच्या कारकिर्दीत झालेल्या समाजातील सुधारणांची यादी मोठी आहे. त्याच पराक्रमी होळकरांच्या वारशात यशवंत होळकरांचा उपेक्षित विक्रम लेखकाने जाणीवपूर्वक मांडला आहे. संपूर्ण वाताहात झाल्यावरसुद्धा मराठा राज्याच्या एकत्रीकरणासाठी प्रयत्न व पराक्रम करणाऱ्या राजा यशवंतराव होळकरांचे कार्यकर्तृत्व पुढील पिढ्यांना प्रेरक असल्याचे सत्य समजून घ्यावे लागते.

सन १८५७ च्या उठावातील झाशीच्या राणीचा पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठा डॉ. जाधवर यांनी वंदनीय मानून प्रेरणादायी चरित्र वाचकासमोर ठेवले आहे. छत्रपती व संत महात्म्यांची प्रगत विचारांची प्रेरणा घेऊनच वासुदेव बळवंत फडके या क्रांतिकारकांच्या कार्याचा शोध घेता येतो. इंग्रजी राजवटीविरुद्ध बंड पुकारणाऱ्या या देशभक्तांच्या चरित्राला व क्रांतीकार्याला लेखकाने समर्थ न्याय दिला आहे.

वर्तमानातील जातीय भूमिकेतून इतिहास पुरुषांचे मूल्यमापन करण्याची सदोष परंपरा डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी नाकारली आहे. त्याच दूषित पर्यावरणात राहूनसुद्धा लेखक जाधवर यांच्या प्रतिभेला जातीयवादाची बाधा झाली नाही, हे विशेष! त्यांचा विवेक इतिहास आकलन करताना व त्याचे विश्लेषण करताना शाबूत आहे, म्हणूनच ब्राह्मण-ब्राह्मणेतर सैद्धांतिकतेचे विष टाळून त्यांनी ब्राह्मण झाशीची राणी व वासुदेव बळवंत फडके, धनगर अहिल्याबाई व यशवंतराव होळकर, मातंग लहूजी वस्ताद अशा समाजनायकांचे

सम्यक दर्शन या लेखनातून घडविले आहे.

डॉ. जाधवर यांनी गांधीतला महात्मा आणि स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांचा यथोचित शब्दांत गौरव आणि सन्मान केला आहे. भारत छोडो व आझाद हिंद सेनेचा सूत्ररूप इतिहास त्यामधील सूक्ष्म तपशिलासह लेखकाने या लेखनात मांडला आहे. अहिंसात्मक व शस्त्र-अस्त्रांच्या दोन मार्गांनी झालेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे सम्यक दर्शन महात्मा गांधी आणि नेताजींच्या चारित्र्यातून घडते. अर्थात या दोन महापुरुषांच्या इतिहासात संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा सारांश सामावला आहे.

हिंदू धर्माचे आदर्श प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंदांच्या जागतिक धर्म परिषदेतील भाषणाचा गौरव करून लेखक डॉ. जाधवर यांनी शुद्ध अध्यात्माचा सन्मान केला आहे. सहिष्णू व उदार हिंदुत्वाची जगाला ओळख करून दिली आहे. आजच्या संकुचित हिंदुत्ववादी धर्मकारण व राजकारणाच्या पार्श्वभूमीवर शुद्ध व सहिष्णू हिंदुत्वाची विवेकानंद प्रणित थोरवी निर्णायक व महत्त्वाची ठरते.

शिक्षणाशिवाय बहुजनांचा उद्धार अशक्य मानून समताधिष्ठित समाजासाठी कर्मवीर भाऊराव पाटलांनी केलेल्या अथक प्रयत्नाचा लेखाजोखा लेखक डॉ. जाधवर यांनी सप्रमाण व सविस्तर मांडला आहे. गाडगेबाबा, सयाजीराव गायकवाड, डॉ. नागनाथ नाईकवाडी यांच्या कार्याचा अनुबंध भाऊराव पाटलांशी जोडून लेखकाने त्यांच्या शैक्षणिक कार्याची नोंद घेतली आहे. मुख्य म्हणजे शाहू महाराज, गाडगेबाबा, अब्दुल कलाम आझाद अशा महापुरुषांची नावे आपल्या शाळांना देऊन सर्वधर्मीय मानदंडाची पुण्याई बेरजेमध्ये स्वीकारत भाऊराव अण्णांनी राष्ट्रीय कार्य केल्याची नोंद अर्थपूर्ण आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजक्रांती आणि राष्ट्राच्या उभारणीतील योगदान समर्थपणे डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी वर्णिले आहे. संपूर्ण जीवनकार्याचा सम्यक वेध घेताना त्यागमूर्ती रमाईचे लेखकाने घडवलेले दर्शन प्रत्ययकारी आहे. बाबासाहेब आणि रमाई यांनी स्वत:च्या मुलांच्या मृत्यूचे भोगलेले दु:ख अफाट आहे आणि त्याची शोकात्म नोंद लेखकाने घेतलेली आहे. त्यावरून डॉ. सुधाकरराव जाधवर यांच्या संवेदनशीलतेची साक्ष पटते. महाड सत्याग्रह, गोलमेज परिषद, मंदिर प्रवेश आणि धर्मांतर अशा आंबेडकरी पर्वाच्या

साक्षीने डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी बाबासाहेबांचे चरित्र व चारित्र्यसुद्धा वाचकासमोर ठेवले आहे.

लहुजी वस्तादांच्या तालमीतून शेकडो राष्ट्रभक्त तरुणांनी प्रशिक्षण व प्रेरणा घेतल्याची नोंद अर्थपूर्ण आहे. महात्मा फुले व लोकमान्य टिळकांच्या या अज्ञात गुरूंच्या कार्याची माहिती डॉ. जाधवर यांनी प्रकाशात आणली आहे. उमाजी नाईकांचे बंडही लहुजी वस्तादाच्या कार्याचा आढावा घेताना लेखकाने वर्णिले आहे. उपेक्षित जात प्रवाहातून राष्ट्रभक्तीचे प्रतिनिधित्व करणारे नायक लहुजी आणि उमाजी नाईकांच्या रूपाने लेखकाने सन्मानित केले आहेत. इंग्रजांविरुद्ध सर्व प्रांताचे राष्ट्रभक्त लढल्याचा इतिहास प्रेरक आहे, या सत्याची मांडणी या लेखनातून समजून घेता येते आणि भारतीय स्वातंत्र्य कुठल्या एका जातीने वा धर्माने मिळविले नसून, स्वातंत्र्य लढ्यात सर्वांचेच योगदान असल्याचे सत्य डॉ. सुधाकरराव जाधवर सांगू पाहतात.

भारतीय स्वातंत्र्य व सार्वभौमत्व सुरक्षित ठेवण्यासाठी नवी पिढी सक्षम व जागृत व्हावी, त्यांचे सर्वांगीण प्रबोधन व्हावे हा प्रामाणिक हेतू मनाशी बाळगून या ग्रंथाचे लेखन झाल्याचे जाणवते. मुख्य म्हणजे या लेखनात भक्ति-शक्तिच्या नायकाची बेरीज आहे. संत, महापुरुष, समाजक्रांतिकारक, महात्म्ये, शिक्षणमहर्षी यांविषयीचे लेखन म्हणजे सर्व प्रवाही सामर्थ्याची बेरीज आहे. आण्णा भाऊ साठे यांच्या उपेक्षित साहित्य सेवेची नोंदही लेखकाने आवर्जून घेतलेली आहे.

संस्कृतीचे संचित सर्व जात धर्मात व प्रवाहातून उदयाला येते. मानवाचे कल्याण त्या सर्व प्रवाही पुण्याईच्या बेरजेतूनच घडते. म्हणून डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी सर्वच सांस्कृतिक मानदंडाची बेरीज आपल्या ग्रंथात केली आहे. त्यातून बहुसांस्कृतिक एकता व राष्ट्रीय एकात्मता साध्य होईल. विश्व मानवता सुखी करण्यासाठीसुद्धा सर्वांच्या शहाणपणाची व सत्याची बेरीजच आवश्यक आहे, म्हणून हा ग्रंथ निर्णायक महत्त्वाचा आहे. डॉ. सुधाकरराव जाधवर यांचे या ४९५ क्रमांकाच्या प्रस्तावनेत हार्दिक अभिनंदन!

**- श्रीपाल सबनीस**

V



**प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर**
M.com., M.A., L.L.M., M.P.M.,
D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., PhD.
**मा. मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य :**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
**माजी डीन :** वाणिज्य विद्या शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
**सरचिटणीस :** प्रिन्सिपल फोरम
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**सरचिटणीस :** महाराष्ट्र स्टेट प्रिन्सिपल फेडरेशन
**मा. सदस्य :** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, महाराष्ट्र राज्य
**अध्यक्ष :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स
**अध्यक्ष :** ऑल इंडिया प्रिन्सिपल फेडरेशन

## मनोगत

महाराष्ट्राच्या पठारावर आणि सह्याद्रीच्या काताळावर संघर्ष हा शब्द कोरलेला आहे. मर्द मराठी मनगटांनी कितीतरी साम्राज्यवादी आक्रमणं परतवून लावत हा देश व समाज सुरक्षित ठेवला. हिमालय संकटात असताना सह्याद्री नेहमीच मदतीला धावून गेला. देशाला दिशा दाखविण्याचे कार्य महाराष्ट्राने अविरत केले. भागवत धर्माची पताका घेऊन स्नेह, समर्पण आणि सहिष्णुतेची बिजं इथल्या वारकरी सांप्रदायाने महाराष्ट्राच्या मातीत रुजवली. संतांनी इथल्या मानवी जीवनाला नितीमूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून महाराष्ट्रासह देशाची आध्यात्मिक व सांस्कृतिक बैठक व्यापक केली. दुसरीकडे बल, बुद्धी व विद्येच्या जोरावर इथल्या रत्नांनी देशाला दिशा दाखवित दिल्लीचेही तख्त राखले. हिमालय जेव्हा कधी संकटात आला, तेव्हा सह्याद्री नेहमीच मदतीला धावून गेला. महाराष्ट्र काळासोबत चालत राहिला

आणि काळानुरूप आधुनिक झाला. या आधुनिक महाराष्ट्रासह प्रगत भारत राष्ट्रनिर्मितीच्या यज्ञकर्मात ज्यांनी समर्पित भावनेने आपले अवघे आयुष्यच समिधा म्हणून स्वाहा केले, त्या रत्नांचे स्मरण करण्याचा केलेला छोटासा प्रयत्न म्हणजे मानवी कल्याणाचे शिल्पकार ही पुस्तिका होय.

शिक्षण हे मानवी प्रगती व विकासाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे, हा विचार महापुरुषांच्या विचारांना स्पर्श करताना प्रकर्षाने जाणवला. त्यामुळेच या क्षेत्रात सर्व स्तरातील घटकांना स्वउत्कर्षाची संधी विनासायास प्राप्त व्हावी, या उद्देशाने मी शैक्षणिक क्षेत्रातच काम करण्याचे निश्चित केले. ''बल, बुद्धी आणि सद्विचारासाठी शिक्षण'' या व्हिजनसह कैलासवासी उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशन तिच्या स्थापनेपासूनच नॉलेज हब म्हणून उदयास आणण्यासाठी माझे आजवर प्रयत्न राहिले आहे. उपनगरात वसलेले हे महाविद्यालय युवकांना विजेते व्यक्तिमत्त्व आणि सर्वगुणसंपन्न मानव म्हणून विकसित करण्यासाठी मूल्यावर आधारित शिक्षण प्रदान करते. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रनिर्मितीच्या भावनेची क्षमतावृद्धी घडवून आणणे, हा या शिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे नेतृत्व अध्यक्ष या नात्याने मी आजवर केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता म्हणून मी माझा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या कालावधीत प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात मी यशस्वी राहिलो. इतकेच नव्हे तर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांमध्येही माझा सहभाग उल्लेखनीय राहिला. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, महाराष्ट्र राज्यासह सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेच्या प्रिन्सिपल फोरमचे सरचिटणीस म्हणून काम करण्याची संधी मला प्राप्त झाली.

केवळ शैक्षणिक व सामाजिकच नव्हे तर वाणिज्य क्षेत्रातही मी माझ्या परीने उल्लेखनीय योगदान देण्याचा प्रयत्न केला. जय हिंद को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पिंपरी-चिंचवडच्या अध्यक्ष पदावरही मी कार्यरत राहिलो. याचदरम्यान, भारतीय विकास संस्था, बीड या संस्थेच्या खजिनदार पदावरही काम पाहिले. चंद्रकांत यशवंत दांगट पाटील शिक्षण व क्रीडा मंडळ, पुणे, धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे, स्व. चंद्रकांत दांगट पाटील अलिअस

चंदर पाटील सार्वजनिक वाचनालय, पुणे, आदित्य एज्युकेशनल फाउंडेशन, पुणे, निनाईदेवी एज्युकेशनल ट्रस्ट, पुणे, सोलापूर जिल्हा शैक्षणिक प्रतिष्ठान या संस्थांच्या सचिव पदाची धुराही मी समर्थपणे वाहिली. प्राध्यापक म्हणून २२ वर्षे निरंतर सेवा केल्यानंतर सन २००६ पासून शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून मी काम पाहिले.

अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, व्हॅटिकन सिटी, बेल्जियम, स्वित्झर्लंड, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, श्रीलंका, दुबई, शारजाह, अबूधाबी, मॉरीशस, चीन, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया, नेपाळ इत्यादी देशात केलेल्या अभ्यास पर्यटनातून भारतीय शैक्षणिक धोरण व शैक्षणिक सुधारणा याबाबत विपुल अभ्यास केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ६, राष्ट्रीय स्तरावरील १०, राज्यस्तरीय चर्चासत्र २०, विद्यापीठ स्तरावरील २० चर्चासत्र व परिषदांतून मी आपले शैक्षणिक निरीक्षणे व अनुभव उदधृत करत कालसुंसगत शिक्षण पद्धतीचे, परंतु चिरंतन शाश्वत मानवी मूल्यांची वृद्धी घडवून आणणाऱ्या आपल्या सभ्यता व संस्कृतीचे समावेशन वर्तमान शैक्षणिक व्यवस्थेत करण्याबाबत आपले प्रगत विचार वेळोवेळी मांडले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मध्य वाणिज्य विद्याशाखेचे डीन, व्यवसाय व्यवहार मंडळ, व्यवसाय कायदा मंडळ, वाणिज्य विद्याशाखा, ३२ (५) समिती या संस्थांवर अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना शैक्षणिक परिषद व सिनेट सदस्य  म्हणूनही मी जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत वाणिज्य विद्याशाखेमधले कॉस्ट ॲन्ड वर्क्स अकाउंटिंग व व्यवसाय कायदा या विषयाशी संबंधित पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. तसेच माझी आजवर चार पुस्तके व बिझनेस प्रॅक्टीस आर्टिकल्स नावाचा एक संदर्भ ग्रंथही प्रकाशित झाला आहे. राष्ट्रीय स्तरावर जवळपास १२ तर आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण ४ आर्टिकल्स प्रकाशित केली आहेत.

शिक्षण व विद्याशाखांचा उपयोग आपल्या आसपासच्या समाजातील विद्यार्थ्यांना कसा करून देता येईल, याची काळजी मी आजवर वाहिली आहे. एक अशी शिक्षण संस्था असावी, जेथे केवळ विद्यार्थी नाही, तर माणूस घडेल

यादृष्टीने मी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटची स्थापना केली. आजमितीस २५ हजारांहून अधिक विद्यार्थी या महाकाय संस्थेत ज्ञानाचे धडे गिरवत आपल्या प्रकाशवाटा उज्वल करीत आहेत. तळागाळातील मुलेही जेव्हा स्पर्धात्मक शिक्षणपद्धतीत अव्वल ठरतात, तेव्हा आपण सुरू केलेला ज्ञानयज्ञ व आजवर केलेली ज्ञानसाधना सफल झाली, ही बाब कमालीचे समाधान देऊन जाते. हे समाधानच आयुष्यातील माझी सर्वात मोठी कमाई असल्याचे मी मानतो.

सन २०२० मध्ये केवळ भारत देशच नाही, तर अवघे विश्वच कोविड-१९ या महामारीमुळे एका अस्वस्थ वर्तमानाचे भागीदार ठरले. पण, या अस्वस्थ वर्तमानातही सामान्य माणसाला चिरंतन शाश्वत मूल्यांच्या आधारे समोर आलेल्या संकटाला सामर्थ्याने सामोरे जाता यावे, यासाठी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या व्यासपीठावर सोशल मीडियातून मी एक व्याख्यानमाला चालविली. या व्याख्यानमालेतून संतमहात्म्यांच्या प्रागतिक विचारांना उजाळा देत मी सामान्य माणसाच्या आयुष्यात आशेचा किरण तेवत राहील, यासाठी प्रयत्न केले. संत व महापुरुषांच्या जीवन, कार्य व विचारांना या व्याख्यानमालेतून उदधृत करत सामाजिक प्रबोधनाची वहिवाट आपल्या परीने प्रशस्त करण्याचा प्रयत्न मी केला.

**दिसा माजी काही तरी ते लिहावे ।**
**प्रसंगी अखंडित वाचीत जावे ।।**
**जे जे आपणासी ठावे । ते ते इतरांसी शिकवावे ।**
**शहाणे करून सोडावे सकल जन ।।**

या समर्थ रामदास स्वामींच्या वचनांना स्मरत मी माझ्या आजवरच्या शैक्षणिक व सामाजिक प्रवासात विविध संत व महापुरुषांचे ज्वलंत विचार, जीवन व कार्य मला अभ्यासण्याचा प्रयत्न केला. या अध्ययनात माझ्या अल्पमतीला जे सुचले ते कोविड-१९ काळात व्याख्यानमालेच्या माध्यमातून मी आपणासोबत सामायिक करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रचलित मराठी भाषेत मी उदधृत केलेले विचार हे प्रमाण मराठी भाषेत या पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर पुस्तिकेत काही भाषिक व साहित्यिक बदल ओघाने आले आहेत.

मानवी जीवनाला नैतिक मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून त्यांच्या सर्वांगीण उन्नती व उत्कर्षासाठी जीवन समर्पित करणाऱ्या प्रत्येक संत महापुरुषाबद्दल मला नितांत आदर आहे. संत व महापुरुषांच्या जीवन व कार्याबाबत माहिती देताना या पुस्तिकेत शब्दबद्ध झालेल्या घटना, घडामोडी व अनुषंगिक माहिती याबद्दल वाचकांनी संदर्भांकित माहितीसह दुरुस्ती सुचविली तर मला आनंदच होईल. वाचकांच्या अभिप्रायांसह सूचनांचे स्वागतच असेल. या पुस्तिकेतील लेखांची क्रमवारी ही संत महापुरुषांच्या जीवन कालखंडानुसार निश्चित करण्यात आली आहे. त्यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत प्रागतिक विचारांची सुधारणावादी चळवळ व्यापक व गतिमान करणे हाच माझा या पुस्तिकेच्या निर्मितीमागील प्रांजळ उद्देश आहे. यासाठी माझ्या सोशल मीडियातील व्याख्यानांना शब्दबद्ध करत 'मानवी कल्याणाचे शिल्पकार' ही पुस्तिका प्रकाशित करण्याचे काम ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनने पाहिले. ही पुस्तिका थोरामोठ्यांसह बालमनाचे भरणपोषण व निकोप सामाजिक विकासाच्या प्रक्रियेचे प्रतिनिधित्व करत सुशिक्षित व सजग समाजनिर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देईल, याची मला खात्री आहे.

**- प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर**

V

# - अ । नु । क्र । म । णि । का -


| | | |
|---|---|---|
| ०१ | **संत शिरोमणी नामदेव महाराज**<br>इ.स.२६ ऑक्टोबर १२७० ते इ.स. ३ जुलै १३५० | १५ |
| ०२ | **संत सावता माळी महाराज**<br>इ.स. १२५० ते इ.स. १२ जुलै १२९५ | २४ |
| ०३ | **संत ज्ञानेश्वर महाराज**<br>इ.स. २२ ऑगस्ट १२७५ ते इ.स. २ डिसेंबर १२९६ | २९ |
| ०४ | **संत एकनाथ महाराज**<br>इ.स. ८ नोव्हेंबर १५३३ ते इ.स. २६ फेब्रु. १५९९ | ३४ |
| ०५ | **संत तुकाराम महाराज**<br>इ.स. २१ जानेवारी १६०८ ते इ.स. १९ मार्च १६५० | ४१ |
| ०६ | **क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज**<br>इ.स. १९ फेब्रुवारी १६३० ते इ.स. ३ एप्रिल १६८० | ४९ |
| ०७ | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर**<br>इ.स. ३१ मे १७२५ ते इ.स. १३ ऑगस्ट १७९५ | ९८ |
| ०८ | **चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर**<br>इ.स. ३ डिसेंबर १७७६ ते इ.स. २८ ऑक्टोबर १८११ | १०४ |
| ०९ | **क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे**<br>इ.स. १४ नोव्हेंबर १७९४ ते इ.स. १७ फेब्रुवारी १८८१ | ११० |
| १० | **क्रांतीसेनानी झाशीची राणी लक्ष्मीबाई**<br>इ.स. १९ नोव्हेंबर १८२८ ते इ.स. १८ जून १८५८ | ११७ |
| ११ | **सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके**<br>इ.स. ४ नोव्हेंबर १८४५ ते इ.स. १७ फेब्रुवारी १८८३ | १२५ |
| १२ | **स्वामी विवेकानंद**<br>इ.स. १२ जानेवारी १८६३ ते इ.स. ४ जुलै १९०२ | १३२ |

| | | |
|---|---|---|
| १३ | **राष्ट्रपिता महात्मा गांधी**<br>इ.स. २ ऑक्टोबर १८६९ ते इ.स. ३० जानेवारी १९४८ | १४१ |
| १४ | **राष्ट्रसंत संत गाडगेबाबा**<br>इ.स. २३ फेब्रुवारी १८७६ ते इ.स. २० डिसेंबर १९५६ | १५६ |
| १५ | **शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील**<br>इ.स. २२ सप्टेंबर १८८७ ते इ.स. ९ मे १९५९ | १६५ |
| १६ | **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>इ.स. १४ एप्रिल १८९१ ते इ.स. ६ डिसेंबर १९५६ | १७२ |
| १७ | **नेताजी सुभाषचंद्र बोस**<br>इ.स. २३ जानेवारी १८९७ ते इ.स. १८ ऑगस्ट १९४५ | १८४ |
| १८ | **साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे**<br>इ.स. १ ऑगस्ट १९२० ते इ.स. १८ जुलै १९६९ | १९३ |



संत शिरोमणी नामदेव महाराज



# संत शिरोमणी नामदेव महाराज

- जन्म: २६ ऑक्टोबर १२७० ते संजीवन समाधी : ३ जुलै १३५०

**संत नामदेव महाराज हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या कालखंडात होऊन गेले. वारकरी संप्रदायाचे प्रचारक नामदेव महाराज नाम वेदाचे व नामविदेचे आद्य प्रणेते असलेले महाराष्ट्रातील हे एक थोर संत होत. आपल्या कीर्तन कलेमुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला बोलायला लावणारे, अशी त्यांची कीर्ती होती. संत नामदेव महाराज प्रत्यक्ष श्री विठ्ठलाच्या निकट असलेला सखा होता, असे मानले जाते. संत नामदेव महाराज हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्याबाबतीत भावनिक व आध्यात्मिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी स्वकर्तृत्वाने केले.**

दामाशेट्टी हे संत नामदेव महाराजांचे वडील व गोणाई त्यांची माता होती. दामाशेट्टींचा व्यवसाय कपडे शिवणे हा होता, म्हणजे ते शिंपी होते. यांच्या अगोदरच्या सातव्या पिढीतील पुरुष यदूशेठ हे सात्विक प्रवृत्तीचे भगवद्‌भक्त होते. सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी बामणी नरसी नामदेव हे संत नामदेवांचे जन्मगाव होय. नामदेव महाराजांचा जन्म प्रभात नाम संवत्सरात शके ११९२ इ.स. १२७० मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीस रोहिणी नक्षत्रास रविवारी झाला. त्यांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्री विठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली.

संत गोरा कुंभार महाराज यांच्याकडे तेरढोकी येथे निवृत्तीनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज, सोपानदेव महाराज, मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, चोखामेळा, संत विसोबा खेचर आदी संतांचा मेळा जमला होता. याचप्रसंगी

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विनंतीवरून गोरोबाकाकांनी उपस्थितांच्या आध्यात्मिक तयारीविषयी आपले मतप्रदर्शन केले होते. या प्रसंगानंतरच संत नामदेव महाराज, संत विसोबा खेचर हे आध्यात्मिक गुरू म्हणून लाभले. पत्नी राजाई, मोठी बहीण आऊबाई, नारायण, विठ्ठल, गोंविंद, महादेव हे त्यांचे चार पुत्र व एक मुलगी लिंबा असा त्यांचा परिवार होता. त्यांच्या कुटुंबात एकूण १५ माणसे होती. स्वतःला नाम्याची दासी असे म्हणणाऱ्या संत जनाबाई या त्यांच्या परिवारातील एक सदस्य होत्या. संत नामदेव महाराजांच्या अभंग गाथेंतर्गत सुमारे २५०० अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांनी शीख भाषेत सुमारे १२५ पदे केली त्यातील सुमारे ६५ अभंग नामदेव जी की मुखबानी शीख पंथाच्या गुरुग्रंथसाहिबमध्ये गुरुमुखी लिपीत घेतलेले आहेत. संत नामदेव महाराजांनी आदी समाधी व तीर्थावळी किंवा तीर्थावली या गाथांतील तीन अध्यायातून संत ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र सांगितले आहे. कीर्तनात अनेक चांगल्या ग्रंथांचा उल्लेख असे. यावरून ते बहुश्रुत व अभ्यासू असल्याचे लक्षात येते.

नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग! अशी त्यांची योग्यता होती. नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी, हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून संत नामदेव महाराजांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५० वर्षे भागवत धर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले. पंजाबमधील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव नामदेव बाबा म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबातील शपथ कीर्तन व महाराष्ट्रातील वारकरी कीर्तन यात विलक्षण साम्य आहे. घुमान पंजाब येथे शीख बांधवांनी त्यांचे मंदिर उभारले आहे. बहुरदास लढविणुस्वामी, केशव कलाधारी हे त्यांचे पंजाबी शिष्य होत. राजस्थानातील शीख बांधवांनीही नामदेव महाराजांची मंदिरे उभारलेली आहेत. संत शिरोमणी असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते. भगवद भक्तांच्या व साधू संतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी पायरीचा दगड होण्यात त्यांनी धन्यता मानली.

संत नामदेव महाराज हे आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ मध्ये शनिवारी ३

जुलै १३५० रोजी पंढरपूर येथे पांडुरंग चरणी विलीन झाले. नक्की दिनांकाविषयी एक वाक्यता दिसून येत नाही. कालनिर्णय या दिनदर्शिकेत दिनांक २४ जुलै असा दिलेला आढळतो. संत नामदेव महाराज हे कीर्तने करत करत भारतभर फिरले. त्यांचे मूळ नाव नामदेव रेळेकर होते. त्यांची समाधी मंदिर पंढरपूर येथे आहे. ते नाथ संप्रदायातील वारकरी वैष्णव होत. त्यांचे गुरू विसोबा खेचर, तर शिष्य चोखामेळा होय. त्यांनी मराठी भाषेत साहित्यरचना केली. त्यांचा व्यवसाय कपड्याचा होता. त्यांचे वडील दामा शेट्टी आई गोणाई यांच्या सानिध्यात संत नामदेव महाराजांचे बालपण मजेत गेले. अगदी लहानपणापासूनच भक्त प्रल्हादासारखे होते. ते विठ्ठलाचे महान भक्त होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी जेव्हा त्यांनी बोलण्यास सुरुवात केली, तेव्हा दररोज त्यांची आई गोणाई त्यांना देवतांच्या पूजेसाठी विठोबाच्या मंदिरात घेऊन जात असत.

संत नामदेव महाराजांची विठोबाबद्दलची भक्ती इतकी निर्दोष आणि प्रामाणिक होती की कधी कधी ते त्याला त्यांचा सर्वात प्रिय भाऊ म्हणून मानत असत. एके दिवशी नामदेवची आई व्यस्त असल्याने तिने नामदेवाला विठोबाला नैवेद्याचे भोजन भरवण्यास सांगितले. नामदेव मंदिरात गेला आणि त्याने जेवणाची थाळी विठोबासमोर ठेवली आणि त्याला नैवेद्य स्वीकारण्यास सांगितले. तथापि, विठोबाने नामदेवाची मागणी मान्य नाही केल्यामुळे बालक नामदेव रडू लागला. तेव्हा विठोबाने प्रत्यक्षात मानवी रूप धारण केले आणि कृतज्ञतेने अर्पण स्वीकारले. संत नामदेव महाराजांच्या आईला आश्चर्य वाटले जेव्हा तिचा मुलगा रिकामी प्लेट घेऊन मोठ्या आनंदाने परत आला आणि त्याने तिला सांगितले की विठोबाने नैवेद्य स्वीकारले. परमेश्वराने खरोखरच त्यांचे अर्पण स्वीकारल्याचे पाहून आईला समाधान वाटले. तिचा नामदेवावरील आनंद आणि अभिमान अमर्याद होता. ती अशा महान भक्ताची आई आहे, याबद्दल तिला परमेश्वराची कृतज्ञता वाटली.

संत नामदेव महाराजांना सुरुवातीपासूनच ऐहिक गोष्टींमध्ये रस नव्हता. त्यांना शिंपी म्हणून किंवा आपल्या वडिलांच्या इतर व्यवसायात रस नव्हता. दिवस आणि रात्र विठोबाच्या भक्तीत घालवणे, हे त्यांचे एकमेव कार्य होते. त्यांचे आई वडील म्हातारे झाले. कौटुंबिक भरभराट होत चालली होती, म्हणून

त्यांची प्रिय इच्छा अशी होती की नामदेवांनी आपल्या भक्तीसाठी वाजवी मोकळा वेळ घालवून कुटुंब सुखसोयी राखण्यास मदत करावी. म्हणून संत नामदेव महाराजांना काही दिवस कपड्यांचे तुकडे विकण्यासाठी बाजाराकडे पाठविण्यात आले. पण संत नामदेव महाराज व्यापाराच्या युक्तीने निष्पाप होते. त्यांच्यासाठी किमती आणि पैसे आणि त्याचे मूल्य यासारख्या गोष्टी अज्ञात विषय होते. ते कपड्यांसह बाजारात गेले कारण त्यांच्या वडिलांनी त्यांना भाग पाडले. ते व्यापाराऐवजी एका दगडावर भजन करीत बसले, हे विसरूनच गेले की आपण तेथे कपडे विकायला गेलो आहे. काही तासांनंतर सूर्य मावळला आणि संध्याकाळच्या भक्ती प्रदर्शनासाठी मंदिराकडे जाण्याची वेळ झाली. त्यानंतर त्यांना आठवले की त्यांनी कपडे विकले नाही आणि आता आपल्या वडिलांकडून मारहाण केली जाईल. ते मंदिरात जाण्यासाठी अधीर होते म्हणूनच त्यांनी सर्व कपडे ज्या दगडावर बसले होते त्याला विकून टाकले. म्हणजे त्याने कपडे ज्या दगडावर ठेवले आणि पैसे दुसऱ्या दिवशी देण्यासाठी त्या दगडाचा साक्षीदार म्हणून आणखी एक दगड नेमला आणि मंदिरात गेले. आपल्या मुलाचे धाडस ऐकून संत नामदेव महाराजांच्या वडिलांचा राग अनावर झाला आणि त्यांनी पैशाची हमी दिलेला दगड आणण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी संत नामदेव महाराज बाजाराकडे परत गेले तेव्हा त्यांना आढळले की कपडे रात्रीच्या वेळी गायब झाले होते आणि त्यांनी दुसरा दगड घरी नेला कारण त्याने पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर ते मंदिरात गेले आणि त्यांनी विठोबाला सर्व घटना सांगितल्या आणि आपल्या अडचणीही सांगितल्या. जेव्हा संत नामदेव महाराजांच्या वडिलांनी त्यांना पैशाची हमी दिलेला दगड दाखवायला सांगितले, तेव्हा संत नामदेव महाराज यांनी उत्तर दिले की दगडाला घराच्या बंद खोलीत ठेवण्यात आले आहे आणि ते मंदिरात पळाले. जेव्हा वडिलांनी पैशाची मागणी करण्यासाठी खोली उघडली तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले की त्यांनी तेथे एक सोन्याचा ढीग पाहिला. वडिलांना खूप आनंद झाला. पण संत नामदेव महाराज त्याबद्दल अगदीच उदासीन होते. नंतर त्यांना वाचवल्याबद्दल त्यांनी देवाची स्तुती केली.

एकदा नामदेवांची संत ज्ञानदेव महाराज व त्यांच्या भावंडाशी भेट झाली.

त्या सर्व भावंडांनी संत नामदेव महाराजांना नमस्कार केला. परंतु, संत नामदेव महाराजांनी त्यांना परत नमस्कार न करताच असेच बसून राहिले. ते पाहून मुक्ताबाई नामदेवांना म्हणाली, तुम्ही विठ्ठलभक्त स्वतःला समजता तरीही तुमचा अहंकार काही गेला नाही. त्यानंतर संत ज्ञानदेव महाराजांच्या सांगण्यावरून संत नामदेव महाराजांनी औंढा नागनाथ येथे जाऊन विसोबा खेचऱ्यांकडून उपदेश घेतला. त्यांचे शिष्यत्व स्वीकारले.

संत नामदेव महाराज खूप लहान असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले आज देवाला प्रसाद तू दाखव. त्या दिवशी संत नामदेव महाराजांनी नुसता नैवेद्य दाखविला नाही, तर देवापुढे वाट बघत बसले की केव्हा हा खाईल. त्या अत्यंत निरागस अपेक्षेला मान देऊन प्रत्यक्ष विठ्ठल प्रकट झाले व संत नामदेव महाराजांनी दिलेला प्रसाद त्यांनी ग्रहण केला. कुत्र्याने चपाती पळवली त्याला ती कोरडी खाऊ लागू नये म्हणून संत नामदेव महाराज तुपाची वाटी घेऊन त्याच्या मागे लागले.

एकदा महाशिवरात्रीच्या निमित्ताने संत नामदेव महाराज औंढा येथे नागनाथाच्या दर्शनासाठी गेले असता मंदिरात भजन कीर्तन करण्यास व पूजा करण्यासाठी त्यांना विनवले. त्यांच्या विनंतीचा सन्मान ठेवून संत नामदेव महाराज मंदिराच्या मागील बाजूस बसून दर्शनासाठी नागनाथाची आळवणी करू लागले. संत नामदेव महाराजांची भक्ती बघून त्यांना दर्शन देण्यासाठी देवाने पूर्वाभिमुख असलेले मंदिर फिरवून पश्चिमाभिमुख केले, ते आजतागायत तसेच आहे. संत नामदेव महाराजांचे लग्न याच दरम्यान राधाबाईशी झाले. राधाबाई ही संसारिक विचारांची स्त्री होती. संत नामदेव महाराजांच्या आमंत्रणास उत्तर म्हणून विठ्ठलाने मनुष्याच्या वेशात संत नामदेवांच्या मुलाच्या नामकरण सोहळ्यास हजेरी लावली. मुलाचे नाव नारायण ठेवले आणि त्याप्रसंगी त्यांना चांगल्या भेटवस्तू दिल्या.

संत नामदेव महाराजांच्या घरात एकूण १५ लोक होते. संत नामदेव महाराजांना वाटले की घरगुती गोष्टींमध्ये, पत्नीत आणि मुलांमध्ये रस घेणे अधिकच कठीण आहे. सर्व लोक किंवा त्यांचे मित्र त्यांना मनापासून सांसारिक जगात परत आणण्यात यशस्वी झाले नाही. नामदेवांना फक्त एक आवड होती आणि ती होती विठोबाची भक्ती. तो विठोबासमोर तासन् तास बसून त्याच्याशी बोलत असे. त्याच्याशी आध्यात्मिक गोष्टींबद्दल चर्चा करीत आणि भजन करीत

असे. संत नामदेवासाठी विठोबाच प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि अंत होता.

- **संत नामदेव महाराजांचे साहित्यिक कार्य**

संत नामदेव महाराज म्हणजे मराठीतील पहिले चरित्रकार आणि स्वयंरचित काव्यप्रकार आणि पंजाबपर्यंत धर्म प्रसार करणारे भागवत धर्माचे अग्रणी लेखक होते. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्राचे प्रख्यात धार्मिक कवी मानले जातात. ईश्वराला अनन्यभावाने शरण जाणे ही संत नामदेव महाराजांच्या कवितेमागे प्रमुख प्रेरणा होती. विठ्ठल आवडी प्रेमभावे, आधी रचिली पंढरी, मग वैकुंठ नगरी, असं संत नामदेव महराज अभिमानाने सांगतात. अमृताहुनी गोड नाम तुझे देवा, असे म्हणत पंढरीचा महिमाही ते पटवून देतात. देह जावो अथवा राहो, माझे तीर्थ पंढरी, अशा कितीतरी अभंगातून संत नामदेवांचा विठ्ठलाविषयीचा श्रद्धाभाव व्यक्त झाला आहे.

संत नामदेवांनी विठ्ठलाविषयी ज्या उत्कटेने रचना लिहिल्या त्याच उत्कटतेने अनेक संतांचे वर्णन काव्यात केले आहे. साधी पण भावोत्कट अभिव्यक्ती हे संत नामदेव महाराजांच्या काव्यरचनेचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या उत्कट ईश्वर भक्तीचा अत्यंत विलोभनीय, असा आविष्कार काव्यात जाणवतो. त्यांच्या रसाळ वाणीची व अर्थपूर्ण अभंगाची महती सांगणाऱ्या कितीतरी कथा प्रचलित आहेत. महाराष्ट्राच्या पलीकडे जाऊन पंजाबमध्ये पोहोचलेल्या भागवत धर्माचे ते आद्यसमर्थक आहेत. हिंदी आणि पंजाबी भाषेत ही त्यांनी काही भजने लिहिली. कीर्तन करताना त्यांची भक्ती आणि कौशल्य इतके उच्च दर्जाचे होते की, भगवान पांडुरंगसुद्धा त्यांच्या नादात नाचले होते. वारकरी संप्रदायाचे समर्थक असूनही संत नामदेव महाराज यांनी देशभर धार्मिक ऐक्य स्थापित केले. सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी भगवदभाव  हा जो भक्तियोग संत ज्ञानदेव महाराजांनी सांगितला, तोच भागवत धर्म त्यांच्या शब्दांमध्ये समदृष्टी आहे, व्यापक आहे आणि अंतभूर्तही आहे. त्यामुळे संत नामदेव महाराजांच्या रचना मनाला स्पर्श करतात.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी एका ओळीत जे मूळ तत्त्व सांगितलं ते संत संत नामदेव महाराजांनी केवळ स्वीकारलं असंच नाहीतर ते अंगीकारलंही. त्यामुळे त्यांना जो अनुभव आला तो त्यांनी आपल्या साहित्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवला. संत नामदेव महाराजांनी समाज जागृतीचे महान कार्य केले. संसारात राहून संसाराचा उपभोग जरूर घ्यावा, परंतु नित्य जागृत राहावं,

अनासक्त असावं, वेळोवेळी ईश्वराची भक्ती करावी, अशा या भक्ताच्या रक्षणासाठी साक्षात विठ्ठल सुदर्शन चक्र घेऊन दारात उभा असतो.

संत नामदेव महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा म्हणजे नामस्मरण होय. संत नामदेव महाराजांनी विठ्ठल भक्तीबरोबरच व्यावहारिक व प्रापंचिक जीवनावर ही अभंगाद्वारे भाष्य केले आहे. चंचल मनाविषयी ते म्हणतात, मन केले तैसे होय, धाडले तेथे जाय. संत नामदेव महाराजांचे अभंग कविता अतिशय तरल, अर्थपूर्ण व भावस्पर्शी आहेत. त्यांच्या काव्याचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी कविता गोमटी नाम्याची, अशा अचूक शब्दात केले आहे. संत नामदेवाने असंख्य अभंग लिहिले. ते महाराष्ट्रात आणि पंजाबमध्ये अत्यंत लोकप्रिय होते आणि त्यांचे काही श्लोक अनेक ग्रंथांत समाविष्ट आहेत. शीख धर्माचे पवित्र शास्त्र सांगताना संत नामदेव महाराज यांनी भक्तिमय कवितेची परंपरा प्रेरित केली, जी महाराष्ट्रात चार शतकांपर्यंत चालू राहिली. ज्याचा शेवट महान भक्ती कवी संत तुकाराम महराज यांच्या कार्याने झाला. अशा या संत नामदेव महाराजांनी अज्ञानाला दूर सारत कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानाचा दीप लावण्याचे महान कार्य केले. त्या अर्थाने स्वार्थी भावनेने त्यांनी संत ज्ञानदेव महाराजांनी लावलेल्या भागवत पंथाच्या रोपट्याचा महावृक्ष केला.

- **संत नामदेव महाराजांचे सामाजिक आध्यात्मिक कार्य**

संत नामदेव महाराजांनी उत्तर भारतात तब्बल ५४ वर्षे समाज जागृतीसाठी आध्यात्मिक कार्य केले. अवघ्या महाराष्ट्रात संत ज्ञानदेव महाराज संत नामदेव महाराजांबरोबरच आध्यात्मिक भक्तीत पुढे संत एकनाथ, संत तुकाराम, राम दास स्वामी हेदेखील सामील झाले आणि या पंचसंत कवींनी अज्ञानी मनात ज्ञानाचे दीप प्रज्वलित करण्याचे मौलिक काम केले. त्यानंतर संत नामदेवांनी महाराष्ट्रापासून ते पंजाबपर्यंत भागवत संप्रदायाचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी गुजरात, सौराष्ट्र, राजस्थान, पंजाब असा प्रवास करीत कीर्तनाद्वारे भागवत संप्रदायाचे प्रबोधन केले. राजस्थानातील जयपूर, भरतपूर, बिकानेर अलवर अशा मोठ्या शहरात संत नामदेव महाराजांची मंदिरे आहेत. तसेच त्यांच्या नावाच्या शाळाही आहेत. राजस्थानमध्ये १८ जिल्ह्यांतील नामदेवांची ५२ मंदिरे आजही पाहायला मिळतात.

७०० वर्षांपूर्वी संत नामदेव महाराजांनी भारतभर धर्मकार्य केले, ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. संत नामदेव महाराजांनी आधी तीर्थावळी व समाधी

अशी त्रिखंडात्मक चरित्रकार रचना संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर केली. अनेकाध्याय पद्य चरित्रकार म्हणून संत नामदेव महाराजांचा गौरव केला गेला. संत ज्ञानदेव महाराजांना समकालीन असलेले संत नामदेव महाराज यांनी तर भागवत धर्माची पताका महाराष्ट्राबाहेर द्वारका, मारवाड प्रांत, बिकानेर, मथुरा, हरिद्वार, पंजाबपर्यंत फडकवली. पंढरपुरातील विठ्ठलाच्या परिसरात सीमित झालेल्या भक्ती केंद्राला त्यामुळे व्यापक क्षेत्र मिळालं.

पंजाबमधील घुमान हे शहर हे बाटला शहराच्या दक्षिण पूर्व दिशेला २६ किमी आणि श्री हरगोविंदपूरपासून १० किमी अंतरावर आहे. ते श्री हरगोविंदपूरच्या पश्चिमेस दिशेने आहे. घुमान हे स्थळ संत नामदेव महाराजांशी संबंधित आहे. संत नामदेव महाराज हे या शहराचे संस्थापक होते आणि १७ वर्षे त्यांनी येथे ध्यान केले. येथे त्यांनी चमत्कारिक कामे केली. या मंदिराचे पूर्व प्रवेशद्वार संत नामदेव महाराज दरवाजा म्हणून ओळखला जातो. गर्भगृहात विठोबाची स्थिर प्रतिमा आहे. भागवत धर्माची पताका उत्तरेत नेणारे संत नामदेव महाराज हे पहिले संत होते. संत नामदेव महाराजांनी पंजाबमध्ये भक्ती मार्गाचा शुभारंभ केला आणि रामानंद कबीर व नानक अशा संतांना प्रेरणा मिळाली. शीख बांधवांच्या श्री गुरुग्रंथसाहेब या धर्मग्रंथात संत नामदेव महाराजांची ६२ हिंदी पदे आहेत. त्यास बाबा नामदेव जी की मुखबानी म्हणून ओळखले जाते.

दु:खापासून मुक्ती मिळवून सुख शांती समाधान मिळविण्यासाठी नामस्मरणाचा सोपा मार्ग काढत संत नामदेव महाराजांनी जनतेला दिला. लोकांना कर्मकांडापासून परावर्त करून खरा धर्म सर्वसामान्याच्या मनात रुजवला. अखंड आयुष्यभर भ्रमण करत विश्वशांतीचे स्वप्न साकार केले. संत ज्ञानदेवांनी केलेली विश्व कल्याणाची प्रार्थना संत नामदेव महाराजांनी अधिकच सार्थ केली. ८० वर्षे वय झाल्यानंतर संत नामदेव महाराजांनी देह त्यागण्याचे ठरविले. त्यांनी विठ्ठलापुढे जाऊन आज्ञा द्यावी, अशी आषाढ शुद्ध एकादशी शके इ. स. १३५० रोजी विनंती केली. त्यानंतर आषाढ वद्य त्रयोदशी शके इ. स. १३५० या दिवशी पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या महाद्वारातील पहिल्या पायरीखाली संत नामदेव महाराजांनी समाधी घेतली.

V



संत सावता माळी



# संत सावता माळी महाराज

- जन्म : १२५० ते संजीवन समाधी : १२ जुलै १२९५ -

**वारकरी कर्मयोगाचा पहिला आदर्श म्हणजे संत सावता माळी महाराज. कर्मयोगाचा साक्षात्कार म्हणजे संत सावता माळी महाराज. कवने रचणारा मराठीतला पहिला शेतकरी म्हणजे संत सावता माळी महाराज. जो देवाला भेटायला गेला नाही; पण ज्याला देवच साक्षात भेटायला आला, तो संत म्हणजे संत सावता माळी महाराज आणि समकालीन संतांमधला सर्वात वडीलधारा माणूस म्हणजे संत सावता माळी महाराज.**

संत सावता माळी महाराज यांचे पूर्वज मूळचे मराठवाड्यातले लातूरजवळ आवसा नावाचे जे गाव आहे, त्या गावचे असा संदर्भ सापडतो. अजूनही त्या गावात यादव आडनावाची मंडळी वस्तीला आहेत. त्यांच्या घराण्यात परंपरेने विठ्ठलाची वारी होती. त्या वारीच्या वेळेस जाताना येताना त्यांच्या आजोबांना अरण नावाचं (पंढरपूरच्या अलीकडे ३५ किलो मीटरवर असलेले) गाव आवडलं. त्यांना वाटले की इथे आपणाला आपले बस्तान बसवता येईल आणि म्हणून त्यांनी तिथे राहायला सुरुवात केली. त्यांचे आजोबा दैवू हे या गावात प्रारंभी महादेवाच्या मंदिरात राहिले. मग हळूहळू त्यांनी तिथे जागा मिळवली. मग शेत घेतलं आणि मग पुढच्या पिढ्या त्यांच्या तिथं रुळल्या.

संत सावतोबांचा जन्म अरण या गावीच झाला. संत सावतोबांच्या वडिलांचे नाव परसोबा होते. त्यांना आणखी एक भाऊ पण होता. पण, हा भाऊ दिंडीमध्ये गेला आणि परत आलाच नाही. संत सावतोबांच्या आईचं नाव नंदिताबाई. त्यांनीच कष्टाची आणि वारीची दीक्षा सावतोबांना दिली. संत सावतोबांच्या पत्नीचे नाव जनाई. जनाईचे गाव जवळच भानवस हे होते. नागू

ही त्यांची एकमेव मुलगी त्यांच्या सोबत होती. सावता या शब्दाचा अर्थ सज्जन गरीब स्वभावाचा मुलगा. त्याचंच पुढे सावतोबा झालं. सावता झालं. नागूच लग्न सावतोबांच्या गावातल्याच गोविंद वसेकर यांच्याशी झालं

जनाबाईंच्या एका अभंगानुसार काशिबा गुरव हे संत सावतोबा यांच्या अभंगाची लेखनिक समजले जातात. सावतोबा ज्ञानदेवांपेक्षा २५ वर्षांनी मोठे होते आणि नामदेवांपेक्षा २० वर्षांनी मोठे होते. संत सावता माळी महाराज यांचा जन्म इसवी सन १२५० आणि मृत्यू इसवी सन १२९५. म्हणजे केवळ ४५ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभलं आणि इतर संतांच्या या तारखांविषयी जसे भेद आहेत, मतभेद आहेत, तसे संत सावता माळी महाराज यांच्या जन्मतिथीविषयी आणि समाधीविषयी नाहीत. त्या तारखा सगळेजण मान्य करतात.

गावोगावच्या पालख्या पंढरपूरला जातात, पण उलट पंढरपूरची पालखी संत सावतोबांना भेटायला येते, असं सुरुवातीपासूनचा रिवाज आहे. संत संत सावतोबांची स्वतःची मोठी विहीर अजूनही त्या गावात दाखवली जाते. कदाचित उन्हाळी पिकंसुद्धा सावतोबा घेत असतील असा समृद्ध त्यांचा तो मळा असावा. सुरुवातीला जेव्हा त्यांनी जमीन कसायला सुरुवात केली तेव्हा पडीक जमिनी त्यांच्या आजोबांना मिळाल्या असतील. त्यातली काही जमीन का घेतली नाही, म्हणून संत सावतोबांनी आजोबांना प्रश्न केला, तेव्हा आजोबा म्हणाले, त्या शेतात म्हसोबा आहे म्हणून आपण ती जागा सोडून दिली. संत सावतोबांनी सरळ तो म्हसोबाचा दगड उचलला आणि आपल्या शेताच्या बांधावर नेऊन ठेवला. लोक त्यांना घाबरत होते. ते म्हणत होते, काय करताय तुम्ही? हे चुकीचं आहे. तुम्हाला शाप लागेल. पण त्यांनी कोणाचं ऐकलं नाही. सरळ दगड उचलला आणि शेताबाहेर ठेवला. म्हणजे एका अर्थाने महात्मा फुलेंचे ते पूर्वज शोभतात. अंधश्रद्धा निर्मूलनाची ही सुरुवात म्हणावी लागेल. ते काय त्या शेंद्राच्या देवाला वगैरे घाबरले नाही. वारकऱ्यांनी नेहमी सांगितलं होतं की शेंद्राच्या देवाची भक्ती करू नका.

सर्व संतांना घेऊन विठ्ठल मळ्यात आले होते, असा संदर्भ आपणाला संत नामदेव महाराजांच्या अभंगात सापडतो. संत ज्ञानदेव महाराजांनी आणि संत नामदेव महाराजांनी कर्मयोग कसा श्रेष्ठ आहे आणि आपण करत असलेल्या

कामातच कसा ईश्वर असतो, आपल्या कामाला कसं प्राधान्य दिले पाहिजे, उठसूठ देवाला भेटायला जाण्याची गरज नाही, म्हणजे संत सावतोबा कधीच गेले नाही अशातला भाग नाही, जेव्हा वेळ असेल, जेव्हा संधी असेल, तेव्हा ते नक्की गेले असतील; पण जेव्हा शेतातली कामे आहेत, ते काम सोडून कधीही ते वारीला गेले नाही आणि हा आदर्श संत ज्ञानेश्वर महाराजांनी आणि संत नामदेव महाराजांनी त्यांच्या अभंगात सांगितला होता. आपलं जे स्वकर्म आहे त्याचीच पूजा जर आपण केली तर देव अपार संतोष पावतो. त्याच्या संतोषाला पारावर राहत नाही. एका अर्थाने कर्मयोगाबद्दल दोन्ही संतांनी जे सांगितले त्याचे साक्षात उदाहरण म्हणजे स्वतः सावतोबा होते. कृषी कर्माशी जोडलेला तत्कालीन एकमेव संत म्हणजे सावतोबा होत.

संत सावता महाराज आपल्या व्यवसायात म्हणजेच कर्मामध्ये विठ्ठल पाहत होते. त्यांनी आपल्या कार्यातून जनसामान्यांना उन्नतीचा मार्ग दाखवला. प्रबोधनाचे व भक्ती प्रसाराचे कार्य केले. त्यांचे केवळ ३७ अभंग उपलब्ध आहेत. कर्तव्य आणि कर्म करत राहणे हीच खरी ईश्वर सेवा त्यांनी मानली. वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संत म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यांना संत शिरोमणी अशी पदवी लोकांनी बहाल केली. अध्यात्म आणि भक्ती आत्मबोध आणि लोकांसाठी कर्तव्य आणि सदाचार यांची भेट घडवून मानवधर्माची सांगड त्यांनी घातली. धर्माच्या अंधश्रद्धा, कर्मठपणा, दांभिकता याबाबत त्यांनी सतत कोरडे ओढले. कोणाची त्यांनी भलावण केली नाही. ईश्वराला प्रसन्न करून ठेवायचे असेल तर योग, यज्ञ, व्रतवैकल्ये या साधनांची बिलकुल आवश्यकता नाही, केवळ ईश्वराचे अंतकरणपूर्वक कीर्तन हवे, असा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या अभंगातून जनसामान्यांना दिला. श्री विठ्ठल हे त्यांचे परम दैवत होते, पण ते कधीही पंढरपूरला गेले नाही. स्वतःचे कर्म हाच आपला देव आहे आणि ते कर्म करत असताना तुम्ही कामावर श्रद्धा ठेवून जर कर्म केलं तर भगवंताचे प्राप्ती नक्कीच होते हा संदेश त्यांनी आपल्या जगण्यातून लोकांना दिला.

प्रत्यक्ष पांडुरंग त्याला भेटायला आला तो प्रसंग असा होता. एकदा देव संत सावता महाराजांच्या मळ्यात आले तेव्हा संत सावता महाराज आपल्या मळ्यात काम करत अभंग गात होते आणि देव त्यांना म्हणाले, मला लपायला

थोडी जागा दे. दोन चोर माझा पाठलाग करत आहेत. खरंतर हे दोन चोर कोणी नसून प्रत्यक्ष संत ज्ञानदेव महाराज आणि संत नामदेव महाराज होते. संत सावता महाराजांची परीक्षा घेण्याकरता रचलेली भगवंताची ती लीला होती. संत सावता महाराजांनी इतर कोणताही विचार न करता आपल्या हाताने आपली छाती फाडली आणि देवाला आपल्या हृदयात लपवले. त्याची भक्ती पाहून सर्वांनाच गहिवरून आले आणि सर्वांनीच त्यांना नमन केले. प्रपंची असून परमार्थ साधावा, हाच विचार त्यांनी आग्रहाने मांडला. नामसंकीर्तनामध्ये त्यांनी जास्त भर दिला. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज यांनी समाधी घेतली असे मानले जाते.

V



संत ज्ञानेश्वर महाराज



# संत ज्ञानेश्वर महाराज

- जन्म : २२ ऑगस्ट १२७५ ते संजीवन समाधी : ०२ डिसेंबर १२९६ -

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील परमार्थाच्या क्षेत्रातील न भूतों भविष्यती असे अजोड व्यक्तिमत्त्व व अलौकिक संत म्हणजे संत ज्ञानेश्वर महाराज होत. गेली सुमारे ७२५ वर्षे महाराष्ट्रातील सर्व पिढ्यातील सर्व स्तरांतील समाजाने जे व्यक्तिमत्त्व आपल्या मनोमंदिरात एक आदर्श श्रद्धास्थान म्हणून जपले आहे आणि जे श्रद्धास्थान पुढील असंख्य पिढ्यांतही कायमच उच्चस्थानी राहणार आहेत असे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर महाराज.**

संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगाव येथे तेराव्या शतकात मध्यरात्री श्रावण कृष्ण अष्टमी शके ११९७ (१२७५) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी व त्यांच्या आई रुक्मिणीबाई होत. गोविंदपंत व मीराबाई हे त्यांचे आजोबा होत. संत निवृत्तीनाथ हे संत ज्ञानेश्वर महाराजांचे थोरले बंधू. संत निवृत्ती, संत सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांचा जन्म अनुक्रमे शके १२७३ (संत निवृत्तीनाथ) व १२७७ (संत सोपान) व १२७९ (मुक्ताई) मध्ये झाला. काही अभ्यासकांच्या मते संत निवृत्ती, संत ज्ञानदेव, संत सोपान व मुक्ताबाई या सर्व भावंडांचा जन्म आळंदी येथेच झाला. त्यांच्या जन्म वर्षाबाबत विविध अभ्यासकांनी वेगवेगळे दावेही केलेले आढळून येतात.

संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आपेगाव हे गाव औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणजवळ गोदावरी नदीच्या काठावर वसलेले छोटे गाव आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडील विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. विवाहित असतानाच

त्यांनी संन्यास घेतला व ते काशीला गेले. गुरूंना ते विवाहित असल्याचे समजल्यावर गुरूंनी त्यांना परत पाठवले. त्यांच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर विठ्ठल पंतांना चार अपत्ये झाली. संत निवृत्ती, संत ज्ञानदेव, संत सोपान व मुक्ताबाई अशी त्यांची नावे होत. विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत करत आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. त्याकाळी संन्यासाची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. गावाने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकले. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. संत ज्ञानेश्वर महाराज व त्यांच्या भावंडांची मुंज करण्याचे आळंदीच्या ब्राह्मणांनी नाकारले. त्यावर विठ्ठल पंतांनी उपाय काय असे धर्मशास्त्रींना विचारले. त्यावर केवळ देहदंडाची शिक्षा आहे असे ब्राह्मणांनी सांगितले.

मुले संस्कारांपासून वंचित राहू नये व त्यांचे भविष्यात भले व्हावे, यासाठी विठ्ठल पंतांनी व रुक्मिणीबाई यांनी आत्महत्या करून देहांत प्रायश्चित्त घेतले. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर संत ज्ञानेश्वर महाराज आणि त्यांच्या भावंडांना लोकांकडून फार त्रास दिला गेला. त्यांना अन्न आणि पाणी यासारख्या मूलभूत गोष्टी नाकारण्यात आल्या. पुढे ही भावंडे पैठणला गेली आणि तेथे संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपली विद्वत्ता सिद्ध केली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी अत्यंत रसाळ भाषेत शब्दरचना केली. संत नामदेव महाराजांच्या जोडीने त्यांनी भागवत धर्म वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. ७०० वर्षांची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायाचे अनुयायी महाराष्ट्रात आजही लाखो संख्येने आहेत. भावार्थदीपिका हे भगवद्गीतेच्या अनुवाद वजा टीका ग्रंथाचे कार्य संत ज्ञानेश्वर महाराजांनी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे केले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि त्यांच्या भावंडांचा मराठी संस्कृतीवर असलेला प्रभाव आजही अबाधित आहे. संत निवृत्तीनाथ महाराज हेच संत ज्ञानेश्वर महाराजांचे सद्गुरू होते. नेवासा क्षेत्रात आपल्या गुरूंच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. खरे पाहता संत ज्ञानेश्वर महाराजांनी ही टीका सांगितली व सच्चिदानंद बाबा यांनी ती लिहिली. या ग्रंथास ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदीपिका असे म्हणतात. हे मराठी वाङ्‌म याचे देशीकार लेणे झाले. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ज्ञान श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी प्राकृत भाषेत

आणले.

**माझ्या मराठीची बोलू कौतुके, परी अमृता तेही पैजासी जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके, मेळविन!**

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान मराठीची महती व्यक्त केली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तीयोग सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत. हा ग्रंथ १२९० मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते. त्यांचा दुसरा ग्रंथ अनुभवामृत किंवा अमृतानुभव होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा, जीव-ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या १० प्रकरणे या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. चांगदेव पासष्टी या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेव हे महान योगी १४०० वर्षे जगले, असे मानले जाते. पण त्यांचा अहंकार गेला नव्हता. यासाठी संत ज्ञानेश्वर महाराजांनी उपदेशपर लिहिलेले ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा ग्रंथ होय. यात अद्वैत सिद्धांताचे अप्रतिम दर्शन आहे. संत ज्ञानेश्वरांचा हरिपाठ हा नाम पाठ आहे. यात हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे. संजीवन समाधीत संत ज्ञानेश्वर महाराज संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे समाधी स्थळ म्हणून आळंदी प्रसिद्ध आहे. याला देवाची आळंदी असेही म्हणतात. वारकरी भक्तांसाठी तसेच समस्त मराठी जनांसाठी आळंदीला मोठे महत्त्व आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी येथे १२१८ संजीवन समाधी घेतली. त्यानंतर येथे सोळाव्या शतकात भव्य समाधी मंदिर बांधण्यात आले. त्यांच्याशिवाय विठ्ठल-रखुमाई, राम, कृष्ण, मुक्ताई यांची मंदिरेही येथे आहेत. आषाढी व कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. आषाढात येथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरपूरला जाते. आळंदी ते पंढरपूर हे अंतर सुमारे २२५ किलोमीटर आहे. तथापि, पावसापाण्याची तमा न बाळगता भक्तीरसात चिंब भिजलेले वारकरी हे अंतर दिंडीच्या माध्यमातून पायी पार करतात.

संत ज्ञानेश्वर महाराजांना आपल्या तपसामर्थ्याचा प्रभाव दाखविण्यासाठी वाघावरून आलेल्या चांगदेवाचे गर्वहरण करण्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराजांनी भिंत चालवून दाखविल्याची आख्यायिका आहे. ती भिंत येथे आहे. अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, भावार्थदीपिका, ज्ञानेश्वरी या ग्रंथांचा शेवट

पसायदान या नावाने ओळखला जातो. अखिल विश्वाची काळजी वाहणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराजांना वारकरी संप्रदायासह सर्वच भक्त प्रेमाने माऊली म्हणतात. त्यांनी धर्मातील क्लिष्ट अवडंबरे काढून धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला. बरोबरच त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न चंद्रभागेच्या वाळवंटात केला. भागवत धर्माचा तथा वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याचे अभूतपूर्व कार्य त्यांनी केले. संत नामदेव, संत गोरोबा कुंभार, संत सावता माळी महाराज, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा या समकालीन संत प्रभावळीचे अनौपचारिक नेतृत्व करत संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

अमृतानुभव या ग्रंथाच्या लेखनानंतर संत ज्ञानेश्वर महाराज यांनी तीर्थयात्रा केली. संत नामदेव महाराजांच्या तीर्थावलीमध्ये या तीर्थयात्रेचा उल्लेख आढळतो. या यात्रेनंतर माऊलींनी समाधी घेण्याचा निर्णय घेतला. संत नामदेव महाराजांच्या समाधीच्या अभंगांमध्ये तत्कालीन संदर्भ सापडतात. अन्य संतांची मानसिक स्थिती त्यांच्यासह समाजाला झालेले दु:ख खुद्द नामदेव महाराजांच्या वेदना, संत ज्ञानेश्वर महाराजांचा निग्रह या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब समाधीच्या अभंगात आढळते. संत ज्ञानदेव महाराज यांनी वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या पावन तीरावर (कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ दुर्मुखनाम संवत्सर इ.स. १२९६ गुरुवार) संजीवन समाधी घेतली. हा ज्ञानसूर्य मावळल्यानंतर अवघ्या वर्षभरात निवृत्ती सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली.

V



संत एकनाथ महाराज



# संत एकनाथ महाराज

- जन्म : ०८ नोव्हेंबर १५३३ ते संजीवन समाधी : २६ फेब्रुवारी १५९९ -

**सर्वसाधारणत: नाथ म्हणून ओळखले जाणारे संत एकनाथ यांचा जन्म देशस्थ ब्राम्हणाच्या घरात इ.स. १५३३ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे झाला. संत भानुदास महाराज हे संत एकनाथ महाराजांचे पणजोबा होत. ते सूर्योपासक होते. चक्रपाणी आणि सरस्वती हे संत एकनाथ महाराजांचे आजोबा व आजी होत. श्री संत एकनाथ महारजांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. आईचे नाव रुक्मिणी होते. आई-वडिलांचा सहवास त्यांना फार काळ लाभला नाही. लहानपणीच एकनाथांना आई-वडिलांच्या प्रेमाला मुकावे लागले. त्यानंतर एकनाथांचे पालनपोषण त्यांच्या आजी-आजोबांनीच केले.**

वयाच्या सहाव्या वर्षी त्यांच्या आजोबांनी लहानग्या संत एकनाथ महाराजांची मुंज करून त्यांना शिक्षणासाठी एका विद्वान पंडितांकडे दाखल केले. त्या पंडिताकडून संत एकनाथ महाराजांनी रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आदी ग्रंथांचा अभ्यास केला. कारण ईश्वरभक्तीचे वेड त्यांना उपजतच होते. बालवयातच ते गुरूच्या शोधात निघाले आणि दौलताबादेच्या किल्ल्यात असलेल्या जनार्दन स्वामींच्या म्हणजेच आपल्या गुरूसमोर हात जोडून उभे राहिले. तो दिवस होता फाल्गुन वद्य षष्ठीचा. संत एकनाथ महाराजांचे गुरू सद्‌गुरू जनार्दन स्वामी हे देवगड (देवगिरी) दरबारी अधिपती होते. ते मूळचे चाळीसगावचे रहिवासी होत. त्यांचे आडनाव देशपांडे होते. ते दत्तोपासक होते. गुरू म्हणून संत एकनाथांनी त्यांना मनोमन स्वीकारले होते. नाथांनी खडतर परिश्रम करून गुरूसेवा केली आणि साक्षात दत्तात्रेयांनी त्यांना एकदिवस दर्शन

दिले. द्वारपाल म्हणून दत्तात्रेय नाथांच्या द्वारी उभे असत अशी आख्यायिकाही महाराष्ट्राच्या संत साहित्यात उपलब्ध आहे.

गुरूंच्या कृपेने संत एकनाथ महाराजांना भगवान दत्तात्रेयांचे दर्शन झाले. त्यांनी मनोमन ओळखले की श्रीगुरू दत्तात्रेय आहेत आणि श्री दत्तात्रेय हेच गुरू आहेत. त्यानंतर त्यांच्या गुरुदेवांनी त्यांना श्रीकृष्णाच्या उपासनेची दीक्षा दिली व शुलभंजन पर्वतावर राहून तपश्चर्या करण्याची आज्ञा दिली. कठोर तपश्चर्या करून ते गुरूआश्रमात परतले. त्यानंतर गुरूंच्या आज्ञेनुसार ते तीर्थयात्रेला मार्गस्थ झाले. तीर्थयात्रा आटोपून संत एकनाथ महाराज आपल्या जन्मस्थानी अर्थात पैठणला परतले आणि आजी-आजोबा आणि गुरूंच्या आज्ञेने विधिवत गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यांच्या पत्नीचे नाव गिरिजाबाई होते. गिरिजाबाई अतिशय एकनिष्ठ आणि आदर्श गृहिणी होत्या. संत एकनाथ महाराजांचे गृहस्थ जीवन अत्यंत संयमी व सुखी-संपन्न होते. कुटुंबात दररोज कथा-कीर्तन चालायचे. कथा-कीर्तनानंतर प्रत्येकजण आपापल्या जागेवर भोजन करत असे. अन्नदान आणि ज्ञानदान हे दोन्ही त्यांच्या कुटुंबात अखंड चालू असत. संत एकनाथ महाराजांना गोदा आणि गंगा नावाच्या दोन मुली आणि हरिपंडित नावाचा मुलगा होता.

संत एकनाथ महाराज सद्‌गुणांचा एक अक्षय्य अमृतकुंभ होत. त्यांच्या ठायी क्षमाशीलता ओतप्रोत भरलेली होती. गोदावरीत स्नानासाठी ते नियमित जात असत. वाटेत एक पान खाणारी व्यक्ती राहायची. ही पान खाणारी व्यक्ती झाडावर बसून, संत एकनाथ महाराज आंघोळ करून परत आले की त्यांच्यावर गुळण्या करायचा. या कारणामुळे संत एकनाथ महाराजांना रोज चार ते पाच वेळा आंघोळ करावी लागत असे. एके दिवशी त्याने दुष्टपणाची हद्दच ओलांडली. संत एकनाथ महाराजांवर त्याने १०८ गुळण्या केल्या आणि संत एकनाथ महाराजांना तब्बल १०८ वेळा आंघोळ करावी लागली. मात्र, या प्रपंचात संत एकनाथ महाराज त्याच्यावर साधे संतापलेसुद्धा नाहीत. शेवटी त्या व्यक्तीला आपल्या कूकर्माचा पश्चात्ताप झाला आणि संत एकनाथ महाराजांचा भक्त झाला. संत एकनाथ महाराजांची भूतदयाही अद्भुत अशीच होती. एकदा ते प्रयागहून कानवडमध्ये गंगाजल भरून श्रीरामेश्वरला प्रयाण करत होते. वाटेत

त्यांना एक गाढव तहानलेल्या अवस्थेत दिसले. एकनाथ महाराजांनी गंगेचे सर्व पाणी त्या गाढवाला दिले. या प्रकारावर त्यांच्या साथीदारांनी आक्षेप नोंदवला. यावर एकनाथ महाराज म्हणाले की, ''प्रत्येक कणात भगवान रामेश्वर वसतात. त्यांनी माझ्याकडे गाढवाच्या रूपात पाणी मागितले, म्हणून मी सर्व पाणी रामेश्वरजींना अर्पण केले. गाढवाने प्यायलेले सर्व पाणी थेट रामेश्वरजींवर गेले.'' संत एकनाथ महाराजांच्या जीवनात अशा अनेक घटना घडल्या ज्यातून आपल्याला त्यांच्या दिव्य जीवनाचे दर्शन घडते.

चार श्लोकांमध्ये आदिनारायणांनी ब्रह्मदेवाला अध्यात्मरहस्य उदधृत केले आहे. ब्रह्मदेवाने नारदांना, नारदांनी व्यासांना व व्यासांनी १२ स्कंधात त्याचा विस्तार करून शुकाला सांगितले व तेच रहस्य शुकाने परीक्षितीलाही सांगितले. भागवत ग्रंथाचे बीज या चतुश्लोकीत आहे. भागवताचे सार असे चार श्लोक भागवताच्या दुसऱ्या सवर्गातील ९ व्या अध्यायात आलेले आहेत. त्या श्लोकांना चतुश्लोकी भागवत असे म्हणतात. परंतु, त्या सर्व अध्यायावर संत एकनाथ महाराजांनी आपले गुरू श्रीजनार्दन यांच्या आज्ञेने १०३६ ओव्यांचा ग्रंथ लिहिला. तेच नाथांचे चतुश्लोकी भागवत होय. संत एकनाथ महाराजांनी लहान वयात लिहिलेला हा प्रथम ग्रंथ होता. या ग्रंथातील ओवी संख्या १००० च्या आसपास आहे. नाथांनीही पुष्कळ ग्रंथरचना केली आहे. एकनाथी भागवत ही भागवताच्या ११ व्या स्कंधावरील टीका, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख, आनंद लहरी, चिरंजीवपद, गीतासार, त्याशिवाय ५००० हून अधिक अभंग आहेत. संत एकनाथ महाराजांच्या ग्रंथातील एकूण ओवी संख्या सुमारे ७५००० च्या आसपास असल्याचे संत साहित्याचे अभ्यासक सांगतात.

संत एकनाथ महाराजांचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांनी ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली. एके दिवशी त्यांचा घसा अतिशय दुखू लागला. त्यावर त्यांनी औषधोपचारही केले. पण गुण काही येईना. तिसऱ्या दिवशी संत ज्ञानदेव महाराज त्यांच्या स्वप्नात आले. त्यांना म्हणाले, माझ्या मानेस अजानवृक्षाच्या मुळीचा गळफास बसला आहे. तो तू स्वत: येथे येऊन काढ. म्हणजे तुझा घसा बरा होईल. म्हणून समुदाय बरोबर घेऊन कीर्तन करीत संत एकनाथ महाराज

शके १५०५ मध्ये आळंदीस आले. याविषयी संत एकनाथ महाराजांचा खालील अभंग प्रसिद्ध आहे,

**श्रीज्ञानदेवें स्वप्नात आले.**
**आईला मजला सांगितले.**
**दिव्य प्रकाशः पुंज मदनाचा पुतळा.**
**तुम्ही फक्त परब्रह्माचेच बोलता.**
**अज्ञात झाडाच्या मुळाचा**
**त्याच्या मानेला स्पर्श झाला.**
**येउनि आळंदी कधि वेगें ।।३।।**
**असे स्वप्न असती अलंकापुरी ।**
**मग नदी माझरी दिसली फाटक ।**
**एका जनार्दनीं त्याचें**
**पूर्वीचें गुण पूर्ण केलें ।**
**श्रीगुरुंना ज्ञानाचा स्वामी भेटला.**

संत ज्ञानेश्वर महाराजांनी स्वप्नात दिलेल्या दृष्टांतानुसार संत एकनाथ महाराज आळंदीस आले. आळंदीस सिद्धेश्वराचे प्राचीन स्थान गर्द झाडीने वेढलेले होते. सोबतच्या मंडळींना बाहेर बसवून संत एकनाथ महाराज समाधिस्थळाच्या शोधार्थ निघाले असता दूरूनच त्यांना अजानवृक्ष दिसला. समाधीचे द्वार उघडून ते आत प्रवेशस्थ झाले. तेथे त्यांना वज्रासन घालून बसलेले ज्ञानराज दिसले. त्यांचे दर्शन होताच संत एकनाथ महाराजांनी त्यांच्या पायी दंडवत प्रणाम घातला. अजानवृक्षाची मुळी मस्तकाला लागल्याचे निमित्त करून संत ज्ञानदेवांनी संत एकनाथ महाराजांना प्रत्यक्ष दर्शन दिले व ज्ञानेश्वरीचा लोकप्रसार करण्याची आज्ञा केली. संत एकनाथ महाराज समाधीच्या बाहेर आल्यावर लोकांनी पूर्ववत समाधीस्थानावर दगड रचले.

पैठणला परतल्यावर संत एकनाथ महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या संशोधनाचे महत्कार्य हाती घेतले. लोकांच्या व पाठकांच्या चुकीमुळे काही अशुद्ध व अप्रस्तुत पाठ त्यात समाविष्ट करण्यात आले होते. संत एकनाथ महाराजांनी ते काढून टाकले व ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत वाचकांच्या हाती सुपूर्त केली. संत

एकनाथ महाराजांना संत ज्ञानदेव महाराजांचे दर्शन शके १५०५ मध्ये ज्येष्ठात झाले व ज्ञानेश्वरी संशोधनाचे काम शके १५०६ मध्ये तारण नाम संवत्सरी संपले. ज्ञानेश्वरीच्या शेवटी त्यांनी हा ज्ञानेश्वरी शुद्धीकरणाचा काळ नोंदवला आहे. आज आपण पठन करतो ती संत एकनाथांनी तयार केलेली ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत आहे. भाद्रपद वद्य षष्ठीला हे काम पूर्ण झाले. म्हणून तो दिवस ज्ञानेश्वरी जयंती म्हणून साजरा करण्यात येतो. संत ज्ञानदेवांच्या वाङ्मयाचा प्रभाव संत एकनाथ महाराजांच्या लिखाणावर प्रकर्षाने दिसून येतो.

संत एकनाथांनी भक्ती हीच देवतेची उपासना असून, आपल्या आयुष्यात भक्तीपरायणता घालून आपण आपल्या मनाचे शांतता आणि आनंद मिळवू शकतो, याचा वस्तुपाठ आपल्याला घालून दिला. तसेच, सेवेचे कार्य कसे करावे याबाबत विविध उपाय सांगितले. सेवा कार्य केल्याने आपण समाजात एक सक्रिय घटक बनू शकतो, हे सांगतानाच त्यांनी साधनेच्या माध्यमातून आपण आपल्या मनाला शांतता आणि आनंद मिळवायला साध्य करू शकतो, साधना हीच आत्मनिर्माणाची एक महत्त्वाची उपासना असल्याचे पटवून दिले. सत्याचे पालन करणे आणि सत्याची मर्यादा राखणे आपल्याला जीवनात स्थिरता देते, हा संत एकनाथ महाराजांचा विचार आज आणि उद्याही कालातीत राहील. श्रद्धा हीच आपल्या निर्माणातील एक महत्त्वाची गुणवत्ता आहे.

श्रद्धा असल्यास आपण आपल्या उद्धारातील अडचणींवर दुःखी होणार नाही, हे सांगताना संत एकनाथ महाराज मानवी मनाला केवढा आधार प्रदान करतात. स्वार्थाचा त्याग करून आपण आपल्या सामर्थ्याचा उपयोग सर्वांगीण लोकांच्या हिताच्या सर्वांगीण क्षेत्रावर करू शकतो, हे सांगताना संत एकनाथ महाराज प्रेम हा आपल्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग असून, प्रेमाने आपण इतरांना आणि सर्वांना आपलेसे करू शकतो हे सहजपणे पटवून देतात.

संत एकनाथ महाराजांनी विविध भारुडे, अभंगांच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन व सामाजिक समतेसाठी कार्य केले. अमृताहुनी गोड असलेल्या मराठी भाषेला लोकभाषा बनवण्यासाठी त्यांनी यशस्वी कार्य केले. त्यामुळेच संत एकनाथ महाराज युगप्रवर्तक होते, असे म्हटले जाते. फक्त उपदेशातूनच नाही, तर आपल्या अनेक प्रेरक कृतीतून त्यांनी सामाजिक समतेसाठी विशेष प्रयत्न

केले. अस्पृश्याच्या चुकलेल्या मुलास कडेवर घेऊन हरीजनवाड्यात पोहोचवणे, तीर्थरूपांच्या श्राद्धाला ब्राम्हणासाठी शिजवलेले अन्न अस्पृश्यांना खाऊ घालणे, गाढवाला गंगोदक पाजणे, पाषाणाच्या नंदीला गवताचा घास भरवणे यांसारख्या संत एकनाथ महाराजांच्या चरित्रातील आख्यायिकाद्वारे त्यांच्या प्रत्येक कृतीत अद्वैत वेदांताचा व्यापक अर्थ प्रत्यक्ष बाणलेला होता हे दिसून येते. संत एकनाथ महाराजांनी माणसात देव पाहण्याची शिकवणूक प्रत्यक्ष आपल्या कृतीतून देणे, तत्कालीन जातीभेद नष्ट करण्यासाठी रंजल्या-गांजल्यांच्या घरी भोजन करणे, लोकसेवा करून प्रस्थापित समाजित सेवाभाव वाढवणे, अशा जनप्रबोधनाच्या कार्यासोबतच भक्तीमार्गही समाजात त्यांनी प्रशस्त केला. सामाजिक समतेसाठी त्यांनी आपल्या संपूर्ण हयातीत प्रयत्न केले.

संत एकनाथ महाराजांच्या शिष्य शाखा महाराष्ट्र आणि बाहेरही मोठ्या प्रमाणात विस्तारल्या आहेत. त्यापैकी काही श्री नारायणगड (बीड), श्री भगवानगड (नगर), एकाजनार्दनी नाथपीठ (अंजनगावसुर्जी), श्री अमृतनाथस्वामी मठ (आळंदी), श्री तुकाविप्र महाराज (पंढरपूर, अंजनवती), श्रीकृष्णदयार्णव महाराज (पैठण, भारतातील सर्व मठ), श्री गोपालनाथ महाराज (त्रिपुटी, साता) होत.

V



संत तुकाराम महाराज



# संत तुकाराम महाराज

- जन्म : २१ जानेवारी १६०८ ते वैकुंठगमन : १९ मार्च १६५० -

**महाराष्ट्राच्या संत परंपरेत संत तुकाराम महाराज हे एक लोकप्रिय संत होऊन गेले. त्यांचे प्रबोधनात्मक अभंग आजही जनतेला मुखोद्गत आहेत. विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालत अज्ञानाची जळमटे दूर करत लोकांना प्रकाशगामी करण्याचे महान कार्य संत तुकाराम महाराज यांनी केले. कुठलाही भेदाभेद अमंगळ मानणाऱ्या संत तुकारामांनी मानवी विकासासाठी एक शाश्वत, आश्वासक व निर्णायक असा भक्तीमार्ग काळाच्या कसोटीवर तयार करून दिला, ज्यामुळे मानवी जीवन चिरंतन शाश्वत मूल्यांच्या आविष्कारातून सुकर झाले.**

संत तुकाराम महाराज हे इ.स.च्या १७ व्या शतकातील एक वारकरी संत कवी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील देहू या गावात वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी 'जगद्‌गुरू' म्हणूनही ओळखले जाते. वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या अखेरीस 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्‌गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष केला जातो. जगद्गुरू तुकाराम महाराज यांना केवळ संत किंवा अभंगकार म्हणून चालत नाही, कारण ते याहीपलीकडे एक लोककवी म्हणून मराठी साहित्य व भावविश्वाला परिचित होते व आहेत.

**'जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले**
**तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा!'**

अशा प्रकारचे प्रबोधनात्मक अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना ऐकवत ईश्वर भक्तीचा एक सुबोध व सुगम मार्ग दाखवला. महाराष्ट्राच्या पठारावर वारकरी संप्रदायाची एक अखंड परंपरा त्यांनी रुजविली. १७ व्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा गौरवोल्लेख केला जातो. संत तुकाराम महाराज यांनी वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकतेवर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार केले. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये अस्वस्थ सामाजिक वर्तमानात संत तुकारामांनी आपल्या अभंगांतून व कीर्तनांतून समाजाला बिनतोड मार्गदर्शन करण्याचे पथदर्शी कार्य केले.

संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी म्हणून आध्यात्मिक क्षेत्रात प्रसिद्ध होते. तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत ईश्वर भक्तीचा रस प्रवाहित झाला. 'अभंग म्हटला की तो फक्त संत तुकाराम महाराजांचा' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली होती, जी आजही कायम आहे. थोडक्यात संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग होय. हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचे महान द्योतक असल्याची नोंद आजही संत साहित्याचे गाढे अभ्यासक नमूद करत असतात. आजही अनेक वारकरी, भक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. संत तुकाराम महाराजांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांनाही मुखोद्गत आहेत.

महाराष्ट्राच्या भागवत धर्माचा कळस होण्याचे परमभाग्य संत तुकाराम महाराज यांना लाभले. त्यांच्या प्रबोधनात्मक अभंगांमध्ये परतत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य त्यांच्या अभंगातील शब्दकळेतून पदोपदी पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यातून अनुभवता येते. त्यांच्या काव्यातील सहजता, गोडवा व भाषेची रसाळता अनुपम आहे. संत तुकाराम महाराजांनी अभंगलेखनासह गवळणीही रचल्या आहेत.

संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा ही अखंड ज्ञानाचा स्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये आजही कायम आहे. गाथा बुडवली म्हणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष

अनुभव झाला. इंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग म्हणू लागले. यावेळी संत तुकाराम महाराजांना जाणीव झाली की आपले अभंग, आपली गाथा बुडालेली नाही. तर ती जनसामान्यांच्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहे. आपल्या कार्याची ही खरी पावती आहे. खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. जे बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये यशस्वी ठरले.

देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा संत तुकाराम महाराजांनी केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत. लौकिकार्थाने संत तुकाराम महाराज हे आठव्या पिढीतील लोकनायक होते. ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केले आहे.

संत तुकाराम महाराज यांचे मूळ नाव तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) हे होते. त्यांचा जन्म सोमवार दि. २१ जानेवारी १६०८ रोजी (तिथीप्रमाणे माघ शुद्ध पंचमी, शा.शके १५३०, युगाब्द ४७०९) पुणे जिल्ह्यातील देहू येथे झाला. तुकाराम महाराजांच्या जन्मवर्षाबद्दल इतिहासकारांमध्ये अनेक मतभेद आहेत. त्यातली चार संभाव्य वर्षे इ.स. १५६८, इ.स. १५७७, इ.स. १६०८ आणि इ.स. १५९८ ही आहेत. इ.स. १६५० मध्ये हजर असलेल्या तमाम जनतेच्या समक्ष त्यांचा देव, विठ्ठल त्यांना सदेह वैकुंठी घेऊन गेले असे मानले जाते.

संत तुकाराम यांचे घराणे मोरे आणि आडनाव अंबिले आहे. त्यांच्या घराण्यातील विश्वंभरबुवा हे मूळ पुरुष महान विठ्ठलभक्त होते. त्यांच्या घरात पंढरीची वारी करण्याची प्रथा होती. संत तुकाराम महाराजांना सावजी हा मोठा भाऊ व कान्होबा हा धाकटा भाऊ होता. मोठा भाऊ सावजी विरक्त वृत्तीचा होता. घराची संपूर्ण जबाबदारी तुकोबांवरच होती. पुण्याचे आप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई (आवली) हिच्याशी त्यांचा विवाह झाला होता. तुकोबा व जिजाई यांच्या संसारवेलीवर पुढे महादेव, विठोबा, नारायण व भागूबाई ही

चार फुले उमलली.

संत तुकोबांना त्यांच्या प्रापंचिक जीवनात विविध संकटांचे तडाखे सहन करावे लागले. अनेक प्रापंचिक दुःखेही त्यांना भोगावी लागली. ते साधारणतः १७-१८ वर्षांचे असताना त्यांचे आई-वडील मरण पावले. मोठा भाऊ विरक्तीमुळे तीर्थाटनाला निघून गेला. भयंकर दुष्काळाचा त्यांना सामना करावा लागला. संतू नावाचा त्यांचा मोठा मुलगा दुष्काळातच निर्वतला. दावणीला असलेली गाय गुरेही गेली. महाजनकी बुडाली. मन उदास झाले. संसारात विरक्ती आली. या परिस्थितीत त्यांनी श्री विठ्ठलावरची आपली परमभक्ती कायम ठेवत देहू गावाजवळील भंडारा डोंगरावर उपासना चालू केली. चिरंतनाचा, शाश्वताचा शोध घेत असताना त्यांना साक्षात्कार झाला. तेथेच परब्रह्मस्वरूप 'श्रीविठ्ठल' त्यांना भेटला असे मानले जाते.

संत तुकाराम महाराजांचा सावकारीचा परंपरागत व्यवसाय होता. परंतु एकदा दुष्काळ पडला असता त्यांनी सर्व कुळांना त्यांच्या सावकारीच्या पाशातून मुक्त करून टाकले. जमिनीची गहाणवटीची कागदपत्रे इंद्रायणी नदीत बुडवली. पुढे प्रवचने-कीर्तने करताना संत तुकारामांना अभंगांची रचना स्फुरू लागली. सुदुंबरे गावातील त्यांचा बालपणीचा मित्र संताजी जगनाडे यांनी संत तुकाराम महाराजांचे अभंग कागदावर उतरवून घेण्याचे काम केले. देहू गावातील मंबाजी नामक बुवाने संत तुकाराम महाराजांचा अनन्वित छळ केला. परंतु संत तुकाराम महाराज यांच्या पत्नी आवलीने मंबाजींना बदडण्याचा प्रयत्न केल्यावर मंबाजी पळून गेला. पण नंतर संत तुकाराम महाराजांचा आध्यात्मिक अधिकार ओळखून त्यानेही त्यांचे शिष्यत्व पत्करले. पुण्याजवळील वाघोली गावातील रामेश्वर भट यांनी संत तुकाराम महराज यांना संस्कृत भाषेतील वेदांचा अर्थ प्राकृत भाषेत सांगितल्यावरून त्यांना त्यांच्या अभंगांच्या गाथा इंद्रायणी नदीत बुडवून टाकण्याची शिक्षा देण्यात आली.

वारकरी सांप्रदायातील संत असलेल्या संत तुकाराम महाराज यांच्या गुरूचे नाव केशवचैतन्य (बाबाजी चैतन्य) होते. त्यांच्या शिष्यांचे नाव संत निळोबा, संत बहिणाबाई व भगवानबाबा असे होते. मराठी भाषेवर संत तुकाराम महाराजांचे उत्तम प्रभुत्व होते. संत तुकाराम महाराजांनी आपल्या हयातीत सुमारे

पाच हजाराहून अधिक अभंग रचले. एक समाजसुधारक, कवी, विचारवंत व लोकशिक्षक म्हणून संत तुकाराम महाराज समाजासाठी निर्मोही वृत्तीने समर्पित कार्य करीत राहिले.

फाल्गुन वद्य द्वितीयेला संत तुकाराम यांचे सदेह वैकुंठ-गमन झाले, असे मानले जाते. हा दिवस 'तुकाराम बीज' म्हणूनही ओळखला जातो. संत तुकाराम महाराज हे संसारी असूनसुद्धा त्यांनी आयुष्य परमार्थाकडे वळवले. सर्व समाज सजग व सधन असावा, अशी त्यांची धारणा होती. गरिबांविषयी त्यांना प्रचंड कळवळा होता. त्यांचे अंतकरण महासागरासारखे होते. माणुसकीची त्यांना जाणीव होती. ते व्यापारी होते. त्यांनी स्वतःच्या वाट्याला जे आले ते लोकांमध्ये वाटले. कर्जदारांची कर्ज माफ करणारा हा जगातील पहिला संत होता. जगामध्ये समता नांदावी, अशी त्यांची सम्यक भूमिका कायम राहिली. आपल्या अभंगांतूनही ती त्यांनी यथोचित मांडण्याचा प्रयत्न केला. संसारातील विरक्तीचा ते महामेरू होते. महात्मा गौतम बुद्धाने जसे राजऐश्वर्याचा त्याग केला. तसा संत तुकाराम महाराज यांनी संसारातील सुखदु:खाचा त्याग केला. जगाचा संसार सुरळीत चालविण्यासाठी त्यांनी अभंगांद्वारे मानवाला व एकूणच तत्कालीन समाजाला दिशा दाखविली. त्यांचे मार्गदर्शन समाजाच्या दृष्टीने तेव्हाही आणि आजही मौलिक ठरले आहे. समाजातील काही विकृत मानसिकतेच्या समाजकंटकांनी संत तुकाराम महाराजांना वेडसर ठरविण्याचाही अयशस्वी प्रयत्न केला. अनेक कट कारस्थाने त्यांच्याविरुद्ध रचली. परंतु, संत तुकाराम महाराज त्या सर्वांतून सहीसलामत सुटले.

संत तुकाराम महाराजांची पहिली बायको वारल्यानंतर त्यांनी पुण्यातील आप्पाजी गुळवे यांची कन्या नवलाई ऊर्फ जिजाऊ हिच्याबरोबर दुसरा विवाह केला. ती स्वभावाने खाष्ट होती, परंतु सती सावित्रीसारखी पतिव्रता होती. संत तुकाराम महाराज यांचा संसार तिने नीट सांभाळला, त्यांची विरक्ती सांभाळली. संत तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर आत्मचिंतनासाठी तेरा दिवस बसले. ईश्वराची करुणा भाकत त्यांनी चिंतन केले, त्यावेळी त्यांची सर्व देखभाल जिजाऊने केली. संत तुकाराम महाराजांनी स्वतःचा संसार सुखाचा करण्यापेक्षा जगाच्या कल्याणासाठी कीर्तनातून अभंगवाणी रचली, लौकिकार्थाने मायाजालात

ते गुंतले नाहीत. देहूला संत तुकाराम महाराज जेथून वैकुंठाला गेले, त्या स्थानावर नांदुरकीचे एक झाड आहे. तुकाराम बिजेला बरोबर दुपारी १२:०२ वाजता तुकाराम वैकुंठाला गेले, (निर्वाण शनिवार १९ मार्च १६५०, फाल्गुन वद्य द्वितीया, शा.शके १५७२, युगाब्द ४७५१. देहू, महाराष्ट्र) त्या वेळी हा नांदुरकीचा वृक्ष प्रत्यक्ष हलतो, असे सांगितले जाते.

संत तुकाराम महाराजांना ''जगद्गुरू'' असे संबोधले जाते. जगदगुरू तुकाराम महाराज हे सदैव ''हरिनामात'' गढलेले असायचे. होळीनंतर लगेच दुसऱ्या दिवशी ''तुकाराम बीज'' हा दिवस येतो. याच दिवशी जगद्गुरू तुकाराम महाराज हे नांदुरकी वृक्षाच्या छायेखाली ध्यानस्त बसून सदेह वैकुंठधामाला गेले. वैकुंठधाम म्हणजे साक्षात ''श्री हरि भगवान विष्णू'' यांचे धाम. जगदगुरू तुकाराम महाराज यांच्या नावातच ''राम'' आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या एक युगप्रर्वतक महापुरुषाने संत तुकाराम महाराज यांचे आशीर्वाद घेऊन आपल्या कार्याला सुरुवात केली होती. यामुळे संत तुकाराम महाराजांना ''जगद्गुरू'' असे संबोधले जाते.

जेव्हा संत तुकाराम महाराजांनी आपल्या जवळचे सगळे गरिबांना वाटून दिले. तेव्हा घरामध्ये खाण्यासाठी त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना काही उरले नव्हते. जिजाई म्हणाली ''असे का बसलात, शेतात जाऊन ऊस घेऊन या''. त्या दिवशी संत तुकाराम महाराज उसाची मोळी घेऊन घराकडे निघाले. वाटेत भेटलेल्या माणसांनी उसाची मागणी केली. संत तुकाराम महाराज यांनी प्रत्येकाला ऊस दिला. घरी फक्त एक ऊस घेऊन गेले. हे पाहून भुकेलेल्या बायकोला राग आला. संत तुकाराम महराज यांना त्याच उसाने मारायला सुरुवात केली. जेव्हा ऊस तुटला तेव्हा तिचा राग शांत झाला. संत तुकाराम महाराज हसले आणि म्हणाले'' उसाचे दोन तुकडे झाले आहेत, एक तुकडा मी खातो आणि दुसरा तू खा.'' क्षमा आणि प्रेमाचा असीम समुद्र पाहून बायकोच्या डोळ्यात अश्रू आले. संत तुकाराम महाराजांनी तिचे अश्रू पुसले आणि ऊस सोलून त्यांना खाण्यासाठी दिला.

महाराष्ट्राच्या पठारावर अध्यात्माचे सिंचन करत चिरंतन शाश्वत मानवी मूल्यांच्या माध्यमातून अवघ्या मानव समाजाला सम्यक दृष्टी व सजग आचार

प्रदान करणाऱ्या संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर अनेक चित्रपट प्रदर्शित झाले व लोकसाहित्यही प्रकाशित करण्यात आले. सन १९३६ मध्ये 'संत तुकाराम' हा संत तुकाराम महाराजांवरील चित्रपट मुंबईमध्ये मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आला आणि तो पाहण्यासाठी खेडेगावातील असंख्य लोक चालत आले होते. सन १९६३ मध्ये संत तुकाराम महाराज हा चित्रपट कन्नडमध्ये, १९६५ मध्ये हिंदीमध्ये, १९७३ मध्ये भक्त तुकाराम या नावाने तेलगूमध्ये आणि सन २०१२ मध्ये तुकाराम या शीर्षकाने मराठीमध्ये संत तुकाराम महाराजांच्या जीवनावर चित्रपट प्रदर्शित झाला. भारतातील सर्वात मोठी कॉमिक बुक सीरिज असलेल्या अमर चित्र कथाच्या ६८ व्या अंकात तुकारामांचे जीवन होते. सन २००२ मध्ये भारत सरकारने संत तुकाराम महाराज यांच्या गौरवार्थ १०० रुपयांचे रौप्य स्मारकाचे नाणे काढले.

**आम्ही जातो आमच्या गावा ।**
**आमचा राम राम घ्यावा ।।१।।**
**आजवर होतो तुमच्या गावी ।**
**आता कृपा असू द्यावी ।।२।।**
**आता कसले येणे जाणे ।**
**सहज खुंटले बोलणे ।।३।।**
**रामकृष्ण विठ्ठल बोला ।**
**तुका गेला वैकुंठाला ।।४।।**

- संत तुकाराम महाराज

V



क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज



# क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज

- जन्म : १९ फेब्रुवारी १६३० ते महानिर्वाण : ०३ एप्रिल १६८० -

**तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या व अवघे पन्नास वर्षांचे आयुष्य लाभलेल्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा, धैर्याचा, रणनीतीचा व राजनीतीचा अमीट ठसा प्रत्येक मराठी माणसाच्या मना-मनात उमटलेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांसारखा पराक्रमी योद्धा, प्रजाहितदक्ष, अन्यायनिवारक, परधर्मसहिष्णू, रंजल्या-गांजलेल्यांचा कैवारी राजा खरोखरच विश्वभूषण होता. युगप्रवर्तक होता. हिंदवी साम्राज्याचे संस्थापक आणि एक आदर्श शासनकर्ता म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजीराजे भोसले एक सर्वसमावेशक, सहिष्णू राजा म्हणून महाराष्ट्रात आणि जगभरात वंदिले जातात. अनेक पाश्चिमात्य देशांनी छत्रपती शिवरायांच्या युद्धनीतीचा आणि राज्यव्यवस्थेचा अभ्यास करून त्याचा अंतर्भाव आपल्या प्रशासनात केला आहे. अशा या महान युगप्रवर्तक राजाविषयी.**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म दि. १९ फेब्रुवारी १६३० या दिवशी शिवनेरी गडावर झाला. हा गड पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात वसलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सरदार शहाजी आणि जिजाबाईंचे द्वितीय चिरंजीव होय. त्या दोघांना एकूण सहा मुले झाली. त्यात सर्वात थोरले संभाजी आणि छत्रपती शिवाजी महाराज हे वगळता बाकीची मुले फार काळ जगली नाहीत. जिजाबाईंनी शिवनेरी गडावरील शिवाई या देवीला नवस बोलला होता. त्यावरून मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळेस शहाजीराजे गडावर नव्हते. ते विजापूरच्या आदिलशहाच्या मोहिमेत गुंतले होते. त्या काळात महाराष्ट्रावर अहमदनगरचा निजामशाह,

विजापूरचा आदिलशाह आणि गोवळकोंड्याचा कुतूबशाह अशा तिघांची सत्ता होती. स्वतः शहाजीराजे हे त्या सुमारास आदिलशाह आणि पुढे निजामशाही यांच्या पदरी सेवेला होते. आदिलशाहने त्यांना पुणे प्रांताची जहागीर बहाल केली होती. मुघल सम्राटांच्या सेवेत असूनदेखील स्वतंत्र राज्य म्हणजेच स्वराज्याचे स्वप्न पाहणारे पहिले मराठा सरदार म्हणजे शहाजीराजे भोसले होय. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला त्याच सुमारास महाराष्ट्रात प्रचंड मोठा दुष्काळ पडला. शहाजीराजांना तर क्षणभरही उसंत नव्हती. ते आपल्या तान्ह्या मुलाला भेटले आणि लगेचच बऱ्हाणपूरच्या मोहिमेवर निघून गेले. त्या सुमारास पडलेला दुष्काळ फारच लांबला होता.

बालपणीच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज गडावर फिरणे, जुन्नरच्या आसपास लेण्याद्री ओझरचा प्रदेश पायाखाली घालणे, घोड्यावर रपेट मारणे, अक्षरे लिहायला-वाचायला शिकणे, अशा अनेक गोष्टीत हळूहळू पारंगत झाले. आई जिजाबाईकडून संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, रामायण व महाभारत यांच्या गोष्टी सतत ऐकल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात एक वेगळीच धारणा निर्माण झाली होती. त्यावेळेस पुणे प्रांताची जहागिरी शहाजीराजांकडे होती. या प्रांताचा कारभार त्यांनी दादोजी कोंडदेव या सुभेदाराकडे सोपवला आणि स्वतःसाठी कर्नाटकातील जहागिरी घेऊन ती आपल्या दोन्ही मुलांच्या नावे केली. शहाजीराजांनी कर्नाटकातील राज्य स्वतः निर्माण केले होते, त्या जहागिरीचे ते राजे होते. शहाजीराजांचे आदिलशाहीत खूप वजन होते. त्यांच्या शब्दांना मान होता.

छत्रपती शिवाजी महाराज सात वर्षांचे असताना जिजाबाई त्यांना घेऊन पुणे येथे वास्तव्यास आल्या. त्यावेळी मुरार जगदेव याने पुणे जाळून त्याची अक्षरशः राख रांगोळी केली होती. पुण्यात जागोजागी फक्त भंगलेले अवशेष आणि वस्त्या दिसत होत्या. पुणे उद्ध्वस्त झाले होते. मोठमोठ्या वास्तू, वाडे, जमीनदोस्त होऊन पडले होते. पुण्यात आल्यावर राहायचे कुठे, हाच प्रश्न लहानग्या शिवबालाही पडला होता. त्यांनी जिजाबाईंना विचारले, मांसाहेब आपण कुठे राहायचे आहे? इथे तर एकही महाल वाडा दिसत नाही. त्यावर जिजाबाईंनी उत्तर दिले, शिवबा, महाल किंवा वाडा आपण बांधायचा आहे.

पुण्याची जहागिरी पाहणारे सुभेदार दादोजी कोंडदेव जिजाबाई आणि शिवबा यांच्याबरोबर होतेच. त्यांनी वाड्यासाठी योग्य अशी जागा शोधली. त्या जागेचे रीतसर भूमिपूजन करण्यात आले. वाडा उभारणीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांचा तो भला मोठा वाडा पुण्याच्या मध्यवर्ती भागात बांधून तयार झाला. वाड्यात मोठ मोठी दालने, महाल, कोठ्या स्वयंपाक घर, पागा, गोशाळा, भरपूर पाणी असलेली मोठी विहीर अशा सर्व सोयी होत्या. वाड्याच्या अगदी शेजारीच गणपतीचे मंदिर बांधले. त्या वाड्याचे नाव लाल महाल ठेवण्यात आले. मांसाहेब जिजाऊंच्या देखरेखीखाली पुणे हळूहळू पूर्वपदावर येऊ लागले. या माध्यमातून बाल शिवबाला एक वेगळेच पण महत्त्वाचे प्रशिक्षण मिळाले. एखादे गाव बसवण्याचे, स्वतःचे राज्य उभारायचे तर अशी गावेच्या गावे निर्माण करायची असतात, हे त्यांना कळाले. अशारीतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे नव्याने उभारलेल्या पुण्यात बस्तान बसले.

काही वर्षे गेली. छत्रपती शिवाजी महाराज दहा वर्षांचे झाले. सन१६४० मध्ये फलटणच्या निंबाळकर यांची सात वर्षांची कन्या सई हिच्याशी त्यांचा विवाह झाला. या विवाह सोहळ्यालाही शहाजीराजे हजर राहू शकले नाहीत. राजांचे मोठे भाऊ संभाजीदेखील आपल्या वडिलांबरोबरच राहत असल्यामुळे ते देखील येऊ शकले नाही. शहाजीराजे विजापूरच्या मोहिमेत गुंतले होते. जिजाबाई आणि संभाजी या मायलेकरांची तब्बल ११ वर्षे भेट नव्हती. शिवाजी महाराज आणि सईबाईंच्या विवाहनंतर काही दिवसांनी शहाजीराजांनी जिजाबाईंना व शिवाजी महाराजांना कर्नाटकात बंगळूरला येण्याची आज्ञा केली. त्यानुसार ते दोघे निघाले. सईबाईंची फलटणला माहेरी पाठवणी करण्यात आली. महाराजांनी प्रथमच आदिलशाहच्या साम्राज्यात प्रवेश केला. बंगलोर शहराचे त्यांना मोठे अप्रूप वाटत होते. इतके मोठे शहर, प्रचंड मोठी बाजारपेठ शहाजीराजे पाहत होते. तो प्रशस्त राजेशाही वाडा पाहून महाराजांचे डोळेच दीपून गेले. एकदा संभाजीराजांच्या सोबत बंगलोरमधील बाजारपेठेत फिरताना महाराजांना दोन गोरेपान उंच इसम दिसले. त्यांच्या डोक्यांवर केसांचे टोप होते. त्यांनी संभाजी राजांना विचारले, दादा ते कोण आहेत? संभाजीराजांनी उत्तर दिले, ते फिरंगी व्यापारी आहेत. इथे व्यापार करायला येतात. त्यावर त्यांनी

विचारले, कशासाठी व्यापार करायला आपल्याकडे आले? त्यांना व्यापार करायला त्यांचा मुलुख नाही का? या प्रश्नाचे संभाजी राजांकडे उत्तर नव्हते. पण त्यांच्या मनात तो प्रश्न तसाच राहिला. पण दोन-तीन दिवसांनी तेच दोन फिरंगी व्यापारी शहाजीराजांना भेटायला महालात आले. ते शस्त्रास्त्राचे व्यापारी होते. शहाजीराजांनी त्यांच्याकडून दोन मोठ्या बंदुका घेतल्या. त्यातील एक बंदूक त्यांनी महाराजांना दिली आणि तिथे प्रशिक्षण देण्यासाठी एका हवालदारला नेमले. त्यानंतर त्यांचे रीतसर युद्ध प्रशिक्षण सुरू झाले.

बंगलोरला दोन वर्षे राहून शिवाजीराजे पुण्याला परतले. त्यावेळेस त्यांचे वय अवघे १२ वर्षे इतकेच असले तरीही पुण्याच्या राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. गावातील मोठ मोठे मंडळी जसे कुलकर्णी, पाटील, देसाई, देशपांडे, देशमुख यांच्याशी ते स्वतः चर्चा करू लागले. त्यांनी पुण्याच्या कारभाराला स्वतःला वाहूनच घेतले. दादोजी पंतांबरोबर मावळ प्रांतात फिरताना त्यांचे लक्ष नेहमी गड किल्ल्यांकडे जायचे. उंच भक्कम आकाशी स्पर्धा करणारे ते गडकिल्ले शिवाजीराजांना आकर्षित करून घेत होते. त्यांच्यात कुठलीतरी शक्ती आहे असे त्यांना वाटत होते. एकदा शिवाजीराजांनी दादोजी पंतांना विचारले, पंत हे गड किल्ले कोणाचे आहेत? त्यावर पंत उत्तरले, ते आदिलशहाचे आहेत. पंतांचे उत्तर ऐकून महाराजांना आश्चर्य वाटले. ज्या भागात आपली जहागिरी आहे, त्या भागातील गड मात्र आदिलशहाचे कसे? हे गणित त्यांना समजले नाही. शिवाजीराजे त्यावरच विचार करीत राहिले. शिवाजीराजांनी पुण्याचा कारभार हातात घेतला आणि तेव्हापासून ते काही विलक्षण आश्चर्यकारक निर्णय घेऊ लागले. लहान वयात ही एवढी अफाट निर्णय क्षमता पाहून त्यांच्या आजूबाजूचे सरदार चकित होऊन जात.

एकदा एक लोहार शिवाजी महाराजांकडे आला. त्याचे नाव भीमा लोहार. जंगलातून येताना त्याने एक लांडगा मारला होता आणि त्याची शेपटी तोडून आणली होती. त्या परिसरातील लांडग्यांचा उपद्रव थांबवण्यासाठी जिजामातेने एक नामी युक्ती शोधून काढली होती. जो कोणी लांडग्याला मारून त्याची शेपूट आणून दाखवील, त्याला महाराजांकडून बक्षीस मिळेल, अशी त्यांनी

घोषणा केली. ती घोषणा ऐकून भीमा लोहाराने लांडग्याची शिकार करून त्याची शेपूट आणली आणि शिवाजीराजांना दाखवली. शिवाजीराजांनी त्या भीमा लोहाराला बक्षिसी तर दिलीच; पण त्याला आपल्या पदरी ठेवून घेतले आणि त्याच्यावर लोहार शाळेची जबाबदारी सोपवली. शिवाजीराजांनी अशा अनेक गरीब कष्टकरी हातांना आपल्या दरबारी विश्वासाने कामाला ठेवून घेतले. त्यात त्यांनी गरीब श्रीमंत किंवा जात-पात असा भेदभाव अजिबात केला नाही.

स्वराज्य स्थापन करणे म्हणजे आदिलशहाशी संघर्ष करणं, हे अटळ होते. शिवाजीराजांना अनेक जण येऊन मिळत होते. त्यांचा मित्रपरिवार वाढत होता. त्यात बारा मावळ प्रांतातील भिन्न भिन्न जाती धर्मांचे लोक सामील होत होते. गुंजवणी येथील येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कान्होजी जेधे, दादाजी नरस प्रभू, बाजी पासलकर, काकाजी कोंढाळकर, जीवा महाला, सूर्याची काकडे अशी अनेक मंडळी राजांना येऊन मिळाली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शिवाजी महाराजांचे नाव आणि लोकप्रियता वाढू लागली होती. जनतेच्या मनात शिवाजी या नावाविषयी आणि त्या व्यक्तीविषयी एक कुतूहल उत्पन्न झाले होते. खूप जण तर त्यांना पाहण्यासाठी येत असत. एकदा शिवाजीराजे घोड्यावर बसून डोंगर कपारीतून रफेट मारीत होते, तोच त्यांना एक व्याकूळ हाक ऐकू आली. शिवाजीराजांनी तत्काळ घोड्याचे लगाम खेचले आणि चोहीकडे पाहिले, तर एक इसम धावत त्यांच्याकडे येत होता. तो जिवाच्या आकांताने इतका धावत होता, की एक दोनदा तो खालीच पडला. तो पुन्हा उठला व महाराजांच्या जवळ आला. त्याने महाराजांच्या पायाला मिठी मारली. तो हुंदके देत रडायला लागला. शिवाजीराजांनी त्याला विचारले की, काय झाले? तो इसम सांगू लागला की, त्याची तरुण मुलगी पाणी भरायला गेली असताना गावच्या पाटलांनी तिला पळवली आणि तिच्यावर अत्याचार केले होते. त्या मुलीने जीव दिला होता. पाटलाचे हे प्रताप साऱ्या गावाला माहीत होते. पण त्याच्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची हिम्मत नव्हती. तो प्रसंग ऐकून शिवाजीराजांनी येसाजी कंक याला हुकूम सोडला की आत्ताच्या आत्ता जाऊन त्या पाटलाला इथे हजर करा.

महाराजांची आज्ञा घेऊन येसाजी कंक दौडत निघून गेला. काही वेळाने पडलेला चेहरा घेऊन माघारी आला. येसाजीने राजांना सांगितले की, पाटील

लई कडू हाय. म्हणाला, तुझा कोण शिवाजी हाय, तो माझ्यापेक्षा मोठा हाय व्हयं? तो नुसता नावाचा राजा हाय. आरं आम्ही गावचं पाटील हौत. तुझ्या राजाला सांग, भेटायला यायचं असेल, तर तूच समोर ये. पाटील येणार नाही. हे ऐकून शिवाजीराजांनी स्मित केले आणि येसाजीच्या संगतीला ५० घोडेस्वार दिले आणि त्या पाटलाच्या मुसक्या आवळून त्याला महालात हजर करण्याचा हुकूम सोडला. येसाजीने तात्काळ अंमलबजावणी केली आणि त्या पाटलाला बांधून राजांच्या पुढे हजर केले. पाटील प्रचंड घाबरलेला होता. राजे त्याला म्हणाले, काय पाटील? आम्ही नुसते नावाचे राजे आणि तुम्ही गावाचे पाटील ना. पण आम्ही धरतीचे पुत्र आहोत. परस्त्रीला माता बहिणी समान वागवण्याचे जसे आमच्यावर संस्कार आहेत तसेच प्रजेला नोकर न समजण्याचेही. नीट ऐकून ठेवा. प्रजाही आपल्याला पोरासारखी असते. तुम्ही आम्ही तिचे पालन करत असतो. तुम्ही तर गावचे पाटील म्हणतात, मग आपल्याच प्रजेवर बलात्कार कसा करतात? हा तर पाशवी रिवाज झाला की! राजांचे ते शब्द ऐकून पाटलाच्या डोळ्यातून खळाखळा अश्रू वाहू लागले. तो पुन्हा पुन्हा महाराजांची माफी मागू लागला. महाराजांनी किंचितही दयामया न दाखवता त्या पाटलाचे हात पाय तोडून त्याची त्याच्याच गावात गाढवावरून धिंड काढण्याची कठोर शिक्षा सुनावली. दुसऱ्या दिवशी ही बातमी साऱ्या पुणे आणि आसपासच्या गावात वाऱ्यासारखी पसरली. ती ऐकून प्रत्येक गावच्या पाटील आणि देशमुखांच्या तोंडचे पाणीच पळाले. सर्वसामान्य लोक मात्र खूष झाले. शिवाजीराजांच्या रूपात त्यांना आपला पालनकर्ता मिळाला.

पुण्याच्या आसपास असलेली आळंदी आणि जेजुरी ही मंदिरं महाराजांना विशेष आवडायची. ते वरचेवर त्या मंदिरांना भेट देत असत. पण, त्यांचे सगळ्यात आवडते देऊळ रायरेश्वराचे. हे प्राचीन देऊळ सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वसलेले होते. महाराज रायरेश्वराला नेहमी जात असत. तेथे महादेवाच्या मूर्ती पुढे नतमस्तक झाल्यावर त्यांच्या मनातील खळबळ तात्पुरती का होईना शांत व्हायची. आपण फक्त नावाचे राजे आहोत, या मुलखावर आदिलशाहीची हुकमत चालते, त्यांनी आक्रमण केले की कोणी काहीही करू शकत नाही, येथील जनता जणू काही निर्जीव पडलेली असते, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची तिला

जाण नाही व जनतेत एकताही नाही. पाटील, देशमुख मंडळी याचाच फायदा उचलतात, ही मंडळीदेखील आदिलशहाला कायमची शरण गेलेली दिसतात. त्या मंडळींना विश्वासात घेऊन एकत्रित करायला हवे. जहागीरदार, कुलकर्णी, पाटील, देशमुख, देसाई देशपांडे यांच्यासोबत असंख्य मावळे, सामान्य जनता हे सगळे एकत्र आले तर निश्चितच काहीतरी बदल घडू शकेल. पण हे लवकर घडायला हवे. राजांच्या मनात ही खळबळ चालू होती. महाराज रायरेश्वराला आले की त्यांचे आसपासच्या गावात फिरणे व्हायचेच. इतर वेळीदेखील ते ज्या-ज्या गावी जात, तेथील लोकांच्या व्यथा अडचणी ते समजावून घेत. त्या गोरगरिबांच्या झोपड्यात खोपटात जाऊन त्यांची चटणी भाकरी मोठ्या आवडीने खाताना त्यांच्याशी तासन्तास बोलून त्यांच्या अंतकरणात विश्वास निर्माण करीत. शेती पीकपाणी याविषयी जाणून घेत.

शिवाजी महाराजांनी याच काळात तातडीने कोंढाणा स्वराज्यात सामील करून घेतला. आता त्यांचे लक्ष पुरंदर गडाकडे गेले. पुण्याजवळ सासवड गावी असलेल्या पुरंदरावर भरपूर प्रमाणात संपत्ती, तोफा, बंदुका, हत्यारे आणि दारूखाना होता. गडाची व्यवस्था पूर्वी महादजी नीलकंठ यांच्याकडे होती. महादजी नीलकंठ यांच्या मृत्यूनंतर त्यांची तीन मुले निरोजी, शंकराजी आणि पिलाजी हे पुरंदरचे वारस होते. पण मोठा भाऊ निरोजी मात्र आपल्या भावांना पुरंदरचा हिस्सा आणि उत्पन्न देण्यास अजिबात तयार नव्हता. या तिन्ही भावांच्या मनात शिवाजी महाराजांविषयी मात्र आदर होता. तीन भावांमधल्या भाऊबंदीचा फायदा उठवीत त्यांनी पुरंदरावर स्वारी केली. संपत्तीमधील वाटा मिळावा, यासाठी तीन सख्खे बंधू कुठल्याही थराला जायला तयार आहेत याची त्यांना कल्पना आली होती. हीच गोष्ट त्यांच्या पथ्यावर पडली. पुरंदर स्वराज्यात सामील झाला. शिवाजी महाराजांच्या ताब्यात आलेला एक महत्त्वाचा मोठा असा तो गड होता. पण केवळ एवढेच करून महाराज थांबले नाहीत. त्यांनी तिन्ही भावांना एकत्र बोलावले आणि त्यांच्यात सामोपचारही घडवून आणला. इतकेच नाही तर त्यांनी तिन्ही भावांना त्यांच्या वाटणीची पुरंदरची वतनदारीही देऊ केली, फक्त गड मात्र स्वराज्याकडे ठेवला.

शिवाजी महाराजांच्या असामान्य दूरदृष्टीचे एक उदाहरण म्हणजे

पुरंदरापाठोपाठ शिवाजी महाराजांनी चाकण ताब्यात घेतले. असे एक एक करीत स्वराज्याची भक्कम भिंत उभारली जाऊ लागली. कोंढाणा, पुरंदर आणि चाकण या सर्व मोहिमांमध्ये शक्तीपेक्षा युक्तीचा अधिक वापर होता आणि तसे करणे क्रमप्राप्तही होते. कारण शिवाजी महाराजांचे सैन्य अद्याप फार मोठे नव्हते. ७००० मावळे त्यांच्या दिमतीला होते. त्यांना हाताशी घेऊन आदिलशहाच्या अफाट सैन्याशी युद्ध करणे केवळ अशक्यच होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची सुरुवात करताना अतिशय सावधानता बाळगली होती. सगळ्यात आधी त्यांनी पुणे आणि आसपासच्या परिसरावर लक्ष केंद्रित केले. त्या भागातले गडकिल्ले ताब्यात घेतले. त्यांना विजापूरहून निरोप आला की आदिलशहाचा मुख्य सरदार फत्तेखान तातडीने इकडे येण्यास निघाला आहे. तो निरोप ऐकून शिवाजी महाराज जराही विचलित झाले नाहीत. त्यांनी नेहमीच्या धीरोदात्तपणे तयारी सुरू केली. बाजी पासलकर याला बोलवून घेतले आणि म्हणाले, बाजी फत्तेखान आमच्या भेटीस येतो आहे. जरा उशीर झालाय, पण आम्ही त्याच्या भेटीस आतुर आहोत. चला तयारीला लागा. फत्तेखानाला पुरंदरावर भेटूयात. तुम्ही नेतृत्व करावे. शिवाजी महाराजांना काय म्हणायचे ते बाजी पासलकरला लगेच समजले. तो आनंदाने तयार झाला. शिवाजी महाराजांना मुजरा करून बाजी म्हणाला, महाराज, मनगट शाबूत आहे. फक्त आज्ञा करावी ही लढाई करण्याची. शिवाजी महाराजांनी आपला पुण्याचा सर्व खजिना तातडीने तोरणा किल्ल्यावर हलवला. बाजी तानाजी, फिरंगोजी आणि बाकीच्या मावळ्यांना पटापट सूचना केल्या. शिवाजी महाराज पुण्याहून पुरंदरावर निघाले. फत्तेखानाचा समाचार घेण्यासाठी ही स्वराज्याची पहिलीच लढाई असणार होती. त्यामुळे तर सगळ्यांच्या अंगात दुप्पट उत्साह संचारला होता. शिवाजी महाराजांचे मावळे आदिलशहाच्या फत्तेखान, फाजलशाह, असलमशाह या सरदारांच्या सैन्यावर अक्षरश: तुटून पडले. हर हर महादेवच्या गर्जनेने आदिलशाही सैन्य गांगरून गेले. मराठ्यांकडून इतक्या प्रखर आणि कडव्या आक्रमणाची त्यांना स्वप्नातही अपेक्षा नव्हती. बाजी पासलकरच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी ही लढाई जिंकली. पुरंदरावर भरपूर लूट गोळा केली आणि स्वराज्याच्या चरणी अर्पण केली.

पुरंदरगड स्वराज्यात आला, पण पुरंदरावर फत्तेखानाच्या सैन्याशी जिवाची

बाजी लावून लढणारे बाजी पासलकर मात्र कायमचे गमावले. त्याचे शिवाजी महाराजांना खूप दुःख झाले. पुरंदरासारखा मोठा गड हाती आला पण बाजी पासलकर सारखा मोहरा मात्र गमावला. अठरा वर्षे वयाच्या शिवाजीच्या मांडीवर ६५ वर्षांच्या बाजी पासलकरने प्राण सोडला. पुरंदरावर फत्तेखानाला पराभूत केल्याची बातमी आदिलशाहीत पोहोचली. त्यामुळे आदिलशहात चवताळून उठला. गेले काही दिवस शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या बातम्या त्याच्या कानावर येत होत्या. त्यामुळे आधीच त्याची झोप उडाली होती. म्हणून त्याने फत्तेखानाला पाठवले तर शिवाजी महाराजांनी त्यालाही पळवून लावले होते. ते कळाल्यावर तर आदिलशहाची बैचेनी अधिकच वाढली आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.

शहाजीराजे आदिलशहाच्या सेवेत होते. आपल्या सरदारांकरवी आदिलशहाने शहाजीराजांना पकडून कैदेत टाकले. पण हे कृत्य त्याने अतिशय विश्वासघाताने केले होते. एके दिवशी शहाजीराजे त्यांच्या छावणीत रात्री झोपले असताना आदिलशहाचा महाबलशाली सरदार अफजल खान याने त्यांच्या छावणीत शिरून त्यांना कैद केले होते. आपल्या वडिलांच्या कैदेची वार्ता इकडे शिवाजी महाराजांना समजली. आदिलशहाने फार वाईट डाव खेळला होता. असेच्या असे उठावे आणि विजापूरवर चाल करून जावे, असे शिवाजी महाराजांना वाटले. खरे म्हणजे शहाजीराजांनी त्यांचा सर्वाधिक काळ आदिलशाहीच्या सेवेत घालवला होता. तीस वर्षे ते आदिलशाहीत होते. आपल्या सेवेत त्यांनी कधीच कुठलीच कसूर ठेवली नव्हती. म्हणूनच आपल्या वडिलांचा असा विश्वासघात केलेला शिवाजी महाराजांना अजिबात खपणे शक्य नव्हते. अफजल खानाचा वध करण्यासाठी त्यांचे हात शिवशिवू लागले.

शहाजीराजांना कैदेत ठेवण्याची वार्ता समजल्यापासून जिजाबाई सईबाईसुद्धा चिंतेने ग्रासून गेल्या होत्या. शहाजीराजे सुरक्षित राहावे यासाठी त्या दोघी श्री गणेशाची प्रार्थना करीत होत्या. त्याला अभिषेक करत होत्या. शिवाजी महाराज द्विदा मनस्थितीत पडले होते. विजापूरवर हल्ला करावा की आणखी काही वेगळा विचार करून पावले टाकावित, याबाबत त्यांचा निर्णय होत नव्हता. अर्थात विजापूरवर हल्ला करून जाणे हे तेवढे सोपे नव्हते. उलट ते अधिक जोखमीचे

होते. विजापूरचे आदिलशाही सैन्य अफाट होते. शिवाय विजापूर हा त्यांचा प्रांत होता. थेट हल्ला केला असता तर त्यात मराठ्यांचा पराभव होण्याची शक्यता होती. खूप विचार करून शिवाजी महाराजांनी एक बैठक बोलावली. पंत डबीर, अमात्य सारे जण तातडीने हजर झाले. शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात जिजाबाई स्वतः जातीने लक्ष घालत असत. त्याही बैठकीला आल्या होत्या. या बैठकीत शिवाजी महाराजांनी आपला विचार मांडला. ते म्हणाले, आपण विजापूरवर चाल करून जाण्याचे ठरवले तर काय होईल. त्यावर सर्वांनीच ते आत्मघातकीपणाचे ठरेल, अशी प्रतिक्रिया दिली. शिवाजी महाराजांना हीच प्रतिक्रिया अपेक्षित होती. त्यांनी बैठकीत आणखी एक प्रस्ताव मांडला व विचारले, समजा आपण आदिलशाहीशी तह करायचा ठरवले तर? त्यावरही सर्वांनी नकारात्मक प्रतिक्रिया दिली. मग शिवाजी महाराज म्हणाले, ठीक आहे. थेट युद्ध आणि तह हे दोन्ही नको. विजापूरच्या दरबारी एक खलिता पाठवा की आम्ही स्वराज्याची मोहीम मांडली आहे. त्याविषयी सविस्तर बोलण्याकरता आम्ही स्वतः विजापूरला येत आहोत. त्याची परवानगी द्यावी.

शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार विजापूरला खलिता पाठवण्यात आला. पण खूप दिवस उलटले तरीही त्या खलित्याला काहीच उत्तर आले नाही. शहाजीराजे अद्यापही कैदेतच होते. त्यांच्याभोवती अफजल खानाचा सख्त पहारा होता. अफजल खानाने काही दगलबाजी केली तर, या चिंतेने शिवाजी महाराजांची अस्वस्थता सतत वाढत होती. याच दरम्यान त्यांची अचानक भेट झाली ती संत तुकाराम महाराज यांच्याशी देहू आळंदी येथे. तुकाराम महाराजांच्या भेटीने व आशीर्वादाने शिवाजी महाराज धन्य झाले. त्यांची अस्वस्थता दूर झाली. त्या थोर संताने महाराजांना आशीर्वाद देताना म्हटले, राजे तुम्ही हाती घेतलेले कार्य अलौकिक आहे. ते कार्य सिद्धीस जाणार यात शंकाच नको. भवानी माता सदैव तुमच्या पाठीशी आहे. तुमचे कार्य तडीस नेण्यास माऊली समर्थ आहे. तुकारामांच्या त्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांना खूप धैर्य आले. त्यांचे मन शांत झाले.

शिवाजी महाराज ज्या विजापूरच्या खलित्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो खलिता एक दिवस आला. त्यात शहाजीराजांची मुक्तता केल्याचे लिहिले

होते. पण काही अटी घातल्या होत्या. त्यातील मुख्य अट होती की शिवाजी महाराजांनी कोंढाणा आदिलशाहीला परत करावा. शिवाजी महाराजांनी एक ठाम विचार केला आणि कोंढाणा आदिलशाहीला परत देण्याची अट मान्य केली. ते आपल्या साथीदारांना म्हणाले, स्वराज्यात कधीही निर्भय सुख मिळत नसते, हे ध्यानात ठेवा. एक कोंढाणा गेला तर जाऊ देत. तो परत मिळवता येईल, पण आपल्याला असे अजून २०० गड जिंकायचे आहेत. त्यावर लक्ष केंद्रित करू. शिवाजी महाराजांनी घेतलेली ही पहिली यशस्वी माघार होती. तो राजकारणाचा एक भाग होता. नुकताच हाती आलेला कोंढाणा गड लगेच परत देऊन टाकायचा या विचाराने त्यांचे साथीदार दुःखी झाले. पण महाराजांची राजनीतीच वेगळी होती. आपल्या वडिलांची शहाजीराजांची सुटका करणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. पण आता यापुढील काही दिवस तरी आदिलशाही शांत राहील, थोडी बेसावधही राहील हे लक्षात घेत कोंढाणा आदिलशाहीला परत देऊन टाकल्यावर शिवाजी महाराजांना थोडी स्वस्थता लाभली. आता त्यांनी आपले सारे लक्ष राज्याची व्यवस्था लावण्यावर केंद्रित केले. त्यात शेती, जमिनी यावरील महसुलाची फेररचना, पाणीपुरवठा विपुल असावा यासाठी धरणांची, हाती असलेल्या गडांची बांधकामे अशा काही महत्त्वाच्या कामांचा समावेश होता. पण त्याचबरोबर राज्याची अर्थव्यवस्था व न्यायव्यवस्था यावरही भर दिला होता. शेतकऱ्यांना जमिनीसाठी कर्ज पुरवणे, गुरे, अवजारे घेण्यासाठी गरीब शेतकऱ्यांना विशेष आर्थिक मदत करणे, जमिनीची पुनर्रचना करणे या गोष्टींवर शिवाजी महाराजांनी विशेष लक्ष दिले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नियोजनबद्ध शासन व्यवस्था तयार केली. त्यामुळे जो कोणी पाटील, देशमुख किंवा तत्सम अधिकारी सर्वसामान्य जनतेची पिळवणूक करेल त्याला कठोर शिक्षा केली जाईल, हा वटहुकूमच निघाला आणि त्याची अंमलबजावणी सुरू झाली. आता कोणाही सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार नोंदवायला जनतेला मुभा मिळाली आणि शिवाजी महाराज स्वतः त्या तक्रारीची जातीने दखल घेऊ लागले. त्यांनी लष्कराचे व सैन्यातही विशिष्ट नियम आणले. त्यांच्या राज्यात घोडा हे मुख्य पशुधन होते. घोड्याची मालकी सरकारी लष्कराकडे ठेवण्यात आली. दुसरीकडे गावातील लोकांच्या मालकीची गाई-म्हशी,शेळ्या-मेंढ्या

कोंबड्या व इतर जनावरे यांच्या सुरक्षिततेची हमी देण्यात आली. सरकारी अधिकारी आणि इतरांनाही नाच, गाणे, कलावंतीण बाई, भोगविलासी शौक करण्यास सक्तीची बंदी होती. शिवाजी महाराज स्वतः अशा भोगविलासापासून चार हात लांब राहत. जो कोणी कुठल्याही प्रकारचे शौक करील त्याची गर्दन छाटली जाईल, असा हुकूमच त्यांनी काढला होता.

यादरम्यान शिवाजी महाराजांना एक दुःखद बातमी कळली. काही दिवसांपूर्वी आळंदी गावात ज्यांच्या आशीर्वादाने नवीन उभारी मिळाली त्या संत तुकाराम महाराजांचे निधन झाले होते, ही बातमी कानी पडताच शिवाजी महाराज अतिशय अस्वस्थ झाले. त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. एका भेटीत ते संत तुकाराम महाराजांच्या निर्मळ व शांत व्यक्तिमत्त्वाने भारावून गेले होते.

पुण्यापासून जवळच जावळी आणि कोयना ही दोन खोरी होती. शिवाजी महाराजांचे त्यावर बारकाईने लक्ष होते. त्या खोऱ्यांपासून जवळच महाबळेश्वर, मकरंद गड आणि मंगळगड ही गावे होती. जावळीचे खोरे चंद्रराव मोरे यांच्या ताब्यात होते. आदिलशहाला जावळी जिंकायची होती, पण ते अद्याप जमले नव्हते. चंद्रराव मोरे जावळी चालवीत होते, पण शिवाजी महाराजांचे त्यांच्यावर विशेष लक्ष होते. कारण मोरे यांनी जावळीत अनेक वाईट कृत्य सुरू केली होती. ती स्वराज्यासाठी घातक आणि प्रजेसाठी अन्यायकारक होती. वास्तविक मोरे यांना जावळीचा कारभार शिवाजी महाराजांनीच सांभाळायला दिला होता. पण मोरेंनी आपल्या अधिकाराचा गैरवापर सुरू केला होता. काही दिवसांनी अफजल खानही जावळीवर चाल करून येणार आहे, ही वार्ताही शिवाजी महाराजांना कळली. त्यांनी तातडीने बैठक बोलावली. बैठकीला कान्होजी जेधे, येसाजी कंक, दादाजी नरस प्रभू आदी लोक हजर झाले. कान्होजी जेधे हे आधीपासूनच शहाजीराजांचे एकनिष्ठ सरदार होते. त्यांच्या सांगण्यावरूनच ते शिवाजी महाराजांच्या सेवेत आले होते. शिवाजीने स्वराज्याचे कार्य हाती घेतल्यापासून कान्होजीने त्यांना मावळ प्रांतातील अनेक ग्रामस्थ प्रमुखांचा पाठिंबा मिळवून दिला होता.

जावळी खोऱ्याची प्रत्येक बारीकसारीक खबर कान्होजींना असायची.

त्यासंबंधीची चर्चा करण्यासाठी शिवाजी महाराजांनी ही बैठक बोलावली होती. चंद्राराव मोरे काय काय उपद्व्याप करीत आहेत, त्याविषयी सारा तपशील दिला. ते ऐकून शिवाजी महाराज अतिशय अस्वस्थ झाले. चंद्राराव मोरे यांचा काहीतरी बंदोबस्त करणे आवश्यकच होते. तानाजी, येसाजी यांनी तर चंद्राराव मोरेंवर हल्ला करावा, असे मत व्यक्त केले. शिवाजी महाराजांना अन्य कुठला पर्याय दिसत नव्हता. त्यासाठी खोऱ्यात लपून बसलेले आपले मावळे तलवारीसहित सज्ज होतेच आणि शिवाजी महाराजांना जसे वाटले होते तसे झाले. जावळीत लहानशी लढाई झाली. मावळ्यांनी चंद्राराव मोरेंवर हल्ला चढवला. मावळ्यांनी तलवारीने कापाकापी सुरू केली. अखेर मावळे जिंकले. चंद्राराव मोरे आपल्या बायका पोरांसह जावळी सोडून पळून गेले. जावळी स्वराज्यात आली. या लढाईत एक मर्द मराठा मावळा अतिशय निकराने लढला. त्याचे शौर्य बघून शिवाजी महाराज इतके प्रभावित झाले की त्याला आपल्या मराठा सैन्यात दाखल करून घेतले. त्याचे नाव होते मुरारबाजी देशपांडे. त्यातून स्वराज्याला खूप मोठी संपत्ती, घोड्यांची भलीमोठी पागा आणि मुरारबाजीसारखा शूर योद्धा मिळाला. त्याचबरोबर चंद्राराव मोरे यांच्याकडचे अनेक लोकही राजांच्या सेवेत सामील झाले.

शिवाजी महाराजांना आनंद झाला. शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकून ताब्यात घेतले. त्यामुळे एक फार मोठा मुलुख राज्याला मिळाला. त्यानंतर महाराजांच्या दृष्टीला एक गड पडला, त्याचे नाव रायरीगड. रायरीगड हा कोकणपट्टी जवळचा एक मोठा गड. मोहिमांवर येत जात असताना शिवाजी महाराजांनी तो अनेकदा दुरूनही पाहिला होता, पण ते जेव्हा प्रत्यक्ष गडावर गेले तेव्हा त्यांना तो गड आणि एकूण परिसर अतिशय आवडला. कोकण म्हणजे समुद्रकिनारा. आजूबाजूला घाटांचे रस्ते. पावसाची तर चिंताच नाही, पण सगळ्याहूनही महाराजांच्या नजरेत भरली ती रायगडाची उंची. हा गड चढायला अतिशय कठीण आणि उंच होता. शत्रूला तिथे येणे सहजासहजी शक्यच नव्हते. रायरीगड पाहून शिवाजी महाराज इतके भारावून गेले की त्यांनी याच गडावर आपला मुख्य दरबार स्थापन करण्याचे ठरवले. रायरी गडाचे नवे नाव रायगड असे ठेवले गेले. पुढे खूप वर्षांनी रायगड ही शिवाजी महाराजांची

राजधानी झाली.

आदिलशाहीचा बलाढ्य सरदार अफजल खान शिवाजी महाराजांवर चाल करून जाण्यासाठी निघाला. पण त्याआधी अफजल खानाने एक विश्वासघातकी कृत्य केले. कर्नाटकात कणकगिरीच्या मोहिमेवर असताना त्यांनी शिवाजी म हाराजांचे थोरले भाऊ संभाजी यांना कपटाने ठार मारले. इकडे दक्षिण प्रांतात शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे कार्य हाती घेतले होते. त्याचा सूड अफजल खानाने उगवला. त्याने संभाजीला ठार केले ही दुःखद वार्ता शिवाजी महाराजांना कळाली, तेव्हा त्यांच्या दुःखाला पारावर उरला नाही. जिजाबाईंनी तर टाहोच फोडला. आपल्या या थोरल्या मुलावर जिजाबाईंचे अतिशय प्रेम होते. त्या संभाजीला लाडाने शंभू बाळ असे म्हणत. फक्त तीस वर्षे वयाच्या संभाजीला अफजल खानाने निर्दयीपणाने मारले. खरे म्हणजे संभाजी आणि शिवाजी हे सख्खे भाऊ. पण त्यांना एकमेकांचा प्रत्यक्ष सहवास अगदीच कमी लाभला होता. संभाजी कर्नाटकात तर शिवाजी महाराष्ट्रात असल्यामुळे दोघांच्या फार भेटी होत नसत. पण तरीही त्या दोघांचे एकमेकांवर अपार प्रेम होते. संभाजी शहाजीराजांच्या बरोबर कर्नाटकात बंगळूर येथे राहत होता. आपल्या मोठ्या भावाच्या मृत्यूने शिवाजी महाराज अतिशय दुःखी झाले आणि संतापले. आता त्यांच्या डोळ्यासमोर एकच लक्ष्य होते. अफजल खानाचा वध. यानंतर एक दोन वर्षांनी सईबाईंना मुलगा झाला. जिजाबाईंच्या मनात संभाजींच्या मृत्यूचे दुःख अद्यापही ताजे होते. त्याची आठवण म्हणून त्यांनी आपल्या या नातवाचे नाव संभाजी असे ठेवले. शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी. त्यालाही सर्वजण शंभू बाळ अथवा शंभूराजे असेच म्हणू लागले. संभाजीचा जन्म झाला, पण हे बाळंतपण मात्र सईबाईंना अजिबात मानवले नाही. छत्रपती संभाजींच्या जन्मानंतर सईबाई दिवसेंदिवस अधिकच अशक्त दिसू लागल्या. त्या सतत आजारी पडू लागल्या आणि त्यांचा आजार वाढतच गेला. त्यांना अंथरुणातून उठणेही अशक्य झाले. एकीकडे शिवाजी महाराज अहोरात्र स्वराज्यात आणि मोहिमेत गुंतलेले, दुसरीकडे सईबाईंचा असाध्य असा आजार आणि नुकताच जन्मलेला संभाजी. या स्थितीतही महाराजांनी आपल्या मोहिमांनाच अधिक प्राधान्य दिले. कौटुंबिक चिंता मनाच्या खोल कप्प्यात दडवून ठेवल्या. संभाजीच्या जन्मानंतर

काहीच दिवसात त्यांनी कोंढाणा किल्ला परत जिंकला. रायगडाचे काम सुरू होतेच. जावळीच्या खोऱ्याजवळ महाबळेश्वर गावी प्रतापगड नावाचा एक नवागड उभारण्यात आला. गडाची बांधकामे, त्यांची डागडुजी आणि राज्य कारभारातील रोजची कामे यांना अजिबात उसंत नव्हती. मधल्या काळात शिवाजी महाराजांनी आणखी एक मोहीम फत्ते केली. त्यांनी कल्याण भिवंडी प्रांत जिंकून ताब्यात घेतले. त्यातून खूप मोठा खजिना मिळाला. पण, या मोहिमेतील एक प्रसंग मात्र सर्वांच्याच मनावर कायमचा कोरला गेला. या प्रसंगामुळे जनतेच्या मनात शिवाजी महाराजांच्याविषयीचा आदर द्विगुणीत झाला. या मोहिमेत शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी कल्याणचा सुभेदार मुलगा अहमद त्याचे सरदार यांना पकडले. पण त्यांनी मुल्ला अहमदच्या सुनेलाही कैद केले आणि शिवाजी महाराजांपुढे हजर केले. हे कळताच शिवाजी महाराज कमालीचे संतापले. त्यांनी आपले साथीदार आबाजी महादेव, दादाजी कृष्ण यांना धारेवर धरले. महाराज त्यांना म्हणाले, तुम्ही मराठा साम्राज्याचे सरदार म्हणून आजवर चांगला पराक्रम केला आहे. पण हा पराक्रम करताना शत्रूच्या स्त्रीला अटक करणे हे आपल्या तत्त्वात बसत नाही, याचा तुम्हाला विसर कसा पडला? परस्त्री मग ती शत्रूच्या गोटातील का असेना, आम्हाला कायम मातेसमानच आहे, याची तुम्हाला जाणीव नाही काय? एवढे बोलून शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने दरबारात बोलवले. शत्रूच्या स्त्रिया पळवून त्यांना आपली दासी बट्टी बनवणे, हा तर मुघलांचाच काय पण इतर राजांचाही रिवाजच होता. पण शिवाजी महाराजांनी मात्र त्या सुभेदाराच्या सुनेला साडीचोळी दिली आणि तिला तिच्या राज्यात सन्मानपूर्वक परत पाठवून दिले. शिवाजी महाराजांचे ते चारित्र्यसंपन्न वर्तन पाहून दरबारातील प्रत्येक सैनिक गहिवरला. इतकेच काय पण प्रत्यक्ष कल्याणचा सुभेदाराचा मुलगा अहमद आणि त्याच्या मुलाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्या दोघांनीही शिवाजी महाराजांना कृतज्ञपणे लवून मुजरा केला. आदर्श राजा कसा असतो, हे शिवाजी महाराजांनी आपल्या वागणुकीतून वारंवार दाखवून दिले.

कल्याण प्रांताजवळच माहुली नावाचा गड होता. हा गड निजामशाहीच्या अधिपत्याखाली होता. शिवाजी महाराजांनी माहुलीवर स्वारी करून तो गड

जिंकून घेतला. या विजयामुळे आता स्वराज्याच्या सीमा खूपच वाढल्या होत्या. शिवाजी महाराजांकडे आता सुमारे १० हजार घोडेस्वार आणि तेवढेच पायदळ होते. त्यांच्या सैन्याची एकूण संख्या २० हजाराच्या पुढे गेली होती. हाताशी खूप गड किल्ले आले होते. स्वराज्याच्या तिजोरीतही मोठी भर पडली होती. मात्र, अशातच एक संकट स्वराज्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे वाढते राजवैभव विजापूरकरांच्या डोळ्यात सलत होते. दरम्यान आदिलशहाचाही मृत्यू झाला होता. त्यामुळे विजापूर साम्राज्याचा सर्व कारभार आदिलशहाची बड़ी बेगमसाहेब हिच्या ताब्यात गेला. हातात कारभार आल्याबरोबर बेगम साहेबांनी शहाजीराजांना बोलावणे पाठवले आणि त्यांना स्पष्ट सुनावले की, दक्षिण प्रांतात तुमच्या पुत्राचे जे उद्योग चालू आहेत; त्याला आवरा अन्यथा आम्हाला काहीतरी वेगळे पाऊल उचलावे लागेल. पण, शहाजीराजे त्यांना नम्रपणे म्हणाले, बेगमसाहेबा, माझा मुलगा माझे ऐकत नाही. त्याला समजावणे माझ्या हाताबाहेरचे आहे. यावर आपण हवा तो निर्णय घेऊ शकता. खुद्द शहाजीराजेच काही करू शकत नाहीत, हे पाहिल्यावर बेगमसाहेब पुन्हा विचारात पडल्या. मग त्यांनी दक्षिण प्रांतावर दहशत निर्माण करण्यासाठी अफजल खानाची नेमणूक केली.

एक दिवस छत्रपती शिवाजी महाराजांना राजगडावर एक खलिता आला. त्यात लिहिले होते की, तुम्ही आमच्या सत्तेत सामील व्हावे आणि तुम्हाला भरपूर दौलत आणि मानसन्मान देऊ. हा खलिता मोगल सम्राट औरंगजेब याने पाठवला होता. औरंगजेब हा आग्र्याच्या शहाजहान बादशहाचा मुलगा. औरंगजेबाने दिल्लीवर कब्जा मिळवला. त्यासाठी त्याने प्रत्यक्ष आपल्या बापाला आणि भावांना कैदेत टाकले होते. शिवाजी महाराजांनी मात्र औरंगजेबाचा प्रस्ताव स्पष्टपणे नाकारला. त्यामुळे औरंगजेब खूप संतापला. महाराजांना हे अपेक्षितच होते. त्यांनी औरंगजेबाच्या भेटीला आपले वकील यांना दिल्लीला मध्यस्थी करण्यासाठी पाठवले. औरंगजेबाला काही काळ तरी शांत ठेवणे गरजेचे होते. कारण विजापूर दरबारी अफजल खानाने शिवाजी महाराजांना मारण्याचा विडा उचलला होता. तो कुठल्याही क्षणी इकडे येऊन थबकणार होता. एकाच वेळेस अफजल खान आणि औरंगजेब ही दोन्ही संकटे खेळणे मिळवण्यासारखे नव्हते.

अफजल खान आपल्या महाप्रचंड फौजेसहित निघाला होता. तो तुळजापूर पंढरपूर असा प्रवास करीत वाईच्या मार्गाने जावळीत उतरणार होता. अफजल खान तुळजापूरला आला. हे गाव हिंदूसाठी अतिशय पवित्र मानले जाते, ही माहिती त्याला त्याचे वकील कृष्णाजी भास्कर यांच्याकडून कळाली होती. खानाला तेच हवे होते. त्यांनी तात्काळ आपल्या सैन्याला तुळजापूर बेचिराख करण्याचा हुकूम सोडला. अफजल खानाने तुळजापूरची देवळं, त्यातील देवांच्या मूर्ती फोडायला सुरुवात केली. मध्ये आलेल्या पुजाऱ्यांना बेदम मारहाण केली. त्याने तुळजापूर अक्षरशः मातीत मिळवले आणि तो क्रूरपणे हसला. तुळजापूरचे दैवत असलेले भवानी मातेचे मंदिरही त्याने उद्ध्वस्त केले. मुघलांच्या दौऱ्याचा तो अतिरेक होता. तुळजापूर बेचिराख करून अफजल खान पंढरपूरकडे निघाला. तुळजापूरच्या भवानीची तीच गत पंढरीच्या विठ्ठलाचीही झाली होती.

अफजल खान वेगाने जावळीच्या दिशेने येत होता. त्याच्या हरेक दुष्कृत्याची बित्तंबातमी शिवाजी महाराजांपर्यंत पोहोचत होती. त्याचे क्रौर्य ऐकून ते कमालीचे अस्वस्थ झाले होते. पण त्यांनी आपली मावळ्यांची फौज तयार ठेवली होतीच. शिवाजीराजांना ठार मारावे, असा आदिलशाहीचा सरळ सरळ हुकूमच होता आणि अफजल खानाने तेच करण्याचा विडा उचलला होता. आता शिवाजी महाराजांची थेट मृत्यूशीच गाठ होती. अफजल खानापुढे आपला काहीच पाडाव लागू शकणार नाही, याची शिवाजी महाराजांना कल्पना होतीच. केवळ ताकदीचाच विचार केला तर खानाची ताकद कितीतरी जास्त होती. अफजल खान राजांना भेटण्यासाठी यायला निघाला आहे, तो कुठल्याही क्षणी येथे येईल, त्याचा पाहुणचार कसा करायचा, यावर शिवाजीराजे आणि त्याच्या साथीदारांची राजगडावर खलबते सुरू झाली. त्या सर्व बैठका चर्चांमध्ये सगळ्यांना एकाच गोष्टींची प्रचंड भीती होती, ती म्हणजे अफजल खान नक्कीच काहीतरी दगा फटका करणार याची. शिवाजी महाराजांच्या जिवाला धोका आहे, याची सर्वांना चिंता होती. फक्त शिवाजी महाराज तेवढे नेहमीप्रमाणे शांत होते.

राजगडावर अफजल खानाची एक एक बातमी रोज येऊन धडकत होती. शिवाजी महाराजांनी राजगडाची भक्कम नाकेबंदी करून घेतली. त्याचबरोबर

इतरही गडांवर कडेकोट बंदोबस्त ठेवला. बाजीप्रभू देशपांडे या आपल्या एकनिष्ठ आणि पराक्रमी मावळ्याला बोलवून त्याला मोहनगड या नव्या गडाकडे खास लक्ष देण्याची कामगिरी सोपवली. राजगडाच्या तटबंदीवर सर्व बाजूंनी तोफा चढवण्यात आल्या. जावळीच्या खोऱ्यात आणि तेथील आजूबाजूच्या परिसरात सैन्य तैनात ठेवण्यात आले. अफजल खान वाई गावापर्यंत येऊन पोहोचला होता. तेथून जावळी अगदी जवळ होती. अफजल खानाचा बंदोबस्त करण्यासाठी शिवाजीराजे स्वतः निघाले. ही मोहीम त्यांनी दुसऱ्या कोणत्याही मावळ्याकडे सोपवली नव्हती, हे विशेष! निघताना त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. चिंतेत पडलेल्या जिजाबाईंनी त्यांना जावळीला न जाण्याचे सुचवून पाहिले, पण महाराजांनी ते ऐकले नाही. राजगडावर सईबाई अंथरुणाला खिळलेल्या होत्या. संभाजी अवघा दोन वर्षांचा होता. सईबाईंचा आजार बरा होण्याच्या पलीकडे गेला होता. वैद्य हकीम यांनी तर हर तऱ्हेचे उपचार करून अखेरीस हात टेकले होते. वृद्ध मांसाहेब, मृत्यूच्या दाराशी उभी असलेली पत्नी आणि चिमुकला पुत्र यांना सोडून शिवाजी महाराज साक्षात मरणाच्या पाशात जाण्यास निघाले होते.

शिवाजी महाराज जावळीला येऊन पोहोचले. तोच मुसळधार पाऊस सुरू झाला. त्यामुळे जावळीचे घनदाट जंगल आणि झाडेझुडपे यातून वाट काढणे अधिकच अवघड होऊन बसले होते. पण अशा वातावरणाची मराठ्यांना सवय होती. जावळीचे जंगल पाहून त्यांना खूप आनंदही झाला कारण, आता अफजलखानाची आणि त्याच्या सैन्याचीच जास्त पंचायत होणार होती. अशा वातावरणात लढाई करणे अफजल खानाला कठीण जाणार होते. शिवाजी महाराजांनी तेथे नव्यानेच बांधलेला प्रतापगड लढाईसाठी सुसज्य करून ठेवला. प्रतापगडाच्या सर्व बाजूंनी भक्कम तोफांचे मोर्चे उभारले गेले. दारूगोळा आणि इतर शस्त्रास्त्रेही तैनात ठेवली. मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांचे सैन्य जोरदार कामाला लागले. शिवाजीराजे प्रतापगडावर गेले. अफजल खान वाईला येणार, हे त्यांना पक्के ठाऊक होते. वाईपासून प्रतापगड जवळ असल्यामुळे तो प्रतापगडाकडेच येण्याचा प्रयत्न करणार, असा अंदाज त्यांनी बांधला आणि तो तंतोतंत बरोबर ठरला. पण अंतर कमी असले तरीही वाटेत जावळीचे घनदाट जंगल होते, ते पार करून प्रतापगडाकडे येणे अतिशय अवघड

होते. शिवाय जंगलात व झाडाझुडपात जागोजागी महाराजांचे मावळे दबा धरून बसले होतेच. मोहिमेचे नियोजन नेहमीप्रमाणेच काळजीपूर्वक आणि विचार करून केलेले होते. आता अफजल खान कधी येतोय याची वाट पाहणे एवढेच काम उरले, पण तेच महत्त्वाचे काम होते.

अफजल खानाचा खात्मा करायला मावळ्यांचे हात शिवशिवत होते आणि अशातच राजगडावरून एक दुःखद वार्ता आली, त्यामुळे शिवाजी महाराजांना तातडीने प्रतापगड सोडून तिकडे जावे लागले. राजगडावर सईबाईंची तब्येत फारच खालावली होती. गडावर सगळ्यांच्या नजरेत चिंता आणि दुःख स्पष्ट दिसत होते. या आजारातून सईबाई वाचणार नाहीत, हे सगळ्यांनाच कळून चुकले होते. सईबाईंच्या मृत्यूची केवळ औपचारिकता बाकी होती. सगळे अंगारे धुपारे कूचकामी ठरले. शिवाजी महाराज राजगडावर आले. अंथरुणाला खिळलेल्या सईबाईंच्या जवळ बसले. त्यांच्या कपाळावर हात ठेवला. आपल्या पतीला पाहून सईबाई खोल आवाजात म्हणाल्या, येण्याची घाई का केलीत. तसं काळजीचं काहीच कारण नाही. आपली मोहीम महत्त्वाची नाही का? शेवटच्या घटका मोजत असलेल्या आपल्या पत्नीचे शब्द ऐकून शिवाजी म हाराजांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. सईबाई गेल्या. दोन वर्षांचे शंभूराजे पोरके झाले. पण त्याहूनही पोरके झाले ते शिवाजी महाराज. सईबाई अनंताच्या प्रवासाला निघून गेल्या. त्यांच्या सुतकाचे दिवस संपवून शिवाजी महाराज पुन्हा प्रतापगडाकडे परतले. परतताना त्यांची पावले जड झाली होती. अंतकरण दुःखाने पोळून निघाले होते. सईबाईचा चेहरा त्यांची आठवण एक क्षणभरही मनातून जात नव्हती. तिकडे अफजल खान वाईला येऊन पोहोचलेला होता. त्याने वाईत आपला तळ ठोकला होता. शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला तात्काळ सूचना दिली की काहीही झाले तरी अफजल खानावर आणि त्याच्या सैन्यावर घाईघाईत हल्ला करू नका. त्यांना स्वतःहून कुठलाही त्रास देऊ नका. त्यामुळे आपल्याला धोका आहे. शिवाजी महाराजांच्या चाणाक्ष आणि दूरदर्शीपणाचे हे उदाहरण होते. अफजल खानाच्या सैन्याने वाई, सुपे, शिरवळ, सासवड, पुणे अशा आसपासच्या प्रांतात धुमाकूळ घालायला सुरुवात केली आणि ते प्रदेश काबीज केले. पण शिवाजी महाराज शांतच होते. आपल्याला

डिवचायचा हा प्रयत्न आहे, हे त्यांना पक्के ठाऊक होते. म्हणूनच त्यांनी आपल्या लोकांना गप्प राहण्याची सूचना दिली होती. अफजल खानाची लुटालूट सुरूच होती. तरी शिवाजी महाराज शांतच होते. त्यांनी आता ठरवले की स्वतःहून अफजल खानाला सामोरे जायचे. त्याला ते स्वतःहून भेटायला निघाले. शिवाजी महाराजांचा हा निर्णय कोणालाच पटण्यासारखा नव्हता. खुद्द जिजाबाईंनीही त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. राजगडाहून निघताना शिवाजी महाराज त्यांना म्हणाले होते, मांसाहेब आम्ही अफजल खानाचा वध करू, असा आम्हाला विश्वास वाटतो. पण चुकून दुर्दैवाने तसे झाले नाही आणि आमचेच काही बरे वाईट झाले तर जराही खचून न जाता स्वराज्याचा गाडा हाकण्याची जबाबदारी तुमची आहे. पुढे शंभूराजे ती जबाबदारी पाहतीलच, असे बोलून आपल्या आईचे शुभाशीर्वाद घेऊन शिवाजीराजे प्रतापगडावर आले होते.

अफजल खानाचा सामना करण्यासाठी शिवाजीराजांकडे सुमारे १० हजार इतके सैन्य होते. पण ते खानाच्या सैन्याच्या तुलनेत अगदीच किरकोळ म्हणावे असेच होते. हे ठाऊक असल्यामुळे शिवाजी महाराज आपल्या सैन्याला लढाईत उतरवणार नव्हतेच. खरा सामना फक्त दोघांमध्येच होता. शिवाजी आणि अफजल खान. आत्तापर्यंत झालेल्या मोहिमांपेक्षा ही सर्वस्वी वेगळी मोहीम होती. त्यासाठी शिवाजी महाराज अनेक तर्कवितर्क बांधीत होते. सतत विचार करीत होते. एक दिवस त्यांना निरोप आला की, अफजल खानाचा मुख्य वकील कृष्णाजी भास्कर त्यांना भेटण्यास येत आहे. त्याला अफजल खानानेच पाठवला होता. कृष्णाजी भास्कर आला आहे, हे कळल्यावर शिवाजी महाराजांची प्रमुख माणसे अण्णाजी पंत आणि पंताजी गोपीनाथ यांनी त्याचे रीतसर स्वागत केले. प्रतापगड चढताना कृष्णाजी पंत अगदी बारकाईने गडाची पाहणी करीत होता. शिवाजी महाराजांनी काय काय बंदोबस्त केला आहे, हे तो नीट न्याहाळत होता. शिवाजी महाराजांबरोबरच्या बैठकीत कृष्णाजी भास्कराने त्यांना अफजल खानाचे पत्र वाचायला दिले. त्या पत्रात अफजल खानाने शिवाजीच्या आदिलशाहीच्या कारवायाविरुद्ध कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. त्याचे परिणाम वाईट होणार होते. ते टाळण्यासाठी शिवाजी महाराजांनी आदिलशाहीशी समझोता करावा आणि जिंकलेले सर्व किल्ले मुलुख परत

करावेत, अशी मागणी केली होती.

शिवाजी महाराजांनी ते पत्र वाचले ते कृष्णाजी भास्करला शांतपणे म्हणाले, आम्ही शहाजीराजांचे पुत्र आहोत. आमचे एक बंधू अफजल खानाने मारले आहेत. आपला दुसरा मुलगा मेलेला शहाजीराजांना चालणार नाही. शिवाजी महाराजांचे ते गोड बोलणे कृष्णाजी भास्करला अजिबात समजले नाही. पण शिवाजी तह करायला अजिबात तयार नाही एवढे मात्र समजले. दुसऱ्या दिवशी प्रतापगडावर बैठक भरली. त्यात त्या पत्रावर बरीच उलट सुलट चर्चा झाली. काहींनी शिवाजी महाराजांना सल्ला दिला की, आपण स्वतःहून वाईला जाऊन अफजल खानाशी बोलणी करावी. म्हणजे पुढचे संकट टळेल. त्यावर शिवाजी महाराज हसले आणि म्हणाले, हे बरोबर आहे. आम्ही अफजल खानाला भेटण्यास उत्सुक आहोतच, पण वाईला आम्ही जाणार नाही. अफजल खानाने येथे प्रतापगडावर आले पाहिजे, कारण भेटीचा प्रस्ताव सर्वप्रथम त्याने पाठवला आहे. आपले खास वकील पंताजी गोपीनाथ यांनी अफजल खानाकडे जाऊन हा निरोप कळवावा. अफजल खानाने जी चाल खेळली होती ती चाल शिवाजी महाराजांनी खेळली. त्यांनीही आपला वकील खानाकडे पाठवला. आमचे महाराज आपली भेट घेण्यासाठी उत्सुक आहेत. त्यांनी आपल्याला खास आमंत्रण पाठवले आहे. परंतु, एक अडचण आहे. आपण आदिलशाहीचे महापराक्रमी सरदार. त्यामुळे आमचे महाराज येथे येण्यास थोडे भीत आहेत. शिवाय ते वयानेही लहान आहेतच. तेव्हा आपणच महाराजांच्या भेटीस प्रतापगडासी यावे, ही त्यांची मनापासून इच्छा आहे. पंताजी गोपीनाथ यांनी अफजल खानाला शिवाजी महाराजांचा हा निरोप दिला आणि पुढे हे सुद्धा सांगितले की आदिलशाहीची माफी मागण्यास आमचे महाराज आतुर आहेत. आपण त्यांच्या भेटीस आलात तर ते आपल्याला करोडो होण भेट म्हणून देणार आहेत आणि अफजल खान तयार झाला. त्याच्या सरदारांनी त्याला सावध करण्याचा प्रयत्नही केला. शिवाजीवर अजिबात भरोसा ठेवू नये. तो युक्ती करण्यात पटाईत आहे. तो काहीतरी करून आपला काटा काढील, असे वारंवार सांगूनही पाहिले. पण अफजल खानाला एक वेगळीच धुंदी चढली होती. शिवाजी आपल्याला भेटतो, त्याच्या घरात जाऊन त्याला मारण्याची नामी संधी

चालून आली आहे. मग चिंता कुठली व शिवाजी के लिए हम अकेले ही काफी है, अशी गुरमी त्याच्यात संचारली.

महाराजांच्या देहयष्टीपुढे अफजल खान शरीराने चांगलाच उंच धिप्पाड होता. पण महाराजांचं बुद्धिचातुर्य अद्याप त्याला ठाऊक नव्हतं. त्या दोघांच्या भेटीचा दिवस ठरला. शिवाजीराजांनी प्रतापगडाच्या खालची माची ही जागा निवडली. तेथे भेट होणार होती त्या जागेवर अफजल खानाच्या स्वागतासाठी एक अतिशय सुंदर लखलखीत शामियाना उभारला गेला. अफजल खान प्रतापगडाशी आला. येताना त्याने आपली निम्मी सेना जावळीकडे हलवली. बाकी सेनेतले १२००० घोडेस्वार,तोफखाना, उंट एवढी भक्कम सामग्री त्याने येताना बरोबर बाळगली होती. खानाचे ते निम्मे लष्करही शिवाजी महाराजांच्या सेनेपेक्षा दुपटीत तिपटीने मोठे होते. शिवाजी महाराजांचे मावळे नेमून दिलेल्या जागी दबा धरून बसले होते. मराठेशाहीतली एक महत्त्वाची आणि अतिशय जीवघेणी अशी ती लढाई असणार होती. शिवाजी महाराज खानावर स्वत:हून कुठलाही हल्ला चढवणार नव्हतेच. पण अफजल खान मात्र वार करणार याचीही त्यांना कल्पना होती आणि त्यांनी त्याची सर्व तयारी ठेवली होती.

भेटीचा दिवस उजाडला. सकाळी पूजाअर्चा आटोपून केदारेश्वरचे दर्शन घेऊन शिवाजी महाराज निघाले. तिकडून अफजल खानही निघाला. का कोणास ठाऊक पण आज तो अतिशय खुशीत होता. शिवाजीराजे नेहमीसारखे शांत गंभीर होते. ते शांतपणे खानाच्या शामियानापाशी आले खानाचे वकील कृष्णाजी पंत यांनी त्यांचे स्वागत केले. आत शामियानात पाऊल टाकण्यापूर्वी शिवाजी महाराजांना पडद्याआड काहीतरी हालचाल दिसली. त्यांनी तातडीने पंताजी गोपीनाथ यांना आतमध्ये पाठवले. ते शामियानात गेले आणि लगेचच बाहेर आले आणि म्हणाले, महाराज आत खानाच्या बरोबर सय्यद बंडा आहे. ठरल्याप्रमाणे त्याला बाहेर पाठवून द्यायला सांगा. आमची व खानाची भेट एकांतात ठरली आहे. शिवाजी महाराजांनी आदेश दिला. तो निरोप आल्यावर आतमध्ये अफजल खान कमालीचा संतापला. तोपर्यंत शिवाजी महाराजांनी आत शामियान्यात प्रवेश केला होता. ते दोघेच समोरासमोर आले. आदिलशाही आणि मराठेशाहीची ती अनोखी भेट होती. शिवाजी महाराजांनी अफजल

खानाच्या नजरेला नजर भिडवली. त्यानेही कुत्सितपणे त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकला. अफजल खान शिवाजीपेक्षा सुमारे दीड हात उंच होता. त्याच्या अंगात प्रचंड ताकद आहे, तो लोखंडी पहार हाताने सहजपणे वाकवतो आणि तशीच परत सरळ करतो, या अफजल खानाबद्दलच्या गोष्टी यापूर्वी महाराजांनी ऐकल्या होत्या. खानाला पाहिल्यावर त्या किती खऱ्या आहेत, याची जाणीव शिवाजी महाराजांना झाली. शिवाजीराजांना पाहून अफजल खानाने आपले दोन्ही हात पसरत म्हणाला, आओ शिवाजी आओ. हमारे गले लग जाओ. खानाच्या त्या आमंत्रणाचा स्वीकार करीत शिवाजीराजे पुढे सरकले आणि खानाच्या बाहुपाशात शिरले. त्यांचे मस्तक खानाच्या छातीच्या उजव्या बाजूस टेकले. काही क्षण त्यांना आपल्या बाहुपाशात तसेच ठेवून मग अफजल खानाने आपला डाव टाकला. त्याने शिवाजीराजांचे मस्तक आपल्या छातीवरून काखेकडे घेतले आणि गच्च आवळून धरले. शिवाजीराजे सावध झाले. तोच खानाने आपल्या दुसऱ्या हातातील खंजीर त्यांच्या पाठीत खुपसला. महाराजांचा अंगरखा पूर्ण फाटला. पण, आतमध्ये चिलखत होते. त्यामुळे ते वाचले. अफजलखानाने खंजिराचा वार केल्या केल्या शिवाजी महाराजांनी हातातील वाघनखे उपसून खानाच्या पोटात खुपसली. त्याच्या अंगात चिलखत असण्याची शक्यताच नव्हती. त्या तीक्ष्ण वाघनखांनी अफजल खानाची आतडीच बाहेर आली. अशा घायाळ अवस्थेतही त्याने शिवाजी राजांवर आणखी एक वार केला, पण तो त्यांनी चपळाईने चुकवला. अफजल खान जिवाच्या आकांताने ओरडला. दगा…दगा!

अफजल खानाचा आरडाओरडा ऐकून सय्यद बंडा आत घुसला. राजांचे दोन मावळे संभाजी कावजी आणि जीवा महाला हेही आत बसले होते. प्रचंड खवळलेल्या सय्यद बंडाने हातातल्या दांडपट्ट्याने शिवाजी राजांवर हल्ला चढवला. तो दांडपट्टा शिवाजी महाराजांच्या अंगावर बसणार तेवढ्यात जीवा म हालाने तलवारीने वरच्यावर सय्यद बंडाचा हात उडवला. जीवा महालाने सेकंदभर जरी उशीर केला असता तरी शिवाजी महाराजांची खैर नव्हती. याच प्रसंगातून पुढे, होता जीवा म्हणून वाचला शिवा असे म्हटले जाऊ लागले. अफजल खान खाली पडला शिवाजी महाराजांनी त्याचा वध केला. इतका वेळ गप्प असलेले

मराठे आणि आदिलशाही सैनिक एकमेकांवर तुटून पडले. झाडाझुडपातून लपलेले मराठे हर हर महादेवची गर्जना करीत बाहेर आले. लढाईला तोंड फुटले. मावळ्यांच्या अनपेक्षित हल्ल्यापुढे आदिलशाही सैन्याचा टिकाव लागला नाही. त्यातही अफजल खान मेला हे कळल्यावर तर ते सैरावैरा धावत सुटले. अफजल खानाच्या स्वारीची पूर्णत: वाताहात झाली.

त्या दिवशी रात्रभर प्रतापगड जागा होता. तिकडे राजगडावरही कुणालाच झोप नव्हती. शिवाजी महाराजांनी अफजल खानाला मारून एका क्रूर हिंसाचाराचा अंत केला होता. जावळीच्या खोऱ्यात तर दिवाळीच साजरी करण्यात आली. शिवाजी महाराज मात्र अजूनही शांतच होते. त्यांची ही शांतता एक कर्तव्यपूर्तीची होती. ते शांतपणे प्रतापगडावर गेले. त्यांनी केदारेश्वरला भावपूर्ण नमस्कार केला. मग त्यांनी येसाजीला बोलावले आणि म्हणाले, येसाजी या मुसलमानाने आमच्या देवदेवतांना उपद्रव केला. आमची देवालयं फोडली. त्या क्रूर अफजल खानाचे मस्तक तोडा आणि आमच्या मासाहेबांना दाखवायला घेऊन जा. या अफजल खानाचे विधिवत दफन करा. त्याची कबर बांधा. आपल्या शत्रूची कबर बांधणारे एकमेव राजे या भूतलावर होऊन गेले त्यांचे नाव शिवाजी महाराज.

शिवाजी महाराजांच्या या प्रतापामुळे आदिलशाहीला तर चांगलीच दहशत बसली होती. अफजल खानाविरुद्धच्या लढाईत मावळ्यांना खूप संपत्ती हाती लागली. त्यात हजारो घोडे, शेकडो हत्ती व उंट,  तोफा, उंची कापड, वस्त्रे, जडजवाहर आणि अगणित खजिना मिळाला. पण त्याचबरोबर लढाईत राजांचे खूप मावळेही मारले गेले. अफजल खानाचा वध करून शिवाजीराजे थांबले नाहीत. त्यांना कशाचीही उसंत नव्हती. त्यांनी तातडीने आदिलशाहीच्या ताब्यात असलेले बाकीचे गड काबीज करण्याचे काम हाती घेतले. पुढच्या मोहिमेची तयारी लगेचच सुरू केली. शिवाजी महाराजांचे म्हणणे होते, एक अफजल खानाला मारले म्हणजे सगळे संपले, असा अर्थ होत नाही. हा काही फार मोठा विजय नाही. अफजल खान हे एक केवळ प्यादे होते. अजून वजीर आणि राजे महाराजे बाकी आहेतच.

महाराजांनी पन्हाळगडावर स्वारी करण्याची तयारी चालू केली. अफजल

खानाला मारल्यावर त्याचे काही सरदार शिवाजी महाराजांना शरण आले होते. ते सर्व मराठी होते, हे विशेष! जाधवराव, पांढरे, खराटे हे आदिलशाहीच्या सेवेत असलेले सरदार महाराजांच्या सैन्यात दाखल झाले. एक मुघल सरदार सिद्धी हिलाल यालाही महाराजांनी सेनेत घेतले व त्याच्याकडे वाईच्या मुलखाचे कामकाज दिले. अफजल खानाच्या वधानंतर त्याचा मुलगा फाजल खान पळून गेला होता. नेताजी पालकर त्याच्या सतत मागावर होते. खानाचे बरेचसे सैन्यही पळूनच गेले. उरलेले सैन्य शरण आले. त्यांना शिवाजी महाराजांनी आपल्या लष्करात सामील करून घेतले. राजांचे मावळे पन्हाळगडाकडे मोठ्या दिमाखात निघाले. पण हा गड काबीज करायला फार अडचण आली नाही. आणखी एक गड स्वराज्यात समाविष्ट झाला. शिवाजी महाराजांनी स्वारी करावी आणि तो गड हाती यावा, हे जणू समीकरणच झाले होते. पराजय म्हणजे काय, याची त्यांना जणू कल्पनाच नव्हती. कोल्हापूर गावाच्याजवळ असलेला पन्हाळगड जिंकून शिवाजी महाराजांनी विजापूरच्या आदिलशाहीला एक भले मोठे भगदाड पाडले होते. अफजल खानाच्या वधापाठोपाठ आदिलशाहीला बसलेला हा दुसरा मोठा धक्का होता. हे कमी होते म्हणून की काय महाराजांचे सैन्य थेट आदिलशाहवरच चाल करून येत आहे, ही वार्ता त्यांच्यापर्यंत पोहोचली. आदिलशाही मुळापासून हादरली. अफजलखानाच्या वधानंतर अवघ्या १५-२० दिवसांत कोल्हापूरचा पन्हाळा आणि आदिलशाहीचा मुलुख असे दोन प्रांत काबीज करून शिवाजी महाराजांनी मोठा विजय संपादन केला. नेताजी पालकरांच्या धाडसी सैन्याने आदिलशाहीत घुसून अमाप लुटालूट केली आणि खंडण्या वसूल केल्या. आता तर शिवाजीवर प्रतिहल्ला करण्यापेक्षा संरक्षण कसे करावे, याच चिंतेने विजापूरचा दरबार कासावीस झाला होता. त्यातच त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी वार्ता कानी पडली. जावळीहून पळून गेलेला अफजल खानाचा मुलगा फाजल खानदेखील नेताजी पालकरांच्या तावडीत सापडला. आता तर आदिलशाहीवर अक्षरशः गर्भगळीत होण्याची वेळ आली. त्यांनी सैरभैर होऊन मुघल बादशहाकडे धाव घेतली. आदिलशहा आणि मुगल यांनी एकत्रितपणे शिवाजी महाराजांचा पुरता आणि कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरवले.

आदिलशाहीचा एक पराक्रमी सरदार सिद्धी जोहर तो युद्धात तरबेज होता. शिवाय कुशल राजकारणी होता. शिवाजीच्या स्वराज्यावर चाल करून जाण्यासाठी सिद्धी जोहरची नेमणूक झाली आणि सुमारे ६० हजार सैन्य सोबत घेऊन सिद्धीने विजापूर सोडले. मजल दरमजल करत सिद्धी जोहर पन्हाळा गडाकडे आला आणि त्याने सर्व बाजूने गडाला वेडा घातला. पन्हाळा गडावर कडेकोट बंदोबस्त होता. शिवाजी राजांच्या मावळ्यांनी निकराचा हल्ला करून सिद्धी जोहरचा वेढा मोडण्याचा प्रयत्न केला. पण सिद्धीचे सैन्य अफाट होते. त्या सैन्यापुढे मावळ्यांना माघार घेणे भाग पडले. पुढील सुमारे सहा महिने पन्हाळगडावर सिद्धी जोहरचा वेढा होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिवाजीराजे नेमके पन्हाळगडावर होते आणि त्या वेढ्यात पुरते अडकले होते. तशातच आणखी एक चिंतेची बातमी आली. या बातमीने स्वराज्यावर दुहेरी संकट उभे राहिले. पन्हाळगडावर एक मुख्य अडचण अशी होती की त्यावेळेस शिवाजी महाराजांचे सैन्य हे वेगवेगळ्या भागात मोहिमांवर गेले असल्यामुळे गडावर मर्यादित सैन्यबळ होते. नेताजी पालकर पुण्याला होते. तिकडे शाहिस्तेखान शिवापूर सासवड मार्गे पुण्यात घेऊन थेट शिवाजी महाराजांच्या लाल महालातच मुक्कामाला शिरला होता. अशा स्थितीत नेताजीला पुण्याहून बाहेर पडणेही शक्य नव्हते. पावसाळ्याचे दिवस सुरू झाले होते. पन्हाळगडावर तुफान पाऊस सुरू झाला, हे आणखी एक संकट उभे राहिले. एवढ्या मुसळधार पावसातही सिद्धी जोहरचा वेढा तसूभरही मागे हटला नाही. अशा नैसर्गिक परिस्थितीचा अचूक फायदा उठवून प्रति हल्ला करणे हे मावळ्यांचे नेहमीचे होते, पण यावेळेस मात्र चित्र वेगळे दिसत होते. गडावर अवघे १००० इतक्या कमी सैन्याशी युद्धात उतरणे धोक्याचे होते.

शिवाजी महाराजांनी ठरवले की सिद्धी जोहरशी तह करायचा. फार वेळ न दवडता त्यांनी त्याच्याशी तशी बोलणी सुरू केली, पण सिद्धीने तहाला स्पष्ट नकार दिला. त्याचे एकच ठाम मागणे होते. राजांनी आदिलशाहीला शरण यावे. त्यांच्या स्वाधीन व्हावे. पन्हाळगडावर शिवाजी महाराजांचे खास लोक बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक, त्र्यंबकराव, गंगाधर पंत वगैरे होते. त्यांनी शिवाजी महाराजांना एक निकराचा उपाय सुचवला तो म्हणजे येथून निसटून

जाण्याचा. बाजीप्रभू देशपांडे म्हणाले, महाराज पन्हाळगडाच्या संरक्षणाची जबाबदारी आमची. तुम्ही निर्धास्तपणे येथून निघावे. आमच्या जिवात जीव असेपर्यंत गड शाबूत राहील. या कामात आणखी एक महत्त्वाचा मनुष्य होता शिवा न्हावी. हा शिवा न्हावी दिसायला बराचसा शिवाजी महाराजांसारखाच होता. खुद्द महाराजांनीच त्याला तसे बोलवून दाखवले होते. ते ऐकल्यापासून तर त्याने अगदी महाराजांसारखीच दाढी राखण्यास सुरुवात केली होती. या शिवा न्हाव्याला एक मोठी जबाबदारी पार पाडायची होती. राजांचे कपडे घालून दुसरा शिवाजी बनून पालखीत बसून तो पन्हाळगडाहून निघणार होता. सिद्धी जोहरच्या सैन्याच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी केलेली ती चाल होती. पन्हाळगडाहून शिवाजी महाराजांच्या दोन पालख्या निघणार होत्या आणि दोन्ही पालख्यांमध्ये शिवाजीराजेच असणार होते.

शिवाजी महाराजांचा पोशाख चढवून शिवा न्हावी महाराजांच्या पुढे उभा राहिला. महाराज त्याच्याकडे क्षणभर पाहतच राहिले. जणू काही आरशात पाहत असल्यासारखेच आणि दुसऱ्या क्षणी शिवाजी महाराजांनी शिवाला कडकडून मिठी मारली. त्यांच्या डोळ्यातील अश्रू त्याच्या खांद्यावर ओघळले. महाराज म्हणाले, शिवा याच कारणासाठी आम्हाला हे राजे पद नको असते. प्रत्येक वेळेस तुझ्यासारखे मोहरे आमच्या एका शब्दाखातर आपला जीव धोक्यात घालायला एका पायावर तयार होतात. शिवाजी महाराजांच्या त्या बोलण्यावर शिवा न्हावी गप्प राहिला. तो काय उत्तर देणार होता. साक्षात शिवाजी महाराज आपल्याला मिठी मारतात, आपल्यासाठी रडतात, यापेक्षा मोठे त्याच्या जीवनात आणखीन काय असणार होते. पन्हाळ्यावरून दोन पालख्या निघाल्या. राजे चोरवाटेने विशाळगडाकडे रुजू झाले आणि शिवा न्हाव्याची पालखी थेट सिद्दीच्या वेढ्यात गेली. सिद्धी जोहरच्या समोर शिवा किंचितही न घाबरता सिद्धीच्या नजरेस नजर देत म्हणाला, आमचे राजे केव्हाच निघून गेले आहेत. मी थोडा वेळ का होईना त्यांचे कपडे अंगावर घातले. मी तात्पुरता शिवाजी बनलो आता आणखी काय पाहिजे. जन्माचे सार्थक झाले. यापुढे एकही शब्द बोलायला शिवाच्या शरीरात प्राण शिल्लक राहिलाच नव्हता. सिद्धीची तलवार त्याच्या छातीत घुसली होती. खाली कोसळतानाही शिवा न्हाव्याने

शब्द उच्चारले, महाराज मुजरा! तोपर्यंत शिवाजी महाराज खूप अंतर पुढे गेले होते.पण शिवा न्हाव्याचा मुजरा त्यांच्यापर्यंत पोहोचलाच. अंतरंगाची भाषा ज्याची त्यालाच कळणार होती. शिवाजी महाराज पन्हाळा गडावरून निसटले आणि ते वेगाने विशाळगडाकडे कूच करीत आहेत ही बातमी कळताच सिद्धी जोहर चौताळून उठला. त्याने तातडीने आपली फौज विशालगडाच्या दिशेने पाठवली. पण, तोपर्यंत शिवाजी महाराज खूप पुढे गेले होते. त्यांच्यासोबत बाजीप्रभू देशपांडे आणि ६०० मावळे होते. पन्हाळा गडाकडून विशाळगडाकडे जाताना मध्ये घोडखिंड लागते. तिथे बाजीप्रभू थांबले आणि त्यांनी महाराजांना पुढे जाण्याची विनंती केली. ते स्वतः घोडखिंडीत थांबून सिद्धीच्या सैन्याला रोखून धरणार होते. बाजीप्रभू महाराजांना कळकळीने म्हणाले, राजे कृपा करून तुम्ही पुढे जा आणि विशाळगडावर पोहोचतात एका तोफेचा इशारा द्या. म्हणजे तुम्ही सुखरूप पोहोचल्याचे आम्हाला कळेल. तुम्ही गडावर पोहोचेपर्यंत या खिंडीतून एकही गनीम पुढे जाणार नाही, हा माझा शब्द आहे. बाजीप्रभूचे ते बोलणे ऐकून शिवाजी महाराज स्तब्ध झाले. त्यांनी बाजीप्रभूला कडकडून मिठी मारली. साक्षात रुद्राचा अवतार असणाऱ्या शिवाजीराजांच्या मिठीने आणखी एक योद्धा कृतकृत्य झाला. घोडखिंडीत हर हर महादेवच्या घोषणा दुमदुमल्या. बाजीप्रभूंचे सारे मावळे सिद्धीच्या सैनिकांवर तुटून पडले. शिवाजी राजे वेगाने विशाळगडाकडे घोडदौड करत चालले होते आणि इकडे त्यांच्या मागावर आलेल्या सिद्धीच्या सैन्याला बाजीप्रभूंच्या मावळ्यांनी घोडखिंडीतच अडवून धरले होते. पण सिद्धीच्या सैनिकांनी बाजीप्रभूंच्या देहाची अक्षरशः चाळण करून टाकली. रक्तबंबाळ झालेले बाजीप्रभू जोमाने लढत राहिले. त्यांच्या अंगात जणू वीज संचारली होती. बाजीप्रभूंना आपल्या मृत्यूची जराही चिंता वा भीती नव्हती. त्यांचे कान विशाळगडाकडे तोफेच्या इशाऱ्याकडे लागून राहिले होते.

गनिमांशी लढता लढता बाजीप्रभू रक्ताने उभे न्हाले. ते बेशुद्ध पडले. बरोबरच्या मावळ्यांनी त्यांना शुद्धीवर आणले, तेव्हा बाजीप्रभूंनी त्यांना पहिला प्रश्न विचारला, महाराजांच्या तोफेचा आवाज झाला का? पण अद्याप तो आवाज झालाच नव्हता. आता बाजीप्रभूंच्या शरीरात रक्तही शिल्लक उरले

नव्हते पण तरीदेखील ते जिवाच्या आकांताने ओरडत उठले. तोफेचे आवाज झाले की नाहीत? राजे गडावर पोहोचले की नाहीत? आणि तेवढ्यात तोफेचा आवाज झाला. विशाळगडावरून संकेत मिळाले शिवाजी महाराज सुखरूप पोहोचले होते. तो आवाज कानी पडताक्षणी बाजीप्रभूंच्या डोळ्यातून कृतार्थतेचे अश्रू वाहू लागले. ते पुन्हा मोठ्याने ओरडून म्हणाले, मर्दानो राजे गडावर पोहोचले. आपली मोहीम फत्ते झाली. समोरून सिद्धी जोहरच्या सैन्याचे आक्रमण सुरूच होते. पण आता कोणालाही त्याची तमा नव्हती. बाजीप्रभू आणि त्यांचे मावळे आता आनंदाने मरायला तयार होते. घोडखिंडीत असलेल्या एकूण एक मावळ्याने शत्रूला कापून काढले. बाजीप्रभू देशपांडे आणि त्यांच्या साथीदारांच्या रक्ताने घोडखिंड पावन झाली. तिचे नाव पावनखिंड असे ठेवण्यात आले.ते शिवाजी महाराजांनी दिलेले नाव होते. बाजीप्रभूसारखे माणसे हीच शिवाजी महाराजांची खरी संपत्ती होती. खरी ताकद होती. लाखो मेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगायलाच हवा, या भावनेने झुंजणारे हे मावळे यांच्या प्रती खुद्द शिवाजी महाराज कृतज्ञता बाळगत असत.

शाहिस्तेखान पुण्यात आला आणि त्याने पुण्याची लुटालूट चालू केली. पुण्यात थेट शिवाजी महाराजांच्या लाल महालातच त्याने तळ ठोकला. शाहिस्तेखानाचा तातडीने बंदोबस्त करणे आवश्यक होते. पुण्यात फिरंगोजी नरसाळा त्याच्या ताकदीनिशी शाहिस्तेखानाला तोंड देत होता. पण खानाची ताकद जास्त होती. शिवाय अलीकडे शिवाजी महाराजांना आणखी एक चिंता लागून राहिली होती, ती म्हणजे आदिलशाही आणि मोगलाई एकत्र येण्याची. यावरही महाराजांनी एक वेगळी उपाययोजना करून ठेवली होती. आदिलशाही संकटात सापडली हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळे त्यांनी आदिलशाहीशी थोडे सामोपचाराने घेण्याचे ठरवले. याचाच एक भाग म्हणून शिवाजी महाराजांनी आपला वकील आदिलशाहीकडे विजापूरला पाठवला. या वाटाघाटीत शिवाजी महाराज स्वतःहून आदिलशाहीला पन्हाळगड परत करायला तयार झाले. तसे केल्याने आदिलशहा खूष झाला, कारण पन्हाळा हा त्यांचा प्रमुख गड त्यांना परत मिळणार होता. पुढील काळात पन्हाळा पुन्हा जिंकता येईल हाही शिवाजी महाराजांचा विचार होताच. गड जिंकणे वेळप्रसंगी थोडी माघार घेऊन ते

शत्रूला परत करणे आणि नंतर तेच गड पुन्हा स्वराज्यात घेणे, हे तर शिवाजी महाराजांच्या मोहिमेचे वैशिष्ट्य होते. पन्हाळगड आदिलशाहीला परत केल्यामुळे ते थोडे निश्चिंत झाले आणि त्यांनी शाहिस्तेखानाचा समाचार कसा घ्यावा, त्याकडे लक्ष वळवले.

सगळ्यात आधी त्यांनी सोनोपंत डबीर यांना एक सामोपचाराचा खलिता घेऊन शाहिस्तेखानाकडे पाठवले. अर्थात त्याचा काहीच उपयोग होणार नाही, हे महाराजांना माहितीच होते. शाहिस्तेखान आपल्या प्रचंड फौजेसहित पुणे आणि आसपासच्या परिसराची लुटालूट करीत सुटला होता. राजांना संपवणे हा त्याचा उद्देश होता. त्यामुळे एका सामोपचाराच्या खलित्याने त्याला शांत करणे शक्य होते, हे शिवाजी महाराज जाणून होते. त्याच सुमारास शिवाजी महाराजांना एक अतिशय आनंदाची बातमी समजली. त्यांचे वडील शहाजीराजे त्यांच्या भेटीस येणार असल्याचे पत्र आले. सुमारे पंधरा-वीस वर्षांनी पिता आणि पुत्राची भेट होणार होती. तेवढ्याच वर्षांनी आपला पती भेटणार याचा जिजाबाईंनादेखील अतोनात आनंद झाला होता. मधल्या काळात शहाजीराजांचे कर्नाटकाहून इकडे येणे झालेच नव्हते. शिवाजी महाराज आपल्या वडिलांची आतुरतेने वाट पाहू लागले. आपण आदिलशाही विरुद्ध उघडलेल्या जोरदार मोहिमेचा आपल्या वडिलांना नक्कीच त्रास होत असणार, याविषयीची शिवरायांना चांगलीच कल्पना होती. शहाजीराजांच्या आगमनाची बातमी कळल्यापासून रायगडावर एकच उत्साह संचारला. शिवाजी महाराजांनी रायगडाची सजावट रंगरंगोटी करण्याच्या सूचना दिल्या. त्यांचा आणि जिजाबाईंचा आनंद गगनात मावत नव्हता. आज इतक्या वर्षांनी आपले वडील येत आहेत, हा एक मंगळ क्षण असेल म्हणून त्यांची भेट ही एखाद्या देवस्थानात व्हावी असे शिवाजी महाराजांना वाटले.

शिवाजी महाराजांनी शहाजीराजांना जेजुरीच्या देवळात भेटण्याचे निश्चित केले. त्यानुसार महाराज तातडीने जेजुरीला रवाना झाले. त्या मंदिराच्या पायथ्याशी एक भव्य शामियाना उभा राहिला. जेजुरी पुण्यापासून जवळच होते आणि शाहिस्तेखानाचा पुण्यात मुक्काम होता. त्याने काही दगा फटका केला असता तर या गोष्टीची खबरदारी म्हणून शिवाजीराजांनी जेजुरीच्या आसपासच्या मुलखात आठ हजारांचे घोडदळ तैनात ठेवले आणि तब्बल वीस

वर्षांनी शहाजीराजांच्या समोर त्यांचा पुत्र उभा होता. देखणा रुबाबदार एका नव्या स्वनिर्मित स्वराज्याचा राजा शिवाजी. त्यांचा लाडका शिवबा. शहाजीराजे त्याचे राजस्वी रूप पाहतच राहिले. जणू त्यांचेच प्रतिबिंब त्यांच्यापुढे उभे होते. तसेच बोलके डोळे, तसेच कपाळ, तसेच धारदार नाक. साठ वर्षांचे शहाजीराजे आपल्या ३० वर्षांच्या महाकर्तृत्ववान सुपुत्राला डोळे भरून पाहत राहिले. शिवाजी महाराजांच्या बरोबर त्यांची पत्नी सोयराबाई होती. कडेवर तीन वर्षांचे शंभूराजे होते. त्यांना शहाजीराजे आज पहिल्यांदाच भेटत होते. राजांनी पुढे होऊन आपले मस्तक वडिलांच्या पायावर ठेवले. शहाजीराजांनी थरथरत्या हातांनी त्यांना उठवले आणि मिठीत घेतले. बराच वेळ ते पिता-पुत्र एकमेकांच्या मिठीत होते. सारे जण स्तब्ध होते जणू ती मिठी कधीच सुटणार नव्हती. ती नि:शब्द शांतता खूप काही बोलून गेली. आदिलशाही आणि आता नव्याने जन्माला आलेला शत्रू निजामशाही या दोन प्रभावी शत्रूविरुद्ध आपला मुलगा हिरिरीने लढतोय, याबद्दल त्यांनी त्यांची मोकळ्या मनाने प्रशंसा केली. राजांना तोंड भरून आशीर्वाद दिले. शहाजीराजे म्हणाले, राजे तुमचे कर्तृत्व आणि तुम्ही निर्माण केलेले वैभव पाहून आमचे डोळे धन्य झाले आहेत. तुम्ही हाती घेतलेले काम येणाऱ्या काळासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. परमेश्वर तुमच्या पाठीशी आहे. शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा वध केला, त्याबद्दल शहाजीराजांनी त्यांचे तोंड भरून कौतुक केले. याच अफजल खानाने शहाजीराजांना बेड्या ठोकल्या होत्या आणि संभाजीला कपटाने मारले होते. राजांनी या दोन्ही गोष्टींची भरपाई केली होती. शहाजीराजांनी शिवरायांना रायगडावर स्वराज्याची राजधानी करण्याची सूचना दिली. शिवरायांनी ती सूचना नीट लक्षात ठेवली. रायगडावर दोन दिवस राहून शहाजीराजे परत कर्नाटकात निघून गेले. शिवाजी महाराजांना खूप वाईट वाटले. त्यांच्या मनात विचार येत होते की आता यापुढे वडिलांची भेट कधी होईल. निरोप घेताना शहाजीराजे त्यांना म्हणाले होते, आम्ही जरूर परत येऊ. शंभूराजे मोठे झाले की त्यांना कर्नाटकात घेण्याचा आमचा विचार आहे. आमच्या नंतर तेच कर्नाटकाचा आपला मुलुख सांभाळतील अशी आमची इच्छा आहे. या भेटीनंतर मात्र शहाजीराजांचे परत इकडे येणे झालेच नाही. पुढे तीन वर्षांनी शहाजीराजांचे

निधन झाले. पिता पुत्राची ती अलौकिक भेट त्यांची अखेरचीच भेट ठरली.

शाहिस्तेखान हा मुगल बादशाह औरंगजेबाचा मामा होता. तो तुर्कस्तानचा नवाब होता. शाहिस्तेखान पुण्यात शिरला आणि शिवाजी महाराजांच्या लाल महालातच तळ ठोकून बसला होता. त्याने पुण्याजवळील चाकणचा किल्ला ताब्यात घेतला. पण बाकी सारे गड शिवाजी महाराजांच्या ताब्यात होते. त्यांना मात्र तो अद्यापही हात लावू शकला नव्हता. शाहिस्तेखानाची फौज मोठी व प्रचंड होती. पण राजांचे मावळे आपल्या गडांचे संरक्षण करण्यास पुरते सक्षम होते. त्यातही पावसाळा हा फार मोठा अडसर त्याच्यापुढे होता. पावसाळा संपल्यावर मात्र शाहिस्तेखानाने पुन्हा आपले काम जोरदारपणे करण्यास सुरुवात केली. त्याने पुणे आणि त्याचबरोबर कल्याण, भिवंडी या भागातही लुटालूट सुरू केली. कोकणपट्टीवरही त्याचा डोळा होता. शाहिस्तेखानाने कोकणवर स्वारी करण्यासाठी आपला खास सरदार तलबखान याला बोलावून घेतले. शिवाय अनेक मराठी सरदारदेखील खानाच्या गोटात होते. शिवाजी महाराजांनी आपल्या मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलावली. त्यात शाहिस्तेखानाचा बिमोड कसा करायचा यावर खलबते झाली. बहुतेक सरदारांच्या मते शाहिस्तेखानाला तळ कोकण भागातच गाठणे योग्य होते. शिवाजी महाराजांचा विश्वासू गुप्तहेर बहिरजी नाईक वेळोवेळी खानाच्या काफिल्यातून खबर आणत होता. त्याने खानाची फौज लोहगड मार्गे उंबरखिंडीतून कोकणात उतरणार असल्याची खबर सांगितली. शिवाजी महाराजांनी आपले मावळे उंबरखिंडीत पाठवण्याची तयारी केली. स्वतः शिवाजी महाराजही या मोहिमेत सहभागी होते. सरदार कहार तलब खानाच्या फौजेचा शिवाजी महाराजांच्या मावळ्यांपुढे काहीच टिकाव लागू शकला नाही. ती मोहीम महाराजांनी अगदी सहज फत्ते केली. त्यानंतरही पुढे चांगली दोन-तीन वर्षे मराठीशाहीत शाहिस्तेखानाच्या कारवाया सुरूच राहिल्या.

शाहिस्तेखानावर पुन्हा एकदा नाही तर कायमचाच वचक बसवणे तातडीचे होते. तो एका दुसऱ्या पराभवाने माघार घेणार नाही, हे आता कळून चुकले. अशातच शिवाजी महाराजांना आणखीन एक वाईट खबर मिळाली. त्यांनी जिंकलेल्या कोंढाणा या गडावरचे त्यांचे सरदार शत्रूशी सलगी करण्याचे वाईट

कृत्य करत होते. काही सरदार मुघलांना फितूरही झाले होते. असे फितूर सरदार म्हणजे स्वराज्यासाठी एक डोकेदुखी झाली होती. बाहेरचा शत्रू कितीही प्रबळ पराक्रमी आणि त्रासदायक असला तरी ठीक, पण हे स्वराज्यातील अंतर्गत शत्रू मात्र बाहेरच्या शत्रूपेक्षाही अधिक धोकादायक असतात. ते आपल्या कुटील कारस्थानांनी राज्य कधी व कसे पोखरून काढत असतात ते चटकन ध्यानातही येत नाही. कारण त्यांची कारस्थाने गुपचूप, हळूहळू आणि गुप्तपणे चालू असतात. शिवाजी महाराजांनी आपल्या प्रत्येक प्रांतात हेर नेमले होते. ते खास आतल्या लोकांवर नजर ठेवण्यासाठीच. तसे करणे अपरिहार्य होते, हे महाराजांना फार लवकर उमजले होते.

शिवाजी महाराजांनी पुणे प्रांताकडे लक्ष वळवले. शाहिस्तेखानाने पुण्याची पार दुर्दशा करून टाकली होती. तो अद्यापही पुण्यात लाल महालातच मुक्कामाला होता. शिवाजी महाराजांचे गुप्तहेर फकीराच्या वेशात पुण्यात फिरत होते आणि खबर आणत होते. त्यांनी खानाची आणि त्याच्या फौजेची सर्व तपशीलवार माहिती गोळा करून महाराजांकडे दिली. खानाची पुढची चाल काय असेल, त्याचा शिवाजी महाराज विचार करू लागले. खानावर बेसावध क्षणी हल्ला चढवता येईल का किंवा अन्य कुठला पर्याय वापरता येईल, यावर मंत्रिमंडळाच्या सल्ला मसलती घडू लागल्या. नेताजी, तानाजी, बालाजी, चिमणाजी नरेकर बंधू हे खास लोक आपापले विचार सांगत राहिले. अखेर शिवाजी महाराजांनी एक विचार पक्का केला. तो त्यांनी जिजाबाईंना बोलून दाखवला. ते म्हणाले, मांसाहेब आमचा बेत पक्का झालाय. आम्ही लाल महालावर हल्ला करायचे निश्चित केले आहे. जिजाबाई वृद्ध झाल्या होत्या. पण त्या अजूनही राज्यकारभारत लक्ष घालत होत्या. शिवाजी महाराज त्यांचा सल्लाही घेत असत. स्वराज्यातील प्रत्येक बारीक सारीक गोष्ट ते जिजाबाईंच्या कानी घालत असत. थेट लाल महालावर हल्ला करण्याचा विचार ऐकून जिजाबाई अस्वस्थ झाल्या. त्या म्हणाल्या, राजे यात किती धोका आहे ते तुम्हाला ठाऊक नाही का? त्या शाहिस्तेखानाची फौज साऱ्या पुणेभर पसरलेली आहे. सगळा मुलुख त्यांनी व्यापून टाकलाय. यावर शिवाजीराजे हसले आणि म्हणाले, मांसाहेब ते आम्हाला माहीत आहे. पण आम्ही शाहिस्तेखानावर

हल्ला करणार आहोत.अन्य दुसरा उपाय नाही आणि मग शिवाजी महाराजांनी जिजाबाईंना सर्व सविस्तर सांगितले.

शाहिस्तेखानाची महाप्रचंड फौज अख्ख्या पुण्यात गस्त घालीत होती. तिची लुटालूट चालूच होती. पण स्वतः शाहिस्तेखान मात्र लाल महालाच्या बाहेर क्वचितच पडत असे. याआधी शिवाजी महाराजांनी त्याला दोनदा पराभूत केले होते, पण दोन्ही वेळेस त्याने आपले सरदारच पाठवले होते. पराभव झाल्यावरही तो स्वतः बाहेर आलाच नव्हता. त्याच्या फौजांनी मात्र सगळा पुणे, कोकण आणि मावळ प्रांत पार उद्ध्वस्त करून टाकला होता. शाहिस्तेखान लाल महालात बसून सर्व सूत्रे हलवीत होता. त्याला त्याच जागेवर गाठून त्याच्यावर तुटून पडायचे हा अतिशय धाडसी बेत शिवाजी महाराजांनी ठरवला. शिवाजी महाराज थेट लाल महालात येईल, हे खानाच्या स्वप्नातही नव्हते. अर्थात कोणीही स्वप्नातही कल्पना करू शकणार नाही ते ते सर्व प्रत्यक्षात उतरवणे हीच तर शिवाजी महाराजांची खासियत होती. शाहिस्तेखानाची फौज दीड लाखांपेक्षा जास्त होती. शिवाजी महाराजांबरोबर फार तर पाच एक हजार मावळे होते. जिजाबाईंना या मोहिमेची फारच चिंता लागून राहिली. त्यांनी शिवाजी महाराजांना फेरविचार करण्याचे सुचवले. पण ते आपल्या निर्णयाशी ठाम होते. जिजाबाईंचा आशीर्वाद घेऊन शिवाजी महाराजांनी राजगड सोडला आणि ते पुण्याच्या दिशेने निघाले. त्यांच्यासोबत मोरोपंत नेताजी, फिरंगोजी, बालाजी, चिमाजी ही मंडळी होती. ते भर उन्हाळ्याचे दिवस होते. वाऱ्याची साधी झुळकही नव्हती. सततच्या घोडे स्वारीने सर्व मंडळी आणि घोडेही थकून गेले. सर्वजण पुण्याला कोंढाणा गडावर पोहोचले. लाल महालाच्या मोहिमेविषयी खलबते सुरू झाली. शिवाजी महाराजांनी सर्व योजना नीट समजावून सांगितली. ती योजना अशी होती की, तानाजी कात्रज घाटाखाली एक लग्नाचे वराड तयार ठेवणार होता. दुपारी दोन वाजता वाजतगाजत हे वराड पुण्यात लाल महालाच्या बाजूने येणार होते. येसाजी हे गवताच्या गंज्या घेऊन पुण्यात येणार होते आणि कोणी विचारले असते तर गुरांना खाण्यासाठी गवत आणले आहे असे सांगणार होते. विठोजी हे त्याच परिसरात दीड दोनशे बैलांना शिंगावर पलिते बांधून तयार ठेवणार होते. रात्री इशारा मिळताच ते पलिते

पेटवून देऊन सरळ कोंढाण्याकडे उलटे फिरणार होते. मोरोपंत आणि नेताजी हे आपापल्या मावळ्यांच्या तुकड्यांसहित नेमून दिलेल्या नाक्यांवर थांबणार होते. सर्जेराव, बाळाजी आणि चिमणाजी हे तिघे शिवाजी महाराजांबरोबर थेट लाल महालात घुसणार होते. आपण आपल्या राजा बरोबर आहोत, याचा त्या तिघांना अतिशय आनंद झाला. आता जगलो काय अन् मेलो काय, त्याची कोणालाच परवा नव्हती. अशाप्रकारे एकूण नियोजन करून झाले. पण फिरंगोजी मात्र थोडे नाराज झाले. महाराजांनी त्यांना गडावर थांबायला सांगितले होते.जर शाहिस्तेखानाचे सैन्य महाराजांना पाठलाग करीत कोंढाण्यावर आले असते तर त्या सैन्याशी दोन हात करण्याची पूर्ण जबाबदारी फिरंगोजीवर टाकली होती. शिवाजी महाराजांनी हे सांगताच फिरंगोजींची नाराजी कुठल्या कुठे पळाली. अशा रीतीने शिवाजी महाराजांचे सैन्य पुण्यात शिरले.

पुण्यात जागोजागी शाहिस्तेखानाचे पहारेकरी होतेच. त्यांनी चौकशी करून सैन्याला आत सोडले. तसेही लग्नाचे वराड आणि गवताच्या गंजा घेऊन येणाऱ्यांची काय तपासणी करणार? कोणाला साधा संशय आला नाही. एक गोष्ट ठीक झाली ती अशी की, उन्हाळ्याचे दिवस असूनही थोडा पाऊस आला. पावसाची एक सर पडून गेली. संध्याकाळ झाली. हळूहळू सूर्य मावळतीला गेला आणि अंधार पडला. तोपर्यंत शिवाजी महाराजांच्या सगळ्या तुकड्या पुण्यात शिरल्या होत्या. त्यांचा एक खास सरदार होता पठाण इब्राहिम खान. तो महाराजांचा अंगरक्षक होता. पठाण इब्राहिम खानाने एक शाही सरदाराचा पोशाख केला होता आणि स्वतः शिवाजी महाराज कसे सेवक बनले होते असे अगदी वेगळे वेशांतर करून ते पुण्यात शिरले. आपला राजा आपला सेवक बनला आहे ते पाहून इब्राहिम खान लाजेने अगदी चूर झाला होता. त्याला विलक्षण संकोच वाटत होता. पठाणचे सेवक बनलेले शिवाजी महाराज आणि इब्राहिम खान हे दोघेही लाल महालापाशी आले. त्यांच्याबरोबर पठाणाचा वेश घातलेले सर्जेराव, बाळाजी आणि चिमणाजी होते. लाल महालाच्या पहारेकऱ्यांना इब्राहिम खान आणि इतर पठाणांनी लवून कोरणीसा केला. शिवाजी महाराज आणि त्यांचे लोक लाल महालात गुपचूप शिरले. तोवर रात्र संपून पहाट व्हायला आली होती. लाल महाल ही महाराजांची स्वतःचीच

हवेली. त्यांनीच बांधलेली. त्यामुळे तेथील कोपरान्‌कोपरा त्यांना पक्का माहीत होता. लाल महालातल्या चोर वाटा त्यांनीच तयार केल्या असल्यामुळे कुठून आत शिरायचे आणि कुठून बाहेर निसटून जायचे, याची त्यांना व्यवस्थित कल्पना होती. पण शिवाजी महाराजांच्या त्या सुंदर हवेलीत आता शाहिस्तेखान आणि त्याच्या बेगमा दासी ही मंडळी राहत होती.

पहाटेच्या वेळेस सर्वजण गाढ झोपले होते. त्याचवेळी शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे थेट आत घुसले. त्या गडबडीने लाल महालातील मंडळी जागी झाली आणि समोर उभे असलेले मावळे पाहून गांगरून गेले. खानाच्या बेगमांनी आणि दासींनी आक्रोश सुरू केला. त्या आवाजाने खान जागा झाला. तोपर्यंत मावळे थेट त्याच्या पलंगाजवळच आले होते. त्यांना पाहून भेदरलेल्या खानाने खिडकीतून बाहेर उडी मारण्याचा प्रयत्न केला तोच त्याच्या बोटांवर सटकन तलवारीचा वार बसला. ती शिवाजी महाराजांची भवानी तलवार होती. तिने शाहिस्तेखानाची तीन बोटे मुळापासून कापून काढली होती. त्या वेदना असहाय होऊन खान जिवाच्या आकांताने ओरडत सुटला. पण त्याला लाल महालातून बाहेर पळून जाण्यात यश आले हे मात्र खरे. शिवाजी महाराजांचे ते आक्रमण कोणालाही अपेक्षित नव्हते. मराठ्यांचा तो महासामर्थ्यशाली राजा आपल्याला अगदी पहाटेच्या वेळी असा बेसावध गाठील हे शाहिस्तेखानाला स्वप्नातही वाटले नव्हते. त्यांना अनपेक्षित हल्ल्यामुळे गांगरलेले मुघल सैनिक पटापट लाल महालाच्या बाहेर पडले. तोपर्यंत लख्ख उजाडले होते. त्या दिवशी रामनवमी होती. प्रभू रामचंद्रांचा जन्मदिवस. शिवाजी महाराज सुखरूपपणे कोंढाण्यावर पोहोचले. इकडे लाल महालातून पळालेला शाहिस्तेखान आपल्या उजव्या हाताच्या तीन तुटलेल्या बोटांकडे हताशपणे पाहत बसला होता. शाहिस्तेखान प्रचंड घाबरला होता. त्याच्यापुढे दोन प्रश्न होते एक या शिवाजीचे काय करायचे आणि दुसरा तुटक्या बोटांनी आपल्या भाच्याकडे औरंगजेबाकडे कसे जायचे. शाहिस्तेखानाच्या जिवावर बेतले होते ते बोटांवर निभावले होते.

शिवाजी महाराजांच्या त्या धाडसी पराक्रमाने मराठेशाहीपुढे एक आदर्श घालून दिला होता. वेळ पडताच राजांनी स्वतः धोका पत्करून लढायचे असते, हे शिवाजी महाराजांनी याआधीही दाखवून दिले होतेच. लाल महालात त्याची

पुनरावृत्ती झाली. पुण्यात शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाला पळवून लावले होते. लाल महालात तुटलेली बोटे घेऊन शाहिस्तेखान औरंगजेबाकडे गेला. त्याची ती अवस्था पाहून तो महाबलशाली मोगल सम्राट संतापाने अक्षरशः थरथरू लागला. हा शिवाजीराजे नावाचा राजा साधा नाही. अत्यंत धाडसी व पराक्रमी आहे, याची जाणीव औरंगजेबाला झाली. शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्याशिवाय अन्य कुठलाही विचार औरंगजेबाला सुचेनासा झाला.

शाहिस्तेखानाचा पाडाव केल्यानंतर पुढच्या काही महिन्यांत शिवाजी महाराजांनी सुरत या ठिकाणावर छापा घालून त्याची लूट केली. सुरत हा मुघलांचा फार मोठा महत्त्वाचा मुलुख होता. त्या प्रांतात अनेक मुघल सरदार वास्तव्यास होते. ती मुघलांची प्रमुख बाजारपेठ होती. अनेक व्यावसायिक व व्यापाऱ्यांची तिथे भरभराट झाली होती. सुरत हा औरंगजेबाचा विशेष लाडका प्रांत. त्यातून त्याला वर्षाकाठी दहा लाख रुपये करवसुली होत असे. शिवाजी महाराजांच्या पराक्रमी मावळ्यांनी सुरतमध्ये शिरून तिथे लुटालूट केली. नेताजी पालकर हे प्रमुख मावळे त्यांचे आठ हजार आणि स्वतः शिवाजी महाराज यांनी सुरतेवर छापा घालून सोने, चांदी तसेच करोडो रुपये लुटून नेले. मावळ्यांनी त्याच्या ऐश्वर्य संपन्न बाजारपेठेची अक्षरश: कोळशाची वखार करून टाकली. सुरत बेसूरत झाली. या हल्ल्यांमधून मराठेशाहीत खूप मोठी संपत्ती आली. मधल्या काळात राज्याचे आर्थिक गणित बिघडले होते आणि त्याची बऱ्यापैकी भरपाई झाली. सुरत ही औरंगजेबाची मोठी व्यापार पेठ लुटल्यामुळे स्वराज्यात आनंदी आनंद पसरला. दुसरीकडे स्वराज्यावर चालून येणारी संकटे थांबत नव्हती. शाहिस्तेखान आणि सुरतवरील लूट यामुळे संतापलेल्या मुघलांचे त्रास देणे चालूच होते.

स्वराज्यावर यादरम्यान आणखी मोठे संकट येऊ घातले होते. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीला पूर्णपणे वेगळे वळण देणारे ते संकट होते. त्या संकटाचे नाव होते मिर्झाराजे जयसिंग. त्या वेळचे अमीर आणि आजच्या जयपूरचे मिर्झाराजे. हे औरंगजेब बादशहाचे सरदार होते. शिवाजी महाराजांच्या एकापाठोपाठ एक आक्रमणांनी त्रस्त झालेल्या औरंगजेबाने मिर्झाराजे जयसिंगांना तातडीचा निरोप धाडून बोलावून घेतले. औरंगजेब त्यांना म्हणाला, मिर्झाराजे,

शिवाजी के कारनामे ऐसे ही चालू रहे तो एक दिन हमारी दख्खन की बादशाहत खत्म हो जाएगी. तुम्ही शिवाजीच्या समाचारासाठी गेला नाहीत तर आम्हाला जावे लागेल अशी वेळ आलीये. औरंगजेब खूप काकुळतीला आला होता. शिवाजी महाराजांनी त्याची डोकेदुखी वाढवली होती. त्यानंतर मिर्झाराजे व त्याच्यासोबत दिलेरखान हा सरदार आणि ८० हजार पठाण सैनिक दक्षिणेकडे निघाले. इकडे राजगडावर शिवाजी महाराजांना ही बातमी कळली. मिर्झा जयसिंग अतिशय पराक्रमी चतुर उत्सर्दी राजाने सरदार होते. हिंदू असल्याने त्यांच्यावर सहजासहजी तलवार उगारून भविष्याच्या दृष्टीने योग्य ठरणार नव्हते. एका हिंदू राजावर शिवाजी महाराजांनी तलवार उगारली, याचा चुकीचा संदेश उत्तरेत गेला असता व त्याचा परिणाम भविष्यात स्वराज्याबद्दल प्रतिकूल प्रतिक्रिया उमटण्यात झाला असता. शिवाजी महाराजांना हे नको होते.

मिर्झाराजांसोबत व्यवहार करताना दोनच उपाय करता येण्यासारखे होते. एक तर शेवटचा उपाय म्हणून निकराची लढाई अन्यथा तह करून स्वराज्यावर आलेले संकट परतवून लावणे. त्यादृष्टीने शिवाजी महाराजांनी प्रयत्नही करून पाहिले. परंतु, त्याचा फारसा उपयोग झाला नाही. याउलट मिर्झाराजे जयसिंग यांनी दिलेरखानाला हुकूम दिला की शिवाजीच्या ताब्यातील सर्व मुलुख बेचिराख करावा. जनतेचे हाल करावेत. जनावरे लुटून न्यावेत. मिर्झाराजेंच्या या हुकमाने दिलेरखानाला थोडे आश्चर्यच वाटले. कारण, शिवाजीचे गडकिल्ले काबीज करावेत असा उल्लेखही मिर्झाराजांच्या हुकूमात नव्हता. पण, मिर्झाराजांची चाल थोडी वेगळी होती. भरभक्कम तटबंदी असलेल्या गडकिल्ल्यांवर आक्रमण करणे अतिशय अवघड काम होते.त्या तुलनेत मुलुख लुटणे सोपे होते. जयसिंग व दिलेरखान यांच्या पठाणांनी मुलुख लुटण्यास जोरदार प्रारंभ केला. मावळ्यांनी प्रतिकार केला, पण त्याने फार फरक पडला नाही. जयसिंगाने यानंतर दिलेरखानाला पुरंदर गडालाही वेढा घालण्याचा आदेश दिला होता. दिलेरखान आणि त्याचे सैन्य पुरंदरच्या पायथ्यापाशी पोहोचले. स्वराज्यातला एक अतिशय महत्त्वाचा गड ताब्यात घेतला पाहिजे, अशी त्याची योजना होती. शिवाजी महाराजांचे अनेक मुलुख आणि पूर्णपणे मिर्झा जयसिंगाच्या तावडीत आले. शिवाजी महाराजांना चिंता वाटू लागली.

मिर्झाराजांनी पुरंदरला वेढा दिला. दिलेरखानाने वज्रगडाचा ताबा घेतला. वज्रगडावरून पुरंदरवर तोफांचा मारा सुरू करण्यात आला. तोफांच्या हल्ल्याने पुरंदरच्या तटबंदीला खिंडार पडले. मोगल सेनेने किल्ल्यात प्रवेश केला. माचीवर खानाचे व मुरारबाजीचे जोरदार युद्ध झाले. मुरारबाजी पडले आणि त्याचबरोबर पुरंदरही पडला. हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा त्यांनी मिर्झाराजे जयसिंगाशी तहाचे बोलणे सुरू केले आणि ११ जून १६६५ साली इतिहास प्रसिद्ध पुरंदरचा तह झाला. या तहात ठरल्याप्रमाणे अंकोला, कर्नाळा, कोंढाणा, कोहोज, खिरदुर्ग, तिकोना, तुंग, नंगगड, नरदुर्ग, पळसगड, पुरंदर, मुरंजन, मनरंजन, मानगड, मार्गगड, माहुलीगड, रुद्रमाळ, रोहिडा, लोहगड, वसंतगड, विसापूर, सोनगड हे २३ किल्ले महाराजांना मोगलांना द्यावे लागले. याशिवाय, या तहानुसार राजांनी आपले चार लाख होनांचे क्षेत्र बादशहाला दिले. राजांच्या ताब्यात बारा किल्ले आणि लाख होनांचे क्षेत्र राहिले. मिर्झाराजांनी चाळीस लाखांची खंडणी राजांवर लादली. वार्षिक तीन लाखांचे हप्ते ठरले. संभाजीराजांना बादशहाकडून पाच हजाराची मनसब मिळाली. तहातील कलमांची पूर्तता होईपर्यंत संभाजीराजे मिर्झाराजांकडे ओलीस म्हणून राहिले.

पुरंदरच्या तहानंतर मिर्झाराजे जयसिंग यांनी एक वेगळीच अट शिवाजी महाराजांना घातली. औरंगजेबाच्या बादशाहीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आग्रा येथे मोठा उत्सव आयोजित करण्यात येणार होता. या सोहळ्याला शिवाजी महाराजांनी हजेरी लावावी असे आमंत्रण मिर्झाराजे यांनी दिले. मिर्झाराजे जयसिंग यांनी स्वतः शिवाजी महाराजांना हे सांगितले की, तुम्हाला आणि शंभूराजांना औरंगजेबाने आमंत्रित केले आहे. शिवाजी महाराजांच्या मनात एक शंका आली. त्याचेही जयसिंगाने निरसन करून टाकले. ते म्हणाले राजे चिंता करू नका. आग्र्यामध्ये तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही, हे माझे या राजपुताचे वचन आहे. तुम्ही निर्धोकपणे वाढदिवसाच्या समारंभास यावे आणि शिवाजी महाराज आग्र्याला औरंगजेबाच्या भेटीस निघाले. त्यांचा तो निर्णय जिजाबाई, मोरोपंत, सोनोपंत आणि बाकी कोणालाही अजिबात पटला नाही. शंभूराजे आधीच मुघलांच्या ताब्यात होते. आता शिवाजी महाराज तिथे जाणार,

यात फार मोठा धोका आहे, असे सगळ्यांचेच मत होते. शिवाजी महाराज मांसाहेबांचा हात हातात घेत म्हणाले, कोणीही आमची काळजी करू नका. आपले संभाजीराजे त्याचे पंच हजारी मनसबदार झालेत. आता आम्हालाही दक्षिणेकडची सुभेदारी मिळण्याची सुसंधी आहे. औरंगजेब बादशहा आमच्यावर खुष झाला तर तेही होईलच महाराजांचे ते थट्टेचे बोलणे ऐकून सगळेजण थोडे चिडलेच. ते पाहून महाराजांना आणखीनच हसू आले. त्यांच्या चेहऱ्यावर शांत भाव आणि अंतकरणात एक गंभीर आग होती. लक्षावधी प्रश्नांचे मोहोळ घेऊन शिवाजी महाराज नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी निघाले. शिवाजी महाराजांच्या समवेत ३०० मावळ्यांचे सैन्य होते. पण तेवढे पुरेसे नव्हते. शिवाजी महाराज आणि त्यांचा पुत्र संभाजी आग्राच्या औरंगजेबाच्या दरबारात येणार हे कळल्यावर त्या दोघांना पाहण्यासाठी शहराच्या घराघरातून दारे खिडक्यातून लोकं उभी होती. महाराजांचा अतुलनीय महापराक्रम त्या सगळ्यांच्या कानी वारंवार पोहोचत होताच. शिवाजी महाराज नावाच्या असामान्य विभूतीला प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा आग्रा शहराला झाली होती. त्या दोघांच्या अलौकिक दर्शनाने आग्रा शहरातील रहिवासी धन्य झाले खरे, पण शिवाजी महाराज मात्र विलक्षण संतापले होते.

एका राजाने दुसऱ्या राजाला किमान आदर व सन्मानाची वागणूक द्यावी, अशी अपेक्षा असते. औरंगजेब हा मोठा बादशहा होता. शिवाजी महाराज तर त्याच्याहूनही महान राजे होते. पण, औरंगजेबाकडून त्यांचा घोर अपमान झाला आणि तोही जाणून-बुजून. दरबारात शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांना अगदी मागच्या बाजूला सामान्य सरदार उभे राहतात तिथे उभे करण्यात आले. त्या जागेवरून औरंगजेबाचे सिंहासनही नीट दिसत नव्हते. महाराजांना हा अपमान वाटला. आग्र्याला येण्याचे आमंत्रण पाठवून, अशी वागणूक देणारा औरंगजेब आपली चेष्टा करतोय असे त्यांना वाटले. ते पायापासून मस्तकापर्यंत रागाने लालबुंद झाले. खरे म्हणजे औरंगजेबाने स्वतःहून त्यांच्या स्वागतास येणे अपेक्षित होते. पण येथे स्वागतच काय साधी विचारपूसही महाराजांची करण्यात आली नाही. महाराजांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्यांना आपल्या जागी उभे राहणे अशक्य झाले. ते दरबारातून बाहेर पडले. शिवाजी आपल्या

दरबारात येऊन आपल्याला न भेटता आणि साधा मुजराही न करता निघून गेला, यामुळे औरंगजेब संतापला. त्याच्या संतापाची परिमिती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या अटकेत झाली. औरंगजेबाने त्या दोघांना आग्र्यातच नजर कैदेत ठेवण्याचा हुकूम दिला. त्यांच्यावर सख्त पहारा ठेवला. तिथून बाहेर पडणेही केवळ अशक्य कोटीतील बाब होती. आपला शत्रू शिवाजी स्वतःहून आपल्या गुहेत आला आहे, आजची शिकार वाया का घालवावी? राजांना मारण्याची संधी का घेऊ नये, अशा विचारांनी औरंगजेबाचे चित्त विचलित झाले होते. खरे तर शिवाजी महाराजांना ठार करण्याचा त्याचा कट होता, पण तसे करणे त्यावेळी शक्य नव्हते. कारण, महाराजांच्या जिवास काही बरेवाईट झाले असते, तर दख्खन औरंगजेबाविरुद्ध पेटून उठला असता. मराठ्यांचे सशस्त्र बंड शमवण्यात औरंगजेबाची मोठी शक्ती खर्च झाली असती. त्यातल्या त्यात सह्याद्रीच्या कडेपठारात मराठ्यांशी लढणे म्हणजे एक अग्निपरीक्षाच असणार, हे मिर्झाराजे जयसिंग यांचा मोठा मुलगा आणि शिवाजी महाराज व औरंगजेब भेटीचा समन्वयक रामसिंग याने बादशहाला समजावून सांगितले.

शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेत तब्बल तीन महिने राहिले. हा कालावधी लहान नव्हता. स्वराज्याच्या भवितव्याचा प्रश्न होता. तेथून निसटणे हाच एक उपाय उरला होता. त्यातही असंख्य धोके होते. लहान संभाजीराजे सोबत होते. त्यांना घेऊन पलायन करायचे म्हणजे जिवाशी गाठ होती. शिवाजी महाराज जेथे राहत होते, तिथे पहारेकरी डोळ्यात तेल घालून अहोरात्र पहारा देत होते. शिवाजी महाराजांच्या महालाबाहेर मुघल सरदारांचा खडा पहारा होता. तो भेदून पळून जाणे म्हणजे जिवावरचे संकट होते. शिवाजी महाराजांनी एक वेगळी युक्ती योजली. त्यांनी आजारी पडल्याचे नाटक केले. गोरगरीब आणि साधूसंतांना दानधर्म म्हणून मेवा मिठाई वाढण्याचे ठरवले आणि त्यासाठी मोठमोठाले पेटारे मागवले. योग्य संधी बघून शिवाजी महाराज त्या पेटाऱ्यांचा वापर करून औरंगजेबाच्या तावडीतून निसटून जाणार होते. ते अक्षरश: जिवावर बेतणारी योजना अमलात आणत होते. सुरुवातीला जेव्हा मेवा मिठाई भरून पेटारे बाहेर जात तेव्हा पहारा देणारे सरदार प्रत्येक पेटारा उघडून पाहायचे. पुढे पुढे मात्र त्यांची खात्री पटली की त्यात केवळ मेवा

मिठाई आणि इनाम असतात. तेव्हा त्यांनी पेटारे उघडून पाहण्याचे बंद केले. शिवाजी महाराज याचीच वाट पाहत होते. त्याची खातरजमा झाल्यावर शिवाजी महाराजांनी आपली योजना ठरवली. त्यांचा एक साथीदार होता हिरोजी. तो दिसायला अगदी थेट दुसरा शिवाजीच होता. तशीच चेहरेपट्टी तशीच उंची. जणूकाही जुळा भाऊच. महाराजांनी आपल्या जागी फिरोजीला मागे ठेवायचे ठरवले. तोही क्षणात तयार झाला. महाराजांनी आपल्या दाढीसारखी हुबेहूब दाढी त्याला चिकटवली आणि पलंगावर झोपण्यास सांगितले. आता औरंगजेब संशय घेण्याची शक्यताच नव्हती. त्याला वाटले शिवाजी आजारी आहे व पलंगावर झोपला आहे. शिवाजी महाराजांनी जाण्याचा दिवस निश्चित केला. शिवाजी महाराज सैनिकांचा पहारा असताना मिठाईच्या पेटाऱ्यातून तिथून बाहेर पडले. आग्र्याच्या बाहेर गेल्यावर त्यांनी संभाजीराजांना अज्ञातस्थळी ठेवून जाण्याचे ठरविले. नऊ वर्षांच्या संभाजीराजांना सोबत नेण्यातला धोका त्यांनी ओळखला होता. कारण आपण पळालो हे कळल्यावर औरंगजेबाची प्रचंड सेना आपला पाठलाग करणार आणि त्यामुळे संभाजीच्या जिवाला धोका असेल याची महाराजांना पूर्ण कल्पना होती. महाराज बादशहाच्या तावडीतून सुटले. शिवाजी महाराजांनी जिवावरचे धाडस दाखवले. या प्रसंगातून औरंगजेबाला एक फार मोठा धडा मिळाला. पण आता त्याच्या हाती चरफडण्याशिवाय काहीच उरले नव्हते. आग्र्याला जे घडले ते सारेच अकल्पित होते. आधी मिर्झाराजे जयसिंग यांच्याकडे संभाजीराजांना ओलीस ठेवणे, मग शिवाजी महाराजांची आग्रा भेट, तिथे नजरकैदेतून पळून जाणे या सगळ्या घटनांची सुसंगतीच लागणे शक्य नव्हते.

शिवाजी महाराजांना एका गोष्टीची मात्र पक्की खात्री होती की, आग्र्याला गेल्यावर औरंगजेब आपल्याला सही सलामत जिवंत सोडण्याची कुठलीच शक्यता नाही. त्यांना काळजी होती ती आपल्या मुलाची अर्थात संभाजीची आणि त्याहून कित्येक पटीने काळजी होती ती स्वराज्याची. पण, स्वराज्याच्या संरक्षणासाठी त्यांना आपल्या पोटाच्या पोराला ओलीस ठेवावे लागले होते. त्या आधी वर्षभर तो पोरगा शत्रूच्या ताब्यात होता. संभाजीराजांच्या मनात शौर्याची बीजे पेरली गेली ती आग्र्याच्या प्रसंगापासून. वयाच्या केवळ नवव्या वर्षी

संभाजीराजे पाचहजारी मनसबदार बनले. आग्र्याहून सुटका झाली तेव्हापासून शिवाजी महाराजांच्या राज्यात, त्यांच्या स्वराज्याच्या कार्यात संभाजीराजांचा सक्रिय प्रवेश झाला. एवढ्या मोठ्या साम्राज्याचा वारस तयार करण्याची ती सुरुवात होती. आग्र्याहून सुखरूप निसटून शिवाजी महाराज राजगडावर आले. पण त्यांना कोणीही ओळखले नाही. कारण एका बैराग्याच्या वेशात ते आले होते. आग्र्याहून पळून जाताना त्यांनी आणि संभाजीने बैराग्याच्या वेशात पलायन केले होते. शिवाजी महाराज राजगडावर आले. त्यांनी जिजाबाईंना वाकून नमस्कार केला तर त्या चटकन मागे सरकल्या. एक बैरागी आपल्या पाया पडतोय याचा त्यांना संकोच वाटला. मग शिवाजी महाराजांनी त्यांचे खरे रूप मांसाहेबांना दाखविले आणि आपली ओळख दिली. महाराजांना पाहून मांसाहेबांसह रायगडावर आनंदाश्रूचे पाट वाहिले. राजे आले, राजे आले या बातमीने अवघे स्वराज्य चिरतरुण झाले. मराठी मुलुखात आनंदीआनंद परसला. पण, मांसाहेबांना एक गोष्ट खटकली. महाराजांसोबत त्यांना संभाजीराजे दिसले नाही. त्यावर महाराजांनी सांगितले की, शंभूराजे आता या जगात नाहीत. ते आपल्याला कायमचे सोडून गेले. आग्रा मोहिमेत संभाजीराजे यांचे निधन झाली, ही बातमी जनतेला पुढे साधारण दोन महिने खरी वाटली. कारण, शिवाजी महाराजांनी संभाजीराजांच्या मृत्युपश्चात क्रिया कर्म केल्याचंही नाटक केले. आग्र्याहून दोन महिन्यांनी संभाजी राजे सुखरूपपणे गडावर येऊन पोहोचले. यामागे शिवाजी महाराजांची एक विलक्षण योजना होती. ती अशी की, संभाजीराजांना मृत घोषित करून औरंगजेबाच्या सैन्याचा त्यांच्यामागील पाठलाग थांबवायचा व त्यांना स्वराज्यात सुखरूप परत येण्यासाठी रस्ता तयार करून द्यायचा. संभाजीराजे राजगडावर सुखरूप परतले आणि सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. आपले शंभूराजे जिवंत आहेत, याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता.

दिवस झपाट्याने पुढे जात होते. राजगडावर आल्यापासून शिवाजी महाराजांच्या तब्येतीने कुरकूर करण्यास सुरुवात केली होती. त्यांची प्रकृती वारंवार ढासळत होती. आजारपण मागे लागले होते. स्वराज्यावरची संकटे थांबत नव्हतीच. आग्र्याहून येणे हे फार मोठे धाडस होते. तरी पण तो

मुगलशाहीवर मिळवलेला विजय होता. त्या प्रकरणामुळे औरंगजेब अधिकच चौताळून उठणार होता आणि स्वराज्यावर आक्रमण करणार हे सांगायला कुठल्या ज्योतिषाची गरज नव्हती. मुघलांच्या कारवाया, त्यांची वाईट कृती अखंड सुरूच राहिली. एक दिवस शिवाजी महाराजांना एक अतिशय वाईट बातमी मिळाली. त्यांचे सरनोबत नेताजी पालकर ज्यांना प्रती शिवाजी असेही म्हटले जायचे त्यांना मुघलांनी पळवून नेले त्यांचे धर्मांतर करून त्यांना मुस्लिम बनवले. पुरंदरच्या तहात आणि त्याआधी अफजल खानाच्या भेटीच्या वेळेस फार महत्त्वाची भूमिका बजावणारे नेताजी पालकर शिवाजी महाराजांच्या अतिशय महत्त्वाच्या माणसांपैकी एक होते. पण पुरंदरच्या तहानंतर मोगलांनी त्यांना कैद करीत त्यांचे बळजबरीने धर्मांतर केले व त्यांना अफगाणिस्तानला पाठवून दिले. नेताजींचा अतोनात छळ झाला. त्यांचे मोहम्मद कुलीखान या नावाने मुघलांनी नामकरण केले. दहा वर्षांनी शिवाजी महाराजांनी मुस्लिम झालेल्या नेताजींना विधिवत धर्मांतर करून घेऊन पुन्हा हिंदू बनवले.

पुढे जंजिरा, कोंढाणा, कर्नाळा, रोहडा, सुरतेवरील आणखी एक छापा अशा अनेक मोहिमा झाल्या. पण यादरम्यान महाराजांची प्रकृतीविषयक तक्रारींनी सपाटाच लावला होता. त्यांनी ठरवले की स्वराज्याचा कारभार संभाजीराजे यांच्याकडे द्यावा. त्यांनाही या कामात तयार करावे. त्यानुसार शिवाजी महाराजांनी संभाजीराजांना राज्यकारभाराचे धडे देण्यास सुरुवात केली. या काळात ज्या महत्त्वाच्या मोहिमा झाल्या त्यात कोंढाणा गडावरची मोहीम ही तानाजी मालुसरे यांचा पराक्रमाने अजरामर झाली. शिवाजी महाराजांनी जेव्हा स्वराज्याची स्थापना करायचे ठरवले तेव्हा मिर्झाराजे जयसिंगबरोबर झालेल्या पुरंदरच्या तहात मात्र कोंढाण्याची मालकी मुघलांकडे गेली होती. शिवाजी महाराजांचा अतिशय आवडता असा भरभक्कम कोंढाणा तो पुन्हा काबीज करण्यासाठी ते फार आतुर होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना कोंढाणा फार महत्त्वाचा वाटत होता. शिवाजी महाराजांची ती इच्छा पूर्ण केली तानाजी मालुसरे यांनी. तानाजी हे महाराजांचे बालमित्र त्यांच्याहून चार वर्षांनी मोठे असे महापराक्रमी सुभेदार होते. कोंढाण्याच्या मोहिमेसाठी प्रत्यक्ष स्वतःच्या मुलाचे रायबाचे लग्न बाजूला ठेवून आधी मोहिमेला महत्त्व देणारे असे ते एकनिष्ठ मावळे

होते. कोंढाणा मोहीम तानाजी मालुसरे व शेलार मामा यांनी गाजवली. त्यांनी गडावर वेढा टाकून बसलेल्या उदयभानसिंग राठोड आणि त्याच्या फौजेला गारद करून टाकले. पण या मोहिमेत तानाजी मालुसऱ्यांना मात्र मरण आले. कोंढाणा पुन्हा स्वराज्यात आला, पण जिवाभावाचा सवंगडी आणि एक शूर सरदार मात्र कायमचा गमावला त्याचे हयातभर स्मरण राहावे म्हणून शिवाजी महाराजांनी कोंढाण्याचे नवीन नामकरण केले. ज्या गडावर त्यांचा तानाजी सिंहासारखा लढला आणि धारातिर्थी पडला त्यांनी जिंकलेला गड सिंहगड अशी शिवाजी महाराजांनी घोषणा केली.

एके दिवशी रायगडावर वाराणसी तीर्थस्थानाचे आचार्य गागाभट्ट शिवाजी महाराजांच्या भेटीस आले. शिवाजी महाराजांनी त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले. रायगडावर साधुसंत बैरागी आचार्य ब्राह्मण यांसह सर्व जातीधर्माच्या लोकांना कायमच खूप आदरपूर्वक वागवले जाई. त्यांचा विशेष मान असे. गागाभट्ट यांनी शिवाजी महाराजांना एक अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, शिवाजीराजे तुम्ही पुरुषोत्तम आहात. तुम्ही प्राप्त केलेले वैभव आम्ही पाहिले आहे. साऱ्या जगाला त्याविषयी आदर आहे. तुमचे नाव घेताच मुघल चळाचळा कापतात. तुम्ही परिपूर्ण राज्य स्थापन केले आहे, त्याविषयी आम्हाला परम संतोष आहे. आज तुमच्या मराठेशाहीत सारे काही आहे. फक्त एकाच गोष्टीची उणीव आहे तेवढी पूर्ण करा. ती गोष्ट म्हणजे राज सिंहासन. आज समस्त आर्यावर्तात हिंदूंचे एकही राजपीठ नाही. एकही सिंहासन नाही. आज उत्तरेत आपली देवस्थाने नष्ट होत आहेत. देवदेवतांच्या विटंबना चालू आहेत. औरंगजेब आणि त्याचे मोगल सरदार यांनी अधर्माचे काम हाती घेतले आहे. हिंदूंना कैद करून त्यांचे धर्मांतर केले जात आहे. हे असेच चालू राहिले तर आपला हिंदू धर्म आपली देवभूमी नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. आपल्या हिंदू धर्माचे संरक्षण करणे हे केवळ तुमच्या हाती आहे. कारण तुम्ही तेवढे सामर्थ्यशाली आहात. मी केवळ याच कामासाठी तुमच्या भेटीस आलो आहे. तुम्ही सिंहासनाधीश्वर व्हा. छत्रपती व्हा. धर्मरक्षक व्हा. हिंदवी स्वराज्याचे संरक्षण करा, असे माझे तुम्हाला विनंतीपूर्वक सांगणे आहे. आणि गागाभट्ट यांनी ०६ जून १६७४ या शुभ दिवशी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा

रायगडावर मांडला. रायगड हे हिंदवी स्वराज्याची राजधानी झाली. गागाभट्टांनी मंत्रघोष केला. अवघ्या मराठी मुलखात आनंद आणि चैतन्य पसरले. शिवाजी महाराजांची पत्नी सोयराबाई आणि संभाजी राजे या दोघांचाही विधीपूर्वक राज्याभिषेक करण्यात आला. शिवाजी महाराजांचे सल्लागार सेवक जे अगदी प्रथमपासून त्यांच्यासोबत होते आणि ज्यांनी प्रत्येक मोहिमेत मोलाची भूमिका बजावली होती, त्या आठ सेवकांचे अष्टप्रधान मंडळ अधिकृत करण्यात आले. शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हे आठ दिशांचे प्रतिनिधित्व करणारे होते. त्यात पूर्वेला मोरोपंत पिंगळे, पश्चिमेकडे रामचंद्र नीलकंठ पंडित, उत्तरेला रघुनाथ पंडितराव, दक्षिणेस हंबीरराव मोहिते या प्रमुख दिशांबरोबरच अण्णाजी दत्तो पंडित आग्नेय, जनार्दन पंडित नैऋत्य, दत्तात्रय आणि बालाजी पंडित ईशान्य हे मंत्री होते. या प्रत्येक मंत्र्याला स्वतंत्र विभाग आणि कामकाजाची जबाबदारी सोपवण्यात आली.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे केवळ एक राजाचा सन्मान नव्हता, ही एका पर्वाची नांदी होती. एक नवी सुरुवात होती. वयाच्या केवळ सतराव्या वर्षी राज्य स्थापनेची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवाजी महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला, तेव्हा ते ४४ वर्षांचे झाले होते. जी गोष्ट पूर्वीच करणे त्यांना अगदी सहज शक्य होते, तिचा विचाराही न करता त्यांनी आधी राज्याच्या उभारणीकडे लक्ष दिले. मराठ्यांचे हिंदवी स्वराज्य उभारले. राज्याभिषेकाच्या निमित्ताने त्याची फक्त अधिकृत घोषणा झाली. आधी पाया आणि मगच कळस असाच तो प्रवास होता. पण शिवराज्याभिषेकाचा आनंद अगदी अल्पकाळ टिकला. राज्याभिषेकानंतर अवघ्या बाराव्या दिवशी मांसाहेब जिजाऊंचे निधन झाले. स्वराज्यावर शोककळा पसरली. ज्या माऊलीने स्वराज्याच्या स्थापनेसाठी आपले सगळे ऐश्वर्य व वैभव त्यागून महाराष्ट्राच्या मातीला शिवबा दिला ती माऊली अनंताच्या प्रवासाला निघून गेली. अवघा मराठी मुलुख शोकसागरात बुडाला.

राज्याभिषेक समारंभानंतर शिवाजी महाराजांनी पुन्हा वऱ्हाड, खानदेश या मोगल इलाख्यात चढाया केल्या (१६७४-७५). महाराजांनी जंजिऱ्याचे सिद्दी आणि मुंबईकर इंग्रज यांवर दडपण आणले आणि कारवारकडचा विजापूरच्या

अधिपत्याखालील प्रदेश घेण्याची योजना आखली. विजापूरचा मुख्य प्रधान सिद्दी खवासखान आणि पठाण सेनापती बहलोलखान यांत तेढ होती आणि पठाणांचे पारडे जड होऊन दोन तट पडले. याचा फायदा घ्यावा म्हणून शांततेच्या तहाचे प्रलोभन दाखवून महाराजांनी मोगल सुभेदार बहादूरखान याला निष्प्रभ केले. विजापुरावर आक्रमण केले. या स्वारीत कारवार, अंकोला, सुपे ही स्थळे घेऊन अंकोल्यापर्यंत आपली हद्द कायम केली.

राज्याभिषेक झाल्यानंतरची सहा वर्षे महाराजांसाठी अतिशय संघर्षमय आणि वेदनादायी अशीच होती. औरंगजेबाने राजांचे स्वराज्य बेचिराख करण्याचा विडाच उचलला होता. स्वराज्याच्या कारभारात संभाजीराजे जातीने लक्ष देऊ लागले होते ही आनंदाची बाब होती. हिंदवी स्वराज्याचे युवराज म्हणून राज्याभिषेक झाल्यानंतर संभाजीराजांच्या मोहिमा वाढू लागल्या. त्यांनी अनेक मोहिमांत अतुल्य पराक्रम गाजवून सर्वांची मनं जिंकून घेतली. शिवाजी महाराजांना आपल्या मुलाच्या शौर्याचे विलक्षण कौतुक वाटे. पण संभाजीराजांच्या मनातील कुठलीतरी मोठी खंत त्यांच्या नजरेतून सुटली नव्हती. सावत्र आई सोयराबाईच्या दुष्ट वागणुकीमुळे संभाजीराजे पराकोटीचे संवेदनशील व एकाकी झाले होते. संभाजीराजे अनेक मोहिमा जिंकत चालले होते. हिंदवी स्वराज्याचे भावी छत्रपती म्हणून लोक त्यांच्याकडे आदराने पाहत होते. दरबारातील अनाजी पंत हे कटकारस्थान करून संभाजीराजांना बदनाम करत होते. त्यांना संभाजीराजांचा कारभार अजिबात पसंत नव्हता आणि त्यांच्या पुढील कारस्थानांना संभाजीराजे एकसारखे सुरुंग लावण्याचे काम करत होते. शिवाय अनाजी पंत हे सोयराबाईंच्या खास मर्जीतले होते. सोयराबाई आणि संभाजी या मायलेकांमधील दुरावा वाढत चालला होता. सोयराबाईंचा मुलगा राजाराम खूप लहान होता. तो सतत आपल्या दादाबरोबर म्हणजेच संभाजीराजांबरोबर असे. त्यामुळेही सोयराबाई खूप अस्वस्थ होत्या. एकूणच कौटुंबिक पातळीवर अशांतता आणि तणाव यांनी टोक गाठले होते. अनेक कारणांनी शिवाजी महाराज आणि संभाजीराजे यांच्यातील दुरावा वाढत चालला होता. शिवाजी महाराज पुरते खचून गेले. मात्र, अशाही अवस्थेत संभाजीराजांनी कौटुंबिक घटनांकडे दुर्लक्ष करत आपल्या वडिलांनी उभारलेल्या स्वराज्याची

सीमा वाढवत सुशासन स्थापण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

असेच दिवस जात राहिले शिवाजी महाराज वयाच्या पन्नाशीत प्रवेशकर्ते झाले होते. आयुष्यभर सातत्याने मोहिमा केलेल्या शिवाजी महाराजांची प्रकृती खूप खालावली होती. सन १६८० सालचा ३ एप्रिलचा दिवस उजाडला. रयतेच्या राजाने अखेरचा श्वास घेतला. अवघा मराठा मुलुख आक्रोशात बुडाला. महाराज निघाले, आपले महाराज चालले, सह्याद्रीचे महाराज चालले, स्वराज्यातील मुला-बाळांचे, भावा-भावजयांचे, पशुपक्ष्यांचे सर्वांचे लाडके महाराज निघाले. रायगड दुःखाने काळवंडला. अवघ्या ५० व्या वर्षी आमचे महाराज चालले. कोणाच्याही मुखातून शब्द फुटेना. महाराज मात्र शांत होते, ते आता सर्वांचा अखेरचा निरोप घेत होते. दुःखाचा एकदम टचका उडाला. सर्वांच्या डोळ्यातून गंगा-यमुना दाटल्या. महाराज मृत्यूचे बोट धरून शांतपणे निघून गेले आणि पाच दशके महाराष्ट्राच्या पठारावर आणि सह्याद्रीच्या छाताडावर कोरलेले शिवभारत संपले आणि शब्दही...!

V



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

- इ. स. ३१ मे १७२५ ते इ. स. १३ ऑगस्ट १७९५ -

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतातील माळव्याच्या तत्त्वज्ञानी माहाराणी म्हणून ओळखल्या जातात. मल्हारराव होळकरांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधारे अहिल्याबाईंनी इ. स. १७६६ ते इ. स. १७९५ पर्यंत माळव्यावर राज्य केले होते.**

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी ( मल्हारपीठ ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. तत्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्या-वाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. इतिहासकारांच्या संशोधनानुसार ८ वर्षांच्या अहिल्यादेवींना मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला आपला मुलगा खंडेराव याची वधू करून आणले. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ. स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या

''कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारिट'' असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हटले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वांत महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढंच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरणदेखील पूर्ण क्षमतेने आपल्या राज्यात राबवले. आपल्या राज्यातील प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना विकसित करून सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे मंदीर गझनीच्या महंमदाने उद्ध्वस्त केलेले बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोम नाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देत असतात. अहिल्यादेवी होळकरांना प्रजेसाठी कल्याणकारी असे कार्य करण्याची आवड होती.

इ.स. १७६५ मध्ये एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. या पत्रात ते लिहितात की, ''चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांच्या शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करताना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा.'' पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने अहिल्यादेवी होळकरांना विरोध केला होता त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा

दत्तक पुत्र) यास सैन्याचा सेनापती करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच तत्पर असत. त्यांच्या राज्याची राजधानी ही नर्मदा तीरावर असलेल्या महेश्वर येथे होती. तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू राहावी म्हणून अनेक दान दिले. माळव्याबाहेरही त्यांनी अनेक मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळाही बांधल्या.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस समाजातील वंचित घटक व शेतकरी यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्य कारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे त्यांचे जीवनचरित्र अभ्यासताना निदर्शनास येते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या / रयतेच्या काळजीपोटी अनेक सुधारक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून, सन १९९६ मध्ये इंदूर शहरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष कार्य करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुख यांना दिला होता. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच त्यांच्या नावाने

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर महाराष्ट्रात आहे.

ज्या काळी दळणवळणाची साधने अत्यंत तुटपुंजी होती तेव्हा अहिल्याबाई होळकर यांनी भारतातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे तसेच धर्मशाळा, तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे त्यांच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला कामही मिळवून देण्याचा प्रयत्न अहिल्यादेवी होळकर यांनी केला. स्त्री-पुरुष समानतेसाठीही अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान दुर्लक्षून चालणार नाही. सैन्यामध्ये महिला सैनिकांची स्वतंत्र तुकडी उभारत अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळीला आपल्या राज्यकारभारातून चालना दिली. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून त्यांनी मुक्त केले. शेतकऱ्यांना पशुपालनाचे महत्त्व पटवून देत शेतकरी व तरुणांना उद्यमशील बनविण्यास त्यांनी प्राधान्य दिले.

अहिल्यादेवी होळकरांची लोककल्याणाची ख्यातकीर्त ऐकून अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर तेथेच स्थायिक होत असत. अनेक विषयाच्या विद्वानांना त्यांनी राजाश्रय दिला. अनेक ग्रंथांची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा त्यांनी निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे प्रगत कार्यही अहिल्यादेवी होळकर यांनी केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्य कारभारापूर्वीची सामाजिक परिस्थिती स्त्रियांसाठी फारच जाचक होती. या काळात सती जाण्याची मोठी रुढी व परंपरा होती. अहिल्यादेवी होळकर यांनी रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाही, असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. चोर, दरोडेखोर तसेच लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशू व गायी, म्हशी आणि शेतजमिनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले; त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान

न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबण्याचे धारिष्ट्यही अहिल्यादेवी होळकर यांनी दाखविले. अहिल्यादेवी होळकरांच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित झाले होते.

पुण्यसंचयाची अनंत कामे करत असतानाच अहिल्यादेवी होळकर यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसांतच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. यातच त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे आपला देह ठेवला तो कायमसाठीच!

V



चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर



# चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर

- इ. स. ३ डिसेंबर १७७६ ते इ. स. २८ ऑक्टोबर १८११ -

**चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर यांना जसवंतराव होळकर म्हणूनही ओळखले जाते. ते मराठा महासंघाच्या होळकर घराण्यातील इंदूरचे महाराज होते. एक हुशार लष्करी नेतृत्वासोबतच लेखाशास्त्रात निपुण व फारसी, मराठी आणि उर्दू भाषेवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. मात्र, इतिहासकारांनी या असामान्य राजाच्या कार्यकर्तृत्व व पराक्रमावर अपेक्षित प्रकाशझोत न टाकल्याने अनेकांना या महान राजाविषयी अतिशय त्रोटक माहिती आहे. मराठी मुलुखात आपल्या कर्तृत्वाची गाथा लिहिणाऱ्या व इंग्रजी राजवटीला आपल्या हयातीत अखेरपर्यंत झुंजवत ठेवणाऱ्या एका महान राजाची ही गोष्ट आहे.**

१९ व्या शतकापर्यंत भारतातील अनेक राजामहाराजांनी तैनाती फौजेसह ब्रिटिश साम्राज्याची निरंकुश सत्ता स्वीकारली होती. सततच्या लढायांमुळे व कुटुंबांतर्गत संघर्षामुळे मुघल खूपच कमकुवत झाले होते. इतर संस्थानिकांतही हीच परिस्थिती जवळपास होती. पेशवेही यास अपवाद नव्हते. एकट्याने इंग्रजांना तोंड देणे सर्वांच्याच सामर्थ्य व शक्तीपलीकडील झाले होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार भारतीय राजांशी सर्व प्रकारची प्रलोभने देऊन करार करत त्यांना आपल्या अंकित करत होते. ते शांततेची चर्चा करत असत आणि संपूर्ण राज्य बळकावत असत. त्या काळात इंदूरचा एक तरुण महाराज पुढे येतो, राजांना इंग्रजांविरुद्ध एकत्र करू लागतो. त्या राजाचे नाव होते यशवंतराव होळकर. महाराजा यशवंतरावांना इंग्रजांची युक्ती चांगलीच समजली होती.

जेव्हा बहुतेक राजे ईस्ट इंडिया कंपनीला बळी पडले तेव्हा यशवंतरावांनी एकट्याने ब्रिटिश राजवट उलथून टाकण्याचा निर्णय घेतला. इंग्रजांनी जेव्हा पराभवाची चव चाखली तेव्हा त्यांना समजले की यावेळी त्यांच्यासमोर कोणी सामान्य राजा नाही. भारतातील ब्रिटिश राजवटीच्या इतिहासात असे फार कमी राजे होते ज्यांच्यापुढे इंग्रजांना संधी मिळाली नाही. महाराजा यशवंतराव हे त्यापैकीच एक. महाराजा यशवंतराव होळकर हे एकमेव राजे होते ज्यांच्याशी इंग्रजांनी समान अटींवर शांतता करार केला. तह होऊनही इंग्रजांना हटवण्याचा इरादा त्यांनी सोडला नाही. कोलकत्यावर हल्ला करण्यासाठी एक लाख सैनिकांची फौज उभी केली होती. तथापि, अकाली मृत्यूने भारतातून एक असा राजा हिरावून घेतला गेला ज्याने भारताला कदाचित खूप पूर्वी गुलामगिरीच्या साखळीतून मुक्त केले असते. इतिहासकार त्यांना भारताचा नेपोलियन म्हणतात.

१८ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात इंदूर राज्यात बरीच उलथापालथ झाली. त्यावेळी तुकोजीराव होळकरांची राजवट होती. पण दबदबा होता तो चार पुत्रांपैकी दुसरे मल्हारराव होळकर यांचा. तुकोजीरावांचे ज्येष्ठ पुत्र काशीराव होळकर हे उत्तराधिकारी असले तरी त्यांच्या क्षमतेवर शंका घेणारेही कमी नव्हते. राज्याचे भवितव्य डोळ्यासमोर ठेवून मल्हाररावांनी गादीसाठी दावा मांडला. धाकटे भाऊ- यशवंतराव आणि विठोजीराव यांनी साथ दिली. मल्हाररावांची लोकप्रियता वाढत होती. धोका ओळखून काशीरावांनी शिंदे राजघराण्याकडे मदत मागितली. तोपर्यंत होळकर आणि सिंधिया यांचे अजिबात पटत नव्हते. दौलतराव शिंदे यांनी मल्हाररावांना अचानक मारले. त्यांची गरोदर पत्नी जिजाबाई आणि यशवंतरावांची कन्या भीमाबाई होळकर यांना कैद करण्यात आले. जेव्हा पेशवा बाजीराव द्वितीय यांचे मंत्री नाना फडणवीस यांनी शिंदेंच्या या कृत्याला उघडपणे विरोध केला, तेव्हा त्यांनाही तुरुंगवास भोगावा लागला. यशवंतरावांनी राघोजी दुसरे भोसले यांच्याकडे नागपुरात आश्रय घेतला. शिंदेंना सुगावा लागल्यावर त्यांनी राघोजींना यशवंतरावांना अटक करण्यास सांगितले. राघोजींनी तेच केले आणि २० फेब्रुवारी १७९८ रोजी यशवंतरावांना आश्रय देणाऱ्या व्यक्तीने त्यांना कैद केले. भवानी शंकर खत्रीच्या मदतीने यशवंतराव ६ एप्रिल १७९८ रोजी नागपुरातून निसटले. अनेक छेडछाड पाहिल्यानंतर

यशवंतरावांचा पुन्हा कोणावरही विश्वास बसला नाही.

इंदूरमध्ये यशवंतराव होळकरांची छावणी मजबूत होत होती. डिसेंबर १७९८ मध्ये त्याने महेश्वर काबीज केले आणि पुढच्याच महिन्यात राज्याभिषेक झाला. इथे विठोजीराव होळकरांनी पेशवाईसाठी अमृतरावांशी पैज लावली. विठोजीराव म्हणाले की अमृतराव हा दुसरा बाजीरावापेक्षा चांगला पेशवा ठरेल. एप्रिल १८०१ मध्ये बाजीरावांनी विठोजीरावांना अटक करून पुण्यात हजर केले. हत्तीच्या पायाखाली चिरडण्याची शिक्षा सुनावली गेली. त्या वेळी अनेकांनी पेशव्यांना सांगितले की, असे करू नका, अन्यथा मराठा साम्राज्याचे विघटन होईल. पेशव्यांना ते मान्य नव्हते. जेव्हा यशवंतराव होळकरांना हे सर्व कळले तेव्हा त्यांनी आपल्या भावाच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली.

बदल्याच्या आगीत होरपळून निघालेल्या यशवंतरावांनी सर्वप्रथम शिंदेंची राजधानी उज्जैनवर हल्ला केला. उज्जैनचे सुमारे तीन हजार सैनिक मारले गेले. शिंदे राजघराण्याचा दारुण पराभव झाला. होळकरांचे पुढचे लक्ष्य पेशवे होते. मे १८०२ मध्ये होळकर पुण्याला निघून गेले. सेंधवा, मालेगाव, अहमदनगर, बारामती... एक एक करून छोटी-छोटी संस्थानं जिंकत गेली. पुण्याची लढाई दिवाळीच्या दिवशी झाली. हडपसरमध्ये शिंदे आणि पेशव्याचे सैन्य एका बाजूला आणि यशवंतराव होळकरांचे सैन्य दुसऱ्या बाजूला होते. होळकरांनी सैन्याला शत्रूने २५ गोळे फेकल्याशिवाय हल्ला न करण्याचा आदेश दिला. २५ गोळ्यांचा मारा करताच हल्ल्याचे संकेत मिळाले. शिंदे आणि पेशवे यांची संयुक्त फौजही होळकरांच्या हुशारीसमोर टिकू शकली नाही.

पेशव्यांना कळताच ते पुण्याहून पळून गेले. इंग्रजांना पेशव्यांना मदत करणे धोरणात्मकदृष्ट्या योग्य वाटले. कारण यशवंतरावांचे पुढील लक्ष्य एकतर ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील प्रदेश असते किंवा हैदराबादचा निजाम असता. डिसेंबर १८०२ मध्ये पेशव्यांनी इंग्रजांशी तह केला. पण पुणे हे होळकरांचे राज्य होते. यशवंतरावांनी अमृतरावांना पेशवे म्हणून नेमले. इंग्रजांनी मे १८०३ मध्ये पुन्हा बाजीराव दुसरा पेशवा बनवला, पण लवकरच बाजीरावाला समजले की तो आता नाममात्र पेशवा आहे. ऑगस्ट १८०३ मध्ये अमृतरावांनी पेशवाईवरील हक्क सोडला. बांदा येथे वार्षिक ७ लाख रुपये पेन्शन आणि एक

जहागिरी मिळवण्यासाठी त्यांनी इंग्रजांशी हातमिळवणी करण्याचे मान्य केले. पेशवा बाजीराव द्वितीय यांचे जे झाले, तेच इंग्रज इतर राज्यातही करत होते. यशवंतराव होळकरांना त्यांची ही युक्ती समजत होती. इंग्रजांविरुद्ध एकजुटीने लढण्यासाठी त्यांनी अनेक राजांना पत्र लिहिले. पण बहुतेक राजांनी इंग्रजांशी आधीच तह केले होते.

एप्रिल १८०४ मध्ये यशवंतरावांचे असेच एक पत्र ब्रिटिश जनरल जॉर्ज वेलस्ली यांच्या हाती आले. वेलस्लीने लढाईचे बिगुल वाजवण्यात उशीर केला नाही पण यशवंतराव होळकरांशी स्पर्धा करणे सोपे नाही हे लवकरच समजले. कर्नल मॅन्सन, कर्नल फॉसेट... जून १८०४ ते सप्टेंबर १८०४ पर्यंत होळकरांनी इंग्रजांविरुद्ध अनेक लढाया जिंकल्या. ऑक्टोबर १८०४ मध्ये होळकरांनी दिल्लीकडे कूच केली. दिल्लीवर मुघल सम्राट शाह आलम दुसरा याचे राज्य होते, ज्याला मराठ्यांप्रमाणेच इंग्रजांनीही पांगवले होते. शाह आलमने इंग्रजी सैन्याच्या मदतीसाठी सैन्य पाठवले तेव्हा यशवंतरावांनी युद्ध पुढे ढकलले. पण त्यांचे शौर्य पाहून मुघल बादशहाने यशवंतरावांना महाराजाधिराज राजेश्वर अलीजा बहादूर ही पदवी दिली.

यशवंतरावांचे सैन्य आता राजस्थानकडे निघाले. डीग येथे पराभूत मेजर फ्रेझरच्या सैन्याने आणि भरतपूरचे जाट राजा रणजित सिंह यांनी यशवंतरावांचे मोकळेपणाने स्वागत केले. यशवंतराव होळकर आणि रणजितसिंह यांनी हातमिळवणी केली आणि इंग्रजांना तोंड देण्यासाठी सज्ज झाले. पुढील दीड महिना अशी लढाई होणार होती ज्याची तुलना कवींनी महाभारताच्या युद्धाशी केली आहे. इंग्रजांनी जानेवारी १८०५ मध्ये हल्ला केला पण येथून त्यांना चोख प्रत्युत्तर मिळाले. इंग्रजांनी चार वेळा प्रयत्न केले पण होळकर आणि सिंह यांच्या सैन्याने त्यांचा पाठलाग केला. तथापि, एप्रिल १८०५ मध्ये रणजितसिंहने ब्रिटिशांची ऑफर स्वीकारली. परिणामी यशवंतरावांना भरतपूर सोडावे लागले.


महाराजा यशवंतराव होळकरांना रोखणे त्यांच्यासाठी खूप अवघड आहे हे लंडनमध्ये बसलेल्या ब्रिटिश सरकारला समजले. अशा परिस्थितीत लॉर्ड वेलस्लीच्या जागी लॉर्ड कॉर्नवॉलिसला गव्हर्नर जनरल म्हणून पाठवण्यात आले. त्याने आल्याबरोबर लष्करी सेनापती लॉर्ड लेक यांना पत्र लिहिले की

यशवंतराव होळकरांचे संपूर्ण संस्थान त्यांना परत करावे, ते शांतता प्रस्थापित करण्यास तयार आहेत. समान अटींवर करार करण्यासाठी ब्रिटिशांनी भारतीय राजाशी संपर्क साधण्याची ही पहिली आणि कदाचित एकमेव वेळ होती. तरीही यशवंतरावांनी इंग्रजांशी तह करण्यास नकार दिला. लॉर्ड कॉर्नवॉलिसच्या आकस्मिक मृत्यूनंतर आलेल्या जॉर्ज बार्लोचाही असा विश्वास होता की शिंदे-होळकर एकत्र राहणे इंग्रजांसाठी चांगले नाही. नोव्हेंबर १८०५ मध्ये दौलतराव सिंधिया यांच्याशी ब्रिटिशांनी तह केला तेव्हा यशवंतराव एकटे पडले.

लॉर्ड लेकला यशवंतराव होळकरांशी कोणत्याही प्रकारे तह करण्यास सांगितले होते. ब्रिटिशांनी बिनशर्त शांतता कराराचा प्रस्ताव ठेवला. बाकीचे राजे आपल्यात सामील होण्यास तयार नाहीत हे महाराजा यशवंतरावांच्या लक्षात आले, म्हणून त्यांनी तह मान्य केला. २४ डिसेंबर १८०५ रोजी या करारावर स्वाक्षरी झाली. इंग्रजांनी महाराजा यशवंतराव होळकर यांना सार्वभौम राजा म्हणून मान्यता दिली आणि त्यांची सर्व मालमत्ता परत केली.

तह होऊनही यशवंतराव मराठा राज्याच्या एकत्रीकरणाच्या प्रयत्नात राहिले. याविषयी त्यांनी दौलतराव शिंदे यांना पत्रही लिहिले, पण शिंदे यांनी इंग्रजांना ते सांगितले. अखेर महाराजांनी एकट्याने इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याचा निर्णय घेतला. ते स्वतः भानपुरा येथे राहून तोफा तयार करण्याचे काम करू लागले. रात्रंदिवस काम चालू होते. २०० हून अधिक तोफा आणि एक लाख सैनिक कोलकत्याकडे कूच करण्यासाठी सज्ज होते. पण कामाचा ताण आणि पुतण्यांच्या आकस्मिक मृत्यूने महाराजा यशवंतराव होळकरांना मोठा धक्का बसला. २८ ऑक्टोबर १८११ रोजी त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३५ वर्षे होते.

V



क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे



# क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे

- इ. स. १४ नोव्हेंबर १७९४ ते इ. स. १७ फेब्रुवारी १८८१ -

**मुघलांच्या जाचातून मराठी रयतेला मुक्त करण्यासाठी छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करत शक्तिशाली मुघलशाही उलथवून टाकली. त्याच धर्तीवर आता जुलमी इंग्रजी राजवट उलथवून टाकण्यासाठी घराघरात शिवबा निर्माण व्हावा आणि गोऱ्या इंग्रजी माकडांना भारत भूमीवरून हद्दपार करावे, या एकाच ध्यासाने प्रेरित होऊन क्रांतीशाळेच्या माध्यमातून अनेक महान क्रांतिकारक घडविणाऱ्यांत क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे सशस्त्र क्रांतीच्या यशस्वीतेतील योगदान अनन्यसाधारण आहे.**

लहुजी वस्ताद यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदरगडाच्या पायथ्याला असलेल्या पेठ या गावी साळवे कुटुंबात झाला. साळवे कुटुंब पहिल्यापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात समर्पित राहिले. दांडपट्टा, तलवार, कुऱ्हाड चालवण्यात या कुटुंबातील लोक तरबेज होते. शत्रूच्या छावणीत गुप्त बातम्या काढणे आणि शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवून गनिमी कावा पद्धतीने शत्रू सैन्यावर तुटून पडण्याचे साहस साळवे कुटुंबातील लोकांकडे होते. साळवे कुटुंबाच्या शौर्याचा उचित सन्मान म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना राऊत ही पदवी बहाल करत पुरंदर गडाच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली होती. तेव्हापासूनच साळवे कुटुंब पुरंदरच्या देखभाल व संरक्षण कार्यात तनमनधनाने काम करीत होते. अशा शूरांच्या घरात लहुजी वस्तादांनी युद्धनितीचे धडे गिरविले. लहुजी वस्तादांचा जन्म झाला तेव्हा पुरंदर गडाची जबाबदारी त्यांचे वडील राघोजी साळवे यांच्याकडे होती.

यादरम्यान सत्ता मात्र बाजीराव पेशवे (दुसरे) यांच्याकडे होती.

पुरंदर किल्ल्याला इतिहासामध्ये मिर्झाराजे जयसिंग यांच्याबरोबर झालेल्या तहाचा आणि स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज (शंभूराजे) यांच्या जन्माचाही इतिहास असल्याने साळवे कुटुंबीयांच्या दृष्टीने पुरंदर गडाचे रक्षण अणि अभेद्यता या दोन्ही गोष्टी फार जिव्हाळ्याच्या होत्या. दरम्यान, पेशवे आणि होळकर युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. दुसऱ्या बाजीरावाच्या ही गोष्ट जिव्हारी लागली. होळकरांचा पराभव करण्यासाठी त्याने इंग्रजांशी तह करत त्यांची मदत घेतली आणि होळकरांवर चाल करून पुणे आपल्या ताब्यात पुन्हा घेतले. पण, या तहाच्या माध्यमातून इंग्रजांनी मराठ्यांच्या सत्तेत प्रवेश करत पेशवाई केवळ नावालाच ठेवली आणि सर्वाधिकार स्वतःकडे घेतले.

छत्रपतींनी महाराष्ट्राच्या मातीला स्वाभिमान शिकवला होता. त्यामुळे इंग्रजांचे सत्तापदावर आरूढ होणे मराठी रयतेला मान्य नव्हते. राघोजी साळवे यांनाही या प्रकाराने अस्वस्थ केले होते. कोण कुठले इंग्रज आता आपल्यावर सत्ता गाजवणार का, या एकाच प्रश्नाने त्यांच्या अंतरंगात बंडांची आग प्रज्वलित केली होती. मराठी सत्तेत इंग्रजांचा वाढता हस्तक्षेप आणि मराठी रयतेला गुलाम करू पाहण्याची त्यांची मानसिकता एव्हाना पेशव्यांच्याही लक्षात आली होती. त्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांविरुद्ध युद्ध करण्याचे निश्चित केले. यादरम्यानच, राघोजी साळवे यांनी एका वाघाला जिवंत पकडून गावात आणले होते. त्यांचे हे शौर्य पाहून पेशवेही चकित झाले. सन १८१२ मध्ये त्यांनी राघोजी साळवे यांच्या शौर्याची दखल घेत त्यांना पुण्यास बोलावून घेतले व शिकारखाना सांभाळण्याची जबाबदारी दिली.

साळवे कुटुंब युद्धकौशल्यात निपुण असल्याने लहुजी वस्तादांना सर्व लष्करी प्रशिक्षण घरातूनच मिळाले होते. विविध शस्त्रास्त्रे चालविण्यात ते पारंगत झाले होते. पिळदार शरीरयष्टीमुळे लालमातीतल्या कुस्तीत ते भल्याभल्या पैलवानांना आस्मान दाखवत होते. अवघ्या पुणे परगण्यात त्यांच्या तोडीचा मल्ल त्याकाळी शोधूनही सापडत नव्हता. त्यावेळी साळवे कुटुंब जानाईच्या मळ्यात वास्तव्यास होते. पेशवाईत इंग्रजांची चाललेली ढवळाढवळ आणि त्यांचा मराठी सत्तेतील वाढता हस्तक्षेप मराठी रयतेच्या असंतोषात भर घालत होता.

इंग्रजांशी आता निर्णायक युद्ध पुकारत त्यांना मराठी मुलखातून घालवून द्यावे, यासाठी पेशव्यांकडून जय्यत तयारी सुरू होती. इंग्रजांचा पाडाव करण्यासाठी पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने सैन्याची जमवाजमव करण्यात येत होती. याचवेळी पेशव्यांनी सैनिकांना आवश्यक शस्त्रास्त्रे पुरविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी राघोजीं साळवेंच्या खांद्यावर सोपविली. बंदूक चालविण्यातही राघोजी साळवे निष्णात असल्याने बंदूकधारी सैनिकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. राघोजींनी लहुजींच्या मदतीने ही जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण केली. ब्रिटिशांविरोधात लढाईसाठी सैन्याची जुळवाजुळव सुरूच होती. पण अपेक्षित संख्या गाठता येत नव्हती. त्यामुळे राघोजी साळवेंनी मांग, रामोशी व इतर मागास जातीतील हजारो तरुणांना पेशव्यांच्या सैन्यात समाविष्ट करून घेतले.

इंग्रजांचा पाडाव करत मराठी भूमी परकियांपासून मुक्त करायची, या एकाच ध्येयाने मराठी रयत पेटून उठली होती. अखेर ५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकी परिसरात इंग्रज व पेशवे समोरासमोर आले. तुंबळ लढाईला सुरुवात झाली. पेशव्यांच्या सैन्याचा मारा जोरदार होता, त्यामुळे युद्धाच्या पहिल्या चरणात पेशव्यांची सरशी होणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण, बेरकी इंग्रजांनी सावध चाल खेळत युद्धाच्या मध्यान्हानंतर नव्या दमाची फौज रणांगणात उतरवली आणि पेशव्यांवर निसटता विजय मिळविला. या लढाईच्या साधारणतः १२ व्या दिवशी इंग्रजांविरुद्ध लढताना राघोजी साळवेन वीरमरण आले. राघोजींचा रक्ताळलेला देह घोड्यावरून कोसळताना लहुजींनी पाहिला. पहाडासारखा बाप धारातीर्थी पडलेला होता, पण त्याचा इंग्रजांनी एवढा धसका घेतला की त्यांचे सैन्य राघोजी मृत्यू पावल्यानंतरही त्यांना तलवारी आणि बंदुकीच्या दस्त्याने मारत होते. तरण्याबांड लहुजीला हे पाहवले नाही. शत्रूच्या हल्ल्यातून बापाला बाहेर काढण्यात ते यशस्वी झाले खरे. पण, तोपर्यंत खूपच उशीर झाला होता. राघोजी साळवेंचा या युद्धात मृत्यू झाला होता.

खडकीच्या लढाईत पेशव्यांचा पराभव झाला होता. पेशवाईचा सूर्य मावळतीकडे झुकला होता. शनिवारवाड्यावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकू लागला होता. ज्या दिमाखात मराठा साम्राज्याचा भगवा झेंडा शनिवारवाड्यावर

दिमाखात फडकत होता, तेथे आता इंग्रजांचा युनियन जॅक डौलत होता. हे दुःख लहुजींना कमालीचे अस्वस्थ करून गेले. ते विचारचक्रात बुडाले. माझ्या मातीवर इंग्रजांचा हुकूम मी चालू देणार नाही. भलेही त्यासाठी मला युद्ध पुकारावे लागले तरी बेहत्तर. पण आता यापुढील काळात जगेल तर देशासाठी व मरेल तर देशासाठीच. माझे जगणे मरणे इंग्रजांच्या पाडावासाठीच समर्पित अशी प्रतिज्ञाच लहुजींनी केली.

इंग्रजांचा पाडाव करायचा असेल आणि त्यांच्या येथील हुकमतीला नामोहरम करायचे असेल, तर मराठी तरुणांच्या मनगटात बळ आणि मनात क्रांतीचे रणशिंग फुंकले पाहिजे, या विचाराने प्रेरित झालेल्या लहुजी वस्तादांनी सन १८२२ मध्ये पुण्याच्या गंजपेठेत तालीम सुरू केली. ही तालीमच देशातील पहिली क्रांतिशाळा ठरली, जिथे अनेक क्रांतिकारकांनी युद्धनितीचे आणि सशस्त्र बंडांचे धडे लहुजी वस्तादांच्या मार्गदर्शनाखाली गिरवले. लहुजी वस्तादांच्या तालमीचे उद्घाटन हे सरदार रास्ते यांनी केले. लहुजींनी तलवार, दांडपट्टा व बंदुका चालविण्याचे महत्त्वपूर्ण प्रशिक्षण मराठी तरुणांना देण्यास सुरुवात केली. अनेक तरुण लहुजींच्या तालमीत प्रशिक्षणासाठी दाखल झाले. त्यांचा वस्ताद म्हणून नावलौकिक वाढू लागला. मन-मेंदू- मनगटाने मजबूत असलेली एक पिढीच लहुजी वस्तादांनी या दरम्यान इंग्रजांच्या विरोधात उभी केली. त्यांच्यात देशभक्ती जागवली. काही काळानंतर ठराविक तरुणांचे संघटन उभारत त्यांनी ब्रिटिशांविरोधात सशस्त्र बंड पुकारण्याचे ठरविले आणि प्रत्यक्ष बंड सुरू केले. लहुजी वस्तादांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी मराठी तरुणांकडून इंग्रजांविरोधात उघडपणे बंड होऊ लागले.

लहुजी वस्ताद यांच्या बरोबरीनेच तत्कालीन परिस्थितीत उमाजी नाईक यांचेही बंड मराठी मुलुखात सुरू होते. उमाजी व लहुजी हे एकाच भागातील आणि गाव-शीव एकच असलेले लढवय्ये क्रांतिकारक होते. एकदा उमाजींनी एका दरोड्यासाठी काही पट्ट्यांची मागणी लहुजी वस्ताद यांच्याकडे केली. पण लहुजी वस्ताद यांनी, तुम्ही इंग्रजांविरोधात लढत असाल, तर आम्ही तुम्हाला हवी तेवढी शस्त्रे उपलब्ध करून देऊ असे सांगत त्यांना नकार दिला. यादरम्यानच लहुजी वस्ताद यांनी उमाजी नाईक यांना सांगितले होते की, आपण

या मुलखाचे राजे व्हावे आम्ही तुम्हाला सोबत करू. पुढे त्यानुसार उमाजींनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारत प्रतिसरकारची स्थापनाही केली. पण फंदफितुरीमुळे त्यांना इंग्रजांनी पकडले. त्यांच्या सुटकेसाठी लहुजी वस्ताद यांनीही भरपूर प्रयत्न केले. परंतु, त्यात अपेक्षित यश आले नाही.

लहुजी वस्तादांची तालीम केवळ मनगटाला बळ देणारी नव्हती, तर त्या तालमीत देशरक्षणाचे धडे देणारी बुद्धिवंतांची कार्यशाळाही भरत होती. त्याकाळातील थोर बुद्धिजीवी महात्मा ज्योतीराव फुले यांनाही शारीरिक कसरतींसह स्वसंरक्षणाचे धडे लहुजी वस्तादांनी दिले होते. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यात लहुजी वस्ताद खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. बहुजनांच्या मुलांनी शिकले पाहिजे, शिकून मोठे होत राष्ट्रकार्यात स्वतःला समर्पित केले पाहिजे, यासाठी महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील गंजपेठेत १८५१ साली शाळा उघडण्यात आली. या कार्यात लहुजी वस्ताद सक्रिय होते. त्यांनी महात्मा फुलेंना सर्वतोपरी सहकार्य करत शिक्षणाचे महत्त्व तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महात्मा फुलेंना मदत केली.

लहुजींच्या तालमीत हजारो तरुण प्रशिक्षण घेत होते. स्वतःला राष्ट्रकार्यात सिद्ध आणि समर्पित करत होते. देशभर इंग्रजांविरोधात असंतोष पसरला होता. तो १८५७ च्या बंडाने चव्हाट्यावर आला. या बंडात लहुजींचे शेकडो सैनिक कामी आले. सातारच्या बंडातही लहुजींनी आपले अनेक सैनिक उतरविले होते. पुढे, तेही पकडले गेले आणि सातारच्या झेंडा मैदानावर फाशी गेले.

महात्मा फुले यांच्यानंतर भारतीय असंतोषाचे जनक असणाऱ्या लोकमान्य टिळकांनीही लहुजी वस्तादांच्या तालमीत शारीरिक संपदेसह देशरक्षणाचे धडे गिरविले. सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके हे तर वस्तादांचे जीव की प्राण होते. मराठी मुलुखाला स्वतंत्र करण्यासाठी लहुजी वस्तादांना त्यांच्या रूपाने कदाचित शेवटचा आशेचा किरण दिसत होता. लहुजी वस्तादांच्या मार्गदर्शन आणि साहायाने वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांविरोधात जोमाने बंडाला सुरुवात केली. इंग्रजांच्या अनेक छावण्या त्यांनी उद्ध्वस्त केल्या, खजिने लुटले. वासुदेव बळवंत फडक्यांच्या या पराक्रमाने लहुजी वस्ताद समाधानी होते, पण पुढे फडक्यांनाही इंग्रजांनी सन १८७९ मध्ये कैद केले आणि

त्यांच्याविरोधात खटला भरला आणि त्यांना संगमवाडीजवळच्या तुरुंगात ठेवले. लहुजी वस्तादांनी वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांच्या तावडीतून सोडविता यावे यासाठी संगमवाडी परिसरातच वास्तव्य करण्यास सुरुवात केली. पण इंग्रजांना वस्तादांच्या या हालचालीचा संशय आल्याने वासुदेव बळवंत फडके यांचा संगमवाडी तुरुंगातून मुक्काम हलवत तो एडनच्या कारागृहात हलविला. ही बातमी वस्तादांना समजली तेव्हा त्याना खूप वाईट वाटले.

आयुष्यभर इंग्रजांविरोधात दंड थोपटत मराठी मुलुखात इंग्रजांविरोधात नव्या दमाची सशक्त व सशस्त्र तरुण पिढी घडविणारे लहुजी वस्ताद एव्हाना थकले होते. वार्धक्याकडे झुकले होते. अखेर या महान क्रांतीगुरूने १७ फेब्रुवारी १८८१ रोजी भारतवर्षाचा निरोप घेतला. पण, त्यांच्या त्याग आणि समर्पणातून क्रांतीचे स्फूलिंग मराठी मनास स्फूर्ती देत राहिले. मनांमध्ये धगधगत राहिले. त्यातूनच सशस्त्र क्रांतीचे बंड सन १९४७ पर्यंत धगधगत राहिले.

V



क्रांतीसेनानी झाशीची राणी लक्ष्मीबाई



# क्रांतीसेनानी झाशीची राणी लक्ष्मीबाई

- इ. स. १९ नोव्हेंबर १८२८ ते इ. स. १८ जून १८५८ -

**साधनांच्या संक्रमणात आधुनिकतेचे वारे भारतभर वाहत आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात भारतीय स्त्री शिकलेली आहे आणि प्रत्येक क्षेत्रात आज ती पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत आहे. मात्र, असे असले तरी पूर्णपणे भारतीय स्त्रीला स्वातंत्र्य मिळालेले दिसत नाही. पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीचा पगडा आजही भारतीय समाजमनावर उमटलेला दिसून येतो. मात्र, स्वातंत्र्य संग्रामातील स्त्री सेनानींनी अशाही प्रतिकूल परिस्थितीत अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन करत इंग्रजी सत्तेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. त्यापैकीच एक म्हणजेच झाशीची राणी लक्ष्मीबाई.**

राणी लक्ष्मीबाई मूळच्या कोणत्याही राजघराण्यातील नव्हत्या. महाराष्ट्रातील पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला असणाऱ्या मोरोपंत तांबे यांची राणी लक्ष्मीबाई ही मुलगी होती. त्यांचे जन्म नाव मनकर्णिका होते. त्यांना मनू या नावानेच संबोधले जायचे. तांबे कुटुंब मूळचे भट्ट ते रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळून तालुक्यातील गुढे गावचे रहिवासी होते. सातारच्या धावडशी येथील ब्रम्हेंद्र स्वामींनी मोरोपंत तांबेंना सेवेत रुजू करून घेतले होते. मूळपुरुषाची समाधी मंदिराच्या परिसरात आहे. नंतर काही मंडळी दक्षिणेकडे गेली, कोट, कोलथे, खेडकुळी या भागात राहिली. तर कृष्णाजी, बळवंतराव, मोरोपंत आणि सदाशिव हे पुणे, काशी, बिठूर आणि झाशी येथे वास्तव्यास राहिले. तांबेंचे काही वंशच आजही नागपूर व सातारा या भागात आहेत. तांबेचा पानिपत युद्धातही सहभाग राहिला होता.

राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई तांबे यांच्या पोटी १९ नोव्हेंबर १८२८ रोजी उत्तर प्रदेशातील काशी येथे झाला. मनकर्णिका अर्थात मनूला मात्र मातृसुख फार काळ लाभले नाही. ती अवघ्या तीन ते चार वर्षांची असेल तेव्हाच भागीरथीबाई यांचे निधन झाले. त्यामुळे मनू नेहमी आपल्या वडिलांबरोबरच असे. नानासाहेब पेशवे, रावसाहेब पेशवे या दुसऱ्या बाजीरावांच्या दत्तक मुलांबरोबरच मनू ब्रह्मावर्त येथे वाढली. मोठे व पाणीदार डोळे असणारी ही मोहक कन्या दुसऱ्या बाजीरावांचीच नव्हे तर सर्वांचीच लाडकी होती. बाजीरावाने तिला स्वत:च्या मुलीसारखे वाढवून लिखाण-वाचनाबरोबरच युद्ध कौशल्याचेही शिक्षण दिले. एवढेच नव्हे तर ब्रह्मावर्तामधल्या कार्यशाळेतून, आखाड्यांमधून राणीने अश्वपरीक्षा, घोडेस्वारी, तलवारबाजी, बंदूक चालविणे, पिस्तुले, जांबीया चालवणे यांचेही प्रशिक्षण पूर्ण केले.

अश्वपरीक्षेचे सर्व मापदंड ज्ञात असणाऱ्या लक्ष्मीबाई घोडेस्वारीतही वाक्बगार होत्या. त्या काळी पूर्ण हिंदुस्थानात श्रीमंत नानासाहेब पेशवे, जयाजी शिंदे व झाशीची राणी या तिघांशिवाय कोणीही अचूक अश्वपरीक्षा करणारा नव्हता. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंनी युद्धशास्त्रातील प्रत्येक विद्येत प्रावीण्य मिळविले होते. बाजीरावांच्या पदरी बाळंभट देवधर नावाचे उत्तम कसरतपटू आणि कुस्तीगीर होते. त्यांनीच मल्लविद्येत पारंगत होण्यासाठी मल्लखांब नावाचा कसरतीचा वेगळा प्रकार शोधून काढला. मनाची एकाग्रता, विलक्षण चपळता, शरीराचा तोल सांभाळण्याचे पूर्ण कौशल्य, काटकपणा आणि चतुरस्र भान वृद्धिंगत करणाऱ्या मल्लखांब विद्येतही राणी लक्ष्मीबाई तरबेज झाल्या.

युद्ध कौशल्यासह राज्यकारभाराचे धडे गिरविणाऱ्या राणी लक्ष्मीबाईं यांचा विवाह १८४२ मध्ये झाला. पेशव्यांच्या वाड्यात बागडणारी मनू झाशीचे राजे गंगाधरराव यांची राणी लक्ष्मीबाई झाली. राणी पदाच्या कसोटीला लक्ष्मीबाई पूर्णपणाने उतरल्या. झाशीच्या रयतेमध्ये राणीबद्दल विशेष प्रेम निर्माण झाले. दरबाराचे कामकाज राणीने पाहणे गंगाधररावांस पसंत नसल्याने मिळालेल्या वेळेचा उपयोग लक्ष्मीबाईंनी स्वत्त्व जपण्यासाठी केला. त्यांनी आपला रोजचा व्यायाम, कसरत, घोडेस्वारी, तलवारबाजी नियमित सुरू ठेवली. एवढेच

नव्हे तर कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या सर्वसामान्य वर्गातील महिलांनाही तिने घोडेस्वारी, तलवारबाजीत पारंगत केले. या गोष्टीचा फायदा ब्रिटिशांनी सन १८५७-५८ झाशींवर केलेल्या हल्ल्याच्या वेळी झाला. घोडदळ-सैन्यातील महिलांचा वावर, दारूगोळ्याची ने-आण करणारी महिला, एवढेच नव्हे तर तोफगोळ्यांची मारा करणारी महिला पाहून सर ह्यूज रोज हा इंग्रजांचा सेनापती आश्चर्यचकित झाला होता.

राणी लक्ष्मीबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव असणाऱ्या समाजात एका विधवा राणीला दुर्लक्षित करू नये म्हणून त्यांनी धोरणीपणाने पुरुषी पोषाखात वावरण्याचे ठरवले. राज्य करण्यासाठी आपण समर्थ आहोत, हे सिद्ध करण्यासाठीच त्यांनी गंगाधररावांच्या निधनानंतर स्वत:च्या नावाची (उर्दू भाषेतील) मोहोर करून घेतली. त्या काळात उर्दूमध्ये मोहोर असणे याचा अन्वयार्थ सत्ताग्रहण आणि राजमान्यता असा होता.

राणी लक्ष्मीबाईच्या पोटी पुत्ररत्न जन्मल्याने संपूर्ण झाशी शहर आनंदीत होते. परंतु मुलगा तीन महिन्यांचा असतानाच मरण पावला. परिणामी मुलाच्या रूपाने वारस मिळाल्याच्या आनंदात असणारे गंगाधररावही या गोष्टीने दु:खी झाले. दत्तकपुत्र वारसा हक्कासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. वासुदेवराव नेवाळकर यांच्या मुलाला दत्तक घेऊन दामोदर असे नाव ठेवण्यात आले. पण दुर्दैवाने थोड्याच अवधीत साधारणत: १८५३ मध्ये गंगाधररावांचे निधन झाले.

झाशी संस्थानासोबत पूर्वीपासून ब्रिटिशांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. या संबंधांवरून राणी लक्ष्मीबाईंना दत्तक वारस नामंजूर असल्याचे कारण दुर्लक्षून कंपनी सरकार झाशी संस्थान खालसा करणार नाही, असे वाटत होते. त्यासाठी लक्ष्मीबाई स्वत: ईस्ट इंडिया कंपनीशी पत्रव्यवहार करत होत्या. या पत्रव्यवहारातून त्यांनी कंपनी सरकारचा अन्याय, बेकायदेशीरपणा आणि खोडसाळपणा उघड केला. एका पत्रात-झांशी संस्थान खालसा केले, तर पूर्ण हिंदुस्थानात लोकांना हळहळ वाटेल. परिणामी हिंदुस्थानातील लोकांना ब्रिटिशांबद्दल भरवसा, विश्वास वाटेल का, अशी शंका उपस्थित करून- ब्रिटिश सरकारला एक प्रकारचे आव्हानच राणी लक्ष्मीबाई यांनी दिले. कंपनी सरकारच्या बेजबाबदार, अनैतिक कृत्यांना, कंपनीच्या अधिकाराला आव्हान

देणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या देशातील पहिल्या काही व्यक्तींमधील एक होत्या. हे धारिष्ट्य दाखविल्यामुळेच त्यांना स्वातंत्र्यदेवता म्हटले गेले.

हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करण्याचा निर्णय गव्हर्नर जनरल डलहौसीने घेतलेलाच असल्याने झांशी संस्थानही खालसा करण्यात आले. १३ मार्च, १८५४ रोजी झाशीच्या जनतेला उद्देशून जाहीरनामा काढण्यात आला. त्यानुसार दत्तक विधान नामंजूर करून झाशी संस्थान ब्रिटिश सरकारांत विलीन करण्यात आले. त्या वेळीच स्वाभिमानी राणीने मेरी झांसी नही दूंगी, असे स्फूर्तिदायक उद्‌गार काढले. या उद्‌गाराने अखंड हिंदुस्थानात इंग्रजांविरोधात बंडांचा वणवा पेटला. झांशी खालसा झाल्यावर लक्ष्मीबाईंना किल्ला सोडून शहरातील राजवाड्यात राहायला यावे लागले. राणी लक्ष्मीबाईंना पदच्युत झाल्याचा अपमान सहन करीत काही काळ शांत बसावे लागले होते. अर्थातच ही शांतता वादळापूर्वीची होती.

सन १८५७ चा उठाव हा पूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याप्रमाणे ५ जून, १८५७ ला झांशीतही शिपायांचा उद्रेक झाला. केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून लावले. या परिस्थितीत इंग्रजांच्या परवानगीची वाट न पाहता राणी लक्ष्मीबाई किल्ल्यावर राहण्यास गेल्या. पुढे २२ जुलै, १८५७ ला ब्रिटिशांनी राणींना झाशीची अधिकार सूत्रे हाती घेण्यास सांगितले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या, परंतु अतिशय बिकट परिस्थितीत त्यांच्या हाती राज्य कारभार आला होता. मनुष्यबळ नव्हते आणि खजिनाही रिकामाच होता. प्रजेच्या मनात असुरक्षितता, भविष्याबद्दल भीती होती. परंतु तरीही लक्ष्मीबाईंनी खंबीरपणाने परिस्थिती हाताळली. जुन्या विश्वासातील लोकांना परत बोलावून त्यांना काही अधिकाराची पदे दिली. दिवाण लक्ष्मणरावांना प्रधानमंत्री, तर वडील मोरोपंत तांबे यांना खजिनदार केले. लक्ष्मणरावांचा भाऊ, मुलगा तसेच मुन्सफ, भोलानाथ आणि नामांकित दारूगोळा संचालक खुदाबक्ष यांना फौजेचे व शस्त्रास्त्रांच्या जोडणीचे काम दिले. बंडखोर ठाकूरांना धोरणीपणाने आपल्या बाजूस वळविले. राज्याच्या सल्लागार मंडळात सामील करून घेतले. ब्रिटिशांनी निकामी केलेल्या २२ तोफा पुन्हा सुरू करून तोफगोळ्यांची निर्मितीही त्यांनी सुरू केली. इंग्रजांविरुद्ध बंड करणाऱ्या विद्रोही शिपायांना आपल्या सैन्यात

सामील करून घेतले. परकीयांविरुद्ध लढण्याची तयारी करीत असतानाच राणींनी प्रजेचा स्वाभिमान, निष्ठा वाढवण्याचा व आनंद जपण्याचा प्रयत्न केला. दानशूर, श्रद्धाळू व दयाळू लक्ष्मीबाईंनी थंडीत कुडकुडणाऱ्या हजार-दीड हजार गरिबांना, साधू-संन्याशांना उबदार कपड्यांचे वाटप केले. स्वत:बरोबर प्रजेच्या श्रद्धा जपणाऱ्या राणीने गोहत्या बंदी सुरू केली. रंगपंचमीसारखा सण साजरा करून स्त्रियांसाठी हळदी-कुंकवासारखे धार्मिक कार्यक्रम किल्ल्यावर केले.

इंग्रजांविरुद्ध लढा द्यायचा असेल तर लोकमनात आपल्या राज्यकारभाराप्रती विश्वास निर्माण झाला पाहिजे, हे राणी लक्ष्मीबाई यांनी ओळखले होते. प्रशासन, सैन्य व जनहिताची कल्याणकारी कामे यांची चोख व्यवस्था लावून हे रयतेचे राज्य असल्याचा विश्वास राणी लक्ष्मीबाईंनी जनतेत निर्माण केला. प्रजेला मुक्त मनाने आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यासाठी, त्यांच्या कलेची जोपासना करण्यासाठी त्यांनी आवश्यक व यशस्वी प्रयत्न केले. त्यांनी झाशीमध्ये मराठी नाटकांचे प्रयोग घडवून आणले. मराठी भाषिकांसाठी रासक्रीडा, चित्रलेखा, बाणासूर इ. नाटके योजली. स्वत:ही नाटकांचा आनंद घेतला. एक स्थिर, सुरक्षित, समृद्ध व सुसंस्कृत राज्य घडवण्याचा प्रयत्न राणी लक्ष्मीबाईंनी केला. यामुळे राणी आणि झाशीतील प्रजा यांच्यातील नाते अधिक दृढ झाले. दरम्यान २१ मार्च, १८५८ ला सकाळीच सर ह्यू रोजच्या फौजा झाशीजवळ येऊन धडकल्या. त्याने राणींस नि:शस्त्र भेटीस यावे किंवा युद्धास तयार राहावे, असा निरोप पाठविला. ब्रिटिशांनी केलेल्या विश्वासघातामुळे, अन्यायामुळे 'भारतात विदेशी शासन नकोच अशा ठाम मताच्या राणींनी भेटीस जाण्याचे नाकारले. त्याच वेळी तात्या टोपे यांच्याशी संधान बांधून एका बाजूने इंग्रजांवर हल्ला करण्यास सुचविले.

एक बेरकी, मुत्सद्दी सेनानी आणि कर्तबगार राजकारणी असणाऱ्या ह्यू रोजने झाशीच्या किल्ल्यावर मारा करण्यासाठी आजूबाजूच्या टेकड्यांवर कब्जा मिळविला. त्या टेकड्यांवर तोफा चढवल्या. २-३ दिवस झाशीची बाजू अभेद्य होती. घनगर्ज भवानीशंकर, कडक बिजली या तोफा आपल्या नावाप्रमाणे कार्यरत होत्या. घौसखान याने तर तोफेमधून असा मारा केला, की त्यामुळे दोन शिवमंदिरे वाचली. या गोष्टीसाठी आजही झाशीतील लोक त्याला धन्यवाद

देतात. युद्धाच्या ९ व्या दिवशी इंग्रजांनी पश्चिमेकडील तोफ बंद पाडून त्या बाजूच्या तटाला खिंडारे पाडली. ही खिंडारे बुजवण्यासाठी रातोरात काम केले गेले. त्या वेळी चुना, दगड, विटा यांची ने - आण करण्याचे काम स्त्रियांनी केले होते हे विशेष. शेवटी ब्रिटिशांना फितुरांनीच साथ दिली. झांशीमधील शंकर किल्ल्यावरील मोठ्या विहिरीतून संपूर्ण झांशीला पाणी पुरवठा व्हायचा, ती विहीर आणि जिथे दारुगोळा तयार व्हायचा तो कारखाना, ही दोन ठिकाणे इंग्रजांनी उद्ध्वस्त केली. अशा स्थितीत राणींची आशा पेशव्यांकडून येणाऱ्या मदतीवर होती. त्याप्रमाणे ३१ मार्चला तात्या टोपेंचे सैन्य आले. परंतु, इंग्रजांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

राणी लक्ष्मीबाईंनी सर्व फौजेला धीर देताना स्वत:च्या बळावरच लढण्याचे आवाहन केले. एवढेच नाही तर रणांगणात तुम्हाला मृत्यू आला, तर तुमच्या विधवांच्या निर्वाहाची व्यवस्था मी करेन, असे आश्वासन दिले. राणीचे डावे-उजवे हात असणारे खुदाबक्ष आणि घौसखान इंग्रजांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडल्यावर मात्र बिकट परिस्थिती निर्माण झाली. ब्रिटिश सैन्य शिड्या लावून किल्ल्यात उतरले. शांत, सुंदर शहराची होणारी वाताहत पाहून राणी संतापल्या आणि त्यांनी प्रत्यक्ष रणांगणात उतरण्याचा निर्णय घेतला. संतापलेल्या राणीची तलवार अशी तळपत होती, की समोर येणारा गोरा शिपाई गारदच होत होता. त्यांचे धैर्य, शौर्य, आवेश पाहून ह्यू रोजही थबकला. तरीही एका अनुभवी सरदाराने पुढचा धोका लक्षात घेऊन लक्ष्मीबाईंना परत किल्ल्यावर नेले. सर्व सैन्य अधिकाऱ्यांशी लक्ष्मीबाईंनी चर्चा केली आणि निर्णयानुसार रातोरात त्यांनी झाशी सोडले. सतत ११ दिवस राणींनी ब्रिटिशांना झुलवत ठेवले. लढाईचा साक्षीदार ह्यूज रोजनेही म्हटले की राणी लक्ष्मीबाई सर्वोत्कृष्ट सैनिक आणि सर्वाधिक हिंमतवान व्यक्ती होती.

इंग्रजांसोबत झालेल्या या पराभवानंतर राणी पेशव्यांबरोबर ग्वाल्हेरला गेली. तेथेही स्वस्थ न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित चालू ठेवली. सैन्यांमध्ये फिरून, सैनिकांची चौकशी करीत, इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चेबांधणी करावी, याविषयी त्यांनी चर्चा केली. याच वेळी १८ जूनला (१८५८) सकाळीच ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ येऊन पोहोचला. त्याने त्वरित हल्ला चढवला. लक्ष्मीबाईंनी

रणांगणात धाव घेतली. लक्ष्मीबाई तलवारीचे सपसप वार करीत समोर येणाऱ्या ब्रिटिश सैन्याला कापून काढत होत्या. आवेगाने, विजेसारख्या तळपणाऱ्या राणींकडे पाहून त्यांचे सैन्यही त्वेषाने लढले. इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणारच होते, त्याच वेळी नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली. दोन्हीकडून आलेल्या सैन्यासमोर राणींचा निभाव लागला नाही. परिस्थिती ओळखून त्या काही घोडेस्वारांनिशी बाहेर पडल्या. थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा घोडा अडला. नेहमीचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. परिणामी मागून आलेल्या सैन्याने राणींना जखमी केले. त्यांच्या डाव्या कुशीतही तलवार घुसली आणि एका शूर राणीला रणांगणात वीरमरण आले. विजेसारखेच त्यांचे आयुष्य कडकडाट करून, दिव्यत्वाचा लख्ख प्रकाश देऊन गेले.

अवघ्या २७ वर्षांच्या या निर्भय, पराक्रमी, तेजस्वी, प्रत्यक्ष भवानीचे रूप असणाऱ्या लक्ष्मीबाईंनी इंग्रजांच्या मनात धास्ती निर्माण केली होती. ब्रिटिशांनी राणींचा उल्लेख हिंदुस्थानची जोन ऑफ आर्क असा केला. क्रांतिकारकांची स्फूर्तिदेवता ठरलेल्या या राणीवर अनेक काव्य, पोवाडे रचले गेले. राणी लक्ष्मीबाईंच्या ग्वाल्हेर येथील समाधिस्थानावर १९६२ मध्ये त्यांचा अश्वारूढ पुतळा स्थापन करण्यात आला. ते समाधिस्थान पाहिल्यानंतर कविवर्य भा. रा. तांबे यांना पुढील यथार्थ ओळी सुचल्या.

**रे हिंद बांधवा, थांब या स्थळी। अश्रू दोन ढाळी।।**
**ती पराक्रमाची ज्योत मावळे । इथे झांशीवाली।।**

झाशीच्या राणीने स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची आठवण ठेवूनच नेताजी सुभाषचंद्रांनी १९४३ च्या ऑक्टोबरमध्ये सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेच्या स्त्री शाखेल राणी झाशी रेजिमेंट असे नाव दिले. वेदकालीन पंचकन्यांइतक्याच श्रेष्ठ असणाऱ्या या राणीच्या मृत्यूवर प्रत्यक्ष शत्रूनेही हळहळ व्यक्त केली. अवघ्या २७ वर्षांच्या आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर मोठ-मोठ्या संकटांचा सामना राणी लक्ष्मीबाईंना करावा लागला. परंतु कोणत्याही संकटापासून माघारी फिरणे त्यांना माहीत नव्हते.

V



सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके



# सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके

- इ. स. ४ नोव्हेंबर १८४५ ते इ. स. १७ फेब्रुवारी १८८३ -

**स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात अवघ्या आयुष्याची समिधा वाहणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाला स्मरल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास लिहिला जाऊच शकत नाही. जुलमी ब्रिटिश सत्तेला उलथवून टाकण्यासाठी भारतभूमीवर सशस्त्र क्रांतीचा शंखनाद जर कुणी केला असेल तर तो वासुदेव बळवंत फडके यांनी. भारतभूमी ही इथल्या भूमिपुत्रांची आहे आणि या भूमीवर सन्मानाने जगण्याचा हक्क आम्हाला आहे, असे छातीठोकपणे सांगणाऱ्या वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिश साम्राज्याला महाराष्ट्रातून हादरे देण्याचे धाडसी कार्य आरंभले. त्या कार्याला शब्दरूप देण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न...**

वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा अनंतराव फडके हे कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यामधील हा किल्ला होता आणि त्यांनी अनंतराव फडके यांना किल्लेदार केलेलं होतं. फडके घराणे हे कोकणातील रत्नागिरीतील केळशी या गावचे मूळ रहिवासी होय. या गावापासून जवळच पनवेल तालुक्यात कर्नाळा किल्ला आहे. त्याठिकाणी फडके कुटुंबीय स्थायिक झाले. अनंतराव फडके यांचे चिरंजीव बळवंत फडके हे तेथे किल्लेदार म्हणून काम करत होते. सन १८१८ मध्ये इंग्रजासोबत त्यांची लढाई झाली. तीन दिवस चाललेल्या या लढाईत बळवंत फडके अतिशय निकराने लढले. परंतु या लढाईत इंग्रजांचा विजय झाला. यानंतर फडके कुटुंबीय कर्नाळा किल्ल्यापासून जवळच असलेल्या शिरढोण या गावात आले. येथील वास्तव्य काळात बळवंत

फडके यांच्या पोटी ४ नोव्हेंबर १८४५ रोजी एक पुत्ररत्न जन्माला आले, त्यांचेच नाव वासुदेव बळवंत फडके. ज्यांना आपण सशस्त्र क्रांतीचे जनक म्हणून संबोधतो.

वासुदेव बळवंत फडके यांचे बालपण शिरढोण या गावीच गेले. लहानपणीच फडक्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले. शालेय शिक्षण त्यांनी शिरढोणमध्येच पूर्ण केले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना कल्याण व पुणे गाठावे लागले. शिक्षणानंतर त्यांनी रेल्वेत नोकरी केली. इंग्रज अधिकाऱ्याची अपमानास्पद वागणूक फडके यांना पटत नव्हती. मान व डोळे खाली झुकवून इंग्रज अधिकाऱ्यांशी बोलण्याचा एक प्रघात तेव्हा होता. वासुदेव फडके यांना ही गोष्ट रुचली नाही. अशा स्वरूपाची वागणूक म्हणजे आपल्याच देशात आपल्याला परके म्हणून वास्तव्य करावे लागण्याची अगतिकता आहे, याची त्यांना जाणीव झाली. या मानसिक अस्वस्थेतूनच फडके यांनी रेल्वेची नोकरी सोडली. नंतर त्यांनी ग्रँड मेडिकल कॉलेज येथे नोकरी पत्करली. तिथेही याचीच पुनरावृत्ती झाली व फडके यांनी ही नोकरीही सोडली. पुढे मुंबई येथे सैन्यदलाच्या लेखा विभागात फडके यांनी नोकरी करण्यास सुरुवात केली. यादरम्यान त्यांची बदली पुण्याला झाली. त्यानंतर ते पुण्यात स्थायिक सदाशिव पेठेत स्थायिक झाले.

पुणे ही छत्रपतींच्या पराक्रमाची आणि संत महात्म्यांची प्रगत विचारांची भूमी असल्याने वासुदेव बळवंत फडके यांचा याठिकाणी कालौघात वैचारिक विकास झाला. महादेव गोविंद रानडे यांच्या वैचारिकतेचा वासुदेव बळवंत फडके यांच्यावर प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे असल्याचे त्यांच्या लक्षात आले अगदी याचवेळी फडके हे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्याही प्रभावात आले. लहुजी साळवे यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सामील करून घेणे महत्त्वाचे असल्याचे वासुदेव बळवंत फडके यांना पटवून दिले. पुण्यातील जनाईच्या मळ्यातच लहुजी वस्ताद यांची तालीम होती. नोकरीहून सुटल्यावर फडके तेथे जात व युद्ध कौशल्याचे धडे लहुजी वस्ताद यांच्या मार्गदर्शनाखाली गिरवत.

अंथरुणाला खिळलेल्या आपल्या आईला भेटण्यासाठी फडके यांनी आपल्या वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्याकडे रजा मागितली असता इंग्रज अधिकाऱ्याने टाळाटाळ केली आईचे निधन झाल्यावरही रजा दिली नाही. सावडणे, दिवस, महिना, वर्षश्राद्धालाही वासुदेव बळवंत फडके यांना रजा नाकारण्यात आली. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या वासुदेव बळवंत फडके यांनी इंग्रज प्रशासनातील नोकरीला लाथ मारली व त्यानंतर ब्रिटिश सरकारच्या धोरणांविरुद्ध जाहीरपणाने भाषणे देण्यास सुरुवात केली. सन १८७० च्या दशकात पडलेल्या दुष्काळाकडे ब्रिटिश सरकारने केलेले दुर्लक्ष पाहून त्यांनी स्वतः दुष्काळग्रस्त भागात जाऊन तेथील लोकांना मदत केली व त्याच वेळी सरकार उलथवून देण्याची भाषा करण्यासही सुरुवात केली.

वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांतिकार्याला इ.स. १८७९ नंतर सुरुवात झाली. ब्रिटिश राजवट उलथवून टाकायची असेल तर त्यासाठी मोठी चळवळ उभारावी लागेल आणि त्यासाठी आर्थिक बाजू भक्कम असणे गरजेचे असल्याचे फडके यांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी दौलतराव नाईक यांच्या मदतीने लोणीजवळ धामारी गावावर पहिला दरोडा टाकला. या दरोड्यात त्यांना फक्त ३००० रुपये मिळाले. २५ ते २७ फेब्रुवारी १८७९ या कालावधीत त्यांनी लोणी व खेड या गावांवर दरोडा टाकून सशस्त्र क्रांतीसाठी एक चांगला ऐवज जमविला. त्यानंतर दि. ५ मार्च १८७९ रोजी जेजुरीजवळ वाल्हे गावावर वासुदेव फडके यांनी दरोडा टाकला. या लुटीत त्यांना चार बंदुका, ३०० रुपये व १०० रुपयांचे कापड मिळाले. पुणे परिसरात घातलेल्या दरोड्यामधून फडके यांनी आवश्यक साधने व पैसा जमविला होता आणि यानंतर त्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याची तयारी सुरू केली.

सशस्त्र क्रांतीच्या पहिल्या चरणात वासुदेव बळवंत फडके यांनी सुरुवातीला पुणे, मुंबई व इतर शहरातील सुशिक्षित व धनाढ्य लोकांकडे मदतीची मागणी केली; परंतु त्याला अपेक्षित प्रतिसाद मात्र मिळाला नाही. वासुदेव बळवंत फडके हे दत्त उपासक होते. तसेच स्वरचित दत्तस्तोत्र हे वासुदेव बळवंत फडके यांनी लिहिले. दत्तोपासक असलेले वासुदेव बळवंत फडके स्वामी समर्थ महाराजांचे निस्सीम भक्त म्हणून परिचित होते. अक्कलकोटला स्वामी समर्थ

आणि वासुदेव बळवंत फडके यांची भेट झाली. वासुदेव बळवंत फडके यांनी स्वामी महाराजांसमोर आपली तलवार ठेवली. आपली कार्ययोजना आणि मनोदय त्यांनी स्वामी समर्थांना कथन केला. स्वामी महाराजांच्या हातून तलवार मिळावी व आपल्या महत्त्वाकांक्षी देशकार्यास आशीर्वाद मिळावा, अशी वासुदेव बळवंत फडके यांची इच्छा होती. स्वामी समर्थ त्रिकालद्रष्टे असल्याने ते फडक्यांना म्हणाले की, ''आम्ही जाणतो आहोत, तुम्ही एक चांगले कार्य हाती घेतले आहे. पण, ही वेळ प्रतिकूल आहे. आपण योग्यवेळी याबाबत विचार करावा.'' असे सांगत एका सेवेकऱ्याला समोर ठेवलेली तलवार नेऊन झाडावर टांगून ठेवण्यास सांगितले. मात्र, हाती घेतलेले देशसेवेचे कार्य फडके यांना स्वस्थ बसू देणारे नव्हते. वासुदेव बळवंतांनी ती तलवार घेतली. स्वामींना दंडवत घातले आणि पुढील प्रवासाला निघून गेले.

वासुदेव बळवंत फडके हे सम्यकवादी विचारांचे क्रांतिकारक होते. त्यांनी महाराष्ट्रातील मागासलेल्या जातींमधील तरुणांची एकजूट साधत त्यांनी राष्ट्रकार्यात ब्रिटिशांविरोधात एक संघटित शक्ती उभारली. मातंग, रामोशी, कोळी, धनगर आणि इतर अनेक समाजातील तरुणांना विविध शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देऊन आपल्या सैन्यात भरती करून घेतले. शेकडो सैनिकांसह त्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध अधिकृतरीत्या युद्धाचे रणशिंग फुंकले. पुण्याच्या शिरूर आणि खेड तालुक्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकून सैन्यासाठी आवश्यक रसद वासुदेव बळवंत फडके यांनी उभारली. पुणे हे ब्रिटिशांचे प्रशासकीय केंद्र होते. त्यामुळे थेट पुण्यावर हल्ला करून महाराष्ट्रातील ब्रिटिश हुकमतीला सुरुंग लावण्याचा विचार फडक्यांनी केला आणि थेट पुण्यावर चाल केली. या प्रयत्नात प्रारंभी त्यांना यशही आले. काही दिवसांकरता त्यांनी पुणे शहरावर कब्जा मिळवला. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला चढवून इंग्रज सरकारचे लक्ष विचलित करण्याच्या त्यांच्या युद्ध चालीला अपेक्षित यश मिळाले नाही आणि चिडलेल्या इंग्रज सरकारने भारतातील हा पहिला सशस्त्र उठाव चिरडण्याचा चंग बांधला.

घानूर गावाजवळ झालेल्या लढाईनंतर भारतीयांमध्ये मतभेद निर्माण करण्यासाठी ब्रिटिश सरकारने वासुदेव बळवंत फडके यांना पकडून देण्याबद्दल

४००० रुपयांचे इनाम जाहीर केले. याला प्रत्युत्तर म्हणून फडक्यांनीही मुंबईच्या गव्हर्नरला पकडून देणाऱ्यास ५००० रुपयांचे इनाम जाहीर केले. घानूरच्या लढाईनंतर फडके अरब व रोहिल्यांकडून मदत मिळवण्यासाठी हैदराबाद संस्थानात गेले. तेथील निजामाच्या सेवेत असलेल्या अब्दुल हक आणि मेजर हेन्री विल्यम डॅनियेल या अधिकाऱ्यांनी फडक्यांचा पिच्छा पुरवला आणि त्यांना परत महाराष्ट्रात जाण्यास भाग पाडले.

वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांची जुलमी सत्ताच मान्य नव्हती. ब्रिटिश सत्तेविरोधात यांनी बंड पुकारत सशस्त्र संघटन उभारले. त्यांची ही लढाई साधीसुधी नसून, ब्रिटिश साम्राज्याला सुरुंग लावणारी आहे, हे बेरकी इंग्रजांनी अचूक हेरले. त्यांच्या या बंडखोरीविरुद्ध ब्रिटिशांनी त्यांच्यावर ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्ध पुकारणे, लोकांच्या मनात ब्रिटिश सत्तेविरुद्ध अपप्रचार करून अप्रीती निर्माण करणे, दारूगोळा व शस्त्रे संकलित करून सरकार विरोधात संघटित शक्ती उभारणे, श्रीमंत वर्गाची लुटालूट करणे, असे चार आरोप ठेवले.

दि. २३ जुलै १८७९ रोजी विजापूरजवळील देवर नावडगी या गावाच्या बाहेर एका बौद्ध विहारामध्ये गाढ झोपेत असताना ब्रिटिशांनी वासुदेव बळवंत फडके यांना अटक केली. तेथून त्यांना पुण्याच्या तुरुंगात डांबण्यात आले. फडक्यांविरोधात ब्रिटिश सरकारने खटला चालवला. ब्रिटिशांची दहशत असल्याने पुण्यातील एकाही वकिलाने वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र घेतले नाही. पण, सार्वजनिक काकांनी (गणेश वासुदेव जोशी) त्यांचे वकीलपत्र घेण्याचे धारिष्ट्य दाखवत त्यांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. उच्च न्यायालयात त्यांच्या बचावाचे काम महादेव चिमाजी आपटे यांनी केले. फाशीची शिक्षा टळून त्यांना आजीवन कारावास व तडीपारीची शिक्षा कोर्टाने ठोठावली. त्यानंतर वासुदेव बळवंत फडके यांना येमेन देशातील एडन येथील तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडक्यांनी एके दिवशी आपल्या कोठडीचे दार बिजागऱ्यांसकट उचकटून काढून तुरुंगातून पळ काढला. काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांना परत पकडले व पुन्हा तुरुंगात टाकले.

वासुदेव बळवंत फडके हे स्वतः एक उत्तम योद्धे होते. पाठीच्या बाजूने

उलटी भिंत चढून जायचे. कित्येक मैल अंतर न थकता पळत जायचे. भर पुरात उडी मारायचे. तुटक्या कड्यावरूनही उड्या मारत पोबारा करण्याचे कौशल्य लहुजी वस्ताद यांच्या तालमीत फडक्यांना मिळाले होते. त्यामुळे त्यांचे शरीर अतिशय काटक, पीळदार व बलदंड झाले होते. येमेन देशातील एडन येथील तुरुंगात वासुदेव बळवंत फडके यांचा तेथील तुरुंग अधिकाऱ्यांनी अतोनात छळ केला. याविरुद्ध वासुदेव बळवंत फडक्यांनी आमरण उपोषण केले. भारत भूमीपासून हजारो मैल दूर, अगदी जिथे कुणालाही कळणार नाही, अशा अज्ञात ठिकाणी एका देहाला अखेरची घरघर लागली होती. शरीर तळमळत होते व तेजस्वी डोळे मिटू लागले होते. अखेर त्या दूर देशीच्या भयंकर कारागृहात वासुदेव बळवंत फडके यांच्या आत्म्याने शरीर सोडले ते कायमचे! पण, हा आत्मा लौकिक अर्थाने अनंतात वगैरे विलीन होणार नव्हता. कारण, या आत्म्याने भयंकर प्रतिज्ञा केली होती- ''मी मरून जाईन, पण या दुष्ट, चांडाळ, प्रजाभक्षक इंग्रजांना मेल्यानंतरही शांतता लाभू देणार नाही.'' तेच खरे झाले. तो या महान आत्म्याच्या मुक्तीचा दिवस होता, दि. १७ फेब्रुवारी १८८३.

V



स्वामी विवेकानंद



# स्वामी विवेकानंद

- इ. स. १२ जानेवारी १८६३ ते इ. स. ४ जुलै १९०२ -

ज्ञान आणि अध्यात्माची शिकवण देत समस्त तरुण पिढीला शाश्वत जीवन पद्धतीचा मापदंड घालून देणारे स्वामी विवेकानंद हे हिंदू संन्यासी आणि भारतातील सर्वात प्रसिद्ध आध्यात्मिक गुरूंपैकी एक होते. स्वामी विवेकानंद हे केवळ आध्यात्मिक मनोवृत्तीचे निर्मोही आध्यात्मिक गुरू होते असे नाही, तर ते एक प्रगल्भ विचारवंत, उत्तम व संयत वक्ते आणि उत्कट देशभक्त होते. त्यांनी त्यांचे गुरू, रामकृष्ण परमहंस यांचे मुक्त-विचार तत्त्वज्ञान पुढे नेत त्याचा प्रचार-प्रसार केला. विवेकानंदांनी सामाजिक उत्थानासाठी, गरीब आणि गरजूंच्या सेवेसाठी अथक परिश्रम केले, आपले सर्वस्व देशासाठी समर्पित केले. हिंदू अध्यात्मवादाच्या पुनरुज्जीवनासाठी ते जबाबदार होते आणि जागतिक स्तरावर हिंदू धर्माला एक सुसंस्कृत व सहिष्णू धर्म म्हणून स्थापित केले. त्यांचा वैश्विक बंधुता आणि आत्म-जागरणाचा संदेश विशेषत: सध्याच्या जगभरातील व्यापक अस्वस्थ वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत प्रासंगिक ठरतो. त्यांचे विचार विशेषत: देशातील तरुणांसाठी आत्म-सुधारणेचा एक ध्येयवादी पथ बनला आहे. यामुळेच त्यांचा १२ जानेवारी हा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो.

स्वामी विवेकानंदांचे बालपणीचे नाव नरेंद्रनाथ दत्त होते. कलकत्ता येथील एका सुखी व संपन्न बंगाली कुटुंबात मकर संक्रांतीच्या दिवशी म्हणजे १२ जानेवारी १८६३ रोजी त्यांचा जन्म झाला. ते विश्वनाथ दत्ता आणि भुवनेश्वरी देवी यांच्या आठ मुलांपैकी एक होते. त्यांचे वडील पेशाने वकील आणि

समाजातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विवेकानंदांची आई भुवनेश्वरी देवी या आध्यात्मिक वृत्तीच्या महिला होत्या. त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक संस्कारांचा त्यांच्या मुलांवर खूप प्रभाव पडला. रामायण व महाभारत यासारख्या महान ग्रंथांसह संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांमधील घटना व गोष्टी त्यांनी आपल्या मुलांना सांगितल्या.

घरातील आध्यात्मिक व आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या सुखनैव वातावरणात स्वामी विवेकानंद यांचे बालपण मजेशीर गेले. स्वामी विवेकानंद यांचे वडील हे एक प्रतिष्ठित वकील असल्याने घरात सगळी सुबत्ता होती. त्यावेळी सार्वजनिक परिवहन व्यवस्था प्रगत झालेली नव्हती. टांग्यातून प्रवास करणे हा तालेवार लोकांचा शिरस्ता होता. स्वामी विवेकानंद यांच्या वडिलांना घरापासून कोर्टापर्यंत घेऊन जाण्यासाठी एक टांगेवाला येत असे. तो फार रुबाबदार होता. त्याचा पेहराव आणि एकूणच देहबोली एखाद्या महनीय पुरुषासारखी होती. स्वामी विवेकानंद यांना त्याचे फार कौतुक वाटे. तो येत असला की स्वामी आपल्या घराच्या खिडकीतून त्याची गंमत पाहत असत. एक दिवस ते आईला म्हणाले, ''आई, एकदिवस मीपण असाच टांगेवाला होणार आणि टांग्यामधून सगळीकडे ऐटीत फिरणार.'' यावर आई भुवनेश्वरी छोट्या नरेंद्रला म्हणाल्या. ''बाळ नरेंद्र, टांगेवाला झाला तरी काही हरकत नाही. पण श्रीकृष्णासारखा सारथी हो आणि जगाला प्रभोधीत कर.'' आईचा हा आशीर्वाद लागू पडला आणि स्वामी विवेकानंद यांची एक महान संत होण्याची वाट तेथूनच सुरू झाली.

सन १८७१ मध्ये वयाच्या ८ व्या वर्षी विवेकानंदांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या संस्थेत व नंतर कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांना विदेशी तत्त्वज्ञान, ख्रिश्चन धर्म आणि विज्ञान यांचा परिचय झाला. त्यांना वाद्य आणि गायनात विशेष रुची होती. याशिवाय त्यांना मैदानी खेळांमध्ये जसे की, जिम्नॅस्टिक, कुस्ती आणि शरीरसौष्ठव यांमध्ये आवड होती. स्थितप्रज्ञ विद्यार्थी म्हणून नावलौकिक असलेल्या स्वामी विवेकानंद यांना वाचनाचीही आवड होती आणि पदवीचे शिक्षण पूर्ण करत असताना त्यांनी विविध विषयांचे विपुल ज्ञान मिळविले होते. एकीकडे त्याने भगवद्गीता

आणि उपनिषद यांसारखी हिंदू धर्मग्रंथ वाचले तर दुसरीकडे डेव्हिड ह्यूम, हर्बर्ट स्पेन्सर इत्यादींच्या विदेशी तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक परंपरांचाही संकीर्ण अभ्यास केला. स्वामी विवेकानंद यांचे वाचन विशाल होते. मोठमोठी पुस्तके ते एकबसल्या वाचून काढत असत. एकदा ग्रंथपालाला संशय आला की हा मुलगा आज घेतलेले पुस्तक दुसऱ्या दिवशी परत करतो. हा खरेच वाचन करत असेल का? त्यांनी स्वामी विवेकानंद यांची परीक्षा घेण्याचे ठरविले व त्यांना पुस्तकातील माहितीबद्दल विचारले तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी त्या पुस्तकातील पान क्रमांक व त्यावरील माहिती जशीच्या तशी सांगितली. इतके प्रगल्भ आणि अचूक वाचन स्वामी विवेकानंद करत असत.

स्वामी विवेकानंद एका धार्मिक कुटुंबात वाढले होते, परंतु विविध धार्मिक ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला असल्यामुळे ते अज्ञेयवादावर विश्वास ठेवू लागले होते. पण तरीही देवाच्या वर्चस्वाची वस्तुस्थिती ते पूर्णपणे नाकारू शकत नव्हते. सन १८८० मध्ये ते केशवचंद्र सेन यांच्या नवविधानात सामील झाले आणि केशवचंद्र सेन आणि देवेंद्रनाथ टागोर यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मो समाजाचे एक साधारण सदस्य झाले.

ब्राह्मो समाजाने मूर्तीपूजेच्या विपरीत एक देव ओळखला होता. या समाजात कार्यमग्न असताना विवेकानंदांच्या मनात अनेक प्रश्न घोळत होते. या अवस्थेत त्यांनी रामकृष्ण परमहंस यांच्याबद्दल स्कॉटिश चर्च कॉलेजचे प्राचार्य विल्यम हॅस्टी यांच्याकडून ऐकले होते. ते शेवटी श्री रामकृष्ण परमहंसांना दक्षिणेश्वर काली मंदिरात भेटण्यासाठी गेले. परंतु पहिल्या भेटीत त्यांची रामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट होऊ शकली नाही.

अखेर तिसऱ्या - चौथ्या वेळी त्यांची रामकृष्ण परमहंस यांच्यासोबत भेट झाली. आणि विवेकानंदांनी त्यांना प्रश्न विचारला, ''तुम्ही देव पाहिला आहे का?'' जे त्याने अनेक आध्यात्मिक नेत्यांना विचारले होते पण ते समाधानी नव्हते. पण जेव्हा त्यांनी रामकृष्णांना विचारले तेव्हा त्यांनी इतके सोपे उत्तर दिले की ''होय, माझ्याकडे आहे. मी तुम्हाला जितके स्पष्टपणे पाहतो तितकेच मला देव दिसतो, फक्त खूप खोल अर्थाने'' यानंतर विवेकानंदांनी दक्षिणेश्वराला भेट देण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या मनात असलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे

त्यांना मिळाली.

स्वामी विवेकानंदांच्या वडिलांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. स्वामी विवेकानंद रामकृष्ण परमहंस यांच्याकडे गेले आणि त्यांना आपल्या कुटुंबासाठी प्रार्थना करण्यास सांगितले. परंतु, रामकृष्ण परमहंस यांनी त्यास नकार दिला आणि विवेकानंदांना देवी कालीसमोर प्रार्थना करण्यास सांगितले. ते संपत्ती किंवा पैसा मागू शकत नव्हते म्हणून त्याऐवजी त्यांनी विवेक आणि एकांत मागितला. त्या दिवशी त्यांना आध्यात्मिक जागृती मिळाली आणि तेथूनच त्यांच्या तपस्वी जीवनाचा मार्ग सुरू झाला. हाच त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा होता. यानंतर त्यांनी रामकृष्णांना गुरू म्हणून स्वीकारले.

रामकृष्ण परमहंसांकडे स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. ते चिंतन, मनन, ध्यान-धारणा करू लागले. योग्य वेळ येताच रामकृष्णांनी त्यांना आपले आध्यात्मिक धन संक्रमित केले. मानव सेवा हीच ईश्वर सेवा हे रामकृष्णांचे शब्द त्यांच्या कानात घुमू लागले आणि मनुष्यसेवा करण्यासाठी संपूर्ण भारतभर भ्रमण करण्याचे त्यांनी ठरवले. नदी, नाले, पर्वत पादाक्रांत करत ते फिरत राहिले. लोकांचे दु:ख, दैन्य, अज्ञान, रोगराई, उपासमार इ. निरीक्षण केले. देशांतर्गत आध्यात्मिक व सामाजिक सुधारणा करण्याच्या व मानव प्रगतीच्या दृष्टीने नि:स्वार्थ भावनेने वाहून घेणारे नवे संन्यासी तयार व्हावयास हवे असे त्यांना वाटले. लोकांना दैन्यावस्थेतून बाहेर काढले पाहिजे असे जीवित कार्य करण्याचे त्यांनी ठरविले आणि उठा जागे व्हा चांगले कार्य करा, ध्येयपूर्ती होईपर्यंत थांबू नका हा अमृतबोध त्यांना झाला.

सन १८८५ मध्ये स्वामी विवेकानंद यांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांना घशाचा कर्करोग झाला आणि त्यांना कलकत्याला आणि नंतर कोसीपोरमधील एका बागेत हलवण्यात आले. विवेकानंद आणि रामकृष्णांच्या इतर शिष्यांनी त्यांची खूप काळजी घेतली. १६ ऑगस्ट १८८६ रोजी श्री रामकृष्णांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. परंतु, तत्पूर्वी त्यांनी नरेंद्रला म्हणजे स्वामी विवेकानंद यांना शिकवले की मानवाची सेवा ही ईश्वराची सर्वात प्रभावी उपासना आहे.

रामकृष्णांच्या निधनानंतर, नरेंद्रनाथांसह त्यांचे पंधरा शिष्य उत्तर कलकत्ता येथील बारानगर येथील रामकृष्ण मठात एकत्र राहू लागले. सर्व शिष्यांनी संन्यास घेतला आणि नरेंद्रनाथ स्वामी विवेकानंद म्हणून उदयास आले. विवेकानंद म्हणजे विचारात समजूतदार बुद्धीचा आनंद होय. विवेकानंदांनी यानंतर रामकृष्ण परमहंस यांचा मानवतावादी विचार लोकांपर्यंत पसरविण्यासाठी पायीच भारतभ्रमण सुरू केले.

यादरम्यान त्यांनी लोकांचे अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक पैलू पाहिले आणि सामान्य लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात कोणकोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागते, याचे त्यांना आकलन झाले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी लोकांच्या दु:खावर वैचारिक फुंकर घालण्याचा प्रयत्न केला. लोकांना त्यांचा विचार आवडू लागला. यादरम्यान लाखो लोकांनी त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. लोकांनी उपदेश करत करत स्वामी विवेकानंद दक्षिणेकडे गेले. भारताच्या शेवटच्या टोकाला म्हणजे कन्याकुमारीला ते जाऊन पोहोचले. तीन महासागर एकत्र जेथे येतात, ते ठिकाण म्हणजे कन्याकुमारी. स्वामी विवेकानंद यांना हे ठिकाण खूप आवडले. येथे समुद्रात एक विशालकाय खडक स्वामी विवेकानंद यांना दिसला. त्या खडकावर जाण्यासाठी स्वामीजींनी नावाड्याला विचारणा केली तेव्हा नावाडी त्यांच्याकडे पैसे मागू लागला. स्वामीजी निर्धन संन्याशी असल्याने त्यांनी नावाड्याला सांगितले की, त्यांच्याकडे नावेचे भाडे देण्यासाठी पैसे नाहीत. तेव्हा नावाडी म्हणाला तुम्ही पोहत जा, पण येथील पाण्यात खूप अजस्त्र जलचर प्राणी आहेत. स्वामीजींनी स्मित करत समुद्रात उडी घेतली आणि ते त्या खडकावर पोहोचले. हा खडक अतिशय पवित्र होता. कारण या खडकावर देवी कन्याकुमारीने तप केले होते. स्वामी विवेकानंद यांनी तीन ते चार दिवस या खडकावर ध्यानधारणा केली.

- **शिकागोची धर्मपरिषद**

दक्षिणेत समाजप्रबोधन करत असतानाच स्वामी विवेकानंद यांना अमेरिकेतील शिकागो येथे आयोजित केलेल्या जागतिक धर्म संसदेची माहिती मिळाली. या धर्मसभेला उपस्थित राहण्यासाठी, भारत आणि त्यांच्या गुरूंच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ते उत्सुक होते. शिकागोला गेल्यानंतर त्यांना

विविध अडचणींना सामोरे जावे लागले. तेथे त्यांच्या निवास आणि भोजनाची फार मोठी गैरसोय झाली. तेथे एका महिलेने त्यांना बोस्टन शहरात जाण्यास सांगितले कारण शिकागोच्या तुलनेत बोस्टन शहर राहिवासाच्या दृष्टीने स्वस्त होते. तत्पूर्वी स्वामीजींना शिकागो धर्मपरिषदेत प्रवेश नाकारण्यात आला होता. कारण त्यांच्याकडे भारतातून ते भारताचे प्रतिनिधी म्हणून आल्याचे कुठलेही पत्र नव्हते. अखेर स्वामीजी बोस्टनला गेले. तेथे एका महिलेने त्यांना एका फार्म हाऊसवर निवासाची परवानगी दिली. त्या महिलेने स्वामीजींची विचरणा केली तेव्हा तिच्या लक्षात आले की स्वामीजी एक दिव्य पुरुष आहेत. त्यांनी हॉवर्ड विद्यापीठातील राइट नामक प्राध्यापकाला स्वामीजींबद्दल सांगितले. स्वामीजींची भेट घेतल्यावर राइट नावाचे प्राध्यापक चपापले. त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे पाश्चात्य संस्कृती व धर्माबद्दल असलेले अगाध ज्ञान हेरले आणि म्हणाले की आपल्या विद्यापीठातील सर्व धर्मसंस्कृती चिकित्सक प्राध्यापकांना एकत्र केले तरी स्वामी विवेकानंद यांच्याशी बरोबरी होऊ शकत नाही. त्यांनी शिकागो धर्मपरिषदेच्या प्रतिनिधींना स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल माहिती दिली आणि त्यांचा धर्मपरिषदेतील प्रवेश सुकर झाला.

अनेक त्रासानंतर स्वामी विवेकानंद शिकागोच्या धार्मिक सभेला गेले. ११ सप्टेंबर १८९३ रोजी ते मंचावर आले. या परिषदेत सहभागी ज्या धर्माचे प्रतिनिधी मंचावर येत होते, ते लेडिज अँड जंटलमन असे स्वागत शब्द योजत सभेला संबोधित करत होते. स्वामी विवेकानंद यांची वेळ आली आणि ते मंचावर गेले आणि म्हणाले,

''**अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिणींनो**''

स्वामीजींच्या या शब्दांनी अवघे सभागृह त्यांना मानवंदना देण्यासाठी खुर्चीतून उभे राहिले. टाळ्यांचा कडकडाट झाला. स्वामी विवेकानंदांनी सर्वांना थक्क केले. उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. ते म्हणाले,

''जगातील सर्वात जुन्या संत परंपरेच्या वतीने मी तुमचे आभार मानतो. मी सर्व धर्माच्या मातेच्या वतीने तुमचे आभार मानतो आणि सर्व जाती आणि पंथातील लाखो आणि करोडो हिंदूंच्या वतीने तुमचे आभार व्यक्त करतो. ज्यांनी हे व्यक्त केले त्यांचेही मी आभार मानतो, ज्यांनी सांगितले की जगात

सहिष्णुतेची कल्पना पूर्वेकडील देशांतून पसरली आहे.''

विवेकानंदजी म्हणाले होते, ''मला अभिमान आहे की मी अशा धर्माचा आहे ज्याने जगाला सहिष्णुता आणि सार्वत्रिक स्वीकाराचा धडा शिकवला. आम्ही केवळ वैश्विक सहिष्णुतेवर विश्वास ठेवत नाही, तर जगातील सर्व धर्मांना सत्य मानतो. मला अभिमान आहे की मी अशा देशाचा आहे ज्याने सर्व देशांतील छळलेल्या लोकांना आश्रय दिला आहे. मला अभिमान आहे की आम्ही आमच्या हृदयात इस्रायलच्या त्या पवित्र आठवणी जतन केल्या आहेत, ज्यामध्ये रोमन आक्रमणकर्त्यांनी त्यांची धार्मिक स्थळे नष्ट केली होती.

स्वामी विवेकानंद पुढे म्हणाले, ''ज्याप्रमाणे निरनिराळ्या स्रोतांतून उगम पावणाऱ्या वेगवेगळ्या नद्या शेवटी समुद्राला मिळतात, त्याचप्रमाणे मनुष्य आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो, जे सरळ किंवा वाकडे वाटू शकतात. परंतु, सर्व देवाकडे घेऊन जातात. जातीयवाद, धर्मांधता आणि त्यांचे भयंकर वंशज, कट्टरतावाद यांनी पृथ्वीच्या दीर्घकाळ मुसक्या आवळल्या आहेत. यामुळेच पृथ्वी हिंसाचाराने भरली आहे. ही पृथ्वी किती वेळा रक्ताने लाल झाली आहे, किती संस्कृती नष्ट झाल्या आहेत आणि किती देश नष्ट झाले आहेत कुणास ठाऊक. हे भयंकर राक्षस अस्तित्वात नसते तर आज मानवी समाज खूप प्रगत झाला असता, पण आता त्यांची वेळ संपली आहे.''

या धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंद यांनी वेदांताची तत्त्वे, त्यांचे आध्यात्मिक महत्त्व इत्यादींचे वर्णन केले. अमेरिकेत सुमारे अडीच वर्षे राहून त्यांनी न्यूयॉर्कच्या वेदांत सोसायटीची स्थापना केली. तत्त्वज्ञान, अध्यात्मवाद आणि वेदांताच्या तत्त्वांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी युनायटेड किंगडममध्येही प्रवास केला. अमेरिकेत यादरम्यान एक महिलेने स्वामी विवेकानंद यांच्याशी लग्न करण्याचा आग्रह धरला. तिला स्वामीजींसारखा तेजस्वी मुलगा हवा आहे, असे तिने स्वामी विवेकानंद यांना सांगितले. तेव्हा स्वामीजी अतिशय नम्रपणे म्हणाले, ''तू माझ्यातच तुझा मुलगा पाहा. कारण मी प्रत्येक स्त्रीमध्ये माझी माता भगिनी बघतो.'' इतके स्वामी विवेकानंद थोर विचाराचे होते.


सन १८९७ च्या सुमारास स्वामीजी भारतात परतले आणि कलकत्ता येथे पोहोचले जेथे त्यांनी बेलूर मठ येथे १ मे १८९७ रोजी रामकृष्ण मिशनची

स्थापना केली. मिशनची उद्दिष्टे कर्मयोगावर आधारित होती आणि देशातील गरीब आणि पीडित किंवा त्रासलेल्या लोकांची सेवा करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट होते. या अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालये स्थापन करण्यासारख्या अनेक सामाजिक सेवा देखील केल्या जातात. देशभरात परिषदा, परिसंवाद आणि कार्यशाळा, पुनर्वसन कार्य याद्वारे वेदांताची शिकवण दिली गेली.


स्वामी विवेकानंदांच्या मते, जीवनाचे अंतिम ध्येय हे आत्म्याचे स्वातंत्र्य प्राप्त करणे आहे आणि त्यात संपूर्ण धर्माचा समावेश होतो. आत्मसाक्षात्कारासाठी त्यांनी ज्ञान योग: ज्ञानाचा योग, प्रेम आणि भक्तीचा योग, कृतीचा योग, राज योग आणि स्वत:ला ओळखण्यासाठी ध्यानाचा योग सांगितला.

वयाच्या ४० व्या वर्षापर्यंत जगणार नाही, असे भाकीत स्वामी विवेकानंद यांनी स्वत:च्या बाबतीत केले होते. अखेर ४ जुलै १९०२ रोजी ध्यानधारणा करत असताना त्यांचे निधन झाले. त्यांनी महासमाधी घेतली विश्वाला मानवतावाद शिकवणारा हा भारताचा आध्यात्मिक कोहिनूर आपल्या विचारातून आपले अमिट वैचारिक अस्तित्व भूतलावर ठेऊन गेला.

V



राष्ट्रपिता महात्मा गांधी



# राष्ट्रपिता महात्मा गांधी

- इ. स. २ ऑक्टोबर १८६९ ते इ. स. ३० जानेवारी १९४८

**महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा गांधी हे सत्य आणि अहिंसेच्या धोरणासाठी ओळखले जातात. महात्मा गांधी म्हणून प्रसिद्ध असलेले मोहनदास करमचंद गांधी हे भारतातील एक प्रमुख राजकीय आणि आध्यात्मिक नेते होते, ज्यांनी १९२२ मध्ये असहकार चळवळ आणि १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह आणि नंतर १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलनात स्वातंत्र्य लढ्यात देशाचे नेतृत्व केले. भारतात प्रिय बापू म्हणून ओळखले जाणारे, महात्मा गांधींनी भारतातील ब्रिटिश राजवटीविरुद्ध शस्त्रे म्हणून सामूहिक अवज्ञा आणि अहिंसक प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारले आणि अहिंसेच्या तत्त्वाचे पालन केले. न्याय आणि स्वातंत्र्याच्या प्रवासात आणि संघर्षात त्यांनी अनेक त्रास सहन केले, अटक झाली आणि अधूनमधून मारहाणही झाली. तथापि, त्यांचा संघर्ष भारतापुरता मर्यादित नाही, कारण नेत्याने दक्षिण आफ्रिकेतील नागरी हक्क चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली आणि त्यांना न्याय आणि समानतेचा अधिकार मिळवून दिला.**

महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा गांधी हे सत्य आणि अहिंसेच्या थोरणासाठी ओळखले जातात. महात्मा गांधी म्हणून प्रसिद्ध असलेले मोहनदास करमचंद गांधी हे भारतातील एक प्रमुख राजकीय आणि आध्यात्मिक नेते होते, ज्यांनी १९२२ मध्ये असहकार चळवळ आणि १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह आणि नंतर १९४२ मध्ये भारत छोड़ो आंदोलनात स्वातंत्र्य लढ्यात देशाचे नेतृत्व केले. भारतात प्रिय बापू म्हणून

ओळखले जाणारे, महात्मा गांधींनी भारतातील ब्रिटिश राजवटीविरुद्ध शस्त्रे म्हणून सामूहिक अवज्ञा आणि अहिंसक प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारले आणि अहिंसेच्या तत्त्वाचे पालन केले. न्याय आणि स्वातंत्र्याच्या प्रवासात आणि संघर्षात त्यांनी अनेक त्रास सहन केले, अटक झाली आणि अधूनमधून मारहाणही झाली. तथापि, त्यांचा संघर्ष भारतापुरता मर्यादित नाही, कारण नेत्याने दक्षिण आफ्रिकेतील नागरी हक्क चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली आणि त्यांना न्याय आणि समानतेचा अधिकार मिळवून दिला.

महात्मा गांधींचा जन्म दि. २ ऑक्टोबर, इ.स. १८६९ या दिवशी गुजरातमधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद व आईचे नाव पुतळीबाई होते. महात्मा गांधी यांचे वडील करमचंद गांधी तत्कालीन काठेवाड प्रांतातील पोरबंदरमध्ये दिवाण म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आजोबांचे नाव उत्तमचंद गांधी असे होते. त्यांना उत्ता गांधी असेदेखील म्हणत असत. पुतळीबाई या करमचंद गांधी यांच्या चौथ्या पत्नी होत्या. आधीच्या तीन पत्नी प्रसूतीदरम्यान मृत पावल्या होत्या. अत्यंत धार्मिक वातावरणातील बालपणाचा मोठा प्रभाव गांधीजींच्या पुढील आयुष्यावर दिसून येतो. विशेषतः अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता, इतरांबद्दल करुणा या तत्त्वांचे बीज याच काळात रोवले गेले होते. आईमुळे मोहनदासांवर जैन संकल्पना आणि प्रथांचा प्रभाव होता. प्राचीन वाङमयातील श्रावणबाळ आणि हरिश्चंद्र या दोन कथांचा मोहनदास गांधी मनावर गहिरा परिणाम झाला होता. स्वतःच्या आत्मचरित्रात ते याबाबत कबूल करतात की, या दोन कथांमुळे त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता.

वयाच्या तेराव्या वर्षी इ.स. १८८३ मध्ये त्यांचा कस्तुरबा माखनजी यांच्या बरोबर बालविवाह झाला. त्यांचे नाव लहान करून कस्तुरबा (आणि प्रेमाने बा) असे घेतले जाई. पण त्या काळातील रिवाजानुसार कस्तुरबा बहुतांश काळ त्यांच्या वडिलांच्या घरीच होत्या. या प्रक्रियेत मोहनदासला शालेय शिक्षणाचे एक वर्ष गमवावे लागले. लग्नाच्या दिवसाच्या आठवणींबद्दल ते एकदा म्हणाले होते, आम्हाला लग्नाबद्दल फार काही माहीत नसल्यामुळे लग्न म्हणजे आमच्यासाठी नवीन कपडे घालणे, गोड खाऊ खाणे आणि नातेवाइकांबरोबर खेळणे, हेच होते. इ.स. १८८५ मध्ये जेव्हा गांधीजी १५ वर्षाचे होते तेव्हा

त्यांना पहिले अपत्य झाले, पण ते खूप कमी काळ जगले. त्याच वर्षी आधी वडील करमचंद गांधींचा स्वर्गवास झाला होता. पुढे गांधीजी आणि कस्तुरबा यांना इ.स. १८८८ मध्ये हरीलाल, इ.स. १८९२ मध्ये मणिलाल, इ.स. १८९७ मध्ये रामदास आणि इ.स. १९०० मध्ये देवदास अशी चार अपत्ये झाली.

महात्मा गांधी यांच्या पोरबंदरमधील प्राथमिक तसेच राजकोटमधील माध्यमिक शिक्षणामध्ये ते एक साधारण विद्यार्थी परिचित होते. त्यांचा एका वार्षिक परीक्षेतील अहवाल पुढीलप्रमाणे होता ''इंग्रजीत चांगला, अंकगणितात ठीक आणि भूगोलात कच्चा, वर्तणूक अतिशय चांगली, हस्ताक्षर खराब'' ते मॅट्रिकची परीक्षा भावनगरमधील शामळदास कॉलेजमधून थोड्या कष्टानेच पास झाले. मोहनदास गांधी यांनी वकील व्हावे, ही त्यांच्या घरच्या लोकांची इच्छा होती. मात्र कुटुंबीयांच्या या इच्छेबद्दल ते नाखूष होते.

शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोणिसाव्या वर्षी इ.स. १८८८ मध्ये ते इंग्लंडमध्ये लंडनला युनिव्हर्सिटी कॉलेज, वकिलीचे शिक्षण घेण्यास गेले. तेथे त्यानी इनर टेंपल या गावी राहून बॅरिस्टर होण्यासाठी भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंडला जाण्याआधी त्यांनी आईला जैन साधूच्या उपस्थितीत आपण मांस, बाई व बाटली (दारू) यापासून दूर राहू असे वचन दिले होते, त्याचे त्यांनी तिथे तंतोतंत पालन केले. परंतु लंडन मधील सपक शाकाहारी जेवणाची चव त्यांना आवडली नाही आणि लंडनमधील त्याकाळी दुर्मीळ असलेली एक भारतीय खानावळ सापडेपर्यंत ते खूप वेळा उपाशी राहिले. गांर्धीनी तेथे इंग्रजी चालीरीती ग्रहण करण्याचा प्रयत्न केला, ते इंग्लंडमध्ये शाकाहारी संस्थेचे सदस्य बनले आणि लवकरच त्याच्या अध्यक्षपदी पोहोचले. तेथे ज्या शाकाहारी व्यक्तींना गांधी भेटले, त्यातील काही स्त्रिया थिओसोफिकल सोसायटीच्या सदस्य होत्या. त्यांनी गांधींना आपल्यात येऊन मिळण्यासाठी आणि भाषांतरित आणि मूळ भगवद्गीता वाचण्यासाठी प्रोत्साहन दिले. आधी धार्मिक गोष्टीत रस नसणारे गांधी धार्मिक गोष्टीत त्यानंतर रस घ्यायला लागले.

इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास करून ते बॅरिस्टर बनले आणि भारतात परत येऊन वकिली करू लागले. १८९१ मध्ये ते इंग्लंड सोडून परत भारतात आले.

भारतात आल्यावर कळले की त्यांच्या आईचा ते लंडनमध्ये असतानाच मृत्यू झाला आहे आणि त्यांच्या कुटुंबाने ही बातमी त्यांच्यापासून लपवून ठेवली. या घटनेने गांधीजी अतिशय दुःखी झाले. मुंबईमध्ये कायद्याची प्रॅक्टिस उभी करण्याची त्यांची योजना सफल झाली नाही, कारण ते कोर्टात बोलण्यासाठी अतिशय लाजाळू होते. खटल्यांसाठी मसुदा तयार करण्याच्या साध्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी ते राजकोटला परत आले. परंतु, एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या विरोधात गेल्याने हे काम त्यांना बंद करावे लागले. १८९३ मध्ये त्यांनी त्या काळच्या ब्रिटिश साम्राज्यामधील नाताळ (दक्षिण आफ्रिका) येथील दादा अब्दुल्ला आणि कंपनी नावाच्या एका भारतीय कंपनीतील एका पदासाठी एक वर्षाचा करार केला.

महात्मा गांधींनी आयुष्याची २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत घालवली, जेथे त्यांनी त्यांचे राजकीय दृष्टिकोन, नैतिक आणि राजकीय नेतृत्व कौशल्ये विकसित केली. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचे नेतृत्व असणाऱ्या श्रीमंत लोकांनी गांधींना नोकरी दिली. भारतीयत्व सर्व धर्म आणि जातींमध्ये उतरले आहे असा दृष्टिकोन आयुष्यभर ठेवत गांधीनी या सर्वांना भारतीयच मानले. मुख्यत्वे धर्माच्या बाबतीत ऐतिहासिक भिन्नता आपण सांधू शकू असा त्यांना स्वतःबद्दल विश्वास होता, आणि हा विश्वास घेऊन ते भारतात आले. येथे त्यांनी या विश्वासाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला.

दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधींना समाजाच्या विकालांगाची ओळख झाली. भारतीय धर्म आणि संस्कृती यांमध्ये असलेल्या गुंतागुंतीच्या समस्यांपासून आपण दूर आहोत, याची त्यांना जाणीव झाली आणि दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना समजून घेऊन व त्यांचे नेतृत्व करून आपणास भारत समजला असे ते मानू लागले.

दक्षिण आफ्रिकेत गांधींना लोकांबद्दल असलेल्या भेदभावाला अनेकदा सामोरे जावे लागले, तेथील भारतीयांना दिली जाणारी असमान वागणूक महात्मा गांधी यांनी अनुभवली. पहिल्या वर्गाचे तिकीट असतानासुद्धा त्यांना पीटरमारित्झबर्गमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांनी तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसण्यास सांगितले. गांधीजींनी नकार देताच त्यांना अपमान करून आगगाडीमधून ढकलून

देण्यात आले. दि. ७ जून १८९३ ची ती संपूर्ण रात्र गांधीनी फलाटावरील गेस्टरूममध्ये काढली. गांधींनी ठरवले असते तर उद्दाम वर्तन करणाऱ्या त्या रेल्वे अधिकाऱ्यास ते अद्दल घडवू शकले असते. पण सूडभावनेने कोणाला शिक्षा करविणे हा त्यांचा हेतू नव्हता तर अन्यायकारक व्यवस्था बदलवणे हा त्यांचा हेतू होता.

पुढे एकदा, प्रवाशांना वाट करून न दिल्यामुळे वाहन चालकाने त्यांना मारले, पूर्ण प्रवासात त्यांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या. अनेक हॉटेलमधून त्यांना हाकलून देण्यात आले. अशा अनेक घटनांपैकी अजून एक घटना म्हणजे, डर्बनमध्ये न्यायाधीशाने त्यांना त्यांची टोपी काढून ठेवण्याचा हुकूम दिला. गांधींनी तेव्हाही नकार दिला. या घटना त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या ठरल्या. हे सर्व अनुभव घेतल्यावर गांधींनी स्वतःचे समाजातील स्थान आणि ब्रिटिश राज्यातील आपल्या लोकांची किंमत याबद्दल प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली, अशाप्रकारे भारतीयांबद्दलच्या वंशभेद, असमानता यांना सामोरे गेल्यावर गांधींनी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास व समाजात स्वतःचे स्थान निर्माण करण्यास सुरुवात केली.

दक्षिण आफ्रिकेत भारतीयांचा मतदानाचा हक्क काढून घेणारा कायदा लागू करण्यात येणार होता. या कायद्याला विरोध करणाऱ्या भारतीयांना मदत करण्यासाठी गांधींनी आपले दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काही काळासाठी वाढवले. हा कायदा रद्द करण्यात जरी ते अयशस्वी ठरले, तरी यामुळे भारतीयांवरील अन्यायाकडे लक्ष वेधण्यात त्यांची चळवळ यशस्वी झाली. त्यांनी इ.स. १८९४ मध्ये नाताळ भारतीय काँग्रेसची स्थापना केली व याद्वारे दक्षिण आफ्रिकेतील विखुरलेल्या भारतीयांना त्यांनी एका राजकीय पक्षात परावर्तित केले. इ.स. १८९७ मध्ये काही काळाच्या भारतातील वास्तव्यानंतर डरबनमध्ये उतरत असताना काही गोऱ्या लोकांच्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केला व त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. एका पोलीस अधीक्षकाच्या पत्नीच्या सहकार्याने त्यांची सुटका झाली. या घटनेत त्यांच्या तोंडाला इजा झाली आणि दोन दात तुटले. पण त्यांनी न्यायालयात तक्रार करण्यास नकार दिला. वैयक्तिक त्रासाबद्दल न्यायालयात जाणे त्यांच्या तत्त्वांमध्ये नव्हते.

इ.स. १९०६ मध्ये ट्रान्सवाल सरकारने एका नवीन कायद्याची घोषणा केली. या कायद्यानुसार तेथील प्रत्येक भारतीयाला स्वत:ची नोंदणी करणे बंधनकारक झाले होते. याला विरोध करण्यासाठी बोलवलेल्या सभेमध्ये, त्या वर्षीच्या ११ सप्टेंबरला, गांधींनी, पहिल्यांदाच आपल्या अजूनही विकसित होत असलेल्या सत्याग्रहाच्या किंवा अहिंसात्मक कार्यप्रणालीला आपलेसे केले. त्यांनी भारतीय बांधवांना अहिंसक पद्धतीने या कायद्यास विरोध करण्यास सांगितले व असे करताना झालेले अत्याचार सहन करण्यास सांगितले. तेथील समुदायाने या आवाहनाला साद दिली आणि आगामी सात वर्षांत हजारो भारतीयांनी हरताळ केल्यामुळे, नोंदणी करण्यास नकार दिल्यामुळे, नोंदणी पत्रक जाळून टाकणे आणि तत्सम अहिंसात्मक कार्यात सामील झाल्यामुळे लोकांनी तुरुंगवास भोगला, चाबकाचे फटके खाल्ले आणि बंदुकीच्या गोळ्याही खाल्ल्या. सरकारने भारतीय आंदोलकांचा हा विरोध यशस्वीरीत्या मोडून काढला तरी पण या अहिंसक चळवळीची व लोकक्षोभाची नोंद घेण्यास आणि गांधींशी वाटाघाटी करण्यास स्वतः तत्त्वज्ञ असलेल्या दक्षिण आफ्रिकेतील नेता जॉन क्रिस्तिआन स्मट्स याला भाग पाडले. शांततामय मार्गाने निदर्शने करणाऱ्या निदर्शकांवरील दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने केलेल्या कठोर कारवायांमुळे लोकक्षोभ निर्माण झाला होता. गांधींच्या कल्पनांनी आकार घेतला आणि सत्याग्रहाची संकल्पना या संघर्षांदरम्यान परिपक्व झाली.

इ.स. १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात परत आले. एक प्रमुख भारतीय राष्ट्रवादी, थिओरिस्ट आणि संघटक अशी त्यांची आंतरराष्ट्रीय ख्याती होती. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक संमेलनांतून बोलले. खऱ्या अर्थी भारताचे राजकारण व समस्या यांचा परिचय त्यांना गोपाळ कृष्ण गोखले यांनी करून दिला, गोपाळ कृष्ण गोखले हे तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रमुख नेते होते. गोखले त्यांच्या संयम, संतुलन आणि व्यवस्थेच्या आतमध्ये राहून काम करण्याच्या आग्रहाबद्दल ओळखले जात. आजही ते गांधीजींचे राजकीय गुरू म्हणून ओळखले जातात. गांधींनी गोखल्यांचा ब्रिटिशांच्या परंपरांवर आधारित उदार दृष्टिकोन अनुसरला. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाल्यावर ते राष्ट्रीय सभेचे प्रमुख नेते बनले.

गांधींनी १९२० मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाची सूत्रे हातात घेतली. त्यानंतर मागण्यांमध्ये सतत वाढ करत करत २६ जानेवारी १९३० काँग्रेसने भारताचे स्वातंत्र्य जाहीर करून टाकले. अधिकाधिक वाटाघाटी होत गेल्या आणि काँग्रेसने १९३० मध्ये प्रांतीय सरकारमध्ये भाग घेऊपर्यंत ब्रिटिशांना हे ओळखता आले नाही. १९३९ च्या सप्टेंबरमध्ये कोणाशीही सल्लामसलत न करता व्हाईसरॉयने जेव्हा जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केले तेंव्हा गांधींनी आणि काँग्रेसने ब्रिटिश सरकारचा पाठिंबा काढून घेतला. गांधींनी १९४२ मध्ये तत्काळ स्वराज्याची मागणी करेपर्यंत आणि ब्रिटिश सरकारने प्रतिसाद म्हणून त्यांना आणि लाखो काँग्रेसच्या नेत्यांना तुरुंगात डांबेपर्यंत तणाव वाढतच गेला. दरम्यान मुस्लिम लीगने ब्रिटनला सहकार्य केले आणि गांधींच्या तीव्र विरोधाला डावलून मुस्लिमांच्या संपूर्ण स्वतंत्र राष्ट्राची, पाकिस्तानची मागणी केली. १९४७ मध्ये ब्रिटिशानी भूमीची फाळणी केली आणि गांधींनी अमान्य केलेल्या शर्तीवर भारत आणि पाकिस्तानने वेगवेगळे स्वातंत्र्य मिळवले.

गांधीजींना पहिले मोठे यश १९१८ मध्ये चंपारण आणि खेडामधील सत्याग्रहात मिळाले. चंपारण व बिहारमधील जमीनदार जे प्रामुख्याने ब्रिटिश होते. ते स्थानिक शेतकऱ्यांना सक्तीने नीळ उत्पादन करावयास लावत असत. त्यांना योग्य मोबदला पण मिळत नसे. यांमुळे ते सतत गरिबीत राहत. शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठेवली जात. तसेच दारू, अस्पृश्यता, पडदा पद्धत अशा अनेक समस्या या गावांमध्ये होत्या. यावर भर म्हणजे तेथील दुष्काळ, पण इंग्रजांनी तरीही अनेक जाचक कर लादले होते आणि ते वाढतच होते. गुजरातमधील खेडामध्येसुद्धा स्थिती काही वेगळी नव्हती. गांधीजींनी तिथे एक आश्रम उभारला. तिथे त्यांनी त्यांच्या लहान- मोठ्या सर्व अनुयायांना एकत्र केले. त्यांनी त्या भागातील परिस्थितीची माहिती गोळा केली व तिचा सखोल अभ्यास केला, गावकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा, रुग्णालयाच्या बांधकामाचे काम हाती घेतले. याचसोबत गावातील प्रमुखांना वर उल्लेखलेल्या प्रथा नष्ट करण्यास प्रवृत्त केले. जेव्हा पोलिसांनी त्यांना प्रदेशात अशांतता निर्माण करण्याच्या गुन्ह्याखाली अटक केली व तो भाग सोडून जाण्यास सांगितले, तेव्हा गांधीजींचा प्रभाव

जाणवून आला. हजारो लोकांनी या अटकेचा विरोध केला. त्यांनी गांधीजींच्या सुटकेसाठी तुरुंगाबाहेर, पोलीस स्थानकासमोर आणि न्यायालयासमोर मोर्चे काढले. न्यायालयाने शेवटी नाइलाजाने त्यांची मागणी मान्य केली. गांधीजींनी जमीनदारांविरुद्ध सुसंघटित आंदोलने चालू केली. याचा परिणाम म्हणजे तेथील जमीनदारांनी ब्रिटिश सरकारच्या मार्गदर्शनाखाली एक ठराव मंजूर केला. त्यानुसार शेतकऱ्यांना जास्त मोबदला आणि स्वतःच्या मतानुसार पीकघेण्याची मोकळीक मिळाली, तसेच करवाढ होऊन दुष्काळ असेपर्यंत कर भरण्यापासून सूट मिळाली. या आंदोलनादरम्यानच गांधीजींचा उल्लेख लोक बापू आणि महात्मा म्हणून करू लागले. खेडामध्ये सरदार पटेलांनी शेतकऱ्यांच्या बाजूने इंग्रजांसोबत वाटाघाटी केल्या. त्यानंतर कर रद्द करण्यात आला आणि सर्वांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. या आंदोलनामुळे गांधीजींची प्रसिद्धी सर्व भारतभर पोहोचली.

गांधीजींनी असहकार, अहिंसा आणि शांततामय विरोध यांना शस्त्र म्हणून इंग्रजांविरुद्ध वापरले. पंजाबमध्ये जालियनवाला बाग हत्याकांडानंतर लोकांच्या क्रोधाचा उद्रेग झाला आणि अनेक ठिकाणी हिंसक विरोध झाले. गांधीजींनी जालियनवाला बाग हत्याकांड तसेच त्यानंतरचे हिंसक विरोध दोन्हींचा निषेध केला. त्यांनी या दंग्यांना बळी पडलेल्या ब्रिटिश नागरिकांबद्दल सहानुभूती दर्शविणारा आणि दंग्यांचा निषेध करणारा एक ठराव मांडला. या ठरावाला काँग्रेसमध्ये सुरुवातीला विरोध झाला, पण गांधीजींच्या तत्त्वांनुसार कोणत्याही प्रकारची हिंसा ही पाप होती आणि त्याचे समर्थन करता येणे शक्य नव्हते. हे तत्त्व मांडणाऱ्या त्यांच्या भावनाप्रधान भाषणानंतर काँग्रेसने त्यांचा ठराव मान्य केला. पण या हत्याकांडाच्या आणि त्यानंतरच्या हिंसेच्या पश्चात गांधीजींनी आपले सर्व लक्ष पूर्ण स्वराज्यावर केंद्रित केले. त्यांच्या पूर्ण स्वराज्याच्या कल्पनेत पूर्ण वैयक्तिक, धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्य समाविष्ट होते.

डिसेंबर इ.स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पूर्ण अधिकार गांधीजींना देण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची पुनर्बांधणी नवीन संविधानानुसार करण्यात आली. ज्याचा मुख्य उद्देश होता स्वराज्य, पक्षाचे सभासदत्व थोड्याशा फीच्या मोबदल्यात सर्वांना खुले करण्यात आले,

पक्षातील शिस्त वाढवण्यासाठी श्रेणीनुसार समित्या बनवल्या गेल्या, यामुळे फक्त उच्चधूंसाठीच समजल्या जाणाऱ्या पक्षाचे स्वरूप बदलले आणि काँग्रेस जनसामान्याचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष बनला. गांधीजींनी अहिंसेच्या तत्त्वाला स्वदेशीची जोड दिली. त्यांनी सर्वांना परदेशी विशेषतः ब्रिटिश वस्तूंचा बहिष्कार करण्याचे आवाहन केले. या तत्त्वानुसार सर्व भारतीयांनी ब्रिटिश कपड्यांच्या ऐवजी खादीचा उपयोग करावा असे अभिप्रेत होते.

प्रत्येक भारतीय पुरुष आणि स्त्रीने, प्रत्येक गरीब आणि श्रीमंत व्यक्तीने, दिवसाचा काही काळ भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या समर्थनार्थ चरख्यावर सूत कातावे असा गांधीजींचा आग्रह होता. याचा मुख्य उद्देश शिस्त आणि स्वावलंबनाचे महत्त्व लोकांच्या मनावर ठसवणे तसेच स्त्रियांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेणे हा होता. ब्रिटिश वस्तूंच्या बहिष्काराबरोबरच ब्रिटिश शैक्षणिक संस्थांचा बहिष्कार, सरकारी नोकरीचा त्याग आणि ब्रिटिशांनी दिलेल्या मान आणि पदव्यांचा त्याग करण्याचे आवाहन गांधीजींनी केले.

असहकार चळवळीला समाजातील सर्व स्तरांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, पण असहकार चळवळ जोमात असतानाच आकस्मिकपणे थांबवण्यात आली. याला कारण ठरले, उत्तर प्रदेशमधील चौरी चौरा गावात चळवळीला मिळालेले हिंसक वळण, ४ फेब्रुवारी इ.स. १९२२ रोजी पोलिसांनी जमावावर केलेल्या गोळीबाराने संतप्त होऊन आंदोलकांनी पोलिसांवर हल्ला केला व नंतर पोलीस ठाण्याला आग लावली, जमावावरील गोळीबारात तीन जण मरण पावले तर पोलीस ठाण्यात २३ पोलीस जळून मरण पावले. पुढे अजून जास्त हिंसक घटना घडतील या भीतीने गांधीजींनी चळवळ स्थगित केली. दि.१० मार्च इ.स. १९२२ मध्ये गांधीजींना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली व सहा वर्षांचा तुरुंगवास ठोठावण्यात आला. इ.स. १९२४ मध्ये दोन वर्षांच्या तुरुंगवासानंतर अपेंडिक्सच्या ऑपरेशनच्या कारणावरून त्यांची सुटका करण्यात आली.

गांधीजी तुरुंगात असताना त्यांच्या नेतृत्वाअभावी काँग्रेसमध्ये फूट पडू लागली. शेवटी काँग्रेसचे दोन गटात विभाजन झाले. एका गटाचे नेतृत्व चित्तरंजन दास आणि मोतीलाल नेहरू यांच्याकडे होते. हा गटाचा कल संसदीय

कार्यकारिणीत भाग घेण्याकडे होता. पण चक्रवर्ती राजगोपालाचारी आणि सरदार पटेल यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या गटाचा याला विरोध होता. हिंदू-मुस्लिमांमधला चळवळीदरम्यान वाढीस लागलेला एकोपासुद्धा हळूहळू कमी होत होता. गांधीजींनी हे मतभेद दूर करण्याचे अनेक प्रयत्न केले. इ.स. १९२४ मध्ये त्यांनी यासाठी तीन आठवड्यांचा उपवास केला. पण या प्रयत्नांना म्हणावे तितके यश मिळाले नाही.

सन १९२० च्या दशकाचा मोठा काळ गांधीजी सक्रिय राजकारणापासून दूर राहिले आणि त्यांनी आपले लक्ष स्वराज्य पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील मतभेद दूर करण्यावर केंद्रित केले होते. या काळात त्यांनी समाजातील अस्पृश्यता, दारू समस्या आणि गरिबी कमी करण्याचे आपले प्रयत्न चालू ठेवले. राजकारणाच्या पटावर ते इ.स. १९२८ मध्ये परत आले. तत्पूर्वी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने संविधानात एक सुधारणा करण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. मात्र, या समितीत एकही भारतीय सदस्य नव्हता, या कारणाने भारतीय पक्षांनी या समितीवर बहिष्कार टाकला. गांधीजींनी १९२८ च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनात एक ठराव पास केला. त्याद्वारे ब्रिटिश सरकारकडे भारताला सार्वभौम दर्जा देण्याची मागणी करण्यात आली व ही म ागणी मंजूर न केल्यास परत पूर्ण स्वराज्यासाठी असहकार चळवळ सुरू करण्यात येईल असे बजावण्यात आले. पक्षातील सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या तरुण तडफदार नेत्यांची मागणी तात्काळ व संपूर्ण स्वराज्याची होती. पण गांधीजींनी ब्रिटिश सरकारला उत्तरासाठी एका वर्षाचा अवधी दिला, परंतु ब्रिटिश सरकारने याकाळात काहीही उत्तर दिले नाही. या विरोधात भारतीय राष्ट्रीय सभेने दि. ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर अधिवेशनात भारताचा ध्वज फडकवला. हा दिवस काँग्रेसने स्वराज्य दिन म्हणून साजरा केला.

महात्मा गांधी यांनी यानंतर मार्च १९३० मध्ये मिठावरील कराच्या विरोधात सत्याग्रहाची घोषणा केली व त्याची परिणती प्रसिद्ध दांडी यात्रेत झाली. दि. १२ मार्च १९३० रोजी अहमदाबादहून निघालेली यात्रा ६ एप्रिलला ४०० किलोमीटरचा प्रवास करून दांडीला पोहोचली. हजारोंच्या संख्येने

भारतीय या यात्रेत सहभागी झाले होते. ही यात्रा इंग्रजांची भारतातील पाळेमुळे उखडण्याच्या प्रयत्नांमधील सर्वांत यशस्वी यात्रा ठरली. ब्रिटिशांनी उत्तरादाखल ६०,०००हून अधिक लोकांना तुरुंगात डांबले. शेवटी लॉर्ड एडवर्ड आयर्विन यांच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सरकारने गांधीजींशी वाटाघाटी करण्याचे ठरवले. मार्च १९३१ मध्ये गांधी-आयर्विन करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारानुसार ब्रिटिश सरकारने सर्व भारतीय कैद्यांना मुक्त करण्याचे मान्य केले आणि त्याबदल्यात कायदेभंगाची चळवळ बंद करण्याची मागणी घातली. याबरोबरच गांधीजींना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा एकमेव प्रतिनिधी म्हणून लंडनमध्ये होणाऱ्या गोलमेज परिषदेचे आमंत्रण दिले. ही परिषद गांधीजी आणि काँग्रेस पक्षासाठी निराशाजनकच ठरली, कारण त्यामध्ये सत्तांतरणावर भर देण्याऐवजी भारतातील राजे-रजवाडे आणि अल्पसंख्याक यांच्यावर जास्त भर देण्यात आला होता. यातच भर म्हणजे आयर्विननंतर आलेले लॉर्ड विलिंग्डन यांनी राष्ट्रवाद्यांची चळवळ नरम पाडण्याचे प्रयत्न चालू केले होते. गांधीजींना अटक करण्यात आली, त्यांचा अनुयायांवरील प्रभाव कमी करण्यासाठी त्यांना वेगळे करण्याचा हा ब्रिटिश सरकारचा डाव होता. पण त्यांचे हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मागणीनुसार सन १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारने दलितांना वेगळे मतदारसंघ देण्याचा निर्णय घेतला, याविरोधात गांधीजींनी सहा दिवसांचे उपोषण केले. यामुळे ब्रिटिश सरकारला अजून जास्त समानतेवर आधारित मतदारसंघ विभागणी करणे भाग पडले. याबाबत गांधीजी आणि आंबेडकर यांच्यामध्ये पुण्यामध्ये झालेल्या करारास पुणे करार असे म्हटले जाते.

इ. स. १९३९ मध्ये जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले आणि दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. प्रारंभी गांधींजी ब्रिटिशांना अहिंसक नैतिक पाठिंबा देण्याच्या मताचे होते. पण, पक्षातील इतर नेते, भारतीय लोकप्रतिनिधींचे मत घेतल्याशिवाय एकतर्फीपणे युद्धात ओढल्यामुळे नाखूष होते. सर्व काँग्रेस नेत्यांनी मंत्रिमंडळातून सामुदायिक राजीनामे देण्याचे ठरवले. दीर्घ विचारविनिमयानंतर गांधीजींनी जाहीर केले की, भारत या युद्धाचा एक भाग बनणार नाही, कारण

हे युद्ध वरवर तर लोकशाहीवादी स्वातंत्र्यासाठी म्हणून लढवले जात होते आणि दुसरीकडे तेच स्वातंत्र्य भारताला नाकारण्यात येत होते. जसेजसे युद्ध पुढे सरकत गेले तसतसे गांधीजी स्वातंत्र्याची मागणी तीव्र करत गेले. त्यांनी एक ठराव मांडला ज्याद्वारे इंग्रजांना भारत सोडून जा (भारत छोडो) असे ठणकावण्यात आले. हा गांधीजी आणि पक्षाचा ब्रिटिशांना भारतातून हाकलून देण्याचा सर्वांत स्पष्ट व अंतिम प्रयत्न होता. भारत छोडो चळवळ भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील सर्वांत प्रभावी चळवळ ठरली. यात लाखांच्या संख्येने लोकांना अटका झाल्या, अभूतपूर्व अत्याचार करण्यात आला. हजारो आंदोलक पोलिसांच्या गोळीबारात मरण पावले. गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे स्पष्ट केले की भारताला तात्काळ स्वातंत्र्य दिल्याशिवाय भारत महायुद्धात मदत करणार नाही. गांधीजींनी हेसुद्धा स्पष्ट केले की यावेळेस एखाद-दुसऱ्या हिंसक घटनेमुळे ही चळवळ मागे घेण्यात येणार नाही. भारतीयांना त्यांनी करो या मरो हा मूलमंत्र दिला.

यानंतर गांधीजी आणि काँग्रेसची पूर्ण कार्यकारिणी समिती यांना इंग्रजांनी ९ ऑगस्ट १९४२ रोजी अटक केली. गांधीजींना दोन वर्षांसाठी पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये बंदिवासात ठेवण्यात आले. तेथील वास्तव्यात गांधीजींना वैयक्तिक आयुष्यात दोन धक्के सहन करावे लागले, सहा दिवसांनंतरच त्याचे खासगी सचिव महादेव देसाई वयाच्या ५० व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले आणि त्यांच्या पत्नी कस्तुरबा १८ महिन्यांच्या बंदिवासानंतर २२ फेब्रुवारी १९४४ ला मरण पावल्या. त्यानंतर सहा आठवड्यांनी गांधीजींना तीव्र मलेरिया झाला. त्यांच्या ढासळत्या प्रकृतीमुळे आणि ऑपरेशनच्या आवश्यकतेमुळे त्यांना युद्ध संपण्याआधीच दि. ०६ मे १९४४ ला मुक्त करण्यात आले. ते बंदिवासात मरण पावले तर संपूर्ण देश संतप्त होईल अशी भीती ब्रिटिश सरकारला वाटत होती. जरी भारत छोडो आंदोलनाला माफक यश मिळाले तरी करड्या जरबेने व कडक उपाययोजनांनी इंग्रजांनी इ. स. १९४३ पर्यंत भारतातील आपले राज्य सुरळीत ठेवले होते. युद्धाच्या शेवटी इंग्रजांनी भारतीयांच्या हाती सत्ता देण्याचे स्पष्ट संकेत दिले. तेव्हा गांधीजींनी आंदोलन संपवले आणि जवळपास एक लाख राजकीय कैद्यांची सुटका करण्यात आली.

त्यांमध्ये काँग्रेस नेत्यांचाही समावेश होता.

इ. स. १९४६ मधील ब्रिटिश कॅबिनेट मिशनच्या शिफारशी नामंजूर करण्याची सूचना गांधीजींनी काँग्रेसला दिली. या शिफारशींमधील मुस्लिम बहुसंख्य राज्यांच्या एकत्रीकरणाबद्दल गांधीजी साशंक होते. त्यांच्या मते ही फाळणीची नांदी होती. पण जरी पक्ष गांधीजींचा सल्ला खचितच मानत असे, तरी यावेळी मात्र त्यांनी हा सल्ला मानला नाही. कारण पंडित नेहरू व सरदार पटेल यांना माहीत होते की, जर ब्रिटिशांच्या शिफारशी मान्य नाही केल्या तर राज्य कारभाराचे नियंत्रण मुस्लिम लीगकडे जाईल. इ. स. १९४६ आणि इ. स. १९४८ च्या दरम्यान ५००० हून जास्त माणसे दंगलीमध्ये मारली गेली. अखंड हिंदुस्थानाची फाळणी दोन राष्ट्रांत करेल, अशा प्रत्येक योजनेचा गांधीजींनी विरोध केला होता.

हिंदू-मुस्लिमांमधील अंतर्गत युद्ध टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणून काँग्रेसने फाळणीच्या आराखड्याला मान्यता दिली. काँग्रेस नेत्यांना माहीत होते की गांधीजी फाळणीला तीव्र विरोध करतील आणि गांधीजींच्या पक्षातील आणि देशातील पाठिंब्यामुळे त्यांच्या अनुमतीशिवाय पुढे जाता येणार नाही. गांधीजींच्या निकटच्या सहकाऱ्यांनी फाळणीचा (त्या परिस्थितीला) सर्वोत्तम पर्याय म्हणून स्वीकार केला होता. सरदार वल्लभभाई पटेल यांनी गांधीजींना पटवून देण्याचा प्रयत्न केला की, फाळणी हा अंतर्गत युद्ध टाळण्यासाठी एकमेव पर्याय आहे. शेवटी उद्वेगाने गांधीजींनी आपली अनुमती दिली.

महात्मा गांधी यांनी आपल्या जीवनात ११ व्रतांचा स्वीकार केला होता. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शरीरश्रम, आस्वाद, सर्वत्र भयवर्जन (निर्भयता), सर्वधर्म सामान्ताव्य (सर्वधर्म समभाव), स्वदेशी, स्पर्शभावना (अस्पृश्यतेचा त्याग) या अकरा तत्त्वांना आपल्या आचार-विचारात महात्मा गांधी यांनी नेहमीच प्रमाणभूत मानले. निर्भयता या तत्त्वाला गांधीजी आधारभूत मानत असत. निर्भयतेमुळेच इतर तत्त्वांचे पालन करता येऊ शकते, असे त्यांचे ठाम मत होते.


महात्मा गांधींनी आपल्या सामाजिक व सार्वजनिक जीवनात विपुल लेखन केले आहे. अनेक दशके त्यांनी बऱ्याच वर्तमानपत्रांचे संपादन केले. यामध्ये

गुजराती, हिंदी आणि इंग्रजीमधील हरिजन, दक्षिण आफ्रिकेमध्ये असतांना इंडियन ओपिनीयन आणि भारतात परत आल्यावर इंग्रजीमधील यंग इंडिया, गुजराती मासिक नवजीवन यांचा समावेश आहे. नंतर नवजीवन हिंदीमधून पण प्रकाशित केले गेले. या बरोबरच, ते जवळपास प्रत्येक दिवशी अनेक वर्तमानपत्रांना आणि व्यक्तींना पत्रे लिहीत असत.

गांधींनी काही पुस्तकेसुद्धा लिहिली आहेत. त्यांचे आत्मचरित्र माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रकाशित झाले आहे. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील संघर्षावर त्यांनी सत्याग्रहा इन साऊथ आफ्रिका (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह) हे पुस्तक लिहिले आहे. तसेच त्यांनी 'हिंद स्वराज' किंवा 'इंडियन होम' ही राजकीय पुस्तिका लिहिली आहे आणि जॉन रस्किनच्या Unto This Last चे गुजराती भाषेत भाषांतर केले. हा शेवटचा लेख त्यांच्या अर्थशास्त्रावरील विचारसरणीचे वर्णन करतो. त्यांनी शाकाहार, आहार आणि स्वास्थ्य, धर्म, सामाजिक परिवर्तन इत्यादी विषयांवरसुद्धा विपुल लेखन केले आहे. ते सामान्यतः गुजराथीमध्ये लिखाण करत, पण त्यांच्या पुस्तकांच्या हिंदी आणि इंग्रजी भाषांतरांचे परीक्षणसुद्धा ते करत असत. महात्मा गांधींचे पूर्ण लेखन भारत सरकारने संकलित महात्मा गांधी या नावाखाली १९६० च्या दशकात प्रकाशित केले आहे. यामध्ये जवळपास १०० खंड व त्यांची ५०,००० पृष्ठसंख्या आहेत.

दि. ३० जानेवारी १९४८ ला दिल्लीच्या बिर्ला भवनच्या बागेतून प्रार्थनेला जात असताना गांधीजींची गोळी मारून हत्या करण्यात आली. त्यांचा मारेकरू नथुराम गोडसे हा एक पुरोगामी हिंदू होता व त्याचे संबंध जहालमतवादी हिंदू महासभेशी होते. नथुराम गोडसे याने महात्मा गांधी यांची हत्या करण्यासाठी बरेटी मॉडेलचे पिस्तूल वापरले होते. त्याच्या मते पाकिस्तानला पैसे देऊन भारताला दुबळे पाडण्यासाठी गांधीजी जबाबदार होते. गोडसे आणि त्याचा सहकारी नारायण आपटे यांच्यावर खटला दाखल करून त्यांना दोषी ठरवण्यात आले. त्यांना १५ नोव्हेंबर १९४९ ला फाशी देण्यात आली.

V



राष्ट्रसंत संत गाडगेबाबा



# राष्ट्रसंत संत गाडगेबाबा

- इ. स. २३ फेब्रुवारी १८७६ ते इ. स. २० डिसेंबर १९५६ -

अमरावती जिल्ह्यामध्ये भुलेश्वर नदीच्या काठावरती सेनगाव नावाचं गाव वसलेले आहे. तेथे झिंगरोजी व सखूबाई जानोरकर या शेतकरी दाम्पत्याच्या पोटी २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी एक पुत्ररत्न जन्मले. त्याचे नाव डेबूजी ठेवण्यात आले. झिंगरोजी जानोरकर यांची देवावरती फार श्रद्धा होती. सर्व काही सुखनैव सुरू असतानाच झिंगरोजी जानोरकर यांना व्यसनामुळे आपली शेती सावकाराकडे गहाण ठेवावी लागली. जानोरकर कुटुंब हळूहळू कर्जाच्या खाईत लोटले गेले. कर्ज फेडण्यात जमवलेली कमाई गेली. चिंतेने झिंगरोजी जानोरकर यांना ग्रासले. त्यातच ते आजारी पडले. आपण या आजारपणातून आता काही उठत नाही, हे त्यांनी अचूक हेरले. तत्कालीन दारू मटन आणि चैनीत आपण वेळ व पैसा व्यर्थ घातला. त्यामुळेच आज हे दिवस आले, याची कबुली त्यांनी आपल्या पत्नीस दिली. डेबूजीला असल्या वाईट सवयी लागू देऊ नको. अध्यात्माच्या नावाखाली कूप्रथा त्याला जोपासू देऊ नका, असे सांगत झिंगरोजी जानोरकर यांनी जीव सोडला.

सन १८८४ मध्ये झिंगरोजी जानोरकर जग सोडून गेले तेव्हा डेबूजी अवघा आठ वर्षांचा होता. डेबूजीच्या मामाने सेनगावला बैलगाडी पाठवली आणि सखूबाई जानोरकर यांच्यासह मुलांनाही आपल्या गावी (दापूर, तालुका-मूर्तीजपूर, जिल्हा - अमरावती) घेऊन गेला. डेबूजीच्या मामाचं नाव चंद्रभान होतं आणि त्यांचे वडील हे हंबीरराव होते. हे सगळं घराणं चांगली शेती व उत्तम पशुधन राखून होते. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. मामाच्या गावी

गुरे राखण्याचे काम डेबूजी करू लागला. आईपण मामाच्या शेतात राबायची. डेबूजीला एव्हाना गुराखी मित्र मिळाले होते. एकदा त्यांनी ठरवलं की आपण गोपाळकाला करू. एका दिवशी सगळ्यांनी गोपाळकाला तयार केला सगळ्यांना वाटला. पण तत्कालीन समाजातील अस्पृश्य वर्गातील मित्रांना वेगळा काला वाढण्यात आल्याने डेबूजी दु:खी झाला. तो अस्पृश्य वर्गातील मित्रांमध्ये जाऊन बसला आणि गोपाळकाला खाऊ लागला. देव जर एक असेल तर माणसांमध्ये भेद कशासाठी असा सवाल विचारात डेबूजीने सामाजिक समतेच्या आपल्या चळवळीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.

डेबूजीला कीर्तने खूप आवडायची. गावातील मंदिरांमध्ये तो नेहमी जायचा. कीर्तने व अभंग ऐकायचा. शाळेत डेबूजी जात नव्हता; पण कीर्तनकारांच्या अनेक ओव्या, अभंग आणि आईच्या जात्यावरच्या ओव्या डेबूजीला अल्पावधीतच तोंडपाठ झाल्या. रानामध्ये गुरं चारायला गेल्यावर डेबूजी मुलांना दगडाचे टाळ करायला सांगायचा आणि एखाद्या डबड्याला मृदूंग समजून कीर्तन करू लागायचा. अशा पद्धतीने डेबूजी चार भिंतींच्या नाही तर निसर्गाच्या शाळेत शिकला. यादरम्यान डेबूजी एकदा पोहायला गेला आणि बुडू लागला. दोन तरुणांनी त्याला वाचवलं. मामा आणि आईला ही गोष्ट समजली आणि त्यांनी डेबूजीला पोहण्याचे शिक्षण दिले. डेबूजी त्यात पारंगत झाला. एकदा गनाजी नावाच्या मित्रासोबत त्याने पैज लावली. पुराच्या पाण्यात उडी घेऊन नदीचा दुसरा काठ गाठायचा. पण या पैजेत गणाजी पाण्याच्या भोवऱ्यात बुडाला. त्याचे प्रेत पूर्णा नदीत ६ मैलांवर सापडले.  डेबूजी या घटनेने खूप अस्वस्थ झाला.

काळ आपल्या कलेने पुढे जात होता. डेबूजी मोठा होत होता. त्याने आता मामासोबत शेती करायला सुरुवात केली होती. आर्थिक अडचणीमुळे मामाने एक म्हातारा बैल विक्री करायचे ठरविले. डेबूजीने यास विरोध केला. ''बैल विकाल, तर उद्यापासून मी औताला जाणार नाही. मला घरात ठेवा; नाही तर हाकलून द्या. कुठेही चार घरं भीक मागून पोट भरेन; पण असा कसाईखाना मला परवडणार नाही. बैल विकू देणार नाही,'' अशी कठोर भूमिका त्यांनी घेतली. मात्र, मामाच्या उरावर सावकारी कर्ज होते. घरात पैसे नव्हते. त्यामुळे त्यांना बैल सांभाळणे परवडणारे नव्हते. पण, बैल म्हातारा झाला म्हणून विक्री

करायचा मग घरातील वृद्ध लोकांनाही तुम्ही विकणार का? असा सवाल पुसत डेबूजीने आपल्यातील वैचारिक जडणघडणीचा प्रत्ययच या प्रसंगातून दिला. असे अनेक प्रसंग डेबूजीला घडवत होते. त्याला विचार करायला भाग पाडत होते.

शेतीकाम करून आणि घरात दूधदुभतं असल्याने डेबूजी अंगापिंडाने चांगला विकसित झाला होता. मामाने त्याचे लग्न करायचे ठरविले. १८९२ मध्ये कमलापूर येथील धनाजी परिटाच्या मुलीसोबत अर्थात कुंताबाई यांच्यासोबत डेबूजीचा विवाह झाला. मामालाही डेबूजीच्या वडिलांप्रमाणेच दारू अंडी मटण आणि चैनबाजी करण्याचे व्यसन लागले होते. त्यामुळे मामाही कर्जबाजारी झाला. जमीन त्याने सावकाराकडे गहाण ठेवली. डेबूजीने सर्व कर्ज फेडले, पण सावकार कर्जाच्या वसुलीसाठी सारखा तगादा लावत होता. डेबूजी या प्रकाराने भयंकर संतापला आणि त्याने सावकारासकट त्याच्या गुंडांना झोडपून काढले. सावकार गाव सोडून पळून गेला आणि गावासह पंचक्रोशीत डेबूजीचा खूपच दबदबा निर्माण झाला.

डेबूजीने सावकार पळवून लावला होता. गाव त्याला वचकून होते. पण डेबूजीने कधीच कुणावर दादागिरी केली नाही. तो आपलं प्रत्येक काम इमानीइतबारे करत होता. आपला प्रपंच हाकत होता. त्याच्या संसारवेलीवर दोन मुली व दोन मुलांच्या रूपाने चार फुले उमलली. डेबूजीच्या एका मुलाच्या बारशाचा भव्य कार्यक्रम करण्याचे मामासह आजोबांनी ठरविले. तत्कालीन परीट समाजात तथा आसपासच्या समाजात आनंदसोहळा म्हटल की दारू मटणाच्या जेवणावळी उठायच्या. त्यामुळेच समाजातील बापे माणसे व्यसनाधीन होत असल्याचे डेबूजीच्या लक्षात आले. त्याने असल्या प्रथाना विरोध केला. बारशाचा कार्यक्रम होईल, पण मी सांगेल त्याप्रमाणेच होईल असे डेबूजीने ठणकावून सांगितले. मुलाच्या बारशाचा कार्यक्रम दारू आणि मटणविरहित गोडाधोडाचा झाला. हा तत्कालीन समाजात एक अभिनव बदल होता. जो लोकांना पटला नाही. पण, अशा कार्यक्रमातूनच समाज कसा व्यसनाधीन होत आहे, हे डेबूजीने समाजाला पटवून दिले. समाजालाही डेबूजीचा हा प्रगत विचार कालौघात पटला.

सन १९०४ साल उजडले. डेबूजी २८ वर्षांचा झालेला होता. मार्गशीर्ष महिना होता. दुपारचे दोन वाजलेले होते आणि गावामध्ये एक धष्टपुष्ट अशी व्यक्ती त्या गावांमध्ये आलेली होती. त्याने फाटके कपडे घातलेले होते, परंतु त्याच्या चेहऱ्यावर तेज होते. दाढी-मिशा वाढलेल्या होत्या. तो कुणीतरी चांगला मोठा महाराज आहे, असं वाटत होतं आणि डेबू त्यांना भेटला आणि त्याने विचारले की महाराज आपल्याला काय पाहिजे? महाराजांनी सांगितलं मला काही नको, पण तुला काही हवे असेल तर मला सांग. डेबूजीने त्या महाराजाकडील प्रसाद खाल्ला आणि संध्याकाळच्या वेळेला तिथेच एका स्मशानामधल्या महादेव मंदिराच्या ओट्यावरती दोघेजण झोपले. डेबू सकाळी उठून आला. त्याचं दर्यापूरला काम होतं. म्हणून तो तिकडे निघून गेला.

दुपारी तो महाराज त्यांना शोधण्यासाठी आला. गावातल्या लोकांना वाटलं की अरे कोण महाराज आहे हा? डेबूजीच्या मागे उगाच लागलेला आहे, म्हणून गावातल्या लोकांनी त्या महाराजाला हाकलून दिलं. दर्यापूरहून ज्यावेळेला डेबू परत आला त्यावेळेला लोकांनी त्याला सांगितलं की एक महाराज आलेला होता, तो तुला विचारत होता. आम्ही त्याला हाकलून लावलं. हे ऐकताच डेबू पळत सुटला. त्याने जवळजवळ ५० गावांमध्ये महाराजांचा शोध घेतला, परंतु साधूमहाराज कुठेही सापडला नाही आणि त्या दिवसापासून डेबूला असं वाटत होतं की आपण आता घर सोडून निघून गेले पाहिजे. आपण समाजात गेलं पाहिजे. अखेर १ फेब्रुवारी १९०५ ला तो घर सोडून निघून गेला. वेगवेगळ्या गावांमध्ये तो जायचा. खराटा घ्यायचा अन् गाव स्वच्छ करायचा. कोण लाकडं फोडत असेल तर त्याची लाकडे फोडून द्यायचा. पडेल ते काम डेबूजी करायचा. कुणी दिलच तर खायचं नाही तर तसंच पुढे जायचं. कुणाला काही मागायचं नाही.

इकडे डेबूजीची आई सखूबाई व पत्नी कुंताबाई डेबूजीच्या काळजीने खचल्या होत्या. ऋणमोचनाची एक यात्रा असते, तर यात्रेमध्ये तो येईल नक्की असं तिला वाटलं. ती वाट बघू लागली आणि तिने पाहिलं, मुलगा आलेला आहे. त्याच्या एका पायामध्ये चप्पल आहे. एका पायामध्ये बूट आहे. कमरेला लुंगी गुंडाळलेली आहे आणि फाटका सदरा त्याने घातलेला आहे. डोक्यावरती

दाढी मिशा वाढलेल्या आहेत. डोक्यावरती एक घाडगे / खापर ठेवलेलं आहे. डेबूजी आता गाडगेबाबा झाला होता. तिने मुलाकडे पाहिलं. तिला अतिशय वाईट वाटलं. ती रडू लागली, परंतु डेबूजीने तिच्याकडे लक्ष दिले नाही. तू असं करू नकोस, घर सोडू नकोस, तुझी बायको लेकरं आहेत, अशी विनवणी आईने गाडगेबाबांना केली. परंतु, त्यांनी आईचे काही ऐकलं नाही.

जवळपास १२ वर्षे म्हणजे एक तप गाडगेबाबांनी अशीच आपली भटकंती चालू ठेवली. बारा वर्षांची त्यांची तपश्चर्या पूर्ण झाली आणि त्यांना असं वाटलं की आपल्याला जे ज्ञान मिळालेलं आहे ते आपण आता कीर्तनरूपाने मांडलं पाहिजे. छोट्या-छोट्या भजनांमध्ये तो सहभागी होत होता, त्यामुळे भजन त्याला म्हणता येत होतं. कीर्तनाआधी सगळं गाव झाडून काढायचं, रस्ते झाडून काढायचे आणि रात्री कीर्तन करायचं असा गाडगेबाबांचा शिरस्ता होता. हजारो लोक त्या कीर्तनाला जमत होते. त्यासाठी लोकांना सांगायची आणि दवंडी द्यायची गरज नव्हती. गाडगे महाराज स्वच्छता करायला लागले की लोकांना माहीत व्हायचं आणि लोक लगेच रात्री कीर्तनाला यायचे. ''गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला'' ही त्यांची कीर्तन ओळ प्रसिद्ध होती. या कीर्तनामध्ये ते लोकांना वेगवेगळे विषय सांगत होते. चुकीच्या चालीरीती आहे त्या बंद करण्याविषयी सांगत होते. दारू न पिण्याविषयी तसेच चुकीच्या चालीरीती आहेत, त्या बंद करण्याविषयी गाडगेबाबा लोकांना सांगत होते. देवाच्या कृपेसाठी  कोंबडे, बकरे कापू नका, कर्ज काढू नका, खरा देव देवळात नाही तो माणसात आहे, आंधळ्या-पांगळ्या लोकांमध्ये. त्यांची सेवा केल्यास आपोआप ईश्वरसेवा घडते.  भुकेलेल्या अन्न द्या, तहानलेल्या पाणी द्या, गरजवंताला मदत करा, पशूंची हत्या करू नका आणि कसाईला विकू नका, यासारखे अत्यंत महत्त्वाचे उपदेश कीर्तनामधून सामान्य माणसाला गाडगेबाबा करत होते. सगळ्यांना ते पटत होतं. लोकांशी प्रश्न-उत्तर रूपाने बोलत होते. लोकांशी जास्तीत जास्त चर्चा करत होते. लोकांना ते म्हणायचे, अरे देव किती आहेत? एकच आहे! देव माणसांमध्ये आहे आणि त्याची सेवा करणं अत्यंत गरजेचे आहे.

हळूहळू सगळ्या समाजामध्ये गाडगेबाबांची ख्याती निर्माण होऊ लागली.

आता गाडगेबाबा हे नाव संपूर्ण महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण भारताला परिचित होऊ लागलेलं होतं. हजारो लोक न सांगता त्यांच्या कीर्तनाला येत होते, समजून घेत होते आणि जीवन बदलून घेत होते. गाडगेबाबा कुणालाच पाया पडू देत नव्हते. कीर्तन झालं की गाडगेबाबा अंधारामध्ये निघून जायचे. लोक म्हणायचे बाबा चमत्कार करतात, गायब होतात. पण तसं काही नव्हतं. त्यांना लोकांनी त्यांच्या पाया पडणे पसंत नव्हतं, म्हणून ते कीर्तनानंतर निघून जात असत. गाडगेबाबा यांची कीर्तने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अतिशय लक्षपूर्वक ऐकायचे. आचार्य अत्र्यांसारख्या साहित्यिकांसह कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या शिक्षण महर्षींनीही गाडगेबाबांचे कीर्तन ऐकले आणि समजून घेतले. गाडगेबाबांच्या कीर्तनांचे तत्कालीन समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर चाहते झालेले होते. अनेक लोकांनी गाडगेबाबांना सामाजिक कार्यासाठी देणग्या द्यायला सुरुवात केली. त्या देणग्यांतून त्यांनी धर्मशाळा बांधल्या. पंढरपूर, नाशिक, देहू, त्र्यंबकेश्वरसह अनेक ठिकाणी गाडगेबाबांनी धर्मशाळा बांधल्या. त्यांनी फक्त तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीच नाही तर ज्या-ज्या ठिकाणी दवाखाने आहेत तेथेही धर्मशाळा उभारण्याचा प्रयत्न केला. पूर्णा नदीवरती गाडगेबाबांनी सुंदर घाट बांधला. नाशिकला सदावर्त चालवलं. मूर्तीजापूर, राहुरी, नागरवाडी या ठिकाणी गोरक्षण चालवलं. जवळपास ६० ते १०० च्या आसपास आश्रम त्यांनी उभारले आणि हे सर्व आश्रम मराठा ट्रस्टला दिले.

एकदा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शाळेचे अनुदान सरकारने बंद केलं. त्यावेळेला बाळासाहेब खेर हे संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते आणि त्यांना भेटायला कर्मवीर भाऊराव पाटील आणि हे गाडगेबाबा गेले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर उठले बाहेर आले आणि त्यांनी त्यांना साष्टांग दंडवत घातला आणि बाबा तुम्ही कशाला आलात, आम्ही आलो असतो तुमच्या भेटीला असे मुख्यमंत्री खेर बोलले. या प्रसंगातून लक्षात येते की, गाडगेबाबा किती महान व्यक्तिमत्त्व होते. मुख्यमंत्री खेर यांना गाडगेबाबा म्हणाले, ''अनुदान बंद झाले तर गरिबांची मुलं विस्थापित होतील. पाठीवर मारा पण पोटावर मारू नका. तुम्ही यांचे अनुदान चालू करा'', असं गाडगेबाबा म्हटल्यानंतर त्यांनी ते

अनुदान चालू केलं. गाडगेबाबांच्या शब्दाला इतकं महत्त्व होतं.

गाडगेबाबांचा मुलगा गोविंद हा आठ-दहा वर्षांचा असतानाच त्याचं लग्न करायचं ठरवलं. यास गाडगेबाबांचा विरोध होता, पण त्या काळामध्ये ती प्रथा होती आणि म्हणून गाडगेबाबांनी त्यांच्या पत्नीला विरोध केला नाही. मुलगा शिकायला पुण्याला आला होता. त्याचं लग्न मुंबईमध्ये झालं. आता तो १८ वर्षांचा झालेला होता आणि त्याला कुत्रा चावला. तो आजारी पडला. बाबा त्यावेळेला रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण या गावी त्यांचे कीर्तन करत होते. एक माणूस धावत आला. त्याच्याकडून शब्द फुटत नव्हता आणि तो रडत होता की काय सांगायचं तुम्हाला आता बाबा? बाबा म्हणाले, ''काय झालं ते सांग, काय हरकत नाही!'' त्या माणसाने कसंतरी सांगितलं की, ''बाबा तुमचा मुलगा गोविंद हा कुत्रा चावून वारला आहे.'' बाबा एक मिनीट स्तब्ध झाले आणि पुन्हा कीर्तनाला सुरुवात केली. अभंग सुरू केला, ''असे गेले कोट्यान्कोटी, काय रडू एकासाठी?... गोपाला... गोपाला देवकीनंदन गोपाला! दु:खातही सामाजिक प्रबोधनाचे महत्कार्य निरंतर सुरू ठेवणारे गाडगेबाबा त्यामुळेच अद्वितीय समाजसुधारक ठरतात.

गाडगेबाबांचे वय हे ८० वर्षांचे झालेलं होतं. त्यांनी जवळपास ५० वर्षे समाजाची सेवा केलेली होती आणि आता अधून-मधून ते आजारी पडत होते. त्यांचे शेवटचं कीर्तन हे नोव्हेंबर १९५६ साली झालं. बांद्र्याला (मुंबई) पोलीस लाईन आहे, त्या पोलीस लाईनमध्ये शेवटचं झालं आणि नंतर ते आजारी पडले. आजारी पडल्यानंतर मुंबईच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये त्यांना ॲडमिट करण्यात आले. तिथे थोडे बरं वाटल्यानंतर ते अमरावतीला आले. अमरावतीला आल्यानंतर पुन्हा त्यांना आजारी पडल्यासारखं वाटू लागलं आणि त्यांनी सांगितले की आता मला नागरवाडीला जायची इच्छा आहे. बाबांनी सांगून ठेवलं होतं की, ''ज्या गावामध्ये माझा मृत्यू होईल, त्याच गावामध्ये मला जाळा. त्याच गावामध्ये माझा शेवट करा. हे संपूर्ण विश्व हेच माझं गाव आहे. संपूर्ण जनता हेच माझे भाऊबंद आहेत. त्यामुळे वेगळं मला काही करण्याची गरज नाही.'' गाडगेबाबा नागरवाडीला निघाले. १५-२० किलोमीटर पुढे गेले आणि पेटी नदीच्या काठाला वलगाव नावाचं गाव आहे, तेथे पुलावरती

गाडी आली आणि त्याक्षणी गाडगेबाबांचा श्वास कायमसाठी स्थिरावला. गाडगेबाबांनी जगाचा निरोप घेतला. ती तारीख होती २० डिसेंबर १९५६.

गाडगेबाबा समाजासाठी जगले. सेवा देत राहिले. स्वच्छता करत राहिले. कीर्तन सांगत राहिले. धर्मशाळा बांधत राहिले. गोरगरिबांना अन्नदान करत राहिले. आंधळ्या-पांगळ्यांची सेवा करत राहिले. ज्ञानाचे भांडार सगळ्यांना देत राहिले, अखंडपणे काम करत राहिले आणि एक दिवशी या सर्व जगाला सोडून गेले.

**गोपाला... गोपाला... देवकीनंदन गोपाला!**

V



शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील



# शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील

- इ. स. २२ सप्टेंबर १८८७ ते इ. स. ९ मे १९५९ -

''रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे.
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे.''

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वडिलांचे नाव पायगौंडा तर आईचे नाव गंगाबाई होते. पाटील घराणे मूळचे कर्नाटक राज्यात दक्षिण कन्नड जिल्ह्यातील मूडब्रिदी गावचे. कर्मवीर यांचे पूर्वज चरितार्थ चालविण्यासाठी महाराष्ट्रात आपल्या कुटुंबकबिल्यासह आले. त्यांचे पूर्वीचे आडनाव देसाई होते. महाराष्ट्रात ते सांगली जिल्ह्यातील एतवडे या गावी स्थायिक झाले. पुढे त्यांच्या घराण्यात पाटीलकी आल्याने त्यांचे देसाई हे आडनाव बदलून पाटील असे सर्वश्रुत झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात बाहुबली डोंगरावर भगवान पार्श्वनाथाचे सुंदर व सुबक स्मारक आहे. तेथे डोंगरालगतच कुंभोज नावाचे छोटेसे टुमदार गाव आहे. या गावातच दि. २२ सप्टेंबर १८८७ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला.

कर्मवीरांचे बालपण याच कुंभोज गावी गेले. पूर्वीचे देसाई घराणे काहीसे कर्मठ होते. पण भाऊराव मात्र बंडखोर होते. अनिष्ट चालीरितींसह रुढी परंपरा ते अभ्यासपूर्ण विरोध करण्यात पटाईत होते. विशेष म्हणजे अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. घरच्यांच्या विरोधाला न जुमानता भाऊराव पाटील अस्पृश्य मुलांमध्ये खेळायला जात. अस्पृश्यांवर तत्कालीन सामाजिक परिस्थितीत होणारा अन्याय भाऊरावांना कधीच सहन झाला नाही. अस्पृश्य समाजातील लोकांना पाणी दिले जात नाही म्हणून त्यांनी एका विहिरीचा रहाटच मोडून

टाकला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगली जिल्ह्यातील दहीवडी, विटा व आसपासच्या गावांमध्ये झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी कोल्हापूर गाठले. तेथे राजाराम हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. कोल्हापुरात भाऊरावांच्या निवास व भोजनाची व्यवस्था शाहू बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती. याच काळात तरण्याबांड भाऊराव पाटलांवर राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी सामाजिक विचारांचा प्रभाव पडला.

कर्मवीर लहानपणापासूनच बेडर वृत्तीचे आणि उत्तम जलतरणपटू होते. त्यांच्या गावी कुंभोज येथील सत्यापाचे बंड खूप गाजले होते. कुंपणाच्या काट्या तोडणाऱ्या एका दलित गरोदर बाईला एका माणसाने जनावरासारखे मारले होते. या प्रकरणामुळे तेथील सत्याप्पा भोसले या तरुणाने रागाच्या भरात संबंधिताला ठार केले व तो फरार झाला. तो कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आजोबांच्या उसाच्या शेतात लपून बसला. यादरम्यान सत्याप्पाकडूनच कर्मवीरांना सर्वधर्म समभाव, अन्यायाचा प्रतिकार आणि सत्यासाठी कुठलीही तडजोड न करण्याची शिकवण मिळाली. कर्मवीर या सत्याप्पाच्या अंगाखांद्यावर खेळले आणि त्याच्याकडूनच माणुसकीचा धर्महही ते शिकले.

कोल्हापुरात शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटलांवर राजर्षी शाहू महाराजांच्या समाजशील विचारांचा प्रभाव पडू लागला होता. राजर्षी शाहू म हाराज हे भविष्यकाळाचा विचार करणारे राजे होते. त्यांनी महाराष्ट्रात आपल्या आचार-विचारातून सम्यक सामाजिक विकासासाठी प्रयत्न केले. सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. समाज प्रबोधनाच्या चळवळीमध्ये एक सुधारक म्हणून राजर्षी शाहू महाराज यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सन १९३२ मध्ये पुणे येथे येरवडा कारागृहात महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला. या ऐक्याच्या स्मरणार्थ 'युनियन बोर्डिंग'ची स्थापना भाऊरावांनी पुणे येथे केली. तसेच १९३५ मध्ये त्यांनी 'महात्मा फुले अध्यापक विद्यालय' सुरू केले. शिक्षणाची चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे व त्यासाठी योग्य शिक्षक घडवणे हा या अध्यापक विद्यालयाच्या स्थापनेमागील एक प्रमुख उद्देश होता.

शिक्षण सुरू असताना एकदा कर्मवीर सुट्टीमध्ये सांगली जिल्ह्यातील

इस्लामपूरला आले. कर्मवीरांचे आईवडील त्यावेळी इस्लामपूरलाच वास्तव्यास होते. गावामध्ये फेरफटका मारत असतानाच ते आपल्या शाळेकडे फेरफटका मारायला गेले. पावसाळ्याचे दिवस असल्याने वातावरणात गारवा होता. वर्गाबाहेर एक मुलगा थंडीने कुडकुडत बसला होता. त्याला वर्गाबाहेर बसण्याचे कारण विचारले असता तो अस्पृश्य असल्याचे त्याने सांगितले. या घटनेने भाऊरावांचा कंठ दाटून आला. त्यांनी त्या मुलाला आपल्या घरी नेले आणि त्याला स्वतःजवळ बसवून जेऊ घातले. भाऊरावांच्या आईने त्यांना फुकणीने मारहाण केली, पण मागे हटतील ते भाऊराव कसले? त्यांनी त्या मुलाला थेट कोल्हापूरला घेऊन जात मिस क्लार्क होस्टेलमध्ये भरती करत त्याच्या शिक्षणाची सोय केली. पुढे तो मुलगा विधी मंडळाचा सदस्य झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूकनायक या वर्तमानपत्राचाही तो काही काळ संपादक म्हणून काम करत होता. कालौघात कर्मवीरांच्या शैक्षणिक वटवृक्षाला समतेची गोड फळे लगडली.

शिक्षणाशिवाय बहुजनांचा उद्धार होऊन सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही, हे भाऊरावांनी आपल्या तारुण्यातच हेरले होते. त्यासाठी अनेक विषमतावादी घटना त्यांच्यासाठी एक संदर्भ ठरल्या. बहुजनांच्या शिक्षणासाठी भरीव कार्य करत त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्याची भीष्म प्रतिज्ञाच भाऊरावांनी करत आपल्या कार्याला सुरुवात केली. शिक्षणानंतर भाऊराव पाटील साताऱ्यात शिकवण्या घेऊ लागले. याच काळात त्यांनी मदवान मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर आदी मंडळींबरोबर दुधगाव येथे दुधगाव शिक्षण मंडळ स्थापन केले. याच संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी एक वसतिगृहसुद्धा सुरू केले. पुढे याच ठिकाणी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची बीजे रोवली गेली.

शिक्षणाचा यज्ञ प्रज्वलित ठेवण्यासाठी त्यांनी प्रसंगी पडेल ते काम केले. यादरम्यान त्यांनी ओगल्यांच्या काच कारखान्यात व किर्लोस्करांच्या नांगराच्या कारखान्यातही काही काळ रोजंदारी केली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्याशीही त्यांचा या काळात जवळून संबंध आला. भाऊराव पाटील एक चिकित्सावादी समाजसुधारक व प्रगल्भ शिक्षण प्रसारक होते. सर्वसामान्य

जनतेला शिक्षणाची दारे उघडल्यास त्यांची प्रगती वेगाने होऊ शकेल, असा त्यांचा आशावाद होता. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची वाटचाल करण्यास सुरुवात केली होती. यातूनच त्यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा जिल्ह्यातील काले या गावी केली. मागास व गरीब मुलांना विनासायास शिक्षण घेता यावे, यासाठी त्यांनी 'कमवा व शिका' ही योजना अस्तित्वात आणली. याचा लाभ हजारो दलित समाजातील मुलांना प्रकर्षाने झाला. महाराष्ट्र राज्यात आजमितीस या संस्थेच्या चार जिल्ह्यांमध्ये व कर्नाटक राज्यात मिळून ६७५ शाखा आहेत. त्यामध्ये २० पूर्वप्राथमिक, २७ प्राथमिक, ४३८ माध्यमिक, ८ आश्रमशाळा, ८ अध्यापक विद्यालय, २ आयटीआय व ४१ महाविद्यालयांचा समावेश आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेसाठी डॉ. नागनाथअण्णा नायकवाडी यांनी त्यावेळी १ लाख ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली होती. रयत शिक्षण संस्थेचे मुख्यालय सातारा येथे असून, या संस्थेची उद्दिष्टे अशी आहेत की, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजघटकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे. मागासलेल्या वर्गांतील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे, विविध जातीधर्मातील विद्यार्थ्यांमध्ये स्नेह व प्रेमभाव निर्माण करणे, अनिष्ट रुढी तसेच परंपरांना फाटा देत शाश्वत विकासाबाबत जागरूकता वाढविणे, सांघिक शक्तीचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून पटवून देणे, विद्यार्थ्यांना स्वावलंबी, काटकसरी, चारित्र्यवान व उत्साही बनविण्याचा प्रयत्न करणे, बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी जरूर पडेल तसे संस्थेचे कार्यक्षेत्र व्यापक करणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भाऊराव पाटील यांनी केवळ क्रमिक शिक्षणच नव्हे, तर समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली.

साताऱ्यामध्ये निराश्रीत विद्यार्थ्यांसह दूरवरून शिक्षणासाठी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांसाठी भाऊराव पाटील यांनी एक मोठे वसतिगृह स्थापन केले. हे वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना त्यांच्या पत्नीचे मंगळसूत्र व इतर दागिनेही विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी वसतिगृहे व शिक्षण संस्था चालविण्याचा यशस्वी प्रयोग केला. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी

लक्ष्मीबाई यांची अतिशय मोलाची साथ लाभली. २५ फेब्रुवारी, इ.स. १९२७ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते या वसतिगृहाचे श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस असे नामाभिधान केले गेले. महात्मा गांधी यांनी आपल्या हरिजन सेवक फंडातून या वसतिगृहासाठी ५०० रुपयांची मदत सुरू केली. दि. १६ जून १९३५ रोजी रयत शिक्षण संस्था नोंदणीकृत झाली.

याच वर्षी साताऱ्यात भाऊराव पाटील यांनी सिल्व्हर ज्युबिली कॉलेज सुरू केले. बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी भाऊराव पाटील यांना साताऱ्यात हायस्कूल काढण्यासाठी ४००० हजार रुपयांची मदत केली व बडोद्यात महाराजांच्या राज्यारोहणास ६० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून प्राप्त देणगीतून भाऊराव पाटील यांनी देशातील पहिले कमवा व शिका या तत्त्वावर आधारीत पहिले फ्री रेसिडेन्शियल हायस्कूल सातारा येथे सुरू केले आणि त्यास महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. यानंतर कर्मवीर भाऊराव गायकवाड यांच्या अथक परिश्रमातून शाळांची मालिकाच महाराष्ट्रभर सुरू झाली.

इ.स. १९४७ साली भाऊराव पाटील यांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना, तर १९५४ साली कराड येथे सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. शाळा व महाविद्यालयांसाठी प्रशिक्षित शिक्षकांची उणीव भासू लागल्याने भाऊराव गायकवाड यांनी महात्मा फुले अध्यापक विद्यालयाची स्थापना करत १९५५ मध्ये सातारा येथे मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाने आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले. प्रत्येक गावात शाळा, बहुजन समाजातील शिक्षक व शिक्षक प्रशिक्षण या त्रिसूत्रीचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भाऊराव पाटील यांचे महान व पथदर्शी कार्य लक्षात घेता महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना कर्मवीर ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाने त्यांचा इ.स.१९५९ मध्ये सन्माननीय डी. लिट. ही पदवी दिली होती. रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. ह. रा. महाजनी यांनी

'महाराष्ट्राचे बुकर टी. वॉशिंग्टन' अशा यथार्थ शब्दांत कर्मवीरांचे वर्णन केले आहे. सातारा येथे कर्मवीरांचे समाधिस्थान व कर्मवीर स्मृतिभवन आहे. तेथे भाऊराव पाटलांच्या स्मृती जतन करण्यात आल्या आहेत. अशा या शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या आधुनिक भगीरथाची प्राणज्योत ९ मे, इ.स. १९५९ रोजी मालवली.

V


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

- इ. स. १४ एप्रिल १८९१ ते इ. स. ६ डिसेंबर १९५६ -

**सार्वभौम भारताचे पहिले कायदामंत्री, भारताच्या संविधानाचे शिल्पकार, एक तत्त्वनिष्ठ न्यायशास्त्रज्ञ, कुशल अर्थशास्त्रज्ञ, मुत्सद्दी राजकारणी, थोर तत्त्वज्ञ, ध्येयनिष्ठ समाजसुधारक, प्रगल्भ व चिकित्सक पत्रकार, हुशार वकील, दलित बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान व भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक म्हणजे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, मंदिर सत्याग्रह, शेतकऱ्यांचा कैवारी, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी भरीव कार्य, स्वातंत्र्य लढ्यात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या. समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजातील तळागाळातील घटकांचा त्यांनी प्रामुख्याने विचार केला. बहुजनांच्या शिक्षणासाठी, समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र संघर्ष केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा गुरुमंत्र त्यांनी दिला. अशा असामान्य कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा संक्षिप्त आढावा...**

डॉ. भीमराव आंबेडकर यांचा जन्म दि. १४ एप्रिल १८९१ रोजी झाला, ते त्यांच्या पालकांचे १४ वे आणि शेवटचे अपत्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुभेदार रामजी मालोजी सकपाळ यांचे सुपुत्र होते. बाबासाहेबांचे वडील ब्रिटिश सैन्यात सुभेदार होते. ते संत कबीरांचे अनुयायी होते आणि सुशिक्षित होते. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर जेमतेम दोन वर्षांचे असताना त्यांचे वडील

सेवानिवृत्त झाले, तर ते जेमतेम सहा वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण मुंबईत झाले. भारतात अस्पृश्य असणे काय असते याचा धक्कादायक अनुभव त्यांना शालेय जीवनात आला. १८९४ मध्ये बाबासाहेबांचे वडील रामजी सकपाळ साताऱ्याला आले. तेथील कॅम्प स्कूलमध्ये भिवाला दाखल केले. बाबासाहेबांचे गुरुजी होते कृष्णाजी केशव आंबेडकर जातीने देवरुखे ब्राह्मण असलेले कृष्णाजी गुरुजींवर मिशनऱ्यांचा प्रभाव होता. मधल्या सुट्टीत बाबासाहेब घरी जेवायला चालत जात. तो त्रास वाचावा म्हणून गुरुजी आपल्यातली भाजी भाकरी बाबासाहेबांना देत. त्यावेळी कोकणातील लोक गावांची नावे आडनावे म्हणून लावत. सुभेदार रामजी यांचे गाव दापोली जवळचे आंबडवे. आंबडवेकर आडनाव म्हणायला अवघड आहे, म्हणून कृष्णाजी गुरुजींनी बाबासाहेबांना त्यांचे आंबेडकर आडनाव लावले.

डॉ. आंबेडकर त्यांचे शालेय शिक्षण सातारा येथे घेत होते. तेव्हाच दुर्दैवाने डॉ. आंबेडकरांनी त्यांची आई गमावली आणि त्यांच्या आत्याने त्यांचे संगोपन केले. त्यानंतर ते मुंबईला राहायला आले. शालेय शिक्षणादरम्यान त्यांना अस्पृश्यतेचा अभिशाप सहन करावा लागला. १९०७ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांचा विवाह, बाजारातील एका खुल्या शेडमध्ये झाला. डॉ. आंबेडकरांनी एल्फिन्स्टन कॉलेज, बॉम्बे येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केले, ज्यासाठी त्यांना बडोदा संस्थानचे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून परदेशातील उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळत होती. इंग्लंड व अमेरिकेत पदवी संपादन केल्यानंतर त्यांना करारानुसार बडोदा संस्थानमध्ये जावे लागले. बडोद्यात असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. १९१३ या वर्षात डॉ. आंबेडकरांची उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्यासाठी विद्वान म्हणून निवड झाली, हा त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचा निर्णायक टप्पा होता.

त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकू धुत्रे (वलंगकर) व आई रुक्मिणी यांच्यासह रमाबाई दाभोळजवळील वंणद गावात नदीकाठी एका वस्तीत राहत. रमा लहान असतानाच त्यांच्या आई यांचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर

अजाण होते. काही दिवसात वडील भिकू यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत राहायला गेले. सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमराव नामक मुलासाठी वधू पाहत होते.

सुभेदारांना भायखळा मार्केटजवळ राहणाऱ्या वलंगकरांकडे लग्नाची मुलगी असल्याचे समजले. सुभेदारांना रमा पसंत पडली, त्यांनी रमाच्या हाती साखरेची पुडी दिली. रमाई व भीमरावांचे लग्न भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये इ.स. १९०६ या वर्षी झाले. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय १४ वर्षे तर रमाईचे वय ९ वर्षे होते. त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात लग्न मंडप तसेच पंचपक्वान्न जेवण, झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हे लग्न पार पडले. माता रमाई यांना जीवनात फारच दुःख सहन करावे लागले.

इ.स. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पाहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला, पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई. रमाईने अनेक मरणे पाहिली. प्रत्येक मरणाने तीही थोडी थोडी मेली. मरण म्हणजे काय कळत नव्हते त्या वयात आई वडिलांचा मृत्यू. इ.स. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू. इ.स. १९१४ ते १९१७ साली बाबासाहेब अमेरिकेला असताना रमेशचा मृत्यू. ऑगस्ट १९१७ मध्ये बाबांची सावत्र आई जिजाबाईचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबासाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. इ.स. १९२१ बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, व इ.स. १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहोचू दिली नाही. पती परदेशात

शिक्षणासाठी गेले. रमाई एकट्या पडल्या.. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या.. सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीमपर्यंत जात असत, बॅरिस्टराची पत्नी शेण वेचते म्हणून लोक नावे ठेवतील. म्हणून पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८.०० नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असत. मुलांसाठी उपास करत असत. अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करू लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत केली.

डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज मुंबई बंदरात आला. रमाईला नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती म्हणून त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी होती. डॉ. बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली. ते जवळ गेले. त्यांनी विचारले, रामू तू लांब का उभी राहिलीस? रमाई म्हणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतुर झाला असताना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नाही. मी तर तुमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातून १९१५ आणि १९१६ मध्ये अनुक्रमे एमए आणि पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते लंडनला रवाना झाले. तेथे त्यांना ग्रेज इन फॉर लॉमध्ये प्रवेश देण्यात आला आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये डी. एससीची तयारी करण्यासही परवानगी देण्यात आली. पण बडोद्याच्या दिवाणांनी त्यांना भारतात परत बोलावले. पुढे त्यांनी बार-अॅट-लॉ आणि डी. एस्सी. पदवीदेखील मिळवली. त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठातही काही काळ शिक्षण घेतले.

सन १९१६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जाती-त्यांची व्यवस्था, उत्पत्ती आणि विकास हा शोध निबंध वाचला. १९१६ मध्ये त्यांनी भारताचा राष्ट्रीय लाभांश-एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रबंध लिहिला आणि पीएच. डी. पदवी मिळवली. ''ब्रिटिश भारतातील प्रांतीय अर्थव्यवस्थेची उत्क्रांती'' या शीर्षकाखाली आठ वर्षांनंतर हा प्रबंध प्रकाशित झाला. ही सर्वोच्च पदवी प्राप्त केल्यानंतर, नंतर ते भारतात परतले आणि बडोद्याच्या महाराजांचे लष्करी सचिव म्हणून त्यांना नियुक्त करण्यात आले. या काळात बडोदा संस्थानांतील सवर्णांकडून मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. तेथील सर्वच सवर्ण अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हेटाळणी करण्यात आली. तेथील वागणुकीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप अस्वस्थ झाले. सम्यक सामाजिक क्रांतीशिवाय आपल्या समाजबांधवांना बरोबरीने जगण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही आणि त्यासाठी आपल्याला प्रचंड अभ्यास करून सामाजिक चळवळीची बांधणी करावी लागेल, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी अचूक हेरले. नोव्हेंबर १९१७ मध्ये ते मुंबईला निघून गेले. अस्पृश्यतेच्या कारणास्तव त्यांना दिलेल्या अयोग्य वागणुकीमुळे त्यांना सेवा सोडणे भाग पडले.

डॉ. आंबेडकर मुंबईला परतले आणि सिडनहॅम कॉलेजमध्ये राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांचे वाचन चांगले असल्याने ते विद्यार्थ्यांमध्ये खूप लोकप्रिय होते. पण लंडनमध्ये कायदा आणि अर्थशास्त्राचे शिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९२१ मध्ये त्यांनी आपला प्रबंध लिहिला. ''ब्रिटिश भारतातील इम्पीरियल फायनान्सचे प्रांतीय विकेंद्रीकरण'' आणि त्यांनी लंडन विद्यापीठातून एम.एससी.ची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठात काही काळ घालवला. १९२३ मध्ये त्यांनी डी.एससी. ही पदवी घेण्यासाठी ''प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन अँड सोल्युशन'' हा प्रबंध सादर केला आणि त्याचवर्षी म्हणजे १९२३ मध्ये त्यांना वकिलांच्या बारमध्ये निमंत्रित केले गेले.

सन १९२४ मध्ये इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी पीडित- शोषित

असलेल्या वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी एक संघटना सुरू केली. या संघटनेचे 'प्रेसिडेंट' सर चिमणलाल सेटलवाड होते तर अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. शिक्षणाचा प्रसार करणे, आर्थिक परिस्थिती सुधारणे आणि निराश वर्गाच्या तक्रारींचे प्रतिनिधित्व करणे ही या संघटनेची तत्कालीन उद्दिष्टे होती. नवीन सुधारणांच्या संदर्भात पीडित- शोषित वर्गाच्या समस्यांमागची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी, ३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. सन १९२८ मध्ये ते गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, बॉम्बे म्हणजेच मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये प्राध्यापक झाले आणि १ जून १९३५ रोजी ते त्याच महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. १९३८ मध्ये राजीनामा देईपर्यंत ते याच पदावर राहिले.

दरम्यानच्या काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा बडोदा संस्थानातून नोकरी सोडत मुंबई गाठली होती, तेव्हाच सामाजिक चळवळींच्या माध्यमातून व्यापक सामाजिक सुधारणांची मुहूर्तमेढ रोवण्याचे त्यांनी ठरविले. बडोदा संस्थानात असतानाच त्यांचे वडील रामजी आंबेडकर यांची तब्येत बरी नसल्याची तार बाबासाहेबांना आली. ते गावी जाण्यासाठी निघाले. मात्र, प्रवासात त्यांना अस्पृश्यतेचा सामना करावा लागला. बैलगाडीवाल्याने बाबासाहेबांना गाडीतून उतरवून दिले. प्रवासात डोहातील पाणी पिण्याची नामुष्की त्यांच्यावर आली. जनावरं जे पाणी पितात, ते पाणी जित्याजागत्या माणसांनाही न देणाऱ्या या व्यवस्थेला वठणीवर आणायचे असेल तर आपण सामाजिक चळवळींतून बंड करून उठले पाहिजे, असा निर्धार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला.

दि. २० मार्च १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह करून बाबासाहेबांनी समाजात बंधुता, समता वाढीस लागावी यासाठी प्रयत्न केले. आजही महाडचा हा ऐतिहासिक चवदार तळ्याचा सत्याग्रह सर्वांनाच लक्षात आहे. पाच हजार बांधवांना आपल्या सोबत घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचं चवदार तळं गाठलं आणि त्या तलावाचं पाणी पिऊन हिंदू धर्मातला जातीभेद नष्ट करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललं. महाडच्या चवदार तळ्याचं पाणी त्या काळी समाजातल्या काही प्रतिष्ठित घटकांसाठीच मर्यादित होतं. इतर कोणीही तिथं

जाऊ शकत नसे. ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निदर्शनास आली. त्यात त्यांना त्यावेळच्या उच्च घटकातल्या काही महत्त्वाच्या व्यक्तींचीही साथ मिळाली.

त्याकाळी महाड नगरपालिकेचे प्रमुख सुरेंद्रनाथ टिपणीस यांनी सर्व सरकारी मालमत्ता समाजातल्या सर्व घटकांना खुली आहेत, कोणीही सरकारी मालमत्तेवर आपला दावा सांगू शकत नाही, अशी भूमिका घेतली. त्यानंतर टिपणीसांच्याच बरोबरीने अनंत चित्रे, गंगाधर सहस्त्रबुद्धे अशा समाजातल्या त्याकाळच्या प्रतिष्ठित आणि पुरोगामी विचारांच्या व्यक्तींनीही टिपणीस यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. बाबासाहेबांना तिथं सभा घेण्यासाठी आमंत्रित केलं गेलं. तिथं पोहोचल्यावर आधी महाडच्या चवदार तळ्याचं पाणी बाबासाहेब यांनी आपल्या ओंजळीनं प्यायलं आणि मग शेकडो कार्यकर्त्यांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह ऐतिहासिक केला.

यावेळेस बोलताना, ''चवदार तळ्याचा सत्याग्रह हा आम्हीही इतरांप्रमाणेच माणसं आहोत, हे सिद्ध करण्याकरिता केला'' असल्याचं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. पुढे बाबासाहेब म्हणाले होते की, ''चवदार तळ्याचं पाणी प्यायल्याने तुम्ही किंवा मी अमर होणार नाही. आजवर आपण या चवदार तळ्याचं पाणी प्यायलो नव्हतो, म्हणून काही मेलो नव्हतो. चवदार तळ्याचा सत्याग्रह हा बंधुता वाढीस लागावी आणि जातीभेदाच्या भिंती संपुष्टात याव्यात यासाठी केलेला सत्याग्रह आहे'' असं सांगितलं होतं. या सत्याग्रहानंतर हा दिवस समता दिन किंवा सामाजिक सबलीकरण दिन म्हणूनही ओळखला जातो.

अस्पृश्यता निर्मूलनाच्या प्रयत्नात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३ मार्च १९३० रोजी नाशिकच्या काळाराम मंदिरात सत्याग्रह केला. त्या काळात प्रचलित असलेल्या जाचक जातीय रुढींना आव्हान देणे हा या चळवळीचा उद्देश होता. सत्याग्रहादरम्यान, आंबेडकरांनी त्यांच्या १५,००० दलित अनुयायांसह मंदिरात शांततापूर्ण आंदोलन केले. सत्याग्रहाने अत्याचारित जातींना जागृत करण्यात योगदान दिले कारण आंबेडकरांना माहीत होते की केवळ मंदिर प्रवेशाने खोलवरचे प्रश्न सुटणार नाहीत. काळाराम मंदिर सत्याग्रह हा पहिला

नव्हता. याआधी आणखी दोन प्रयत्न झाले. एक अमरावतीमध्ये १९२८ मध्ये आणि दुसरा पुण्यात ऑक्टोबर १९२९ मध्ये. सार्वजनिक सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी बॉम्बे प्रेसिडेन्सी सरकारने काळाराम मंदिराभोवती फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १४४ लागू केले होते. एका महिन्यानंतर, ७ एप्रिल रोजी रामनवमीच्या दिवशी आंबेडकरांनी २०० स्वयंसेवकांसह मंदिरात मिरवणूक काढली, कारण धार्मिक कार्यक्रमात दलितांच्या सहभागावर काही निर्बंध लादण्यात आले होते. काही दिवसांनंतर, ९ एप्रिल रोजी, उच्च जातीच्या सदस्यांनी शांततापूर्ण आंदोलकांवर हल्ला केला, ज्यामुळे राज्यभरात दलितांच्या सत्याग्रहादरम्यान प्रतिकूल हल्ले झाले.

आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे आंदोलकांनी अहिंसा पाळली. आणखी तीन वर्षांच्या संघर्षानंतर आणि काही कायदेशीर खटल्यांनंतरही दलितांसाठी मंदिराचे दरवाजे बंदच राहिले. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेला हा शेवटचा मंदिर सत्याग्रह होता. डॉ. आंबेडकरांनी १९३३ मध्ये पुन्हा सत्याग्रह करण्याची कल्पना नाकारली. डॉ. आंबेडकर यांनी त्यांचे सहकारी भाऊराव गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात समाजाचे प्राधान्य शिक्षण आणि राजकारण असायला हवे. काळाराम मंदिर सत्याग्रह १९३५ पर्यंत चालू होता. जातीय भेदभावाच्या विरोधात लढण्याच्या चळवळीचा परिणाम म्हणून दलितांना मंदिरात प्रवेश करण्यास आणि मंदिराच्या विहिरीतून पाणी काढण्यास परवानगी देण्यात आली. अखेर दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे पीडित-शोषित वर्गाची प्रांतीय परिषद झाली. या परिषदेत त्यांनी एक घोषणा करून हिंदूंना हादरा दिला. ''मी हिंदू धर्मात जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही'' त्यांच्या हजारो अनुयायांनी त्यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला. १९३६ मध्ये त्यांनी बॉम्बे प्रेसिडेन्सी महार परिषदेला मार्गदर्शन केले आणि हिंदू धर्माच्या त्यागाचा पुरस्कार केला.

पहिली गोलमेज परिषद १९३०-३१ मध्ये पार पडली. गोलमेज परिषदेच्या पहिल्या फेरीत महात्मा गांधी अनुपस्थित होते. डॉ. आंबेडकर मात्र उपस्थित होते व त्यांनी जातीप्रथेमुळे दलितांवर होणारा अन्याय तसेच दलितांची दुर्दैवी विपन्नावस्था ही कहाणी सगळ्यांसमोर मांडली होती. दुसऱ्या फेरीत ब्रिटिश

सरकारने जातीय निवाडा जाहीर केला, तेव्हा दलितांना स्वतंत्र मतदारसंघ मिळतील, हे जगाला कळले. महात्मा गांधीजींना दलितांसाठी वेगळी चूल मांडली जाणे मुळातच मान्य नव्हते. हिंदू समाजाची शकले पडणे, सवर्ण आणि दलित यांच्यात सदैव पक्की भिंत उभी राहणे, महात्मा गांधीजींना कदापि मान्य नव्हते. गांधीजींचा आणखी एक दावा होता, काँग्रेस पक्ष अवघ्या भारत वर्षाचे प्रतिनिधित्व करतो, तेव्हा डॉ. आंबेडकरांचा कुठला पक्ष जर दलितांची तरफदारी करण्यासाठी पुढे येत असेल तर ही घटनाही गांधीजींना न रुचणारी होती. परंतु, मी दलित म्हणून माझ्या जन्मापासून सर्व त्या भेदभावांची शिकार झालो आहे व म्हणूनच अस्पृश्य जातींच्या दुखण्या-गाऱ्हाण्यांना मीच वाचा फोडू शकतो, दलितांचा सच्चा प्रवक्ता या नात्याने या मंडळींची कैफियत मांडण्याचा, त्यांना न्याय मिळवून देण्याचा माझा हेतू आहे व हा हेतू सगळ्यांनी समजून घेण्याची गरज आहे, या आशयाचा बाबासाहेब आंबेडकरांचा युक्तिवाद सर्वार्थाने समर्थनीय होता.

नुकतीच चाळीशी ओलांडलेला एक बुद्धिवान दलित युवक, साठी उलटलेल्या सुप्रतिष्ठित वृद्ध नेत्याला आव्हान देत होता, हे दृश्य अनोखे होते. साहजिकच भारतात आंबेडकरांच्या विरोधात रान पेटले. महात्मा गांधीजीही हट्टाने उपोषण करण्यास सिद्ध झाले. ब्रिटिश शासनाचा दलितांसाठी वेगळी चूल मांडण्याचा पवित्रा गांधीजींना पूर्णतः अमान्य होता व म्हणूनच ब्रिटिश शासकांनी दलितांसाठी वेगळे, स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याचे धोरण रद्द करावे, या उद्दिष्टपूर्तीसाठी गांधीजी उपोषणाला बसले. स्वतंत्र मतदारसंघातून प्रतिनिधी व मतदार-दोन्ही दलित असतात, तर आरक्षित मतदारसंघातून मतदारांमध्ये सवर्ण व दलित अशा दोन्ही वर्गांचा समावेश असतो. प्रतिनिधी मात्र केवळ दलित राहतात. डॉ. आंबेडकरांसमोर हा पर्याय ठेवण्यात आला. बाबासाहेबांना परिस्थितीतले ताणतणाव कळून चुकले. महात्मा गांधींचे प्राण वाचविण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघांचा हट्ट सोडून द्यावा आणि आरक्षित मतदारसंघांचा पर्याय मान्य करावा, या दिशेकडे निर्णयाचा काटा झुकला. त्यांनी हाच निर्णय गांधीजींना कळविण्यास संमती दिली आणि हिंदू समाजात फूट पडणार नाही, सवर्णांकडून दलितांसाठी ७१ ऐवजी १४८ आरक्षित जागा सोडण्यात येतील, हा निवाडा

सर्वमान्य ठरला. गांधीजींनी उपोषण सोडले. पुणे कराराद्वारे या निवाड्यावर मान्यतेची मोहोर उठली.

दि. १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी पीडित- शोषित वर्गाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष या पक्षाची स्थापना केली. यामध्ये मुख्यतः कामगारांची संख्या मोठी होती. सन १९३८ मध्ये काँग्रेसने अस्पृश्य या नावामध्ये बदल करणारे विधेयक आणले. त्यावर डॉ. आंबेडकर यांनी टीका केली. त्यांच्या दृष्टिकोनातून नाव बदलणे हा समस्येवरचा उपाय नव्हता. सन १९४२ मध्ये, भारताच्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत कामगार सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सन १९४६ मध्ये ते बंगालमधून संविधान सभेवर निवडून आले. त्याच वेळी त्यांनी 'शुद्र कोण होते? हे आपले पुस्तक प्रकाशित केले.

स्वातंत्र्यानंतर, १९४७ मध्ये नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांची कायदा आणि न्याय मंत्री म्हणून नियुक्ती झाली. परंतु १९५१ मध्ये त्यांनी काश्मीर प्रश्न, भारताचे परराष्ट्र धोरण आणि हिंदू कोड बिल, याबाबत नेहरूंच्या धोरणावरून मतभेद व्यक्त करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यामधील त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून १९५२ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने, त्यांना LL.D ची पदवी बहाल केली. १९५५ मध्ये त्यांनी थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स हे आपले पुस्तक प्रकाशित केले. दि. १२ जानेवारी १९५३ रोजी उस्मानिया विद्यापीठाने, डॉ. बी. आर. आंबेडकर यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली.

''मी हिंदू म्हणून मरणार नाही'' ही १९३५ साली येवला इथे केलेली आपली घोषणा, त्यांनी अखेर २१ वर्षांनंतर खरी ठरवली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर इथल्या ऐतिहासिक समारंभात त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

सन १९५४ मध्ये नेपाळमध्ये काठमांडू इथे झालेल्या ''जागतिक बौद्ध धर्म परिषदेत'', बौद्ध भिक्खूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ''बोधिसत्व'' ही पदवी प्रदान केली होती. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर हयात असतानाच त्यांना बोधिसत्व ही पदवी बहाल करण्यात आली होती. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात

आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुधारणांमध्येही त्यांनी योगदान दिले. याशिवाय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेतही बाबासाहेबांनी मोलाची भूमिका बजावली. बाबासाहेबांनी हिल्टन यंग कमिशनसमोर मांडलेल्या संकल्पनेवर मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली होती. डॉ. आंबेडकरांचा हा दिमाखदार जीवन प्रवास, त्यांच्या अभ्यासू आणि कृतिशील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतो. सर्वात प्रथम, त्यांनी अर्थशास्त्र, राजकारण, कायदा, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान संपादन केले. शिक्षण घेताना त्यांना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागले. पण त्यांनी आपले आयुष्य केवळ वाचन-अभ्यास आणि ग्रंथालयात व्यतीत केले नाही. त्यांनी आकर्षक पगाराची उच्च पदे नाकारली, कारण ते शोषित वर्गातील आपल्या बधूंना विसरले नाहीत. त्यांनी आपले उर्वरित आयुष्य समता, बंधुता आणि मानवतेसाठी समर्पित केले. पिचलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन इतिहास पाहिल्यावर, त्यांचे मुख्य योगदान आणि त्यांची प्रासंगिकता अभ्यासणे आणि त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आणि योग्य आहे. एका मतप्रवाहानुसार तीन मुद्दे आजही अधिक महत्त्वाचे आहेत. भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय समाज आजही अनेक आर्थिक, सामाजिक समस्यांना तोंड देत आहे. या समस्या सोडवण्यामध्ये, डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कृती आपल्यासाठी मार्गदर्शक ठरतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी देशभरात महापरिनिर्वाण दिवस म्हणून पाळली जाते.

V



नेताजी सुभाषचंद्र बोस



# नेताजी सुभाषचंद्र बोस

- इ. स. २३ जानेवारी १८९७ ते इ. स. १८ ऑगस्ट १९४५ -

**नेताजी सुभाषचंद्र बोस हे एक प्रखर भारतीय राष्ट्रवादी होते, ज्यांच्या भारताप्रती देशभक्तीने अनेक भारतीयांच्या हृदयात छाप सोडली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस हे विलक्षण नेतृत्व कौशल्य आणि करिष्माई वक्ते असलेले सर्वात प्रभावशाली स्वातंत्र्यसैनिक मानले जातात. तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूंगा, जय हिंद आणि दिल्ली चलो या त्यांच्या घोषणा प्रसिद्ध आहेत. त्यांनी आझाद हिंद सेना स्थापन केली आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात समर्पित योगदान दिले. त्यांचे हे समर्पण त्यांच्या लढाऊ दृष्टिकोनासाठी आणि त्याच्या समाजवादी धोरणांसाठी ओळखले जाते.**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक (ओरिसा) येथे प्रभावती दत्त बोस आणि जानकीनाथ बोस यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील कटकमधील यशस्वी वकील होते आणि त्यांना ''राय बहादूर'' ही पदवी मिळाली होती. कटक येथील प्रोटेस्टंट युरोपियन स्कूल (सध्याचे स्टीवर्ट हायस्कूल) येथे त्यांचे शालेय शिक्षण आपल्या भावंडांप्रमाणेच झाले. प्रेसिडेन्सी कॉलेजमधून त्यांनी पदवी घेतली.

सुभाषचंद्र बोस यांच्यावर स्वामी रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा फार मोठा प्रभाव शालेय जीवनातच पडला होता. या दोघांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांचे वाचन त्यांनी शालेय जीवनात केले होते. मिशनरी शाळेत गोऱ्या व हिंदी विद्यार्थ्यांमध्ये करण्यात येणारा भेदाभेद आणि विवेकानंदांचे राष्ट्रवादी लिखाण यांमुळे सुभाषचंद्र बोस यांच्या मनात राष्ट्रप्रेम निर्माण झाले व पुढे गोऱ्यांच्या

उद्दाम वर्तनाचे (उदा., प्रा. ओटन) प्रसंग अधिकाधिक घडले तसतसे ते वाढत गेले. याउलट विवेकानंद-रामकृष्णांच्या ग्रंथांमुळे त्यांना अत्यंत उत्कट अशी धार्मिक ओढ वाटू लागली. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच ते कटक आणि नंतर कलकत्याला भेटणाऱ्या साधू, बैरागी, योगी इत्यादींना प्रश्न विचारून त्यांच्याकडून आपल्याला जीवनमार्ग सापडेल का, याचा शोध घेऊ लागले. ध्यान, हटयोग यातही त्यांना गोडी वाटू लागली. मात्र, विषयासक्तीवर पूर्ण नियंत्रण मिळवून साक्षात्कार प्राप्तीचा मार्ग दाखविणारा कोणी गुरू त्यांना या दोन्ही शहरांत भेटला नाही.

महाविद्यालयीन शिक्षणकाळातील प्रथम वर्ष संपल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत १७ व्या वर्षी ते आणि त्यांचे चारपाच मित्र गुरूच्या शोधार्थ निघाले. ते सर्वजण गया, काशी, हरिद्वार, हृषिकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी फिरले. परंतु, त्यांना अपेक्षित असलेला गुरू तर मिळाला नाहीच उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ, शिवाशीव इ. प्रकार पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. मात्र, विवेकानंदांच्या शिकवणुकीने त्यांची सम्यक मानवी व्यवहारावरील श्रद्धा दृढ झाली.

वयाच्या १६ व्या वर्षी स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण यांच्या कार्यांचे वाचन केल्यानंतर त्यांच्या शिकवणींचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर त्यांना त्यांच्या पालकांनी भारतीय नागरी सेवेची तयारी करण्यासाठी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात पाठवले. १९२० मध्ये त्यांनी नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली, परंतु एप्रिल १९२१ मध्ये, भारतातील राष्ट्रवादी गदारोळ ऐकल्यानंतर त्यांनी आपल्या उमेदवारीचा राजीनामा दिला आणि घाईघाईने भारतात परतले.

सुभाषचंद्र बोस भारतात आल्यानंतर महात्मा गांधींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीत सामील झाले, ज्याने इंडियन नॅशनल काँग्रेसला एक शक्तिशाली अहिंसक संघटना बनवली. चळवळीदरम्यान त्यांना महात्मा गांधींनी चित्तरंजन दास यांच्यासोबत काम करण्याचा सल्ला दिला होता, जे त्यांचे राजकीय गुरू बनले. त्यानंतर, ते युवा शिक्षक आणि बंगाल काँग्रेस स्वयंसेवकांचे कमांडंट बनले. त्यांनी स्वराज हे वृत्तपत्र सुरू केले. १९२७ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर, बोस काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस बनले आणि त्यांनी जवाहरलाल नेहरूंसोबत

स्वातंत्र्यासाठी काम केले. पुढे चित्तरंजन दास कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली. ब्रिटिश सरकारने सूडबुद्धीने खोटा आरोप लादून ऑक्टोबर १९२४ मध्ये त्यांना स्थानबद्ध केले. बंगाल प्रांतिक परिषदेमध्ये क्रांतिवीर गोपीनाथ सहा (जो पुढे फाशी गेला) याचा जाहीर गौरव करण्यात आला होता. परिषदेस स्वतंत्र पक्षाचे म्हणजे कौन्सिलमध्ये काम करणाऱ्या काँग्रेस गटाचे बहुसंख्य लोक होते. त्यांनीच बंगाल कौन्सिलचे कार्य अशक्य करून टाकले होते. त्यांना खच्ची करण्यासाठी फार व्यापक धरपकडी झाल्या व सर्वांवर दहशतवादी आंदोलनाशी संबंधित असल्याचे आरोप करण्यात आले.

सुभाषबाबूंना अलीपूर, बेऱ्हामपूर, कलकत्ता इ. शहरांतील तुरुंगात काही काळ ठेवून पुढे मंडालेसही पाठविण्यात आले. येथील कारावासात त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इ. विविध विषयांचे वाचन केले. दरम्यान चित्तरंजन दास यांचे सन १९२५ मध्ये निधन झाल्याचे त्यांना समजले. अशक्त प्रकृती व क्षयाचा विकार यांमुळे सुभाषबाबूंना सन १९२७ मध्ये मुक्त करण्यात आले. यानंतर भारतातील राजकीय परिस्थितीचा सुभाषबाबूंनी सहा महिने अभ्यास केला. त्यानंतर ते सक्रिय राजकारणात सहभागी झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही जवाहरलाल नेहरूंबरोबर त्यांची सन १९२८ मध्ये नियुक्ती झाली. दोघांनी मिळून सन १९२८ मध्ये इंडिया इंडिपेंडन्स यूथ लीगची स्थापना केली. त्याच वर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव काँग्रेस अधिवेशनात मांडला. जवाहरलाल यांच्यासह सुभाषबाबूंनी त्यास विरोध केला आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडावा असे सुचविले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या वेळी सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली.

गांधी-आयर्विन करारानंतर म्हणजेच सन १९३१ मध्ये त्यांची मुक्तता झाली व ते कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाले. भगतसिंग यांची फाशी वाचवू शकत नसल्यामुळे व प्रत्यक्ष काहीच सवलती न मिळाल्यामुळे गांधी-आयर्विन कराराला सुभाषबाबूंनी अत्यंत कडक शब्दांत जाहीर विरोध केला होता.

तेव्हापासून महात्मा गांधी व सुभाषबाबूंचे मार्ग भिन्न झाल्यासारखे दिसतात. जानेवारी १९३२ मध्ये सशस्त्र क्रांतिकारक चळवळीशी संबंध जोडून सरकारने त्यांना पुन्हा स्थानबद्ध केले; पण प्रकृतीच्या कारणास्तव तुरुंगातून मुक्त करताना त्यांना देशातून हद्दपार केल्याचे सांगण्यात आले. उपचारासाठी परदेशी जाणे त्यांना भाग होतेच. १९३३-३६ अशी तीन वर्षे ते व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे राहिले.

या काळात त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा सर्वांगीण आढावा घेतला. फॅसिझम व साम्यवाद या दोन विचारसरणींतील उपयुक्त गोष्टी एकत्र करून एक नवीन विचारप्रणाली अनुसरावी, असे त्यांचे मत होते. त्यांनी डी व्हॅलेरा, केमाल आतातुर्क अशा नेत्यांना भेटून त्या दृष्टीने चाचपणीही केली. याच युरोपच्या दौऱ्यात व्हिएन्ना येथे विठ्ठलभाई पटेलांचे सानिध्य त्यांना एप्रिल ते ऑक्टोबर १९३३ यादरम्यान लाभले. विठ्ठलभाईंनी आपल्या मृत्युपत्रामध्ये आपल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून सुभाषबाबूंना नेमले.

सन १९३८ मध्ये ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि त्यांनी राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना केली, ज्याने व्यापक औद्योगिकीकरणाचे धोरण तयार केले. तथापि, हे गांधीवादी आर्थिक विचारांशी सुसंगत नव्हते, जे कुटीर उद्योगांच्या कल्पनेला चिकटून होते आणि देशाच्या स्वतःच्या संसाधनांच्या वापरातून फायदा मिळवत होते. १९३९ मध्ये बोस यांनी गांधीवादी प्रतिस्पर्ध्याला पुन्हा पराभूत केल्यावर त्याची पुष्टी झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात सहा महिन्यांत युद्धाचा भडका उडेल, असे भाकीत त्यांनी केले. या निवडणुकीमुळे म. गांधी नाराज झाले. त्यांनी हा आपलाच पराभव आहे, असे मानले. बहुसंख्य सभासदांनी गांधीचे नेतृत्व मान्य केल्यामुळे सुभाषबाबूंनी एप्रिलमध्ये अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

यानंतर, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक हा भारतातील डाव्या विचारसरणीचा राष्ट्रवादी राजकीय पक्ष होता जो १९३९ मध्ये सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय काँग्रेसमध्ये एक गट म्हणून उदयास आला. ते काँग्रेसमध्ये डाव्या विचारांसाठी प्रसिद्ध होते. काँग्रेस पक्षातील सर्व मूलगामी घटकांना एकत्र आणणे हे फॉरवर्ड ब्लॉकचे मुख्य उद्दिष्ट होते. जेणेकरून समता आणि

सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करून भारताच्या पूर्ण स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना पसरवता येईल.

ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकच्या माध्यमातून सुभाषबाबू करीत असलेली जनजागृती काँग्रेसला रुचली नाही. काँग्रेसने सुभाषबाबूंविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून बंगाल प्रांतिक परिषदेतून त्यांची उचलबांगडी केली व पुढे तीन वर्षे कोणत्याही पक्षीय अधिकारपदासाठी निवडणूक लढविण्यावर त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. १९ आणि २० मार्च १९४० मध्ये फॉर्वर्ड ब्लॉक व किसान सभा यांचे संयुक्त अधिवेशन रामगढ येथे भरविण्यात आले व ६ एप्रिल १९४० पासून राष्ट्रीय आंदोलनाचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर दि. १८ जून १९४० च्या नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली; परंतु संकल्पित सत्याग्रहाच्या पूर्वीच त्यांना इंग्रजांकडून दि. २ जुलै १९४० रोजी स्थानबद्ध करण्यात आले. आपल्याला मुक्त केले नाही, तर अन्नत्याग करू, अशी धमकी त्यांनी इंग्रजांना दिली. सरकारने त्यांना कारागृहातून मुक्त करत त्यांच्या राहत्या घरात नजरकैदेत ठेवले. आपण अध्यात्म साधना करणार आहोत, असे भासवून त्यांनी एकांतवास पत्करला आणि २६ जानेवारी १९४१ रोजी वेषांतर करून भगतरामसह पेशावरमार्गे काबूल गाठले. तेथून ते जर्मनीत गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी हिंदी लोकांना ब्रिटिशांविरुद्ध लढ्यास प्रवृत्त केले आणि बर्लिन आकाशवाणीवरून ते देशबांधवांना सातत्याने आवाहन करीत राहिले.

जर्मनीमध्ये हिटलरच्या भेटीनंतर निराश न होता त्यांनी पुढे मुसोलिनीची भेट घेतली; तथापि मुसोलिनीची हंगामी सरकार स्थापण्याची सूचना त्यांना एकूण राजकीय परिस्थितीचा विचार करता स्वीकारार्ह वाटली नाही. म्हणून त्यांनी हिंदी लोकांना संघटित करण्यावर भर दिला. जर्मनीत एमिली शेंक्ल या ऑस्ट्रियन युवतीने त्यांची चिटणीस म्हणून काम स्वीकारले. सुभाषबाबूंनी तिच्याशी गुप्तपणे विवाह केला. त्यांना अनिता ही मुलगी झाली.

सुभाषबाबूंनी जर्मनी-इटलीमधील भारतीय सैनिकांना भेटून त्यांनी आपले मनोगत सांगितले व ब्रिटिशांविरुद्ध संघटित होण्याचे आवाहन केले. त्या वेळी जपानने ब्रिटिशांविरुद्ध रशियामध्ये आघाडी उघडली होती. बँकॉक येथे जून

१९४२ मध्ये भारतीयांची एक परिषद भरली होती. त्यात सुभाषबाबूंना पूर्व आशियात येऊन नेतृत्व करण्याची विनंती केलेली होती. त्याप्रमाणे जर्मनीहून जपानला येताना ते दक्षिण आफ्रिका-मादागास्करपर्यंत जर्मन यूबोटीने व पुढे सुमात्रापर्यंत जपानी पाणबुडीने गेले व पेनँग ते टोकिओ हा प्रवास त्यांनी दि. १६ मे १९४३ रोजी विमानाने केला.

जपान येथे आल्यानंतर त्यांनी स्वातंत्र्यासाठी देशाबाहेर दुसरी आघाडी तेथे उघडली. दि. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना करण्यात आली. सुभाषबाबू स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती झाले. या शासनाला जपान, जर्मनी, इटली, ब्रह्मदेश आदी अकरा राष्ट्रांनी मान्यता दिली. या सरकारने इंग्लंड-अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारून स्वतःची तिकिटे व नोटाही काढल्या. जपानने अंदमान, निकोबार व जित बेटांचा ताबा या सरकारकडे सोपविला. ब्रह्मदेशामधून आझाद हिंद सेना भारताच्या दिशेने पुढे गेल्या. इंफाळ येथे लढाईला तोंड फुटले; परंतु तेथे आझाद हिंद सेनेला नैसर्गिक आपत्तींमुळे माघार घ्यावी लागली. १२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगून आकाशवाणीवरून सुभाषबाबूंनी भाषण करून ब्रिटिशांशी कोणत्याही प्रकारचा समझोता न करण्याचे, फाळणी न स्वीकारण्याचे व लढा चालू ठेवण्याचे देशबांधवांना आवाहन केले. शिवाय युद्धात पराजय होत असतानासुद्धा नीतिधैर्य खचू न देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. जपान्यांच्या ताब्यात असलेले अंदमान घेतले आणि तेथे त्यांनी भारताचा ध्वज फडकावला. १९४४ च्या सुरुवातीस, आझाद हिंद फौज (INA) च्या तीन तुकड्यांनी ब्रिटिशांना भारतातून हाकलण्यासाठी भारताच्या ईशान्य भागांवर केलेल्या हल्ल्यात भाग घेतला. आझाद हिंद फौजेतील एक प्रमुख अधिकारी शाह नवाज खान यांच्या म्हणण्यानुसार, भारतात घुसलेल्या सैनिकांनी स्वतःला जमिनीवर टेकवले आणि आपल्या मातृभूमीच्या पवित्र मातीचे चुंबन घेतले. मात्र, आझाद हिंद फौजेचा भारत स्वतंत्र करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला.

दुसऱ्या महायुद्धादरम्यान स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाचा विकास म्हणजे आझाद हिंद फौज, ज्याला भारतीय राष्ट्रीय सेना किंवा INA म्हणूनही ओळखले जाते, त्याची निर्मिती सुभाषचंद्र बोस यांनी केली. आझाद हिंद फौजेत

सुमारे ४५,००० सैनिकांचा समावेश होता, ज्यात भारतीय युद्धकैदी तसेच आग्नेय आशियातील विविध देशांमध्ये स्थायिक झालेले भारतीय होते. रासबिहारी बोस, भारतातून पलायन केलेले आणि अनेक वर्षे जपानमध्ये वास्तव्य केलेले भारतीय क्रांतिकारक, दक्षिण-पूर्व आशियातील देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या पाठिंब्याने इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. जेव्हा जपानने ब्रिटिश सैन्याचा पराभव केला आणि आग्नेय आशियातील जवळजवळ सर्व देशांवर कब्जा केला तेव्हा लीगने भारताला ब्रिटिश राजवटीपासून मुक्त करण्यासाठी भारतीय युद्धकैद्यांमधून भारतीय राष्ट्रीय सैन्याची स्थापना केली. ब्रिटिश भारतीय सैन्यात अधिकारी राहिलेल्या जनरल मोहन सिंग यांनी या सैन्याला संघटित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

भारतीय राष्ट्रवादी चळवळीने जपान सरकारला भारताचा मित्र म्हणून पाहिले नाही. त्याची सहानुभूती जपानच्या आक्रमणाला बळी पडलेल्या देशांतील लोकांप्रती होती. तथापि, नेताजींचा असा विश्वास होता की जपानने पाठिंबा दिलेल्या आझाद हिंद फौजेच्या मदतीने आणि भारतामध्ये बंड केल्याने भारतावरील ब्रिटिश राजवट संपुष्टात येऊ शकते. दिल्ली चलो चा नारा आणि जय हिंद च्या घोषणेसह आझाद हिंद फौज देशाच्या आत आणि बाहेरील भारतीयांसाठी प्रेरणास्थान होती. नेताजींनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आग्नेय आशियामध्ये राहणाऱ्या सर्व धर्म आणि प्रांतातील भारतीयांसोबत एकत्र येऊन रॅली काढली.


भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या कार्यातही भारतीय महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली. आझाद हिंद फौजेची एक महिला रेजिमेंट तयार करण्यात आली, जी कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली होती. त्याला राणी झाशी रेजिमेंट असे म्हणतात. आझाद हिंद फौज हे भारतातील लोकांसाठी एकतेचे आणि वीरतेचे प्रतीक बनले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात महान नेत्यांपैकी एक असलेले नेताजी जपानने शरणागती पत्करल्यानंतर काही दिवसांनी विमान अपघातात ठार झाल्याचे वृत्त आहे.

दि. १८ ऑगस्ट १९४५ नंतर सुभाषचंद्र बोस यांचे जीवन आणि मृत्यू हे आजपर्यंत न उलगडलेले रहस्य आहे. १८ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांचे

ओव्हरलोड जपानी विमान कोसळले. ही दुर्घटना जपानच्या ताब्यातील फॉर्मोसा (सध्याचे तैवान) येथे घडली. नेताजी मृत्यूपासून बचावले की नाही हे स्पष्ट नाही. तथापि, त्यांचे बहुतेक समर्थक, प्रामुख्याने बंगालमध्ये या वेळेला निराधार आणि मृत्यूचे कारण म्हणून नकार देतात. सुभाषचंद्र बोस स्वातंत्र्यानंतर, भारत सरकारने तीन चौकशी आयोग स्थापन केले, ज्यापैकी दोन विमान अपघातात त्यांच्या मृत्यूची पुष्टी करतात. १९५४ मध्ये शाहनवाज आयोग आणि १९७० मध्ये खोसला आयोगाने आपापल्या निष्कर्षात नेताजींचा मृत्यू विमान अपघातात झाल्याचे सांगितले होते. परंतु १९९९ मध्ये स्थापन झालेल्या मुखर्जी आयोगाने ते स्वीकारण्यास नकार दिला. तपास इथेच थांबला नाही. उत्तर प्रदेश सरकारनेही एक आयोग स्थापन केला.

सन २०१३ मध्ये उत्तर प्रदेश सरकारने न्यायमूर्ती विष्णू सहाय चौकशी आयोगाची स्थापना केली. गुमनामी बाबा कोण होते आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी त्यांचा काय संबंध होता, हे आयोगाने शोधून काढावे हा त्याचा उद्देश होता. सहाय आयोगाने आपला अहवाल राज्य सरकारसमोर मांडला. अहवालात म्हटले आहे की नेताजी आणि गुमनामी बाबा यांच्यामध्ये निःसंशयपणे अनेक समानता आहेत. पण यावरून गुमनामी बाबा हे नेताजी सुभाषचंद्र बोस होते असे म्हणता येणार नाही. मात्र, गुमनामी बाबा यांच्या मृत्यूनंतर स्थानिक प्रशासनानेही चोख बंदोबस्त ठेवला होता. लष्कर आणि प्रशासनाच्या उच्चपदस्थांच्या उपस्थितीत गुमनामी बाबांचे पार्थिव गुप्तार घाटावर नेण्यात आले आणि कंपनी गार्डनजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. या लष्करी संरक्षित क्षेत्रात सामान्य व्यक्तीचे अंतिम संस्कार करण्याची कल्पनाही निरर्थक असल्याचे लोकांचे म्हणणे आहे. तेव्हापासून आजतागायत तेथे कोणीही अंत्यसंस्कार केलेले नाहीत. नंतर त्याच ठिकाणी त्यांची समाधी बांधण्यात आली.

V



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे



# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे

- इ. स. १ ऑगस्ट १९२० ते इ. स. १८ जुलै १९६९ -

**अण्णा भाऊ साठे यांचे कथा साहित्य हे सामाजिक व वैचारिक परिवर्तनाच्या चळवळीला चालना देणारे एक सशक्त माध्यम आहे. आधुनिक महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत आणि वाणिज्य विकासात अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीने कामगार चळवळीच्या माध्यमातून मानाचे पान महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे. विद्यार्थी व अभ्यासक तसेच समाजातील विविध क्षेत्रातील विचारवंत आजही त्यांच्या साहित्याचा समग्र व संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठीजनांमध्ये मराठी अस्मितेचे स्फुलिंग चेतविण्याचे कार्य अण्णा भाऊ साठे यांच्या लालबावटा कलापथकाने केले.**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे दिनांक १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. अण्णांचे मूळ नाव तुकाराम असे आहे. भाऊराव सिधोजी साठे हे अण्णांचे वडील आणि वालूबाई साठे या अण्णांच्या मातोश्री होत. अण्णांचे वडील भाऊराव साठे हे पोटापाण्यासाठी मुंबईत गेले होते. एकदा ते असेच गावी सुट्टीवर आले असता आईने सांगितले की, तुकारामचा लहान भाऊ शंकर हा तुकारामाला ''तुक्या'' अशी हाक मारतो. भाऊराव साठे यांना ही गोष्ट आवडली नाही. त्यांनी शंकराला जवळ घेतले आणि सांगितले की, ''तुकारामाला असं तुक्या म्हणत नको जाऊ. असा उद्धटपणा बरोबर नाही. तुकारामाला दादा, अण्णा असं काहीतरी म्हणत जा.'' तेव्हापासून तुकाराम साठे यांचे नामकरण अण्णा असे

झाले ते कायमचेच.

वाटेगावच्या गावकुसाबाहेरच्या वस्तीत अण्णा भाऊ साठे यांचे बालपण नदीनाल्यावर पोहण्यात, पांदीमधल्या झाडांवर चिंचाबोरे खाण्यात आणि म ाळरानावर हुंदडण्यात गेले. पाच-सहा वर्षे वयाचे असताना अण्णा भाऊ साठे यांना गावातील शाळेत घालण्यात आले. अण्णा भाऊ साठे पहिल्या दिवशी शाळेत गेले तेव्हा त्यांना इतर पोरांहून वेगळे बसविण्यात आले. ही गोष्ट अण्णा भाऊ साठे यांना खटकली. त्यांनी शिक्षकांना विचारले, ''मला इतर पोरांहून वेगळे का बसविण्यात आले आहे. मला त्यांच्यामध्ये का बसू दिले जात नाही.'' यावर शिक्षक त्यांना दरडावून म्हणाले की, ''तुला त्यांच्या सोबत बसण्याचा अधिकार नाही. तू खालच्या जातीचा आहे. तुला वेगळे बसावे लागेल आणि वर्गातील इतर मुलांसाठी ठेवलेले रांजनातील पाणी तुला पिता येणार नाही.'' शिक्षकांच्या या उत्तराने अण्णा भाऊ साठे खूप नाराज झाले. मधल्या सुट्टीत मुले अण्णा भाऊ यांना चिडवू लागली तेव्हा अण्णा भाऊ साठे यांनी एका मुलास मारहाण केली. ही वार्ता शिक्षकांना समजली तेव्हा अण्णा भाऊ साठे यांना शिक्षक खूप ओरडले.

अण्णा त्यादिवशी खूप उदास झाले होते. त्यांचे कशातच लक्ष लागत नव्हते. त्यांनी आपल्या आईस ही गोष्ट सांगितली पण अशिक्षित आई केवळ अण्णांची समजूत घालू शकली. दुसऱ्या दिवशी अण्णा ठरल्या वेळेनुसार शाळेत गेले. शिक्षकांनी गृहपाठ तपासण्यास सुरुवात केली. ते अण्णा भाऊ साठे यांच्या जवळ आले आणि त्यांनी गृहपाठाची मागणी केली. अण्णा भाऊ साठे यांनी आदल्या दिवशी घडलेल्या घटनेमुळे अस्वस्थ झाल्याने अभ्यासच केला नव्हता. अण्णाने अभ्यास केला नाही, हे शिक्षकाच्या लक्षात आले. आदल्या दिवशी अण्णा भाऊ साठे यांनी वर्गात घातलेला गोंधळ शिक्षकांना ज्ञात होता. त्यांनी तो राग मनात धरून अण्णा भाऊ साठे यांना शिक्षा म्हणून खूप मारले. अण्णा भाऊ साठे त्या मारहाणीने इतके धास्तावले की, त्यांनी दीड दिवसातच शाळा सोडली ती कायमचीच. यानंतर अण्णा भाऊ साठे कधीही शाळेत गेले नाही.

शाळा सोडल्यानंतर अण्णा खूपच उनाड झाले. ते शिक्षण न घेता इतरत्र भटकू लागले. त्यांचे वळण बिघडत आहे, हे त्यांच्या आईने ओळखले आणि अण्णांचे वडील गावी सुट्टीवर आले असताना त्यांना आपल्यासोबत मुंबईला अण्णांना घेऊन जाण्याचा आग्रह केला. त्यानुसार अण्णा भाऊ साठे यांची

स्वारी वडीलांसोबत मुंबईच्या दिशेने निघाली. त्याकाळी दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने व असली तरी त्या साधनातून मुंबईला जाणे त्यांच्या खिशाला परवडणारे नव्हते. त्यामुळे पायी यात्रा आरंभत त्यांनी मुंबई जवळ केली. या प्रवासात अण्णा भाऊ साठे यांनी खंडाळा येथे रेल्वेमध्ये कोळसा वाहण्याचे कामही केले. पुढे ते कल्याणला गेले आणि तेथे मिळेल ते काम करू लागले. दुकानांची नावे अक्षराला अक्षर जोडत ते वाचू लागले आणि येथूनच अण्णा भाऊ साठे यांचा अक्षरप्रवास आरंभला गेला.

एके दिवशी अण्णा भाऊ साठे यांचा चुलतभाऊ ज्ञानेश्वर त्यांना मुंबईत भेटला. त्याने अण्णा भाऊ साठे यांना त्याच्या घरी नेले. ज्ञानेश्वर साठेच्या घरात देव्हारा आणि पोथीपुराणे ठेवलेली होती. अण्णा भाऊ साठे या पोथी पुराणांकडे आकर्षित झाले. सायंकाळी कामाहून घरी आल्यावर ते देवघरातील ग्रंथ वाचू लागले. अण्णा भाऊ साठे यांचे वाचन दिवसेंदिवस वाढत होते. अक्षरांची ओळख आता स्पष्ट झाली होती. शिकण्याची इच्छा असेल तर शाळेच्या भिंतींची पूर्वअट अण्णा भाऊ साठे यांनी अक्षरओळख वाढवत पुसण्यास सुरुवात केली होती. यथावकाश त्यांच्यामधला लेखक आकार घेत होता.

मुंबईमध्ये अण्णा भाऊ साठे चरितार्थासाठी कोळसे वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे करत. कधी हेल्पर म्हणून तर कधी बूटपॉलिशवाला, तर कधी सिनेमा थिएटरमध्ये द्वारपाल अशी विविध कामं करता करता ते नायगाव मिल, कोहिनूर मिल या ठिकाणी कामगार म्हणून लागले. याच ठिकाणी त्यांचा संबंध कामगार चळवळीशी आला. मुंबईतील कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले. त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही अण्णा भाऊ साठे यांनी अनुभवला. १९३६ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी अण्णा भाऊ साठे प्रभावित झाले. त्यांच्या विचारांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ क्रियाशील कार्यकर्ते झाले. अण्णा भाऊ साठे यांनी दोन लग्नं केली. त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या होत. त्यांना एकूण तीन अपत्ये होती - मधुकर, शांता आणि शकुंतला.

स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात मुंबईमध्ये अण्णा भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची

भाषणे त्यांनी ऐकली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कामही ते करीत होतेच; तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलतभावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याविरोधात पकड वॉरंट काढले.

पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा मोठा नावलौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहिरांबरोबर अण्णा भाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले होते. कामगार चळवळीतल्या वातावरणात त्यांची कला बहरली. ते एक लेखक आणि शाहीर बनले. त्यांनी लिहिलेला 'स्टॅलिनग्राडचा पवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. अण्णा भाऊ साठे यांनी सन १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कला पथक स्थापन केले. या पथकाच्या माध्यमातून ते राज्यभर दौरे करत आणि कामगारांना आपल्या हक्कांबाबत जागृत करत. या कला पथकावर सरकारने बंदी घातली. 'अमळनेरचे अमर हुतात्मे' आणि 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या त्यांच्या काव्यरचना १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊ साठे यांनी स्वतःला झोकून दिले होते. अण्णा भाऊ साठे यांनी कला आणि साहित्य या दोन्ही गोष्टींच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आपले योगदान दिले. ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्ड होल्डर होते म्हणून पक्षाने ठरवून दिलेली कामं तर ते करायचेच पण ते एक लेखक आणि कलाकार होते. नाटक, वग, पोवाडे आणि लावण्या लिहून तसेच त्या सादर करून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची मशाल पेटती ठेवली. पुढाऱ्यांच्या भाषणाआधी अमर शेख आणि अण्णा भाऊ पोवाडे, गीत सादर करून जनमानसांत स्फुलिंग चेतवत असत. त्यामुळे या लढ्याला आणखी धार चढली.त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाट्ये आदीं विविध साहित्य प्रकारांचा समावेश होता. 'महाराष्ट्राची परंपरा' ह्या नावाने त्यांनी या चळवळीसाठी पोवाडा लिहिला; त्याचप्रमाणे मुंबई कुणाची? ह्या लोकनाट्याचे महाराष्ट्रभर प्रयोग केले. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजींचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, लोकमंत्र्यांचा दौरा ही त्यांची

अन्य काही लोकनाट्ये जनमानसात खूप गाजली. अण्णा भाऊ साठे यांनी पारंपरिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप देत एक कालातीत स्थित्यंतर मराठी साहित्यात घडवून आणले.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरणारी अशीच आहे. जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह मराठी साहित्य विश्वात अजरामर झाले. अण्णा भाऊ साठे यांनी एकूण पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा ही त्यांची पहिली कादंबरी आहे. फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. वास्तव, आदर्श आणि स्वप्नरंजन यांचे मिश्रण त्या कादंबरीत आहे. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांचे मुख्य सूत्र ठरले. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. वैजयंता, टिळा लावते मी रक्ताचा, डोंगरची मैना, मुरली मल्हारीरायाची, वारणेचा वाघ, अशी ही साताऱ्याची तऱ्हा, फकिरा या मराठी चित्रपटांच्या कथा अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांवर आधारित आहेत. या शिवाय इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही अण्णा भाऊ साठे यांनी लिहिली.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य प्रतिभेने नेहमीच उपेक्षित नायकांचा, दलित आणि श्रमिक यांच्या वेदनांचा धांडोळा घेतला. त्यांचे दैन्य, दुःख आणि उपेक्षा यावर अण्णा भाऊंच्या शब्दांनी न्यायाची फुंकर घातली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते आणि त्यातूनच ''जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव।।'' हे त्यांचे गीत आंबेडकरी चळवळीत खूपच गाजले. अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेल्या लावण्यांमध्ये ''माझी मैना गावावर राहिली'' आणि ''मुंबईची लावणी'' या अजोड आणि अविस्मरणीय ठरल्या. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली पण या चळवळीत असलेल्या नेत्यांना जो संयुक्त महाराष्ट्र अपेक्षित होता तो मिळाला नाही. बेळगाव आणि कारवार हा सीमाभाग महाराष्ट्रात येऊ शकला नाही. ही सल अण्णा भाऊंना लागली. मुंबईतील फाउंटन आणि बेळगाव येथे झालेल्या आंदोलनात शेकडो लोकांनी रक्त सांडूनदेखील आपल्याला संयुक्त महाराष्ट्र मिळाला नाही याचं दुःख त्यांच्या

मनाला झालं आणि त्यातूनच माझी मैना या छक्कडचा जन्म झाला.

अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. ''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून, ती श्रमिक-कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे'' असे सांगत अण्णा भाऊ साठे यांनी स्वत:मधल्या एका बंडखोर विचारवंतांचे दर्शनही मराठी साहित्य विश्वाला घडविले. मानवी जीवनातील संघर्ष, नाटय, दु:ख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते आणि हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणा स्रोत होता. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून त्यांनी उभ्या केलेल्या माणसांत जबरदस्त जीवनेच्छा दिसते. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन मराठी साहित्यिकांची एक प्रतिभासंपन्न पिढी निर्माण झाली.

अण्णा भाऊंची निरीक्षणशक्ती अत्यंत सूक्ष्म होती. त्यांच्या लेखानशैलीतून ती सातत्याने कागदावर उमटली. त्यांच्या लेखनशैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस असा आशयपदर आहे. नाट्यमयता हासुद्धा अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनशैलीचा एक खास गुण राहिला. ज्या विपर्यस्त जीवनातून अण्णा भाऊंनी अनुभव आत्मसात केले, त्यांतील क्षणांचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात ठायी-ठायी प्रत्ययास येतो. अक्षरओळख झाल्यानंतर अण्णा भाऊ साठे यांनी लेखनावरच आपला जीव जडवला आणि मराठी साहित्य विश्वात विपुल असे लिखाण केले.

रशियाच्या 'इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटी'च्या निमंत्रणावरून अण्णा भाऊ साठे सन १९६१ साली रशियाला गेले. तेथील अनुभवांवर आधारित 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले. पुढे कालपरत्वे मात्र दारिद्र्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला प्रकर्षाने आले. मराठी साहित्यातील प्रतिष्ठितांकडून त्यांची उपेक्षा झाली. विपन्नावस्थेत गोरेगाव (मुंबई) येथे त्यांचे निधन झाले. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णा भाऊंवर ११ प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ 'अण्णा भाऊ साठे' अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

V

GREEN WORLD
PUBLICATION

# लेखक गौतम कोतवाल यांनी लिहिलेले ग्रंथ

| |
|---|
| खेडचे शिलेदार |
| कृ षी आयडॉल्स |
| कृषिरत्न |
| कृषी आयकॉन्स |
| झिरो टू हिरो |
| आंबेगावचे शिलेदार |
| माझं आकाश माझी भरारी |
| महाराष्ट्राच्या सुकन्या |
| झेप |
| उडान |
| मराठी पाऊल पडते पुढे |
| खरेखुरे नायक |
| रिअल विनर्स |
| रिअल लाईफ विनर्स |
| याला जीवन ऐसे नाव |
| मराठी पाऊल पडते पुढे न्यू |
| चतुरस्र-रवी चौधरी |
| सहकार भूषण |
| रिअल अचिव्हर्स |
| जोडी तुझी माझी |
| उद्योजक बना |
| अचिव्हर्स |
| न्यू अचिव्हर्स |
| कर्मयोगी |

| |
|---|
| आखाती देशांतील इंडियन आयडॉल्स |
| बँकर्स व्हिजन |
| पाचपुते एक संघर्षगाथा |
| सेल्फ मेड पीपल |
| सेल्फ मेड मॅन |
| अचिव्हर्स ऑफ महाराष्ट्र |
| शुद्ध बीजापोटी |
| न्यू पाथफाईंडर |
| आयकॉन ऑफ महाराष्ट्र |
| आयडॉल ऑफ महाराष्ट्र |
| समर |
| माझी वसुंधरा |
| रणरागिनी- गाथा स्त्री कर्तृत्वाच्या |
| झिरो टू हिरो (न्यू) |
| रिअल अचिव्हर्स (न्यू) |
| कॅप्टन कूल |
| अचिव्हर्स ऑफ महाराष्ट्र २०२४ |
| भरारी |
| युद्ध |
| कॅप्टन कूल (इंग्रजी आवृत्ती) |
| राजेंद्र पवार एक ऊर्जास्त्रोत |
| जनमानसांतील जिल्हाधिकारी |
| आऊट ऑफ बॉक्स |
| केडीएमसी-ओळख जुनी, ध्यास नवा |

Jadhavar®
The Symbol of Success (Since 2014)

"Education for Strength, Intellect & Wisdom"
- Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar

# JADHAVAR GROUP OF INSTITUTES

The foundation provides quality education in the fields of Schools & School of Education, Open University Center, Junior College, International Schools, Law, Management, Arts, Commerce, Science, Computer Science & Nursing. **Jadhavar Group of Institute's** operates under the expert guidance of Educationist **Dr. Sudhakarrao Jadhavar**. The group has one clear mission to deliver quality education to the upcoming generations.

16000+ STUDENTS | 600+ STAFF | 40+ SCHOOLS / COLLEGES | 100%(*) PLACEMENT ASSISTANCE

## LAW
LL.B. / B.A. LL.B.
3 Year / 5 Year
Phone - 9284246664

## MANAGEMENT
NACC Accredited
M.B.A. / P.G.D.M.
Phone - 9356399629
www.adityainstitute.co.in

## NURSING
A.N.M. / G.N.M.
Phone - 8459727432
www.jadhavarfoundations.org

## EDUCATION
NACC Accredited
B.Ed
Phone - 8975054114
www.jgefs.org

## PARAMEDICAL
D.M.L.T. / C.M.L.T.
Phone - 8459727432
www.sjcp.in

## SR. COLLEGE
NACC Accredited
BBA / BBA (CA), BCA / BCS
B.Sc.
Plain | Data Science
Fashion Designing*
Artificial Intelligence & Machine Learning
Cyber & Digital Science
M.Sc.
Computer Application / Computer Science*
B.A. / M.A.
B.Com / M.Com
Phone - 9168274116
www.jadhavarcollegeedu.com

## JR. COLLEGE
11th & 12th Arts Commerce Science
Phone - 9699707324
www.jadhavarjrcollege.com

## SCHOOL
Play Group to 10th SSC Board Eng. Med. / Semi Eng.
Phone - 7888274117 www.paradiseems.co.in
www.jadhavarems.in / www.jadhavarsemienglish.in

## INTERNATIONAL SCHOOL
Play Group to 12th* C.B.S.E. Board
Phone - 8459781648
www.jadhavarcbse.co.in



Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar Educational Campus (1), Narhe, Pune - 41

## YCMOU
B.A. / B.Com. / D.S.M.
M.A. / M.Com.
Phone - 8459763113



Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar Educational Campus (2), Narhe, Pune - 41

Surekhatai Sudhakarrao Jadhavar Educational Campus (3), Vadgaon Bk, Pune-41.

Surekha Institute of Nursing Educational Campus (4), Terkheda, Tal. Washi, Dist. Dharashiv - 25.

Lt. Uddhavrao Tulshiram Jadhavar Educational Campus (5), Dhayari - 41.

Founder President



The Jadhavar Group of Institutes is offering Scholarship to the ward of professionals from Indian Army, Police Force, Fire Brigade, Journalists and Ambulance Driver, providing up to a 50% concession in educational fees for all grades from KG to PG level.
This Scholarship is offered across all branches of JGIs upon completion of Nine years service to society in education.

For more details, please contact
9075344276

Vice President



Connect with us on Social Media
#JadhavarGroupOfInstitutes

**Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar**
M.Com., M.A., L.L.M., M.P.M., D.T.L., D.L.L., & L.W., G.D.C. & A., Ph.D.
President : All India Principal Federation
Ex. Member : Management Council, Savitribai Phule Pune University, Pune.
Secretary General : Maharashtra State Principal Federation
General Secretary : Principal Forum (Savitribai Phule Pune University), Pune.

**Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar**
M.B.A., P.G.D.H.R.M., M.Com., D.H.R. & L., D.C.L., D.CP.L., APCL., CMED., D.L.L. & L.W., L.L.M.
VICE PRESIDENT : Jadhavar Group of Institutes
• Jadhavar Hotel and Developer Pvt. Ltd. • Jadhavar Films
• Jadhavar Real Estates • Shardulrao Sudhakarrao Jadhavar Associates
• Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar Sevakanchi Patsanstha




लेखक -

**प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर**

M.com., M.A., L.L.M., M.P.M.,
D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., PhD.


- **मा. मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- **माजी डीन : वाणिज्य विद्या शाखा ,** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- **सरचिटणीस :** प्रिन्सिपल फोरम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- **सरचिटणीस :** महाराष्ट्र स्टेट प्रिन्सिपल फेडरेशन
- **मा. सदस्य :** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, महाराष्ट्र राज्य
- **अध्यक्ष :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस
- **अध्यक्ष :** ऑल इंडिया प्रिन्सिपल फेडरेशन


GREEN WORLD
PUBLICATION

403 A, Shivai 2, Sr.No. 133/A/1/2, Opp. Indian Oil Pump,
Parvati Paytha, Sinhagad Road, Pune : 411030.
**Mob.:** 98220 30217 • **email :** greenworld932@gmail.com

**मूल्य : रु. ३००/-**

978-93-88856-24-9